PRGI NO-MAHMAR/2023/86554

जागतिक पर्यावरण दिन


समतावादी


# मुक्त संवाद

एक समृद्ध वाचन यात्रा

पत्रिका

जून २०२६ वर्ष तिसरे : अंक १०




Leh
Ladakh
Where Every Road Tells a Story
Nature Tours
DOMESTIC & INTERNATIONAL TOURS
Travel Date:
8th August 2026
Duration:
10 Nights / 11 Days
Destination:
Leh – Ladakh
Why Choose Us?
Trusted Travel Experts
Hassle-Free Planning
Handpicked Stays
24x7 Assistance
DM us "LEH2026"
Contact Now: 9822339466
Limited Seats | Book Early | Best Deals Available

**प्रकाशक, संपादक**
डॉ. विवेक कोरडे

**कार्यकारी संपादक**
शेखर देशमुख

**सल्लागार संपादक मंडळ**
सुलक्षणा महाजन, डॉ. शैलजा बरुरे, लोकेश शेवडे, राजेंद्र साठे, सुजय शास्त्री, सायली परांजपे

**संपादकीय साहाय्य**
सुमेधा कुवळेकर

**व्यवस्थापन सल्लागार**
विकास नाईक

**शीर्षनाम आरेखन**
विजय नार्वेकर

**मुखपृष्ठ**
ब्राझिलियन कलावंत निलहू अझवेदु हिची 'मेल्टिंग मेन' या शिल्पमालेतली पर्यावरण बदलाच्या धोक्याकडे लक्ष वेधणारी लघुत्तम हिमशिल्पे...

**अंकातील छायाचित्रे**
इंटरनेटवरून साभार

**अंक मांडणी, सजावट**
वैभव केसरकर (८५५१८५०४६२)


**व्यवस्थापक**
चंद्रकांत माळगवे (९६१९८२३६७२)

**विनामूल्य वितरणासाठी**
'समतावादी मुक्त-संवाद पत्रिका' हे मासिक मालक विवेक दत्तात्रय कोरडे यांच्या करिता, प्रकाशक विवेक दत्तात्रय कोरडे यांनी जागृती प्रिंटर्स, त्रिमूर्ती ९१, घारपुरे पथ, गिरगाव, मुंबई ४००००४ येथे छापून रूम नं. ४६, पहिला मजला, आंबेडकर सदन, सखाराम बालाजी पवार मार्ग, करीरोड नाका, डिलाइल रोड, मुंबई ४०००१३ येथून प्रसिद्ध केले.
संपादक : विवेक दत्तात्रय कोरडे

'Samatawadi MuktSanvad Patrika' Monthly Publication owned by Vivek Dattatrey Korde Printed at Jagruti Printers,Trimurti 91, Gharpure Path, Giragaon Mumbai 400004 and Published at Room No. 46, First Floor, SakharamBalaji Pawar Marg, Currey Road Naka, Delisle Road, Mumbai 400013
Editor : Vivek Dattatrey Korde
E mail Id- smsp.mumbai@gmail.com

(अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी, प्रतिक्रियांशी अथवा विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# अंतरंग




✶ उपजत भान आणि ज्ञानाचे पर्यावरणपूरक आविष्कार
– पर्यावरण दिन विशेष वृत्तलेख, टीम बाईमाणूस २

✶ रावणाच्या लंकेत... हनुमानाची धडक
– राजा पटवर्धन ७

✶ न्याय आणि समतेचा लढा अपरिहार्य
– डॉ. विवेक कोरडे १२

✶ संविधानाचा आत्मा वाचवण्यासाठी सारे काही...
– श्रीरंजन आवटे १७

✶ परळ ते लिव्हरपूल : अदृश्य धाग्यांचा 'नियतीशी करार'
– हितेश पोतदार २१

✶ इराणच्या आखातात टायटॅनिक फुटणार?
– डॉ. मोहन द्रविड २७

✶ काळोखातले उजेडात...
– रवि आमले ३२

✶ प्रेम आणि द्वेष : हा कल्लोळ भावनांचा
– प्रा. श्रीनिवास हेमाडे ३६

✶ बहुजीववादी जैन तत्त्वज्ञान...
– जगदीश काबरे ४१

✶ दिल्लीवाले हैं हम...
– आशय गुणे ४६

✶ विन्सेंट वॅन गॉफ : वैज्ञानिक अंतर्दृष्टीचा चित्रवंत
– डॉ. आनंद जोशी ५१

✶ कला संचिताचा अक्षय्य ठेवा
– डॉ. मिनाक्षी पाटील ५७

✶ अनाहत नाद निरंतर...
– गणेश मनोहर कुलकर्णी ६१

✶ समाजनिष्ठ चिंतनस्वर
– अमरेंद्र धनेश्वर ६६

✶ मूल्यसंस्कारांचे काव्यसंचित
– डॉ. नेहा सावंत ७०

✶ शब्दकोडं
इंद्रनील सान्याल; अनुवाद : सुमती जोशी ७६

✶ आयुर्वेदिक औषध खरेदी विषयक दक्षता
– डॉ. श्रीराम सावरीकर ८१

# उपजत भान आणि ज्ञानाचे पर्यावरणपूरक आविष्कार

पर्यावरण दिन विशेष वृत्तलेख


सरपंच शारदा मधुकर गायधने-शेंडे, गाव : बेला


मुकेश सोनकांबळे, गाव: भोसगा


'बीज'माता नीलिमा जोरवर, तालुका : अकोले


सरपंच रवींद्र माने, मान्याची वाडी

जंगल, जल आणि जमीन ही कोणत्याही गावाच्या विकासाची त्रिसूत्री आहे. त्याचा साकल्याने वापर केला तर कोणतेही गाव स्वयंपूर्ण होऊ शकते. किंबहुना, या त्रिसूत्रीचा वापर करीत, लोकसहभागातून सातत्याने केलेले श्रमदान, यातून महाराष्ट्रातील अनेक छोट्या गावांचा शाश्वत विकास शक्य झाला आहे. किंबहुना, हे त्रिसूत्र राबवीत सामूहिक पद्धतीने काम केले, तर राज्यातील, देशातील प्रत्येक गावाचा शाश्वत विकास साध्य होऊ शकतो. स्वयंपूर्ण खेड्याचे स्वप्न सत्यात उतरलेले किंवा उतरू पाहत असलेल्या अशा काही मोजक्या गावांना ५ जून रोजी पाळल्या जाणाऱ्या पर्यावरण दिनाच्या पार्श्वभूमीवर 'बाईमाणूस'च्या टीमने प्रत्यक्ष भेटी दिल्या. त्यातून उभे राहिलेले हे आश्वासक चित्र...

'फक्त गटारं आणि रस्ते बनवणं, घरकुल मिळवून देणं, सिमेंटीकरण करणं म्हणजेच गावाचा विकास नाही तर, त्यापलीकडे जाऊन शाश्वत विकासाच्या ज्या काही नऊ संकल्पना आहेत त्यावर सातत्याने काम करणं, त्या माध्यमातून गावातील लोकांचा विकास करणं, समाजाचा विकास करणं म्हणजे खऱ्या अर्थाने गावाचा विकास...'

'बेला' ग्रामपंचायतीला गेल्या वर्षीचा 'राष्ट्रीय पंचायत राज पुरस्कार' जाहीर झाला. त्या गावच्या महिला सरपंच शारदा मधुकर गायधने-शेंडे यांची ही भूमिका. महाराष्ट्रातील भंडारा जिल्ह्यातलं १० ते १२ हजार लोकवस्तीचं बेला हे गाव, आता देशपातळीवर नावाजलं जात आहे. राज्यातील एकूण पाच ग्रामपंचायतींना राष्ट्रीय पुरस्कार घोषित झाला असला, तरी सर्वाधिक चर्चा बेला या गावाचीच आहे.

२०२३-२४ मध्ये 'कार्बन न्यूट्रल गाव' या संकल्पने अंतर्गत गावाने पुरस्कारावर आपलं नाव कोरलं. खरंतर बेला गावाला पुरस्कार नवीन नाहीत. यापूर्वी संत गाडगेबाबा स्वच्छग्राम पुरस्कार, माझी वसुंधरा असे महत्त्वाचे पुरस्कारही बेला ग्रामपंचायतीने पटकावले आहेत. वृक्षतोड, सिमेंटीकरण, इंधन जाळणे, पेट्रोल-डिझेलवर चालणाऱ्या गाड्या या आणि यासारख्या बऱ्याच गोष्टींमुळे वातावरणात कार्बन डायऑक्साइड वायूचे उत्सर्जन होते. कार्बन डायऑक्साइड शोषून घेण्यासाठी वृक्ष लागवड करणे, कचऱ्याचे व्यवस्थापन योग्यरीत्या करणे, कचरा न जाळणे, वीजेवर चालणाऱ्या गाड्या वापरणे आदी उपाययोजनाही करता येऊ शकतात. या सर्व गोष्टींमुळे कार्बन विरहित गाव कदाचित होणार नाही, पण कार्बन संतुलन राखण्यास मदत मात्र नक्कीच होते.

महिला सरपंच शारदा मधुकर गायधने-शेंडे 'बाईमाणूस'शी बोलताना सांगतात, ''आमचं गाव शहरालगत आणि महामार्गावर असल्याने हवेत प्रदूषण होते. हे कमी करण्यासाठी आम्ही कार्बन न्युट्रल समिती तयार केली. त्या माध्यमातून जनजागृती करत पाच घटकांवर काम केले. १) वृक्षारोपण २) प्लास्टिक बंदीचा ठराव ३) ई-व्हेइकल वापरण्यावर भर ४) घनकचरा व्यवस्थापन ५) पारंपरिक वीजेची बचत.

बेला गावातील सर्व शासकीय इमारती सौरउर्जेवर चालतात. गावातील प्रत्येक घरात ओला कचरा, सुका कचरा याचे व्यवस्थितरीत्या वर्गीकरण करून कचऱ्याच्या गाडीत तो टाकला जातो. बेला गावात घन कचरा व्यवस्थापन केंद्रही आहे. ओल्या कचऱ्यापासून खत निर्मिती करून ते गावातल्या शेतात आणि झाडांना टाकण्यात येतं. गावांमध्ये वृक्षलागवड करून प्रत्येक घराला पाच झाडांचं पालकत्व देण्यात आलं आहे. गावात अनेकांनी ई-गाड्या वापरण्यास सुरुवात केली आहे. या सर्व गोष्टींमुळे बेला गाव हे कार्बन न्यूट्रल गाव बनले आहे.''

शारदा सांगतात, गावाने आतापर्यंत जवळपास ९० हजार झाडं लावली. देशी जाती, विदेशी जाती, नर्सरी, अधिक ऑक्सिजन देणाऱ्या वृक्षांची लागवड केली. परिणामी, प्रदूषण कमी व्हायला मदत झाली. प्लास्टिकऐवजी कापडाची पिशवी वापरण्याचे आवाहन ग्रामस्थांना केले. यात कापडी पिशव्या शिवण्याचं काम गावातीलच बचत गटाला दिले गेले. त्या पिशव्या लोकांना तसेच सुपर मार्केटमध्ये देण्यात आल्या. ग्रामपंचायतीकडे असलेल्या सगळ्या घंटागाड्या बाजूला सारून आम्ही इलेक्ट्रिक व्हेइकल आणल्या. त्यासाठी ग्रामपंचायतीत चार्जिंग स्टेशन तयार केले. लोकांना पेट्रोलची किती बचत होते, इलेक्ट्रिक वाहन किती परवडते, हे आम्ही प्रात्यक्षिक करून दाखवून दिले. त्यामुळे काही लोकांना पटलं आणि ते लोक इलेक्ट्रिक व्हेइकलकडे वळले.

**विकासाचे स्वयंनिर्भर पारूप**

वर्ष २०१२ बेला गावात ग्रामपंचायत निवडणूक होणार होती. शारदा मधुकर गायधने या त्यावेळी बचत गटाच्या समन्वयक म्हणून गावात काम करायच्या. भंडारा जिल्हा परिषदेचे माजी सभापती संजय घाडवे यांनी आमच्या पॅनलमधून निवडणूक लढवणार का? असे विचारले. शारदा गायधने-शेंडे सांगतात, ''मी माझ्या घरातली पहिलीच व्यक्ती, जिने ग्रामपंचायत निवडणूक तर लढवली आणि सरपंचही झाली. तेदेखील एकदा नव्हे, तर सलग दोनदा''

शारदा गायधने सांगतात, गावातील समस्या, त्यावरच्या उपाययोजना आणि त्यासाठी लागणारा खर्च या सर्व गोष्टींचा आराखडा काढल्यावर एक गोष्ट लक्षात आली, ती म्हणजे शासकीय निधीच्या भरवशावर गावाचा विकास होऊ शकत नाही. कारण निधी कधी येणार, मग तो अनेक महिने काही कारणास्तव अडकून राहणार. म्हणून मग असं सुचलं की, राज्य शासनाच्या वेगवेगळ्या स्पर्धा आणि पारितोषिकांची रक्कम ही अशी एकमेव गोष्ट आहे की, ज्या माध्यमातून गावासाठी पैसा मिळू शकतो आणि त्या पैशाच्या माध्यमातून गावाचा हवा तसा विकास करता येऊ शकतो.



*ग्रामीण भागाची पाळेमुळे निसर्गाशी घट्ट जोडलेली असतात. त्यातूनच पर्यावरणपूर्वक जगण्याचे भान जपले जाते, प्रगतीच्या वाटा शोधल्या जातात...*

आज बेला गावामध्ये तीन युनिटचे शौचालय चौकाचौकांत आहेत. उन्हाळ्यात पाण्याची कमतरता भासायला नको म्हणून तलावाचे खोलीकरण करून, नाल्यांचे रुंदीकरण करून पाण्याचे व्यवस्थापन केले जाते. तीन नावाजलेल्या सीबीएससी शाळा आहेत. जिल्हा परिषद शाळेची पट संख्या ही ४०० पार आहे. गावात लोकसहभागातून उभी केलेली सर्वांसाठी निःशुल्क अद्ययावत अभ्यासिका आहे. गावातील दरवर्षी किमान दहा मुलं शासकीय नोकरीला लागतात. कुपोषणाचे प्रमाण अगदी नगण्य आहे. गावातील महिलांच्या, किशोरवयीन मुला-मुलींच्या आरोग्यासाठी दर महिन्याला ग्रामपंचायतीच्या माध्यमातून आरोग्य शिबीरही भरवले जाते. हे सगळं फक्त एकट्या सरपंचामुळे नाही तर, लोकसहभागातून घडलं.

शारदा गायधने सांगतात, बेला गावात तब्बल १५१ बचत गट आहेत. या बचत गटांतील सर्व महिलांची मला मदत होते. दर महिन्याला बचत गटांची बैठक असते. त्यामध्ये गावात काय काम करायचे आहे? कोणते अभियान राबवायचे आहे? या सर्व गोष्टींची माहिती बचत गटांद्वारे गावातील महिलांपर्यंत पोहोचवली जाते. त्यानंतर गावातील प्रत्येक माणसापर्यंत पोहोचता यावे, प्रत्येक माणसाच्या समस्या जाणून घेता याव्यात यासाठी ग्रामस्वच्छता समिती, आरोग्य समिती, पर्यावरण दूत समिती, रेशन दक्षता समिती, पाणीपुरवठा समिती, जैववैविधता समिती, बांधकाम समिती, विद्युत ऊर्जा पुरवठा समिती अशा वेगवेगळ्या १५ समित्या गावात तयार केल्या जातात. या सर्व समितीच्या मार्फत गावातील कामांची रूपरेषा ठरवणं असेल, लोकांना मार्गदर्शन करणं असेल ही सगळी कामं होतात.

बेला गावात महिलांच्या आरोग्याबद्दल, स्वच्छतेबद्दल, किशोरवयीन मुलांच्या वाढत्या वयानुसार शरीरात होणारे बदल या सर्व गोष्टीत जातीने लक्ष देऊन याबद्दल योग्य ती जनजागृती केली जाते. गावात ग्रामपंचायत सदस्यांचे पथनाट्याचे गट आहेत. स्वतः ग्रामपंचायत सदस्य गावातील चौका-चौकात पथनाट्य करून जनजागृती करतात. यामध्ये आरोग्य, शेती (हरितक्रांती), प्लास्टिकचा वापर टाळणे (पर्यावरण) इ. विषय असतात.

**ना आमदाराकडे हात पसरले ना खासदाराकडे...**

मी ठरवलं की कोणत्याही आमदार खासदारकडे हात पसरवायचे नाही. कोणाचं मिंधं व्हायचं नाही. माझं एकमेव साधन होतं, ते म्हणजे, वेगवेगळ्या शासनपुरस्कृत स्पर्धा. त्यानुसार संत गाडगेबाबा स्वच्छता अभियानात भाग घेतला. इतर गावांपेक्षा आमचे बेला गाव स्वच्छतेत पहिल्या क्रमांकावर आले. फक्त तालुका स्तरावरच नव्हे, तर जिल्हापातळीवरही. त्यात ६० लाख रुपयांचं पारितोषिक गावाला मिळालं. 'स्मार्ट ग्राम' मध्ये सहभागी झालो, तिथेही भाग घेतला, त्यातही गावाला पारितोषिक मिळालं.

शारदा गायधनेंच्या सरपंचपदाच्या पुढच्या खेपेला २०२३ साली बेला गावाने 'माझी वसुंधरा' या स्पर्धेत भाग घेतला. मात्र यावेळी पदरी अपयश आलं. बेला गावाला फक्त ६०० गुणांक मिळाले होते. 'माझी वसुंधरा' स्पर्धेमध्ये धुळे जिल्ह्यातील बोराडी हे गाव पहिलं आलं होतं. त्या गावाला सरपंच शारदा गायधने आणि सदस्यमंडळी यांनी भेट दिली.

''बोराडी गावात 'माझी वसुंधरा' अभियानांतर्गत त्या लोकांनी कसं काम केलं, एमआयएस (माहित प्रणालीचे व्यवस्थापन) कसा भरायचा या सर्व गोष्टींची आम्ही माहिती घेतली आणि भूमी, अग्नी, वायू, जल, आकाश या पाचही तत्त्वांचा व्यवस्थितरीत्या अभ्यास करून आम्ही कामाला सुरुवात केली. सरतेशेवटी, त्या प्रामाणिकपणाचं फळ आम्हाला मिळालं. 'माझी वसुंधरा' मध्ये

राज्यात दुसरा क्रमांक बेला ग्रामपंचायतीला मिळाला. हे बक्षीस तब्बल १ कोटी २५ लाखांचं होतं.''

शारदा गायधने पुढे सांगतात, जिल्हा परिषदेकडून आम्हाला माहिती मिळाली की शाश्वत विकासाच्या 'नऊ संकल्पना' अंतर्गत ग्रामपंचायतीचे नामांकन करू शकतो. त्यामध्ये आम्ही बेला ग्रामपंचायतीचे नामांकन केले. यातही तीन विशेष संकल्पना होत्या. त्यातील एक ग्राम ऊर्जा, दुसरी कार्बन न्यूट्रल आणि तिसरी संकल्पना होती, नानाचे फडके ग्रामपंचायत. त्यात 'कार्बन न्यूट्रल गाव' यामध्ये बेला ग्रामपंचायत भारतातून पहिली आली. इथपर्यंत पोहचण्यासाठी सर्व गावकरी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी नंदा गवळी, बीडीओ संघमित्रा कोल्हे, ग्रामपंचायतीचे पूर्ण सदस्य, ग्रामविकास अधिकारी या सगळ्यांच्या सहकार्यामुळेच आज बेला ग्रामपंचायतीचे नाव राष्ट्रीय स्तरावर पोहोचले.

**महिलांमुळेच हे शक्य झालं...**

बेला ग्रामपंचायत सदस्यांमध्ये महिलांचे प्रमाण जास्त आहे. आठ महिला सदस्य आणि सहा पुरुष सदस्य आहेत. या महिला सदस्यांमध्ये दोन-तीनच महिला गृहिणी आहेत, बाकी सर्व महिला सदस्य या शिक्षक आणि अंगणवाडी सेविका आहेत. घरातली कामं आणि बाहेरची कामं आवरून सर्व महिला रात्री ग्रामपंचायती मधील कामांना वेळ देतात. बऱ्याचशा ग्रामपंचायतीच्या बैठका आणि ग्रामपंचायतीची कामं या महिला रात्रीच करतात.

शारदा गायधने यांच्या मते, गावात आतापर्यंत विकासाची परिभाषा एकच होती, ती म्हणजे गावातील रस्ते, नाली दुरुस्तीकरण केलं म्हणजे गावाचा विकास झाला. पण, केवळ रस्ते, नाली बनवणं म्हणजे गावाचा विकास नाही, तर वैयक्तिक स्वच्छता, सार्वजनिक स्वच्छता, जलस्रोतांची कामे, तलावाचे खोलीकरण, लोकसहभागातून विविध योजना राबवणं, जैवविविधतेवर काम करणं, गावातील प्रत्येकाला वृक्षाचं पालकत्व देणं, अशा वेगवेगळ्या स्तरावर गावात कामं केली पाहिजेत. फक्त बांधकाम, घरकुल किंवा सिमेंटीकरण न करता, त्याही पलीकडे जाऊन काम करणं म्हणजे, खरा गावाचा विकास.

✸✸✸

## पाणीदार गावाची बाणेदार गोष्ट

''गावाच्या बाहेर असलेल्या विहिरीतून पाणी काढायला मी दररोज चार किलोमीटर चालत जायचे. दिवसातून चार वेळा हेच काम करावं लागायचं, आमच्या गावात जराही पाणी नाही. उन्हाळ्यात तर जगणं लय अवघड जायचं.'' गावातल्या त्रस्त झालेल्या अनेक महिलांच्या या प्रातिनिधिक प्रतिक्रिया!

या महिला दुष्काळग्रस्त जिल्हा असा शिक्का बसलेल्या धाराशिवच्या. याच जिल्ह्यातील लाहोरा तालुक्यातील भोसगा गावाच्या. धाराशिव जिल्ह्यात मांजरा आणि तेरणा या दोन नद्यांची पात्रे जरी येत असली, तरी या गावकऱ्यांना दुष्काळ आणि पाणीटंचाई काहीकेल्या चुकत नाही. याच जिल्ह्यातील लाहोरा तालुक्यातील भोसगा गाव हे दुष्काळाच्या सावटात पुरेपूर अडकलेलं. भोसगा गावाचे २१ व्या वर्षीच सरपंच झालेले तरुण तडफदार मुकेश सोनकांबळे यांना हा प्रश्न कायमच सतावत होता आणि त्यासाठी काय करता येईल याचा ते सातत्याने विचार करीत होते.

**गावातील युवकांचे होकायंत्र**

मुकेश सोनकांबळे सध्या RSCD (रिसोर्स अँड सपोर्ट सेंटर फॉर डेव्हलपमेंट) या संस्थेत पर्यावरण संवादक म्हणून काम करतात. गावातील दुष्काळी परिस्थिती असेल, पाण्याची टंचाई असेल या सर्व प्रश्नांची त्यांना जाण आहे. त्यामुळे सोनकांबळे यांनी अनेक संवाद गटांसोबत गावपातळीवर बैठका घेतल्या, वेगवेगळ्या विषयांवर गावातील लोकांशी चर्चा केली. त्यातली एक बैठक होती, गावातील युवक-युवतींच्या सोबतची. युवा वर्गासोबत हवामान बदल आणि त्याचा महिलांवर होणारा परिणाम यावर त्यांनी एक चर्चासत्र आयोजित केलं होतं. युवावर्गासोबत चर्चा करताना निष्कर्ष निघाला की, हवामान बदलाला कोणते घटक कारणीभूत असतील? तर ते म्हणजे, हळूहळू नष्ट होऊ लागलेली निसर्गातील जैवविविधता आणि जैवविधतेत सर्वात महत्त्वाचा घटक असलेले पाणी. या गोष्टी पुन्हा नव्याने जिवंत करण्यासाठी जलसंधारण आणि भूगर्भातील पाण्याची पातळी वाढवणे गरजेचे होते.

गावातील तरुणांना दुष्काळाच्या परिस्थितीला कारणीभूत असलेले घटक काय आहेत हे तर समजलं होतं. पण त्यावर काम कसं करायचं, हे खूप मोठं आव्हान त्यांच्यासमोर होतं. गावातील सर्व लोकांना परिस्थितीचं गांभीर्य लक्षात आणून देणं, गावातील ग्रामपंचायतीच्या सदस्यांना आणि लोकप्रतिनिधींना परिस्थितीची जाणीव करून देऊन त्यांचा पाठिंबा मिळवणं, यावर मुकेश सोनकांबळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अधिक भर द्यायला सुरुवात केली.

**भोसगा गावाचा जलसंधारण पॅटर्न**

'बाईमाणूस'शी बोलताना सोनकांबळे सांगतात की, दुष्काळी परिस्थिती असल्याकारणाने गावातील तलाव कोरडे झाले होते. तलाव कोरडा पडल्यामुळे तलावातील गाळ उपसा करण्याचे काम काही ट्रक आणि जेसीबीच्या मदतीने सुरू होते. पण हे जे काही गाळ उपसा प्रकरण होतं, ते अर्थातच नियमबाह्य होतं. नियमानुसार तलाव जर गावाच्या हद्दीत येत असेल, तर त्या ग्रामपंचायतीला गाळ उपसा करण्याचा मोबदला मिळतो आणि सोबतच शासनाला देखील त्यातून मोबदला द्यावा लागतो. मात्र इथे तसं घडत नव्हतं.

यावर मग मुकेश सोनकांबळे आणि सहकाऱ्यांना एक कल्पना सुचली. ''तुम्ही हा जो गाळ उपसा करत आहात, त्याचा आमच्या ग्रामपंचायतींना मोबदला देऊ नका, परंतु त्याबदल्यात आमच्या गावातील ओढ्याचे आणि नाल्या-नदीचे सरळीकरण-खोलीकरण करून द्या. तुमच्याकडं जेसीबी आहेत, ट्रॅक्टर आहेत. तो गावाच्या विकासासाठी वापरूया...'' जेसीबीच्या मदतीने गावातील ओढ्याचे आणि नाल्या-नदीचे सरळीकरण-खोलीकरण झाले. नदीपात्र खोल झाल्याने पाण्याच्या प्रवाहावर नियंत्रण मिळवता आले. पिकं वाहून जाणे आणि शेतीयोग्य जमीन वाहून जाणे थांबले. मातीची धूप होत होती ती देखील थांबली, 'मृद संधारण'ही झालं. नदीपात्राची उंची वाढली. पुराचा धोकाही टळला.

भोसगा गावातील राजू मनाले हा युवक 'बाईमाणूस'शी बोलताना सांगतो, गावात फक्त तरुणांसोबतच नाही, तर सहा गटांसोबत मुकेशसरांनी बैठक घेतली. त्यामध्ये गावातील शेतकरी असतील, गावातील भजनी मंडळ असेल, गावातील दलित-वंचित-उपेक्षितांची एक स्वतंत्र बैठक, गावातील लोकप्रतिनिधींची एक वेगळी बैठक आणि गावातील युवक-युवतींची एक वेगळी बैठक अशा सहा गटांमध्ये बैठक घेतली होती.

गावातील युवतींनी गावातील बचत गटांच्या बैठकांमध्ये जाऊन महिलांना वारंवार जैवविविधतेचं महत्त्व पटवून दिलं. जलसंधारण झालं तर पाण्यासाठी करावी लागणारी पायपीट थांबेल हे पटवून दिलं. युवकांचं म्हणणं गावातील प्रतिनिधींना आणि लोकांना ही पटलं. बघताबघता सर्व गाव युवकांच्या पाठीमागे उभं राहिलं.

गावातील जे वंचित घटक आहेत, जी शेतमजुरी करतात, ज्यांचं हातावर पोट आहे त्यांना दुष्काळात ३-४ किलोमीटर पायपीट करूनच स्वतःची तहान भागवावी लागायची. पण, या जलसंधारणच्या कामामुळे गावातील वंचित घटकाला थोडा का होईना पण दिलासा मिळाला.

***

## हे गाव लई न्यारं, हितं 'सौर उर्जेचं' वारं

गावखेड्यातील परिस्थिती पाहून उद्विग्न होत कवी ना. धों. महानोर यांनी त्यांच्या एका कवितेत प्रश्न केला होता, ''खेड्याकडे चला, कोणासाठी, कशासाठी?'' मात्र 'बाईमाणूस'च्या टीमने पाहिलेलं गाव बघून महानोरांची हतबल मनःस्थिती निश्चितच दूर होऊन 'गड्या आपुला गावच बरा' अशी झाली असती.

सातारा जिल्ह्यातील कराड - ढेबेवाडी रस्त्यावर मालदण फाट्यावरून उजवीकडे जात राहिले की, आपल्याला डोंगरउतारावरील चिखलगाळ सोबत घेऊन दुथडी भरून वाहणारी वांग नदी लागते. वांग ही कृष्णेची उपनदी ओलांडून उजव्या बाजूला गेलो, की काही किमी अंतरावर ग्रामपंचायतीचे प्रवेशद्वार आपल्या स्वागतासाठी सज्ज असते. समोर गर्द हिरव्या झाडीत लपलेला डोंगर, आसपासच्या डोंगर परिसरातून मोरांच्या केकाटण्याचा येत असलेला आवाज, नुकताच पडून गेलेला पाऊस, ऊन-पावसाचा सुरू असलेला खेळ अशा रम्य वातावरणाच्या साक्षीने, कमानीतून आत गेल्यावर आपण पोहोचतो महाराष्ट्राच्या पहिल्या सौर गावात, म्हणजेच मान्याचीवाडी या गावात.

**'माझी वसुंधरा' अभियानात एक कोटींचे बक्षीस**

मान्याचीवाडी हे छोटंसं गाव. गावची लोकसंख्या जवळपास ४२० कुटुंबांची. बहुतांश गावकऱ्यांनी भाकरीचा चंद्र शोधण्यासाठी मुंबईची वाट धरली आहे. मात्र त्यांनाही आता 'गड्या आपुला गावच बरा' असे म्हणण्याची वेळ आली आहे. कारण गेल्या काही वर्षांत मान्याच्या वाडीने अवघ्या राज्याचे लक्ष वेधले जाईल अशी कामगिरी केली आहे.

राज्य शासनाच्या अनेक पुरस्कारांचा बहुमान मिळवलेली ग्रामपंचायत असा या वाडीचा लौकिक सर्वदूर आहे. साधारण चार वर्षांपूर्वी महाराष्ट्र राज्याने, पर्यावरण संवर्धनासंबंधी 'माझी वसुंधरा' नावाचे एक अभियान सुरू केले. मान्याची वाडी ग्रामपंचायतीने हे अभियान अतिशय मनःपूर्वक गावात राबवले. त्याच्याच माध्यमातून वाडीला सलग दोन वर्षे पुरस्कार मिळाले. दोन्ही वेळा पन्नास पन्नास लाख इतकी रक्कम बक्षीस स्वरूपात

(पान ८५ वर)

# रावणाच्या लंकेत... हनुमानाची धडक



राजा पटवर्धन

पुनर्शोध रामायणाचा





सकाळ होता होता एक विचार मनात आला. ''या रावणालाच मारुन टाकतो. नको नको... याला उचलून समुद्रापार करून रामासमोर उभा करतो. नको, संपातीच्या तोंडी वाटिका शब्द होता. अशोक वाटिका ती शोधून काढू या.'' वसू, रुद्र, आदित्य, मरुद्गण, अश्विनी कुमारांना नमस्कार झाला. आता निराशा संपलीच. राम–लक्ष्मणाला नमस्कार केला. सीते, तुला नमस्कार म्हटल्यावर, तर स्फुरण चढले. रूद्र, इंद्र, यम, वायू चंद्र, अग्नी, सुग्रीव सर्वांना मनोमनी नमस्कार करून सर्व दिशांकडे पाहून हनुमानाच्या अशोक वाटिका मिशनास सुरुवात झाली...

सूर्योदय ते सूर्यास्त या एका दिवसात योजनेप्रमाणे उड्डाण पूर्ण झाले. आता वानर रुपात लंकेचा फेरफटका मारणे हा मुख्य उद्देश होता. मोठमोठी धनुष्ये धारण केलेले राक्षस पहारेकरी जागोजागी तैनात होते. लंकापुरीभोवती सोन्याचा तट होता. महाद्वारे सोन्याने मढवलेली होती. देवांचा महाकारागीर विश्वकर्म्याने जणू एका सुंदर स्त्रीलाच घडवले होते. कैलासावरची अलकापुरी आणि पाताळातली भोगवती तशीच ही लंकापुरी होती. महाबलाढ्य रावणासमोर देवांचाही निभाव लागणार नाही. रावणाने अनेक वेळा स्वर्गावर स्वारी केली. देवांचा पराभव केला. मग देवांनी का नाही, एकदाही लंकेवर स्वारी केली? (हेलिकॉप्टरवरुन देवांचे कमांडो का नाही लंकेत उतरु शकले?) हाच प्रश्न हनुमानालाही पडला होता.

''अशी आणि इतकी ही नगरी सुरक्षित आहे. राम जरी स्वतः आले तरी ते काय काय करतील? या नगरीत प्रवेश करायचा झाला तर अंगद, नील, सुग्रीव व मी याशिवाय ही उंच तटबंदी ओलांडून आणखी कुणीही जाऊ शकेल, असे मला दिसत नाही. पण हा पुढचा विचार झाला. सीतेचा शोध हीच त्वरित करण्याची गोष्ट आहे. मी तरी कसा प्रवेश करू? एकटा मी आणि समोर संपूर्ण राक्षस सेना असा हा सामना आहे. या क्रूर राक्षसांपासून आधी सावध राहायला हवे. जवळ जवळ अदृश्य होऊनच नगरीत प्रवेश करायला हवा. गुप्त राहून इतके लहान रुप घेऊ तरी कुणाचे? एकट्या जानकीचीच भेट घ्यायची हेही अवघडच काम आहे.'' हनुमानाचे विचार- स्वगत मनात सुरू होते. आणखी एक जबाबदारी होती ती म्हणजे, मी एक विवेकी दूत आहे. याचे भान ठेवणे.

**चढाईआधीची महागर्जना**

एकच उपाय सुचला. लंकेत रात्रीच प्रवेश करायचा. मशकाचे (डासासारख्या कीटकाचे) रुप घेतले, तर रात्री प्रवेश करता येईल. ही नगरी तर गंधर्वनगरीहूनही श्रेष्ठ आहे. प्रत्येक प्रासादाचे खांब सोन्याचे. रत्नजडित फरशा. सर्व दरवाजे सोन्याचे. जानकीला कुठे शोधू? विषण्ण वाटू लागले. चंद्राचे लख्ख चांदणे तर आपल्याच मदतीला आले आहे, असे म्हणत त्रिकूटाच्या शिखरांवर तो पोहोचला. सभोवती सागर पसरलेला. सोनेरी तटावर जाऊन बसला. या नगरीवर बाहेरून हल्ला कसा करणार? कोण करणार? त्याने बोटे घालून वीरांची मोजणीच केली. ''अंगद, मैंद, द्विविद, सुग्रीव, कुशपर्वा, जांबवान, आणि मी.'' सातच झाले. राम-लक्ष्मण यांच्या पराक्रमाची झलक त्याने पाहिली होती. संपूर्ण नगरीचा फेर फटका झाला. लंकादेवीने हनुमंताला प्रवेशद्वाराबाहेर पाहिले. ती नगरीची अधिष्ठात्री होती. ती लंकेश्वरी राक्षसी रुपाने प्रकटली. ''अरे वनचरा! तू कोण आणि इथे का आलास? अरे वानरा! या नगरीचे रक्षण रावणाची मोठी सेना करते. तुला या नगरीत प्रवेशच शक्य नाही.'' मी सर्व प्रश्नांची उत्तरे देईन पण तुझा परिचय दे. या महाद्वारासमोर उभी राहिलेली तू कोण आहेस? तू माझ्याकडे राग आणि तिरस्काराने का पाहतेस? लंका देवी क्षुब्ध झाली. ''मी रावणाची आज्ञाधारक सेविका आहे. मी कोणाचेही आक्रमण परतवून टाकीन. तू या नगरात शिरूच शकणार नाहीस. तुझा मृत्यू माझ्या हातूनच होईल.'' हनुमान क्षणात भीमरुपाने तिच्यासमोर उभा राहिला. ''मी लंका नगरीचे वैभव ऐकून होतो. प्रत्यक्ष पाहण्याची उत्सुकता होती. जिज्ञासा होती. माझा पराभव करूनच तुला तुझी जिज्ञासा पुरी करावी लागेल.'' ''हे भद्रे! मी आतले वैभव पाहीन, आल्या पावली परत जाईन.'' लंका देवीने प्रचंड गर्जना करुन हनुमानाला जोरदार थप्पड मारली. (सुंदरकांड-वा. रा. सर्ग ३/३८-४०) त्याने महागर्जना केली. एक ठोसा तिला लगावला. स्त्रीला आणखी मारायला तो धजला नाही. पहिल्याच ठोशात ती भूमीवर पडली. विक्राळ तोंडाच्या स्त्रीची त्याला दया आली. ती लंकादेवी त्याला शरण आली. गर्व नष्ट झाला. ''हे महाबली वीरा! मला आणखी मारू नकोस. तू मला जिंकले आहेस. आता माझे ऐक'' मला ब्रह्मदेवाचे वरदान प्राप्त होते. जेव्हा कुणी वानर स्वबळावर तुझा पराभव करील, तेव्हा लंकेतील राक्षसांवर घोर संकट येणार आहे असे समज. तू माझा पराभव केलासच. सीतेच्या कारणाने रावण सर्व राक्षसांसह मारला जाणार आहे. तू आता लंकेत प्रवेश कर. तुझे कार्य पूर्ण कर. हे वानरा, ही सुंदर नगरी अभिशापाने नष्ट झालीच आहे, असे मी समजते. तू आता प्रवेश कर. सती सीतेचा शोध घे.''

**सूक्ष्मरुपी हनुमान**

सुवर्ण भिंत ओलांडून हनुमान महामार्गावरुन चालू लागला. मोठमोठ्या सदनातून शंखनाद ऐकू आले. पुढे जातो तो वेद घोष कानावर पडत होते. विविध वाद्यांचे आवाज आणि मंत्र घोष सुरु होते. नंतर स्तोत्रे म्हणण्याचे आवाज. हनुमान मुद्दाम थांबला. स्तोत्रे कुणासाठी गायिली जात आहेत? ती खुद्द लंकापती रावणाची महती गाणारी स्तोत्रे होती. एका चौकात



*हनुमानाने प्रवेशद्वारावर उभ्या अक्राळविक्राळ लंकादेवीचा पराभव केला, तेव्हाच लंकेवर येणारे संकट निश्चित होते. लंकेतल्या राक्षसांना मिळालेले शाप-वरदान रावणाच्या निःपाताशी जोडलेले होते...*

गर्दी दिसली म्हणून हनुमान पाहू लागला. त्यात हेर होते. दीक्षा घेतलेले ब्राह्मण होते. जटाधारी होते. गायीचे कातडे पांघरलेले, तर कुणी मृगजीन पांघरलेले. हनुमान पुढे जात राहिला. समोरून नग्न राक्षस आले. नंतर शस्त्रधारी राक्षस दिसले. विद्रूप, विक्राळ, विचित्र चेहऱ्याचे राक्षस दिसले. त्यात काही तेजस्वी सुंदरही होते. रावणाचे अंत:पूर दिसले. त्याचे द्वार सोन्याचे. त्रिकुट पर्वताच्या शिखरावर रावणाचा प्रासाद होता. त्याच्या सभोवती खंदक होता, खंदकात कमळे होती. पुन्हा एक खास तटबंदी होती. चार दातांचे हत्तींचे कळप, सजवलेले घोडे असा सर्व थाट होता. हनुमान सूक्ष्मरुपाने आत गेला. आत आणखी एक सोन्याची तटबंदी होती. मांस भोजन करणारे राक्षस होते. मद्याच्या नशेत बडबडत होते. राक्षस स्त्रिया मद्यधुंद होत्या. कित्येक राक्षसी कांतिमयी तेज:पुंजही होत्या. त्याने अनेक घरांत प्रवेश केला तरी सीता कशी ओळखायची? हा प्रश्नच होता. त्रैलोक्यात अद्वितीय असे रुप त्याला कुणा स्त्रीचे दिसले नाही. पतिविरहाने विदीर्ण झालेल्या चेहऱ्याची, सुवर्णकांतीची कुणी स्त्री दिसली नाही. हनुमानही दु:खी झाला. त्याची चिंता वाढली. तो थेट रावणाच्या भवनात शिरला. सोन्याची तटबंदी होतीच. सोन्याची दारे, रत्नांकित मण्यांची सात मजली घरे होती. सुरक्षा रक्षकांची मजबूत कडी होती. (झेड सिक्युरिटी) हत्तीवरचे माहुत पहारेकरी होते. सदनात अलंकृत स्त्रियांचा वावर होता. बिभीषण, प्रशस्त, कुंभकर्ण सर्वांच्या घरात प्रवेश करून झाला. अन्य अनेक राक्षसांची घरे धुंडाळून झाली. त्याला कीटक स्वरुपात कुणी ओळखण्याची शक्यताच नव्हती. प्रत्येक घर वैभवसंपन्न होते, पण कुठेही जानकी दिसली नाही! तो पुन्हा एकदा रावणाच्या मोठ्या सदनात घुसला. अनेक राक्षसींच्या सान्निध्यात एकमुखीच रावण दिसला. पहारेकरी सैनिक राक्षसांची चिलखतेही सोन्याची होती. कुबेराच्या भवनापेक्षाही रावणभवन संपन्न होते. सोन्याच्या पालख्या, सोन्याचे पलंग, सर्व काही होते पण राम पत्नी सीता कुठे नव्हतीच.

**वाल्मिकींचा गुगली**

सीतेच्या शोधार्थ तो फिरत होता, त्याची नजर एका सोन्याने मढवलेल्या भल्यामोठ्या विमानाकडे गेली. प्रचंड आकाराचे, भूत-पिशाच्यांच्या सुरक्षाकवचाने वेढलेले, विश्वकर्माने खास ब्रह्मदेवासाठीच बनवलेले ते 'पुष्पक' विमान होते. ब्रह्मदेवाने ते देवधनपती कुबेराला तपश्चर्येचे वरदान म्हणून दिले. रावणाने कुबेराला युद्धात हरवून तेही पळवले. त्याचा आकार मालकाच्या इच्छेप्रमाणे बदलू शकतो. ते वायुवेगाने फिरते. आकाशात स्थिर राहू शकते. मालकाच्या आज्ञेने सुरू होते. म्हणजे, मालकाची आज्ञा हेच इंधन. तरीही वाल्मिकींनी गुगली टाकलेला आहे. कधी खेचरे, गाढवे यांची नावे विमानाशी जोडलेली आहेत. एकदा हंसही येतो. पर्वतालाच पंख असतात, तर प्राणी-पक्ष्यांना हवेत सारथी, वैमानिक बनवले तर काय बिघडते? महाकवींना एवढे स्वातंत्र्य नको का?

पुष्पक रत्नजडित होते. हनुमानाने तेही तपासले. मैथिली रामपत्नी तिथेही नव्हती. रावणाचे भवन एक योजन लांब अर्ध योजन रुंद होते. सुमारे १८००० एकर जागा व्यापली होती. (अमेरिकेचे अध्यक्ष राहतात, ते व्हाइट हाऊस केवळ १८ एकर, इंग्लंडचा राजा-राणीचा बकिंगहॅम राजवाडा जेमतेम ४० एकर. बडोद्याच्या गायकवाडांचा १८९० साली बांधलेला लक्ष्मी विलास राजवाडा सुमारे ७०० एकर, भारताचे राष्ट्रपती भवन ३३० एकर, त्यातली राहण्याची जागा ५ एकर, मग कैलासावरचा कुबेर किंवा इंद्राचा राजवाडा किती क्षेत्रफळाचा? संशोधनाचा विषय आहे.) रावणाच्या महालात स्वर्गापासून

पृथ्वीवरच्या हजारो तरुण स्त्रिया अंत:पुरात होत्या. कुबेर किंवा इंद्राकडे याहून काहीच अधिक नव्हते. रावणाच्या अंत:पुरातही हनुमानाने राक्षस स्त्रियांचे गलिच्छ चाळे पाहिले. राक्षस स्त्रिया एकमेकींच्या मिठीत हनुमानाला पाहाव्या लागल्या. आपल्या नैष्ठिक विशुद्ध ब्रह्मचर्याचे पुण्य असल्या दर्शनाने क्षीण तर नाही ना होणार? अशी शंका हनुमानाच्या मनात आली. पाप लागायला मनात कोणताच विकार उत्पन्न झालेला नाही. माझे मन देवकार्यात गुंतलेले असताना पुण्यक्षय कसा होईल?

**श्यामलवर्णी, तांबूस डोळ्यांचा...**

पाहता पाहता रावणाचा उंच वेदीवरचा उत्तम पलंगही दिसला. रावण झोपलेला होता. शामलवर्णी. मद्यपान केल्यामुळे किंचित उघडे डोळे तांबूस दिसत होते. हनुमानाला त्याची दहा तोंडे दिसलेली नाहीत. (तो केव्हा दशानन किंवा दशग्रीव असायचा? प्रसंगाप्रमाणे मेरी मर्जी!) रावणाच्या दर्शनाने हनुमान उद्विग्न झाला. या सर्वांहून अलग अशा एका रुपवतीला हनुमानाने पाहिले. विलोभनीय मुखकमलाची, सुवर्ण कांतीची अंत:पुराची देवताच वाटली. तीच सीता असावी असे हनुमानाला वाटले. सर्व श्रमांचे सार्थक झाले, असेही त्याला क्षणभर वाटून गेले. प्रत्यक्षात ती मंदोदरी होती. सीता विरहाने शोकमग्न झालेली असणार. ती सुखाने कशी झोपू शकेल? हा विचार मनात आल्यावर, तिला जेवण तरी कसे जाईल? ती असल्या अंत:पुरात दिसणेच शक्य नव्हते. सीतेचा शोध सुरुच होता. पापी रावणाचे दर्शन हेच मुळी पाप घडले आहे. सीता अंत:पुरात नाहीच नाही. देवकन्या होत्या. गंधर्व कन्या होत्या. नागकन्या होत्या, पण तिथे जनककन्या नव्हती!

वैरी न चिंती ते मन चिंती? सीता आता जिवंत तरी आहे का? असाही विचार हनुमानाच्या मनाला चाटून गेला. म्हणजे, माझा समुद्र उल्लंघण्याचा प्रयत्न व्यर्थ ठरणार? आता सुग्रीवासमोर उभा तरी कसा राहू? तो मला कठोर दंड करील. पण हनुमान हताश-निराश होऊच शकत नाही! आतला आवाज स्पष्ट ऐकू आला. म्हणून शोध चालूच ठेवतो. तरीही मन काही शांत होत नव्हते. रामाचा बाण कधी पाठून येईल, अशी भीती वाटून रावण गडबडून गेल्यामुळे सीता समुद्रात तर पडली नसेल? नाना शंका कुशंका! राक्षसींनी तिला फस्त तर केले नसेल? तिने आत्महत्या तर नाही केली? नाही ते शक्य नाही! जेवढे म्हणून नकारात्मक विचार शक्य होते, ते सर्व मनात येऊन गेले. मात्र, सीतेचा शोध लावीनच लावीन. हा दृढनिश्चय कायम होता.

**अखेर सीतेचे दर्शन झाले...**

ती एक रात्र अशी सरली. सकाळ होता होता एक विचार मनात आला. ''या रावणालाच मारुन टाकतो. नको नको... याला उचलून समुद्रापार करून रामासमोर उभा करतो. नको, संपातीच्या तोंडी वाटिका शब्द होता. अशोक वाटिका ती शोधून काढू या.'' वसू, रुद्र, आदित्य, मरुद्गण, अश्विनी कुमारांना नमस्कार झाला. आता निराशा संपलीच. राम-लक्ष्मणाला नमस्कार. सीते, तुला नमस्कार म्हटल्यावर तर स्फुरण चढले. रूद्र, इंद्र, यम, वायू चंद्र, अग्नी, सुग्रीव सर्वांना मनोमनी नमस्कार करून सर्व दिशांकडे पाहून अशोक वाटिका मिशनास सुरुवात झाली. दृश्य-अदृश्य सर्वांस नमस्कार करून झाले. त्याने सर्व सिद्धी प्राप्त होवोत अशी प्रार्थना केली. सीतेला कधीही न पाहिलेला हनुमान म्हणतो, चंद्रासारखे मुख, सरळ नाक, स्वच्छ दात, नितळ चेहरा, मंद हास्य, कमल नयनी, आर्या तपस्विनी सीतेचे मुख मला कधी दिसेल? रावणाचा महाल मागे टाकून तो अशोक वनापर्यंत गेला. फुलांनी डवरलेले अगणित वृक्ष पाहून हनुमान खूश झाला. या सौंदर्यात भर घालणारे विविधरंगी पक्षी दिसले. हनुमानावर पुष्पवृष्टीच झाली. संपूर्ण भूमी पुष्प शृंगाराने नटली. हनुमान बसला रे बसला की सर्व फुले खाली पडत. हनुमानाच्या उड्यांमुळे हे घडत होते. सोने, चांदी आणि रत्नांनी मढवलेल्या पायऱ्या एका विहिरीकडे जात होत्या. या वाटिकेत विश्वकर्माची निर्मिती स्पष्ट दिसत होती. भरगच्च पानांनी भरलेल्या शिंशपा (अशोक वृक्ष, सुंदरकांड, १६/१९) वृक्षावर हनुमान पोहोचला. सभोवती चंपक, चंदन, बकुळ वृक्ष दिसले. कमळांनी भरलेले सरोवरही दिसले. (अमेरिकेतल्या फ्लोरिडा गार्डनची कल्पना ज्याला सुचली, त्याने रामायण निश्चित वाचलेले असणार!) हनुमानाला स्वर्गातील नंदनवनात आपण आहोत, असे वाटले. हजार खांबांचे एक मंदिर दिसले. प्रवाळाच्या पायऱ्या, सोन्याचे ओटे दिसले.

आणि अचानक राक्षसिणींच्या पहाऱ्यात अशक्त, दीन, नि:श्वास टाकणारी स्त्री दिसली. बारीक चंद्ररेखेप्रमाणे कृश असूनही अग्नीच्या ज्वालेसमान दिसत होती. रेशमी पिवळे वस्त्र नेसलेली मंगळग्रहाने पीडित झालेल्या रोहिणी नक्षत्राप्रमाणे क्षीण झाली होती. सतत अश्रूधारा वाहात होत्या. दु:खात बुडालेली व्यथित. विद्रूप राक्षसिणींच्या वेढ्यात होती. हनुमानाला तर्काधारित मथितार्थ काढायचा होता. तपस्व्याचे

सोंग घेऊन रावणाने पळवून नेलेली हीच ती सीता असावी. हिच्याच कांतीच्या तेजाने दिशा उजळल्या आहेत. ही पद्मलोचना आहे. हनुमानाने दुसऱ्या कोनातून निर्णयाप्रत जाण्यासाठी फांदी बदलली.

गुडघ्यात मान घालून अंग चोरून ती बसली होती. विनाकारण कीर्ती कलंकित झालेली, राम विरहाने व्यथित राक्षस पीडित दुर्बल होती. पहाऱ्यातल्या राक्षसिणींकडे ती कधीही पाहत नव्हती. मात्र, तिने सर्वत्र नजर फिरवण्यासाठी मुख बाहेर काढले. फारसे अलंकार अंगावर नव्हते. तिचे मन गोंधळलेले दिसत होते. हीच ती सीता, हा तर्क हनुमानाने पक्का केला. रामाचे कार्य पार पडल्याचा हनुमानाला आनंद झाला. मनात त्याने रामाशी संवाद केला. रामाचे सर्व पराक्रम त्याने मनाशी घोकले. सीतेचा शोक पाहून सर्व अशोक वृक्षही शोकग्रस्त दिसत होते. हनुमान अशोक वृक्षावर गुप्तपणे बसून राहिला. त्याच वृक्षाच्या बुंध्याला टेकून बसलेली स्त्री हीच मृगनयनी सीता होती.

तेवढ्यात हनुमंताच्या कानावर वेदमंत्र पडले. मंगल वाद्यांच्या स्वरांनी रावणाला उठवले गेले. रावण कायम सीतेचाच विचार करत होता. तिच्याविषयीच्या आसक्तीने तो कामांध झालेला होता. रावण उठताच थेट अशोक वनाकडेच निघाला. शंभर स्त्रिया त्याच्या पाठोपाठ चालत होत्या. त्यांच्या हाती सुवर्णाचे तेवते दिवे होते. सीतेच्या बाबतीत काम विव्हल झालेला रावण अशोकवाटिकेत प्रविष्ट झाला. त्या राक्षसाला पाहताच सीता थरथर कापू लागली. सर्व अंग आक्रसून हातांनी झाकून दीनपणे रडू लागली. दु:खातूर सीतेने कुलदेवतेला प्रार्थना केली. रामचंद्राच्या हातून रावणाचा पराभव होवो... (सुंदरकांड, वा.रा.सर्ग १९/२१)

**ही लेखमाला मूळ वाल्मिकी रामायणावरून बेतली आहे. रामायणातल्या घटना-प्रसंगांचा अर्थ-अन्वयार्थ लावताना, सादरीकरणात खेळकरपणा आणण्यासाठी आधुनिक प्रतीके-प्रतिमा-घटना-कृतींची जोड देण्यात आली आहे. हेतू हा की, रामायणकालीन घटनांचा आजच्या संदर्भाने वाचकांना सुलभपणे अर्थ लागावा.**


**- संपादक**

**राजा पटवर्धन हे विज्ञान, समाज, अर्थशास्त्र आणि संस्कृतीचे अभ्यासक आहेत. कोकणातील विकास प्रकल्पांवर यांनी सातत्यपूर्ण लेखन केले आहे. यांचे 'पुनर्शोध महाभारताचा' हे पुस्तक प्रकाशित आहे.**

**संपर्क : ९८२००७१९७५**

**अक्षर प्रकाशनाचं नवं पुस्तक...**

**आधुनिक भारताचे शिल्पकार :**
**पंडित जवाहरलाल नेहरू**
जगदीश काबरे




**हे पुस्तक केवळ विरोधकांना भानावर आणण्यासाठी किंवा नेहरू विरोधकांचा तर्कशुद्ध, वस्तुनिष्ठ प्रतिवाद करण्यासाठी नसून पंडित जवाहरलाल नेहरूंचे बहुआयामी जीवन आणि विचारविश्व उलगडून दाखवण्यासाठी आहे. यातून नेहरूंना आजच्या सामाजिक आणि राजकीय वास्तवाशी जोडण्याचा प्रामाणिक प्रयत्न लेखकाने केला आहे. या तेजस्वी योध्याची आधुनिकता आणि विज्ञाननिष्ठा, धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद आणि समाजवादी लोकशाहीशी असणारी कटिबद्धता लेखक जगदीश काबरे यांच्या या पुस्तकातून अधोरेखित झाली आहे. नेहरूंची पुनर्भेट अनेक संदर्भासह त्यांनी घडवून आणली आहे, ही या पुस्तकाची जमेची बाजू आहे.**

**- डॉ. शमसुद्दिन तांबोळी (अध्यक्ष, मुस्लीम सत्यशोधक मंडळ)**

**किंमत रु. ३००/-**

अक्षर प्रकाशन ऑर्चिड रोड मॉल, रॉयल पाम, 'बी' विंग, युनिट नं. २३५, सर्वे नं. १६९, आरे कॉलनी, गोरेगाव (पू), मुंबई-६५ फोन : ९३२२३९१७२० email : aksharprakashan@gmail.com

# न्याय आणि समतेचा लढा अपरिहार्य



डॉ. विवेक कोरडे

**विरोधी बाकावरून**




*'नीट' पेपरफुटीविरोधातला युवकांचा आक्रोश आणि सत्ताधाऱ्यांचे मौन...*

**काँग्रेसच्या तथाकथित अल्पसंख्यांक मुस्लिमांच्या लांगुलचालनाला प्रत्युत्तर म्हणून भाजपने हिंदू बहुसंख्यांकवादी राजकारणाचा विध्वंसक खेळ मांडलेला आहे. संस्कृती, धर्म, एक ना अनेक मंदिरे यात जनतेला अडकवून न्याय, समता आणि बंधुत्वाच्या लोकशाही तत्त्वाला तिलांजली देण्याचे काम शीर्षस्थ नेतृत्वाखाली सुरू आहे. आपण काहीतरी मोलाचे, महत्त्वाचे गमावतोय याचे भानही बहुसंख्यांकवादी राजकारणात सामील झालेल्यांना नाही. राष्ट्रनिर्मात्यांनी स्वातंत्र्याच्या पहाटे दिलेले लोकशाही राष्ट्राचे वचन मोडून काढण्यासाठी सगळ्या यंत्रणा खुलेआम राबवल्या जात आहेत. यात केवळ विरोधी पक्षांचे, वैचारिक विरोधकांचे अस्तित्वच पणाला लागलेले नाही, तर लोकशाही राष्ट्राचेच अस्तित्व पणाला लागलेले आहे. ते टिकवण्यासाठी समतेच्या अहिंसक लढ्याला पर्याय नाही...**

‘‘बच्चा बच्चा राम का, जन्मभूमी के काम का’’, ‘‘सौगंध राम की खाते है मंदिर वही बनायेंगे’’ अशा आणि ज्या या लेखात लिहायला हात धजणार नाहीत, अशा घोषणा देत फिरणारे उन्मादी जत्थे १९९० च्या आसपास अनेकदा पाहावयास मिळायचे. देशाच्या साऱ्या समस्यांवर आयोध्येचे ‘राम मंदिर’ हा एकच उतारा आहे, अशा आविर्भावात मोठ्यामोठ्या आवाजात संघ-भाजपचे नेते भाषणे देत फिरायचे. त्या उन्मादी  वातावरणात वाढलेला ‘बच्चा बच्चा’ रामाच्या कामी किती आला, हे सांगणे अवघड असले तरी, तो भाजपच्या कामाला मात्र नक्कीच आला याबाबत शंका घेण्याचे कोणतेच कारण नाही.

मात्र, प्रभू रामचंद्राचा वापर जितका करून घेता येणे शक्य होते, तितका आता करून झाला आहे. गेल्या बारा वर्षात सतत तीन वेळा केंद्रात आणि अनेक राज्यांमध्ये भाजपची सरकारे ‘रामराज्य’ करू लागली आहेत. ‘जय श्रीराम’चे नामस्मरण (आता ती अध्यात्मिक हाक नव्हे परधर्मीयांविरोधातला युद्धघोष बनला आहे.) अधूनमधून सुरू असले, तरी आता ते सवडीने करावयाचे कर्मकांड बनवले गेले आहे. भाजपला आता ‘जय श्रीराम’ हा घोष आवश्यक असला, तरीही रामाचा धावा करत मतांचा जोगवा मागत फिरावयाची गरज राहिलेली नाही. त्या काळात राम सोयीचा आणि किफायती होता. आता भाजपने रामरायांवर अवलंबून राहणे बऱ्यापैकी सोडले असून, एक प्रकारे रामरायांना पुन्हा गरज पडेपर्यंत विश्रांती देण्याचा निर्णय घेतला आहे. रामरायांना भाजपच्या प्रचारातून मोकळीक देण्याचा निर्णय संघ भाजपाच्या निवडणूक प्रचार अभियानाने निदान सध्यातरी घेतला असल्याचे स्पष्ट आहे.

**लोकशाहीवर बुलडोझर चालवण्याचा परवाना**

असे करण्याचे कारण हे आहे की, आता भाजपला निवडणूक जिंकण्यासाठी ‘रामभरोसे’ राहण्याची गरज उरलेली नाही. कारण निवडणुकीतील यश केवळ सरकारे चालवण्याचा अधिकारच देते, असे नाही तर साऱ्याच शासकीय संस्था - शासकीयच कशाला - साऱ्या स्वायत्त संविधानिक संस्था आपल्या मनाप्रमाणे बेकायदेशीरपणे राबवण्याचे आणि वाकविण्याचे धाडसही देते. बऱ्याचदा हा धाडसीपणा इतका भयावह असतो, की स्वतःला सर्वोच्च म्हणवून घेणारेही लीन होऊन जातात. अशावेळी सत्तेत नसताना सुप्त तर सत्तेत आल्यानंतर हुकूमशाहीबद्दल उघड आकर्षण दर्शवणाऱ्या भाजपसारख्या पक्षाला संविधानिकता, स्वायत्तता अशा किरकोळ गोष्टींवर विचार करण्यात वेळ घालवण्याची आवश्यकताच वाटत नाही. ‘‘हम करे सो कायदा’’ राज्य स्थापित केले जाते. लोकशाही, स्वातंत्र्य समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता या संविधानिक मूल्यांची ‘‘ऐसी की तैसी’’ करण्याचा परवाना फॅसिस्ट मंडळींनी निवडणूक जिंकून मिळवलेला असतो.

त्या परवान्याचा वापर आज आपल्याला सरसकटपणे पाहावयास मिळत आहे आणि त्याचे परिणामही आपण भोगत आहोत. अशा परिस्थितीत रामभरोसे राहण्यापेक्षा सीबीआय, इन्कम टॅक्स, इडी, निवडणूक आयोग, न्यायालये अशा साऱ्या संस्थांचा वापर करून निवडणुका जिंकणे जास्त सोयीचे आणि हमखास यश मिळवून देणारे आहे आणि तेच भाजप करत आहे. रामलल्लाजी मंदिरात विराजमान करून ठेवले आहेत. जनतेच्या मनातली धार्मिक झिंग कायम ठेवण्यासाठी पंतप्रधानपदावर बसलेला नेता सोमनाथ मंदिराच्या पुनर्निर्माण सोहळ्याचे निमित्त करून स्वतःहूनच लोकशाहीला अपेक्षित असलेल्या राजकीय सभ्यतेला पायदळी तुडवत आहे. फाळणीनंतरच्या रक्तरंजित जातीय दंगलींचा, संभाव्य धार्मिक ध्रुवीकरण होऊन देश अस्थिर होण्याच्या शक्यतेचा संदर्भ न देता, सोमनाथ मंदिराचे राजकीयीकरण करण्यास नकार देणारे पहिले पंतप्रधान पंडित नेहरू यांची निंदानालस्ती करत आहेत. तेही असो.

**ध्रुवीकरणाची चरमसीमा पार**

नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकांतून एक गोष्ट स्पष्ट झाली आहे की, तामिळनाडू, प. बंगाल, केरळ तेथील सत्ताधारी पक्षांचा दणदणीत पराभव झाला असला, तरी आसामात हेमंत बिस्वा सर्मा या भाजपात जाऊन स्वच्छ, पावन-पवित्र झालेल्या इसमाने पहिल्यापेक्षा जास्त जागा जिंकून आसाम राज्य भाजपच्या ताब्यात ठेवण्यात यश मिळवले आहे. तामिळनाडू आणि केरळ या राज्यांमध्ये भाजपला लाभ झाला नसला, तरी केरळात ११ टक्क्याहून अधिक मते मिळवली आहेत. पश्चिम बंगालमध्ये तर सतत तीन वेळा निवडून आलेल्या ममता बॅनर्जींचा दारुण पराभव करून भाजपने ४५.९ टक्के मते मिळविली आहेत. अशी किमया प्रभू रामचंद्रांनाही कधी जमली नाही, ती किमया भाजपने प्रभू रामचंद्रांहून प्रभावी शक्तींना कह्यात घेऊन साधली आहे. या शक्तीमध्ये पॅरा-मिलिटरी फोर्सही सामील आहे. उपरोक्त सर्वांना बरोबर घेऊन मिळविलेल्या देदीप्यमान यशाबद्दल भाजप



*दमनकारी मनोवृत्तीच्या केंद्रातल्या सत्ताधाऱ्यांनी विरोधी आवाज चेचून टाकण्याचे प्रसंग अनेक आले, परंतु अजूनही बहुसंख्य मध्यमवर्गीयांच्या मनावर साधे ओरखडे उमटलेले नाहीत...*

अभिनंदनास पात्र आहे.

वर उल्लेखलेल्या साऱ्या शक्ती भाजपच्या पाठीमागे ठामपणे उभ्या आहेतच. परंतु यावरून मोठी गोष्ट भाजपने घडून आणली आहे, ती म्हणजे, धार्मिक ध्रुवीकरण. हे ध्रुवीकरण करण्याची सुरुवात १९२५ पासूनच झाली होती. भारताची फाळणी, फाळणीच्या निमित्ताने जातीयवादी शक्तींनी घडवून आणलेली प्रचंड हिंसा, हे सारे होऊनही केवळ पं. नेहरू-सरदार पटेल या खंबीर नेतृत्वामुळे त्यावेळी हे ध्रुवीकरण घडविण्यात जातीयवादी शक्ती अपयशी झाल्या होत्या. त्याचे आणखी एक कारण तत्कालीन नेतृत्वाने ब्रिटिशांपासून स्वातंत्र्य नेमके कशासाठी मिळवायचे, याची स्पष्टता जनतेसमोर ठेवली होती. समाजातील साऱ्याच घटकांच्या आकांक्षांचा आणि उत्थानाचा आशय भारतीय स्वातंत्र्याशी जोडला होता. सर्वसामान्य जनता त्यांच्या समस्यांबाबत विचार करत होती. म्हणूनच तिने जातीयवादी शक्तींच्या, विशेषतः संघाच्या विषारी प्रचाराकडे फारसे लक्ष दिले नाही. स्वतःला आधी भारतीय मानले व नंतर हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन वा अन्य मानले.

मात्र, संघाच्या सातत्यपूर्ण जातीयवादी प्रचाराने आता भारतीय समाज उभा दुभंगला आहे. कुणाला शत्रू समजण्यास कोणी काही कुकृत्य करायची गरजच उरलेली नाही. त्याचे विशिष्ट धर्माचे असणे वा नसणे त्याचा द्वेष करण्यास पुरेसे आहे. परिणाम आपल्यापुढे स्पष्ट उभा आहे. भारतात ऐंशी टक्क्याहून अधिक संख्या हिंदूंची आहे. तरीही या ८० टक्क्याहून अधिक हिंदूंना अन्य धर्मीयांपासून धोका आहे, ही अन्य धर्मीय मंडळी देशाच्या प्रगतीला अडथळा आहेत. देशातल्या साऱ्या समस्यांना हीच मंडळी जबाबदार आहेत. असुरक्षित वातावरणाला हीच मंडळी जबाबदार आहेत असे या वर्गाला वाटू लागले आहे. अशा परिस्थितीत कोणी एक पक्ष त्यांच्या हिताचे रक्षण करेल, अशी त्यांची भावना झाली वा करून दिली गेली, तर त्या पक्षाचा पराभव होणे ही गोष्ट अशक्य बनणार आहे. आज नेमके तसेच झाले आहे. अपवाद वगळता बऱ्याच राज्यांमधून हे ध्रुवीकरण चरमसीमेला पोहोचले आहे. विरोधी पक्षांच्या निवडून आलेल्या उमेदवारांकडे नजर टाकल्यावर ही गोष्ट ठळकपणे नजरेत येते. आता भाजपला मुस्लिम मतांची गरज नाही. भाजप औषधालाही मुस्लिमांना निवडणुकीत तिकिटे देत नाही. भाजपच्या निवडणुकीतील यशात या अशा स्वरूपाच्या सामाजिक ध्रुवीकरणाचा मोठा वाटा आहे.

**विद्वानांनी आत्मपरीक्षण करावे**

हे ध्रुवीकरण केवळ दुष्परिणाम जनतेसमोर मांडून, संविधान बचावाचे नारे देऊन, हिंदू-मुस्लिम ऐक्याचे दर्शन घडविणारा इतिहास सांगून वा मुसलमान मुळात किती चांगले होते वा आहेत, याचे कथाकथन करून थांबवता किंवा शिथिल करता येणार नाही. हे काम समाजातील स्वतःला विद्वान म्हणून घेणारी मंडळी गेली ३०-४० वर्षे करीतच आली आहेत. सांप्रदायिक सद्भावना आणि राष्ट्रीय एकात्मता यासाठी या मंडळींनी उपसलेल्या कष्टांचे कौतुक करत असतानाच या साऱ्याच्या परिणामाची चर्चा करण्याची वेळ आलेली आहे. यांच्या प्रयत्नामुळे सामाजिक सद्भावनांना खरोखर चालना मिळाली की जातीयवादी शक्तींना उर्वरित मंडळी कशी स्युडो-सेक्युलर आहेत आणि मुस्लिमधार्जिणी आहेत, या प्रचाराला बळकटी मिळाली आहे, याचा विचार सुस्पष्टपणे करण्याची वेळ आली आहे. जी गोष्ट अशा विद्वान मंडळींची तीच अशा प्रश्नांवर काम करणाऱ्या एनजीओंची आहे. यांनी निदान आता तरी या

प्रयत्नांनी धर्माचे राजकारण करणाऱ्यांना रोखता आलेले नाही, येणार नाही हे समजून घेतले पाहिजे.

आपल्या प्रयत्नात काही त्रुटी होत्या, काही चुका होत्या हे प्रांजळपणे मान्य करून नव्याने विचार केल्याशिवाय संघाच्या जातीयवादाला रोखणे अशक्य आहे. अर्थात यातील बऱ्याच जणांची ती खोड आहे व उर्वरितांचा पोट भरण्याचा व्यवसाय आहे, ही गोष्ट स्पष्ट आहे. त्यामुळे अशा लोकांना काही सांगण्यात फारसा अर्थ नाही.


''फोडा आणि राज्य करा'' ही नीती भारतासाठी नवीन नाही. ब्रिटिशांनी १८५७च्या स्वातंत्र्यसमराच्या आधीपासूनच या नीतीचा अवलंब केला होता. ब्रिटिशांच्या या नीतीला मदत केल्यावर त्याचे बक्षीस मिळते, राव बहादूर बनता येते, अगदी पेन्शनही मिळवता येते, हा अनुभव आल्यावर देशातील जातीयवादी शक्ती आणि व्यक्ती धार्मिक विभाजन करून, धर्माधर्मात विद्वेष फैलावून इनामाच्या आशेने ब्रिटिशांची इमान राखत ब्रिटिशनीतीला मदत करत होत्या. शहीद भगतसिंग आणि त्यांच्या क्रांतिकारक मित्रांनाही या समस्येला सामोरे जावे लागले होते. त्यावेळी शहीद भगतसिंगांनी अगदी चपखल उदाहरणे देऊन सांप्रदायिक शक्तीविरोधी भावना जनतेमध्ये रुजवली होती. त्यासाठी भगतसिंगांनी व्यवहारातील उदाहरणे समोर ठेवली. ''महागाई वाढते, तेव्हा ती हिंदू आणि मुसलमान अशा दोघांसाठीही वाढलेली असते. तसेच जेव्हा एखाद्या संक्रामक रोगाची साथ येते, तेव्हा तो रोग सर्वच धर्माच्या लोकांचे बळी घेत असतो. आपले प्रश्न धर्मातून निर्माण झालेले नसून आर्थिक प्रश्नांतून निर्माण झाले आहेत, शोषणातून निर्माण झालेले आहेत, म्हणूनच सर्वांनी एकजुटीने त्याला सामोरे जायला हवे,'' ही गोष्ट भगतसिंग यांनी जनतेच्या मनावर बिंबवण्याचा प्रयत्न केला. कारण शोषकांचा मतलब शोषणाशी असतो, मग ते वासाहतिक गुलामी लागणारे ब्रिटिश असोत वा फॅसिस्ट हुकूमशाही लादणारे जातीयवादी असोत. केले जात असलेल्या शोषणाबाबत जनतेला जागृत करणे ही एकच गोष्ट अशा फॅसिस्ट राजवटींचा मुकाबला करू शकेल, पराभव करू शकेल ही गोष्ट आपण जनतेला पटवून द्यायला हवी.

**हक्क आणि न्यायाचे लढे आवश्यक**

हजारो वर्षांच्या वर्णाधिष्ठित व्यवस्थेच्या गुलामीतून आणि त्यानंतर सुमारे दीडशे वर्षांच्या ब्रिटिशांच्या गुलामीतून स्वतंत्र झालेल्या देशाच्या जनतेचा उद्धार ज्यांना होऊ द्यायचा नाही, ज्यांना त्यांच्यावर वर्णाधिष्ठित गुलामगिरी पुन्हा लादायची आहे, ज्यांना स्वातंत्र्यामुळे बहुजनांना मिळालेला किमान एका प्रतिष्ठेने जगण्याचा अधिकार नाकारायचा आहे, त्यांचा मूळ उद्देश जनतेसमोर स्पष्ट करायला हवा. हे लबाड लोक पाच किलो धान्य आणि लाडक्या बहिणीला पंधराशे रुपये देऊन, गरिबांना शिक्षण, आरोग्य, रोजगार, निवारा या हक्कांपासून डावलत आहेत, म्हणूनच या साऱ्याची स्पष्ट जाणीव जनतेला करून देऊन या हक्कापासून वंचित झालेले आणि वंचित होऊ घातलेले यांना एकत्र करून त्यांचे न्यायासाठीचे, हक्कांसाठीचे छोटे मोठे लढे उभे करायला हवेत.

इथे आणखी एक गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे, ती म्हणजे हे प्रश्न केवळ गरिबांचेच नाहीत, मध्यमवर्गीय आणि उच्चमध्यम वर्गीयांचेही आहेत. घराचा प्रश्न घेतला, तरी यात मध्यम व उच्च मध्यमवर्गीयांचे ज्या पद्धतीने शोषण होते, ते शोषण त्या वर्गाच्या लक्षात आणून देणे महत्त्वाचे आहे. नोकरी धंद्याच्या निमित्ताने ग्रामीण भागातून शहराकडे स्थलांतर होणे, ही आता आम बाब बनली आहे. अशावेळी त्या व्यक्तीला राहण्यासाठी घर शोधणे भाग पडते. आता या बिल्डिंग व्यवसायात बिल्डर लॉबीने आपले पाय भरभक्कमपणे रोवले आहेत आणि त्यांच्याबरोबर त्यांचे राजकारणातील भागीदार या नफेखोरीत सामील आहेत. अनेक ठिकाणी तर राजकारणीच बिल्डर आहेत. या मंडळींनी घरांच्या किमती पार गगनाला भिडविल्या आहेत. त्यामुळे ते घर खरेदी करणाऱ्याला प्रचंड कर्ज काढावे लागते आणि त्या कर्जफेडीत त्या व्यक्तीच्या आयुष्यातील उमेदीची किमान पंचवीस वर्षे खर्ची पडतात. हे बिल्डर आणि राजकारणी यांच्या युतीमुळे घडते. नफेखोरी करून गडगंज पैसा कमावला जातो. हे शोषण आहे ही गोष्ट मध्यम आणि उच्च मध्यम वर्गाला समजावून द्यावी लागेल आणि घरांच्या समस्यांवर उपाय सुचवावे लागतील. मध्यमवर्गीयांची आंदोलने उभारावी लागतील.

रोजगाराची अवस्थाही बिकट आहे. सरकारी आणि सार्वजनिक क्षेत्रातले रोजगार जवळजवळ संपविले गेले आहेत. जे रोजगार उपलब्ध आहेत, ते कंत्राटी रोजगार आहेत आणि या रोजगारांमध्येही कामगारवर्गाचे शोषण करून कंत्राटदारांचे चांगभले करण्याचा उद्योग जोरात सुरू आहे. हे कंत्राटदार बहुदा राजकारण्यांचे बगलबच्चे असतात ही गोष्टही समाजास समजावून सांगावी लागेल. रोजगाराच्या हक्काचा समावेश




*मे महिन्यात सरन्यायाधीशांनी बेरोजगार युवकांना झुरळ म्हणत हिणवल्यानंतर सोशल मीडियावर एकच गदारोळ माजला. त्याची उपरोधिक प्रतिक्रिया म्हणून कॉक्रोज जनता पार्टीचा उदय होऊन लाखो सोशल मीडिया युजर्सनी त्याला पाठिंबा दिला. या घटनेने सत्ताधारी सटपटले, विरोधक सावध झाले...*

मूलभूत अधिकारात व्हायला हवा ही मागणी घेऊन संघटना उभाराव्या लागतील.

**शोषणाला सीमा नाही**

शिक्षण ही सर्वसामान्यांच्या उत्थानासाठी एक आवश्यक बाब. या शिक्षणक्षेत्राचेही धनदांडगे आणि राजकारणी यांनी पूर्णपणे व्यापारीकरण केले आहे त्यामुळे बहुसंख्य गरीब मुले दर्जेदार शिक्षणापासून आणि खरंतर शिक्षणापासूनच वंचित होत चालली आहेत. ''जसा दाम तसे शिक्षण'' ही शिक्षणाची नवी नीती आहे आणि हे क्षेत्रही समाजाला लुटणारे क्षेत्र बनले आहे. मे महिन्यात लाखो विद्यार्थ्यांचे मानसिक-भावनिक खच्चीकरण करणाऱ्या 'नीट' पेपरफुटीचा निषेध करण्यासाठी एनएसयूआयसारख्या विद्यार्थी संघटना रस्त्यावर उतरल्या. मात्र, चीनमधल्या खाण दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांबद्दल सहवेदना प्रकट करणाऱ्या पंतप्रधानांनी 'नीट' प्रकरणी सहानुभूतीचा चकार शब्दही उच्चारला नाही. 'परीक्षा पे चर्चा' हे निव्वळ थोतांड आहे, हेही त्यांनी यानिमित्ताने सिद्ध करून टाकले. वरताण म्हणजे, मे महिन्यातच नीती आयोगाच्या अहवालानुसार २०१४-१५ ते २०२४-२५ या कालावधीत सरकारी आणि अनुदानित ९८ हजार शाळा बंद झाल्याचे वृत्त प्रकाशित झाले. त्यावरही सत्ताधाऱ्यांनी मौन धरले. आरोग्याबाबतीतही परिस्थिती वेगळी नाही. सरकारी आरोग्यव्यवस्था जाणीवपूर्वक दुबळी करून खाजगी संस्थांना गडगंज नफा कमवण्यासाठी मोकळी वाट ठेवली आहे. खाजगी रुग्णालय रुग्णांना लुटण्याचे काम करत आहेत. परिणामी, आजारपणासाठी कर्ज काढून दारिद्र्यरेषेखाली जाणाऱ्या व्यक्तींची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. दारिद्र्यरेषेखाली ढकलल्या जाणाऱ्या लोकांमध्ये अठरा टक्के लोक आजारपणातील कर्जामुळे दारिद्र्य रेषेखाली ढकलले जातात हे वास्तव आहे.

या साऱ्या शोषणाचा सर्वात मोठा बळी शेतकरी आहे. त्याच्या शोषणाला सीमा नाही. शेतमालाला आणि शेतीला संरक्षण नाही. शेत विमा कंपन्या शेतकऱ्यांपेक्षा स्वतःचं भलं करून घेण्यात धन्यता मानत आहेत. त्याच्या मालाला भाव नाही. कर्जबाजारी होऊन तो आत्महत्या करतोय, तर अडते, दलाल आणि व्यापारी गडगंज नफा कमावत आहेत.

या साऱ्या विरुद्धचे छोटे मोठे संघर्ष समाजाला एक समाज म्हणून जवळ आणतील, खऱ्या समस्यांची जाणीव करून देतील. ही जाणीव त्यांना एकत्रित होऊन लुटणाऱ्या शासन व्यवस्थेविरुद्ध उभे राहण्याची क्षमता प्रदान करेल. ज्यांना खऱ्या अर्थाने संविधानाची लढाई लढाईची असेल, त्यांना शोषणाविरोधात ठामपणे उभे राहून न्याय आणि समतेसाठीची लढाई लढण्याखेरीज आता अन्य पर्याय उरलेला नाही.

**डॉ. विवेक कोरडे यांची 'जातीयवादी राजकारणाचा अन्वयार्थ', 'गांधीची दुसरी हत्या', 'शहीद भगतसिंग', 'वैचारिक बंदुकांचे शेत', 'गांधीहत्येचे राजकारण', 'आरएसएस आणि नथुराम गोडसे', 'भगतसिंग, गांधी आणि सावरकर : अपप्रचारामागचे वास्तव' ही पुस्तके प्रसिद्ध आहेत.**

**ई मेल :** drvivekkordeg@mail.com

# संविधानाचा आत्मा वाचवण्यासाठी सारे काही...




श्रीरंजन आवटे

**मर्म संविधानाचे**



*मानवी हक्कांचे अद्याक्षर : सायरस सिलेंडर...*




*हक्क आणि अधिकारांची हमी देणारे भारताचे संविधान...*

**इ.**स. १२१५ मध्ये इंग्लंडमध्ये हक्कांची सनद मांडण्यात आली. या सनदेला 'मॅग्ना कार्टा' (महान सनद) असे म्हणतात. अमेरिकेने १७७६ साली स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यात काही हक्क हे अविभाज्य आहेत, ते व्यक्तीपासून हिरावून घेताच येऊ शकत नाहीत, अशी मांडणी केली. फ्रेंच राज्यक्रांतीनंतरही 'द डिक्लरेशन ऑफ द राइटस ऑफ मॅन ॲण्ड ऑफ द सिटिझन' (१७८९) या शीर्षकाचा जाहीरनामा प्रसिद्ध झाला. रशियन क्रांतीनंतर रशियातील लोकांच्या हक्कांबाबतच्या दस्तावेजात (१९१७) स्वातंत्र्य आणि समतेबाबतचे हक्क मान्य करण्यात आले. भारताच्या संविधानसभेतही याबाबत मूलगामी चर्चा सुरू असताना संयुक्त राष्ट्रांनी 'मानवी हक्कांचा वैश्विक जाहीरनामा' (१९४८) प्रसिद्ध केला. माणसाचे काही हक्क हे सन्मानाने जगण्यासाठी आवश्यक आहेत, ही बाब अशा वेगवेगळ्या टप्प्यांवर अधोरेखित झाली...

१. माध्यमांच्या स्वातंत्र्याच्या निर्देशांकानुसार १८० देशांच्या यादीत भारताचा क्रमांक १५७ वा.

२. राष्ट्रीय मानव हक्क आयोगाच्या अहवालानुसार, २०२५ च्या पहिल्या आठ महिन्यांमध्ये पोलिस कोठडीमध्ये ११३ मृत्यू झाले. न्यायालयीन कोठडीमध्ये १५३५ मृत्यू झाले, तर १३२ न्यायबाह्य हत्या झाल्या.

३. संयुक्त राष्ट्रांशी संबंधित ग्लोबल अलायन्स ऑफ ह्युमन राइट्स इन्स्टिट्यूशन्स यांच्या अहवालानुसार भारतीय राष्ट्रीय मानव हक्क आयोगाचे अभूतपूर्व असे अधःपतन झाले आहे...

असे अनेक दाखले देता येतील. भारतामध्ये मूलभूत मानवी हक्कांची अवस्था दयनीय आहे. दलित, आदिवासी, अल्पसंख्य आणि स्त्रिया यांच्यावर सातत्याने अत्याचार होत आहेत. राष्ट्रीय सुरक्षा कायद्याचा गैरवापर मोठ्या प्रमाणावर होतो आहे. युएपीए असो की काश्मीर, मणिपूरमध्ये लागू झालेला आफ्स्पा, अशा अनेक कायद्यांचा आधार घेत मानवी हक्कांचे सर्रास उल्लंघन केले जात आहे. काश्मीरमध्ये अनेकदा इंटरनेट बंद करण्यापासून ते आंदोलकांना ठार करण्यापर्यंतचे असंख्य प्रकार घडले आहेत, घडत आहेत. जवळपास साडेतीन वर्षे मणिपूरसारखे राज्य अक्षरशः जमातवादी हिंसेने होरपळते आहे. दुर्दैवाने, न्यायसंस्था या सर्व प्रकारात सक्षम भूमिका बजावत नाहीच; उलट कायदेमंडळाचीच ती विस्तारित 'शाखा' आहे, असं वाटावं, असं चित्र आहे.

**मूलभूत हक्क आहेत काय?**

मुळातच मूलभूत हक्कांच्या संकल्पनेला मोठा इतिहास आहे. प्राचीन पर्शियाचा राजा 'सायरस द ग्रेट' याने बॅबिलिऑन साम्राज्याचा पाडाव केला. साधारण ख्रिस्तपूर्व ५३९ मधली ही गोष्ट आहे. बॅबिलिऑन साम्राज्यावर आपण आक्रमण का केले, याचे स्पष्टीकरण राजाने दिले. हे स्पष्टीकरण देणारा शिलालेख म्हणजे, सायरस सिलिंडर. या शिलालेखात या राजाने गुलामगिरीच्या प्रथेचा धिक्कार केलेला आहे. राजा म्हणतो की, मला साम्राज्यामधल्या सर्व धर्मांच्या प्रथांविषयी आदर आहे. कोणत्याही धर्माचा, व्यक्तीचा अवमान होईल, असे कृत्य साम्राज्यामध्ये होणार नाही, याची मी ग्वाही देतो. प्रत्येकाला संपत्ती मिळवण्याचा अधिकार आहे. कोणी कोणाचा स्वातंत्र्याचा हक्क हिरावून घेऊ शकत नाही. प्रत्येकाला मुक्त जगण्याचा हक्क आहे, असे सविस्तर लिहिलेला हा शिलालेख म्हणजे 'मानवी हक्कांचे आद्याक्षर' आहे.

इराकमधील हॉरमझ्ड रासद यांनी हा इतिहास समोर आणला आणि त्यानंतर जगण्याच्या मूलभूत हक्कांचा अवघा पट उलगडला. विसाव्या शतकाच्या मध्यावर मानवी हक्कांच्या बाबत जागरुकता निर्माण झाली, तेव्हा सायरस सिलिंडरचा दाखला दिला गेला. मानवी हक्कांचा हा उगम असल्याचेही दावे केले गेले.

**हक्काची सनद**

तेराव्या शतकातल्या आफ्रिकेतील मांदेन साम्राज्याच्या मौखिक संविधानातही लोकांना मूलभूत हक्क आहेत, हे मान्य केले गेले होते. इ.स. १२१५ मध्ये इंग्लंडमध्ये हक्कांची सनद मांडण्यात आली. या सनदेला 'मॅग्ना कार्टा' (महान सनद) असे म्हणतात. सुमारे ६२ कलमे असलेल्या या दस्तावेजात मूलभूत हक्कांची मांडणी केलेली होती. त्यामुळेच मूलभूत हक्कांच्या कोणत्याही चर्चेची सुरुवात या सनदेपासून होते. भारताच्या संविधानातील मूलभूत हक्कांच्या तिसऱ्या भागाला 'मॅग्ना कार्टा' असे म्हटले गेले आहे. अमेरिकेने १७७६ साली स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यात काही हक्क हे अविभाज्य आहेत, ते व्यक्तीपासून हिरावून घेताच येऊ शकत नाहीत, अशी मांडणी केली. फ्रेंच राज्यक्रांतीनंतरही 'द डिक्लरेशन ऑफ द राइटस ऑफ मॅन अ‍ॅण्ड ऑफ द सिटिझन' (१७८९) या शीर्षकाचा जाहीरनामा प्रसिद्ध झाला. या दस्तावेजातही माणूस म्हणून काही हक्क हे अपरिहार्यपणे दिले गेले पाहिजेत, असे म्हटले गेले. रशियन क्रांतीनंतर रशियातील लोकांच्या हक्कांबाबतच्या दस्तावेजात (१९१७) स्वातंत्र्य आणि समतेबाबतचे हक्क मान्य करण्यात आले. भारताच्या संविधानसभेतही याबाबत मूलगामी चर्चा सुरू असताना संयुक्त राष्ट्रांनी 'मानवी हक्कांचा वैश्विक जाहीरनामा' (१९४८) प्रसिद्ध केला. माणसाचे काही हक्क हे सन्मानाने जगण्यासाठी आवश्यक आहेत, ही बाब अशा वेगवेगळ्या टप्प्यांवर अधोरेखित झाली.

इतिहासात असे अनेक दाखले असले तरी मुळात हक्क म्हणजे काय आणि त्याची गरज काय? एखादी व्यक्ती जेव्हा आग्रहाने अमुक गोष्ट करणे हा माझा हक्क आहे, असे म्हणते तेव्हा तिला आपली कृती समर्थनीय आहे, ती योग्य आहे, हे सांगायचे असते. एखाद्या व्यक्तीला काय देऊ केले पाहिजे, तिला काय मिळाले पाहिजे, याचा मूलभूत विचार हक्काच्या कल्पनेत येतो. व्यक्ती, अमुक समूहाची व्यक्ती किंवा नागरिक म्हणून व्यक्तीला काही बाबी करण्याचा अधिकार असतो. हे

स्वातंत्र्य मान्य करण्यातून हक्काची भाषा आकाराला येते.

**लॉकचा दृष्टिदायी सिद्धांत**

जॉन लॉक या विचारवंताने नैसर्गिक हक्कांचा सिद्धांत मांडला. त्यांच्या मते, जगण्याचे, स्वातंत्र्याचे आणि संपत्तीचे हक्क हे नैसर्गिक हक्क आहेत. नैसर्गिक हक्क याचा अर्थ एखादी व्यक्ती ही जन्माला आली आहे म्हणून ती काही हक्कांसाठी पात्र आहे. व्यक्तीला जन्मजात काही हक्क असतात. समाज त्याला मान्यता देतो, तेव्हा त्याची दखल घेतली जाते. समाजामध्ये असलेल्या कायदेशीर-संवैधानिक चौकटीत त्या हक्कांना मान्यता दिली जाते, तेव्हा त्यांना 'कायदेशीर हक्क' असे संबोधले जाते. हेही लक्षात घेतले पाहिजे, की हक्क प्रदान केले जात नाहीत, हक्कांना मान्यता दिली जाते. त्यामुळे संविधानातली परिभाषाही लक्षात घ्यायला हवी. आपल्याला मूलभूत हक्क होतेच, संविधानाने ते हक्क मान्य केले आहेत. इमॅन्युएल काण्ट या तत्त्वज्ञाने हक्कांबाबत नैतिक मांडणी करताना म्हटले, की कोणत्याही साध्याचे साधन म्हणून व्यक्तीचा वापर होऊ नये. व्यक्ती हीच साधन आहे. तसेच जी आपल्याबाबत वर्तणूक होते तशीच इतरांसोबत व्हावी, असे वैश्विक तत्त्व त्यांनी हक्कांबाबत मांडले आहे. माणसांशी माणसासारखे वागण्याचे आणि वागणूक देण्याचे मूलभूत सूत्र येथे आहे आणि राज्यसंस्थेने ते मान्य करणे अभिप्रेत आहे. मूलभूत हक्क ही मानवतेची पूर्वअट आहे.

**संविधानाचा गाभा**

त्यानुसार भारताच्या संविधानातील तिसरा भाग (अनुच्छेद १२ ते ३५) अतिशय महत्त्वाचा, गाभाभूत भाग आहे. मूलभूत हक्कांची संविधानसभेत चर्चा झाली. त्यापूर्वी नेहरु अहवालात मूलभूत हक्कांची मांडणी केलेली होती. त्यानंतर कराची ठरावानेही हक्कांबाबत आग्रही मागणी केलेली होती. कोणते हक्क मूलभूत असतील आणि त्यांचे संविधानाच्या चौकटीत स्वरूप कसे असेल, हे ठरवण्याचे प्रयत्न झाले. त्यानुसार मूलभूत हक्कांच्या विभागाची रचना निर्धारित झाली. सुरुवातीला राज्यसंस्था म्हणजे काय, हे स्पष्ट केले गेले. त्या अनुषंगाने असलेल्या व्याख्या सांगितल्या गेल्या आणि त्यानंतर मूलभूत हक्कांशी विसंगत असणाऱ्या बाबींचा निर्देश केला गेला. स्वातंत्र्य, समतेचे रक्षण व्हावे आणि शोषणापासून मुक्ती मिळावी, यासाठी मूलभूत हक्क असावेत, अशी कल्पना मांडली गेली. तसेच धर्म, संस्कृती, शिक्षण आणि संवैधानिक दुरुस्ती या




*केशवानंद भारती खटला हा 'लँडमार्क जजमेंट' मानला जातो. या खटल्याच्या निकालानुसार संविधानाच्या पायाभूत रचनेला धक्का न लावता बदल आणि सुधारणा करता येणे शक्य आहे...*

अनुषंगाने मूलभूत हक्कांचा समावेश केला. मानवी जगण्याचे सारे आयाम ध्यानात घेऊन मूलभूत हक्क मान्य केले गेले.

मूलभूत हक्कांना संविधानाचे संरक्षण लाभले आहे. संविधानाने अधिकृतरित्या या हक्कांच्या रक्षणासाठीची व्यवस्था तपशिलात सांगितली आहे, मात्र हे हक्क निरंकुश किंवा अमर्याद स्वरूपाचे नाहीत. काही अटी आणि शर्ती पूर्ण केल्यावर मूलभूत हक्कांना मान्यता मिळते. या हक्कांवर राज्यसंस्थेचा अंकुश आहे. राज्यसंस्था या हक्कांवर वाजवी निर्बंध आणू शकते. वाजवी निर्बंध म्हणजे, तार्किकदृष्ट्या योग्य असतील, समर्थनीय असतील असे निर्बंध. राज्यसंस्थेने वाजवी निर्बंध लावण्याच्या ऐवजी बेताल किंवा स्वैरपणे व्यक्तीच्या विरोधात निर्णय घेतल्यास व्यक्तीला आपल्या हक्कांचे रक्षण करण्याचा अधिकार आहे. या हक्कांवर गदा आल्यास व्यक्तीला न्यायालयात दाद (जस्टिसिएबल) मागता येते. या हक्कांच्या रक्षणासाठी व्यक्ती थेट सर्वोच्च न्यायालयातही धाव घेऊ शकते. त्यासाठी आधी कनिष्ठ पातळीवरील न्यायालयांच्या टप्प्यांमधून सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोहोचलेच पाहिजे, असे नाही. थेट सर्वोच्च न्यायालयाकडे धाव घेता येऊ शकते, यावरून मूलभूत हक्कांचे रक्षण संविधानाने अत्यंत महत्त्वाचे मानले आहे, हे सहज लक्षात येऊ शकेल.

**पायाभूत रचनेचे महत्त्व**



मूलभूत हक्कांपैकी काही हक्क केवळ नागरिकांसाठी



आहेत, तर काही हक्क सर्वांसाठी आहेत. तसेच काही हक्क राज्यसंस्थेच्या कृतींवर मर्यादा आणतात तर काही हक्क हे विशेषाधिकाराच्या स्वरूपात आहेत. या मूलभूत हक्कांची मर्यादा कमी किंवा जास्त केली जाऊ शकते. त्यामध्ये दुरुस्ती केली जाऊ शकते; मात्र यासाठी सामान्य पद्धतीने दुरुस्ती करता येत नाही. त्यासाठी संवैधानिक दुरुस्ती करावी लागते. एवढेच नव्हे तर संविधानाच्या पायाभूत रचनेमधील (बेसिक डॉक्ट्रिन) तत्त्वांना बाधा पोहोचणार नाही, अशी दक्षता घेऊनच मूलभूत हक्कांमध्ये दुरुस्ती करता येते. केवळ घोषित आणीबाणीच्या काळातच मूलभूत हक्क निलंबित केले जाऊ शकतात. त्यातही आणीबाणी कोणत्या स्वरूपाची आहे, यावरुन कोणत्या हक्कांचे निलंबन होणार हे ठरते. बाह्य आक्रमणामुळे आणीबाणी असेल किंवा देशांतर्गत परिस्थितीमुळे आणीबाणी लागू केली असेल, तर त्यानुसार विशिष्ट हक्कांचे निलंबन केले जाऊ शकते. तसेच लष्कराचा कायदा (मार्शल लॉ) लागू केल्यास काही मूलभूत हक्कांवर गदा येऊ शकते. लष्कराचा कायदा आणि आणीबाणीची परिस्थिती या दोन्ही बाबी वेगळ्या आहेत. अर्थातच अशा अपवादाच्या परिस्थितीमध्येच मूलभूत हक्कांवर गदा येऊ शकते. इतर वेळी राज्यसंस्थेने संविधानानुसार व्यक्तींच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करणे अत्यावश्यक आहे. कोणत्याही संविधानात मूलभूत हक्कांचे स्वरूप काय आहे आणि त्यांची अंमलबजावणी कशी होते, ही एक प्रकारे राज्यसंस्थेची लिटमस टेस्ट असते.

आज सर्वसामान्य नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे सर्रास उल्लंघन होते आहे. सुरुवातीलाच उल्लेखल्याप्रमाणे असे अनेक दाखले आहेत, ज्यामध्ये आंदोलक, विद्यार्थी, नागरी समाजातील व्यक्ती यांच्यावर हेतुपुरस्सर अन्याय केला जातो आहे. सरकारला विरोध करणाऱ्या व्यक्तींना 'अर्बन नक्सल' किंवा 'देशद्रोही' ठरवले जात आहे.

या पार्श्वभूमीवर मूलभूत हक्क समजावून घेणे आणि त्यांचे जतन व्हावे म्हणून लढणे, हे नागरिकांचे आद्यकर्तव्य ठरते. केशवानंद भारती खटल्यात (१९७३) सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते, की संविधानामध्ये बदल, सुधारणा केल्या जाऊ शकतात; मात्र संविधानाच्या पायाभूत रचनेवर कुऱ्हाड चालवता कामा नये. संविधानाच्या पायाभूत रचनेमध्ये मूलभूत हक्कांचा समावेश होतो. त्यामुळे संविधानाचे चिरंतन मूल्य टिकवण्यासाठी संविधानाचा हा आत्मा शाबूत ठेवणे अपरिहार्य आहे.

**श्रीरंजन आवटे कवी, लेखक आहेत. ते सध्या बँकॉक येथील सुआन सुनंधा राजभाट विद्यापीठात सहाय्यक प्राध्यापकपदी (राज्यशास्त्र) कार्यरत आहेत. राही श्रु. ग. यांच्यासोबत त्यांनी लिहिलेले 'आपलं आयकार्ड' हे संविधानाधारित पुस्तक वाचकप्रिय ठरले आहे.**
**संपर्क :** poetshriranjan@gmail.com

**कुणबी, गाव आणि वेळीप यांची वास्तविकता**
प्रतापसिंह वेळीप काणकर
किंमत २५०/-

**काळीज उसवलं**
उदय नरसिंह म्हांबरो
अनुवाद : पौर्णिमा केरकर
किंमत २००/-

**आरशातल्या आरशात**
डॉ. सुधीर देवरे
किंमत २२५/-

**दक्षिणायन**
किशोर अर्जुन
किंमत : २५०/-

**नामदेव साळुबाई ढसाळ**
मोतीराम कटारे
किंमत २२५/-



**यांगोन यात्रा**
डॉ. मिलिंद जोशी
किंमत २००/-

सहित
**आपली प्रत आजच नोंदवा**
७०३० ९९००८१
९९६० ३७४७३९
@SAHITPRAKASHAN

# परळ ते लिव्हरपूल : अदृश्य धाग्यांचा 'नियतीशी करार'




हितेश पोतदार

अर्थबोध





*लिव्हरपूलचा कापूस वायदे बाजार...*



*परळची कापड गिरणी...*

**१५** ऑगस्टच्या रात्री लाल किल्ल्यावरून नेहरूंनी उच्चारलेले शब्द जगभर पोहोचले. भारताने नियतीशी करार केला, असं त्यांनी म्हटलं. पण हा करार कुणाशी झाला आणि त्याची किंमत कोण देणार, हे त्या भाषणात स्पष्ट नव्हतं. इतिहासात स्वातंत्र्याच्या घोषणा आणि स्वातंत्र्याचा प्रत्यक्ष अनुभव यांच्यात नेहमीच एक मोठी दरी असते. इंग्रजी इतिहासकार ई.पी. थॉम्पसन यांनी ब्रिटनच्या कामगार वर्गाच्या इतिहासाविषयी म्हटलं होतं, की कामगार वर्ग ठराविक वेळी सूर्यासारखा उगवत नाही. तो स्वतःच्या घडणीत उपस्थित असतो. हेच भारताच्या स्वातंत्र्याबाबतही म्हणता येतं. स्वातंत्र्य हे अखेरीस त्यांना मिळतं, ज्यांच्या हातात ते घडवण्याची ताकद असते. पण त्या ताकदीचं वाटप समान नसतं...

**श**ब्दचित्र : भिन्न विश्वे, क्षण एक

गिरणगाव, मुंबई (जानेवारी, १९५२)

थंडीची पहाट. घड्याळात सहाही वाजले नव्हते. परळच्या एका चाळीत, दहा बाय दहाच्या खोलीत, चार माणसे एकत्र झोपलेली. त्यातल्या एकाने, त्याचं नाव नारायण, कूस बदलली. बाहेरून गिरणीची शिट्टी आली. पहिली पाळी.

नारायण उठला. अंधारातच कपडे चाचपडले. जवळच्या दोरावर त्याचा मळकटलेला खाकी शर्ट होता. त्यावर गिरणीच्या कापसाचा हलका थर होता. शर्टावर जणू एक डिझाइन तयार झाले होते. शर्ट धुतला तरी तो थर पुरता जाण्यातला नाही. जणू गिरणीने आपली छाप कायमची उमटवलेली होती.

चाळीत वरच्या मजल्यावरून कुणाच्या तरी मुलाचं रडणं ऐकू आलं. बाजूच्या खोलीतून तमीळ भाषेतला संवाद कानावर पडत होता. हे काही निवडक दाक्षिणात्य कामगार व त्यांचे कुटुंब. खाली चुलीपाशी एक बाई चहा ठेवत होती. ''लवकर आलास वाटतं, पाळीला,'' ती म्हणाली. नारायण उत्तर न देता केवळ हसला.

त्याने खिशातून एक कागद काढला. निवडणुकीचं मतदार ओळखपत्र. देशाची पहिली सार्वत्रिक निवडणूक नुकतीच पार पडली होती. रत्नागिरी जिल्ह्यातल्या आपल्या गावी गेला होता, तेव्हा त्यानेही मतदान केलं होतं. काँग्रेसला. कारण काँग्रेस म्हणजे पंडितजी. पंडितजी, म्हणजे नवीन जग. ''At the stroke of the midnight hour, when the world sleeps, India will awake to life and freedom.'' हे शब्द त्याला पूर्ण कळले नव्हते. पण 'freedom' म्हणजे काहीतरी मोठं आहे, हे त्याने ओळखलं होतं.

गिरणीकडे चालताना त्याने विचार केला. स्वातंत्र्य म्हणजे नक्की काय? दिवसाचे दहा तास कापसाच्या धुळीत काम करणं, महिन्याला ४२ रुपये मिळवणं आणि त्यातले १५ रुपये रत्नागिरीला पाठवणं. हे सगळे स्वतंत्र झाल्यावर बदलणार होतं का?

प्रत्यक्षात तसं फार काही बदललं नव्हतं. गिरणीत जाण्यासाठी तो मुकादमाच्या शब्दावर अवलंबून होता. त्याच मुकादमाने त्याला कामाला लावलं होतं. गावातला, त्याच्या आईच्या ओळखीचा. मुकादमाने सांगितलेल्या पाळीत यायचं, मुकादमाचं ऐकायचं, मुकादमाला नाराज करायचं नाही, हे अलिखित नियम होते. कामगार संघटनेचं कार्ड खिशात होतं, पण मुकादमापुढे ते कितपत चालत होतं?

**रत्नागिरी जिल्हा, त्याच क्षणी**

नारायणची बायको सखुबाई भल्या पहाटे उठली होती. सासूला उठवायचं होतं. दोन मुलांचं आवरायचं होतं. शेताकडे एक चक्कर टाकायची होती. पाणी पोहोचलं का ते पाहायला. दुपारी परत यायचं, स्वयंपाक करायचा. रात्री दिव्याखाली मुलांचा अभ्यास. झोपायला केव्हा मिळेल ते माहीत नाही.

नारायण पाठवतो, त्या पंधरा रुपयांतले दहा सावकाराच्या व्याजात जातात. बाकीच्या पाचात महिना काढायचा. गावातल्या दुकानात उधारी वाढतेय. पीक थोडं कमी आलं, या वेळी. पुढच्या हंगामाची आशा आहे.

सखुबाईचा दिवस किती तास असतो, याची कोणती नोंद नाही. कुठल्या सरकारी दस्तऐवजात तिचं नाव नाही. पंचवार्षिक योजनेच्या जाड खंडांमध्ये तिच्या श्रमाला जागा नाही. ती कामगार नाही. कारण तिला पगार नाही. ती शेतकरी नाही. कारण जमीन नारायणच्या नावावर आहे. ती एक अस्तित्व आहे. पण अदृश्य!

**स्वातंत्र्याची वर्गीय मर्यादा : वारसा, वचने आणि वास्तव**

भारताने निकराचा लढा देऊन ब्रिटिश राजवट संपवली. पण ब्रिटिश राजवटीने निर्माण केलेले आर्थिक संबंध तसेच राहिले. जमीन ज्यांच्या हाती होती, ती तशीच राहिली. कारखाने ज्यांच्या ताब्यात होते, ते तसेच राहिले. ज्यांना मजुरी करावी लागत होती, त्यांना अजूनही तेच करावं लागत होतं. झेंडा बदलला, गव्हर्नर-जनरल बदलला, पण उत्पादनसंबंध (म्हणजे कोण काम करतं आणि कुणाला त्याचं फळ मिळतं) ते मात्र बदलले नाहीत.

आर्थिक इतिहासकार अमिया कुमार बागची यांनी एके ठिकाणी म्हटलं आहे, की भारताच्या वसाहतकाळातील 'विकास' हा खरंतर विकासाचा आभास होता. संपत्ती निर्माण होत होती, पण ती देशात राहतच नव्हती. ब्रिटिश काळात मुंबई ही जगाच्या व्यापारातील एक प्रमुख केंद्र होती. कापूस, अफू, कापड, सूत ही मुंबईच्या निर्मितीतील मुख्य घटक होती. या सगळ्यांचा व्यवहार इथून होत होता. पण हे सगळं भारताच्या विकासासाठी नव्हतं. ते ब्रिटिश साम्राज्याच्या गरजांसाठी होतं.

१९४७ मध्ये भारताने जे उद्योग ताब्यात घेतले, ते मुख्यत: उपभोग्य वस्तूंचे उद्योग होते. कापड, साखर, जूट इत्यादी.

भांडवली वस्तू बनवण्याचे उद्योग, म्हणजेच मशीन बनवणारे कारखाने हे जवळपास नव्हतेच. ब्रिटिशांनी ते इथे येऊ दिले नव्हते. कारण ते आले असते, तर भारत तांत्रिकदृष्ट्या स्वावलंबी झाला असता. आणि तांत्रिक स्वावलंबन म्हणजे, तर वसाहतवादाच्या मुळावरच घाव होता.

या वारशाची किंमत स्वतंत्र भारताला जड गेली. देशाला पोलाद हवं होतं, पण आयात करावं लागलं. यंत्रे हवी होती, पण परदेशातून मागवावी लागली. परकीय चलन नव्हतं आणि त्यामुळे कर्ज घ्यावं लागलं. हे चक्र सुरुवातीपासूनच होतं. ते अपघाताने नव्हतं, तर वसाहतवादाने घातलेल्या सापळ्याचा तो स्वाभाविक परिणाम होता.

**गिरणगाव आणि मुकादमाची सत्ता : श्रमसंबंधांची खरी रचना**

आता परत नारायणाकडे जाऊ. तो गिरणीत काम करतो. त्याच्या खिशात कामगार संघटनेचं कार्ड आहे. पण गिरणीत प्रत्यक्ष सत्ता कुणाची आहे? इतिहासकार राजनारायण चंदावरकर यांनी, मुंबईच्या गिरणी कामगारांच्या इतिहासाचा सखोल अभ्यास केला आहे. त्यांच्या मते, ब्रिटिश काळात आणि स्वातंत्र्यानंतरही मुंबईचा कामगार वर्ग एका विशिष्ट पद्धतीने संघटित होता. मुकादम व्यवस्थेच्या आधारावर उभा होता. मुकादम हा गिरणीमालक आणि कामगार यांच्यामधला दुवा होता. तो गावातून माणसे आणत असे. आपल्या जातीचे, आपल्या गावचे, आपल्या नातेवाईकांचे नातेवाईक असे नात्यागोत्यातले ते असत. त्यांना कामावर लावत असे. त्यांची हजेरी ठेवत असे. गरज पडल्यास त्यांना कामावरून काढतही असे.

ही व्यवस्था एका विशिष्ट रचनेवर उभी होती. कामगाराला नोकरी ठेवायची असेल, तर मुकादमाशी जमवून घ्यावं लागायचं. मुकादम रागावला, तर नोकरी गेली आणि सोबत गावातला आधारही. कारण हा संबंध केवळ आर्थिक नव्हता, तर तो जातीचा, गावाचा, कौटुंबिक नात्यांचा होता. गिरणी मालकांनी ही चौकट जाणीवपूर्वक जपली. कारण मुकादम व्यवस्था म्हणजे, श्रम नियंत्रणाची एक अत्यंत स्वस्त आणि प्रभावी पद्धत होती. थेट सत्ता न गाजवता, कामगार दबावाखाली राहत असे.

चंदावरकर यांनी आणखी एक महत्त्वाची गोष्ट दाखवली. मुंबईचा कामगार कधीच पूर्णतः शहरी बनला नाही. तो शहरात राहत होता, पण त्याचं मन, त्याची बचत, त्याची चिंता हे सगळं गावाशी जोडलेलं होतं. त्याचं घर गावात होतं. त्याची बायको गावात होती. त्याची जमीन छोटीशी का होईना, पण गावातच होती. शहर त्याला पैसे देत होतं, पण सुरक्षितता देत नव्हतं. गाव सुरक्षितता देत होतं, पण पैसे देत नव्हतं. तो या दोन्हींच्या मध्ये तो अधांतरी अवस्थेत होता आणि त्याच अवस्थेत भांडवलाला त्याची सर्वात जास्त गरज होती.

हा परंपरागतपणा शुद्ध नव्हता. हे एक तर्कशुद्ध जगणं होतं. ज्या कामगाराला शहरात कायमची नोकरी नाही, ज्याला आजारपणात किंवा वृद्धापकाळात कोणती सामाजिक सुरक्षितता नाही, त्याने गावाचा आधार का सोडावा? मुंबईचा गिरणी कामगार अर्धा-शेतकरी होता, कारण भांडवलाने त्याला पूर्ण कामगार बनवण्यास नकार दिला होता.

**काँग्रेस राज्य : वर्गीय तडजोड आणि तिच्या मर्यादा**

स्वतंत्र भारताची सत्ता काँग्रेसकडे आली. काँग्रेस हे एक संघटन होतं, पण कुठल्या वर्गांचं? अर्थतज्ज्ञ प्रणव बर्धन यांनी भारतीय राज्याच्या वर्गीय स्वरूपाचे विश्लेषण करताना तीन प्रबळ मालकी वर्गांची ओळख करून दिली : औद्योगिक भांडवलदार वर्ग (टाटा, बिर्लांसारखे मोठे उद्योगपती), धनी शेतकरी वर्ग (जे जमीन सुधारणांनंतर बळावले), आणि मध्यम वर्गीय वेतनजीवी वर्ग (म्हणजे सरकारी नोकरी, प्राध्यापक, अधिकारी). या तिन्ही वर्गांच्या परस्पर विरोधाभासी मागण्यांवर भारताचं राज्य चालत होतं. या तिघांनाही एक गोष्ट मान्य होती. ती म्हणजे, खालच्या वर्गाच्या खऱ्या अर्थाने उत्थानाचा विचार करायचा नाही.

या जमीन सुधारणांचं उदाहरण सर्वात बोलकं आहे. संविधानात जमीन सुधारणांची तरतूद होती. जमीनदारी निर्मूलन कायदे आले. पण प्रत्यक्ष अंमलबजावणी? ज्यांच्या हातात जमीन होती, त्यांच्याच हातात सत्ता होती. त्यांनी कायद्यात पळवाटा काढल्या. जमीन कागदावर नातेवाईकांच्या नावे केली. न्यायालयात अडवून ठेवली. महाराष्ट्रातही हेच घडलं. कुळकायदे आले, पण त्यांची अंमलबजावणी अत्यंत असमान राहिली. मराठवाड्यात, विदर्भात, कोकणात जमिनीचं वास्तविक पुनर्वाटप झालं नाही.

नेहरूंचं स्वप्न पंचवार्षिक योजनांमध्ये दिसतं. नियोजन आयोग, भाक्रा-नांगल धरण, पोलाद कारखाने, आय.आय.टी. ही सगळी खरोखरच मोठी कामगिरी होती. पण या स्वप्नातली



*ब्रेटन वूड परिषदेने तिसऱ्या जगातल्या अर्थव्यवस्थांची कायमस्वरुपी कोंडी करण्याचा प्रयत्न केला, तर पं.नेहरु उपस्थित असलेल्या बांडुंग परिषदेने अन्याय्य जागतिक अर्थव्यवस्थेच्या बदलाचा आग्रह धरला...*

एक मूलभूत मर्यादा होती. औद्योगिक क्षेत्रात सार्वजनिक गुंतवणूक होत होती. पण त्याचा सर्वाधिक फायदा खाजगी उद्योगांनाच मिळत होता. सार्वजनिक क्षेत्र पायाभूत सुविधा निर्माण करत होतं. जसे रस्ते, वीज, पोलाद. त्या सुविधांवर खाजगी कारखाने नफा कमावत होते. बागची यांच्या विश्लेषणानुसार, भांडवली वस्तू क्षेत्रात सरकारने महत्त्वाची पावले उचलली. पण ग्राहकोपयोगी वस्तू क्षेत्रात अजून खाजगी भांडवलाचं वर्चस्व कायम राहिलं.

कामगारांसाठी काय होतं? औद्योगिक विवाद कायदा, कामगार संघटना कायदा. या गोष्टी कागदावर महत्त्वाच्या होत्या. पण त्यांचं कवच केवळ संघटित, औपचारिक क्षेत्रातील कामगारांना मिळत होतं. हे कामगार एकूण श्रमशक्तीच्या फक्त दहा ते बारा टक्केच होते. बाकीचे जसे शेतमजूर, घरकाम करणाऱ्या बायका, असंघटित बांधकाम कामगार, फेरीवाले या सगळ्यांसाठी कोणतंही कवच नव्हतं.

**दोन जग : शहर आणि शेत**

स्वतंत्र भारताची अर्थव्यवस्था दोन वेगळ्या गतींनी चालत होती. एक होती मुंबई, अहमदाबाद, कोलकाता यांसारख्या औद्योगिक शहरांची गती. ज्यात गिरण्या, कारखाने, नवे मध्यम वर्ग, नव्या आशा होत्या. दुसरी होती, ग्रामीण भारताची गती. तीच जुनी शेती, तोच सावकार, तीच जातव्यवस्था, तेच दुष्काळ. दोन्हींमधले अंतर वाढत होते.

या दोन जगांना जोडणारा धागा होता, स्थलांतर. दरवर्षी हजारो नारायण गावातून शहरात येत होते. हजारो सखुबाई मागे राहत होत्या. गाव सांभाळत, मुले सांभाळत, कर्ज सांभाळत, रेंगाळत शहरात येत होत्या. शहरातला नफा गावातल्या कर्जावर जगत होता. गावातली टिकून राहण्याची क्षमता शहरातल्या कामगाराला स्वस्त ठेवत होती. कारण शहर त्याला पूर्ण पगार द्यायला बांधील नव्हतं. गाव पूरक उत्पन्नाचा भ्रम जिवंत ठेवत होतं.

हीच रचना भांडवलास अनुकूल होती. कामगार गावाशी जोडलेला राहिला, तर त्याला शहरात पूर्ण सामाजिक सुरक्षिततेची, जास्त पगाराची मागणी करणं शक्य नव्हतं. तो मुकादमावर अवलंबून होता, कारण मुकादमच त्याला गावातून इथे घेऊन आला होता आणि कधी तरी परत पाठवणार होता.

१९४७ ते १९५५ या पहिल्या दशकात भारत बदलत होता. पण ती बदलाची गती असमान होती. काहींसाठी स्वातंत्र्य म्हणजे, नव्या संधी होत्या. काहींसाठी जुन्याच व्यवस्था नव्या नावाने समोर उभ्या होत्या. नारायणसाठी गिरणी होती. पण मुकादमाची सावलीही होती. सखुबाईसाठी अदृश्यता होती.

हे वास्तव समजून घ्यायचं असेल, तर केवळ धोरणांकडे पाहून चालत नाही. आपल्याला विचारावं लागतं, की ही धोरणे कुणाच्या हाताने बनली आणि त्याचा फायदा कुणाला झाला? या प्रश्नाचं उत्तर आपल्याला जागतिक पातळीवर घेऊन जातं. ब्रेटन वूड्सकडे, शीतयुद्धाकडे आणि त्या जागतिक व्यवस्थेकडे, जी स्वतंत्र भारताच्या भवितव्यावर आधीपासूनच आपली मोहोर उमटवत होती.

**भाग दोन : जग**

**जेव्हा जगाची रचना ठरली : ब्रेटन वूड्स ते बांडुंग**

जुलै १९४४. दुसरं महायुद्ध अजूनही संपलेलं नव्हतं. युरोपात लढाई सुरू होती, आशियात जपान अजून लढत होता. पण अमेरिकेतल्या न्यू हॅम्पशायरमधील एका छोट्या पर्वतीय शहरात, ब्रेटन वूड्समध्ये, ४४ देशांचे प्रतिनिधी एकत्र जमले होते. युद्धानंतरच्या जगाची आर्थिक रचना ते ठरवू पाहत होते. भारत त्या बैठकीत होता. पण ब्रिटिश साम्राज्याचा एक भाग म्हणून. स्वतंत्र देश म्हणून नव्हे.

हा तपशील नुसता ऐतिहासिक नाही. तो सांगतो, की पुढच्या पन्नास वर्षांत भारताला ज्या जागतिक आर्थिक व्यवस्थेत जगावं लागणार होतं, ती व्यवस्था भारताच्या सहभागाशिवाय, भारताच्या हिताचा विचार न करता रचली गेली होती.

ब्रेटन वूड्स परिषदेत दोन प्रमुख आर्थिक दृष्टिकोन

आमनेसामने उभे होते. ब्रिटनचे प्रतिनिधी जॉन मेनार्ड केन्स यांनी एक आंतरराष्ट्रीय चलन व्यवस्था सुचवली होती, जिथे व्यापारात जास्त शिल्लक असलेल्या देशांवरही, म्हणजेच निर्यातदारांवरही, समायोजनाची जबाबदारी असेल. ही व्यवस्था तुलनेने संतुलित होऊ शकली असती. पण अमेरिकेचे प्रतिनिधी हॅरी डेक्स्टर व्हाइट यांनी वेगळाच प्रस्ताव मांडला. डॉलरला जगाचं मुख्य चलन करायचं, डॉलर सोन्याशी जोडायचं, आणि इतर चलनं डॉलरशी. व्हाइट जिंकले. लिटरली 'व्हाइटस्' जिंकले. कारण अमेरिका युद्धात, अर्थव्यवस्थेत आणि वाटाघाटीच्या टेबलावरही जिंकली होती.

याचा अर्थ काय झाला? डॉलर हे जगाचं राखीव चलन बनलं. जागतिक व्यापार डॉलरमध्ये होऊ लागला. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) आणि जागतिक बँक (World Bank) या दोन नव्या संस्था उभ्या राहिल्या. पण त्यांच्या रचनेत मतांचं वाटप देशांच्या आर्थिक वजनावर होतं. म्हणजे सांगायला आंतरराष्ट्रीय, पण प्रत्यक्षात अमेरिकेचं वर्चस्व. व्यापारात तूट असलेल्या देशांना, म्हणजेच ज्यांची आयात जास्त आणि निर्यात कमी, या संस्थांकडे कर्ज मागायला जावं लागायचं आणि कर्जासोबत अटी यायच्या.

युद्धानंतर अमेरिकेने युरोपच्या पुनर्बांधणीसाठी मार्शल प्लॅन जाहीर केला – सुमारे तेरा अब्ज डॉलर्स. चार वर्षांत युरोपातील बाजारपेठा अमेरिकी मालासाठी खुल्या झाल्या, साम्यवादाला अडथळा निर्माण होऊन अमेरिकी भांडवलाला नवं क्षेत्र मिळालं. आशिया, आफ्रिका, लॅटिन अमेरिका यांच्यासाठी असा कोणताही मार्शल प्लॅन नव्हता. त्यांनी बाजाराच्या नियमांनुसार विकास करायचा होता – म्हणजे ज्या बाजाराच्या नियमांनी ते आधीच पिचले होते, त्याच नियमांनुसार.

**सोनेरी युग – पण कुणासाठी?**

१९५० ते १९७३ हा काळ इतिहासकार एरिक हॉब्सबॉम यांनी सोनेरी युग म्हणून संबोधला आहे. पश्चिम युरोप आणि अमेरिकेत अभूतपूर्व आर्थिक वाढ झाली. कामगारांचे वेतन वाढले. कल्याणकारी राज्याची उभारणी झाली. फोर्डिस्ट उत्पादनव्यवस्था, मोठ्या कारखान्यांत मोठ्या प्रमाणावर उत्पादन आणि त्याच कामगारांना तो माल विकत घेण्याइतपत वेतन, हे युरोप-अमेरिकेचं चित्र होतं.

पण एक साधा प्रश्न. या सोनेरी युगाची किंमत कुणी दिली?

युरोपीय-अमेरिकी कारखान्यांना कच्चा माल कुठून येत होता? कापूस, रबर, तांबे, बॉक्साइट, तेल हे सगळं आशिया, आफ्रिका, लॅटिन अमेरिकेतून येत होतं. या कच्च्या मालाची किंमत कोण ठरवत होतं? लंडन आणि न्यूयॉर्कमधले वस्तू बाजार. भारतातून कापूस जायचा आणि त्याची किंमत लिव्हरपूलमध्ये ठरायची. मराठवाड्यातला शेतकरी किंमत-स्वीकारणारा होता, किंमत-ठरवणारा नव्हे!

अर्जेंटिनाचे अर्थतज्ज्ञ राऊल प्रेबिश यांनी १९५० च्या दशकात हे आर्थिकदृष्ट्या सिद्ध केलं. त्यांचा युक्तिवाद सरळ होता : दीर्घकाळात प्राथमिक वस्तूंच्या म्हणजेच कच्च्या मालाच्या किमती उत्पादित वस्तूंच्या किमतींच्या तुलनेत घसरत जातात. याला प्रेबिश-सिंगर प्रमेय म्हणतात. याचा अर्थ सोपा होता. जे देश कच्चा माल निर्यात करतात आणि तयार माल आयात करतात, धोरण कितीही चांगलं असलं तरी त्यांची स्थिती वर्षागणिक बिघडत जाते. हे कुणाचं अपयश नव्हतं. तर रचनाच तशी होती.

**बांडुंग : एक वेगळ्या जगाचा आग्रह**

एप्रिल १९५५. इंडोनेशियातल्या बांडुंग शहरात आशियाई आणि आफ्रिकी देशांचे २९ नेते एकत्र आले. नेहरू होते, नासेर होते, सुकार्नो होते, उन्क्रुमा होते. हा आजच्या अर्थाने केवळ राज 'नैतिका' समारंभ नव्हता. हा नव्याने स्वतंत्र झालेल्या देशांचा एक सामूहिक आग्रह होता. की जागतिक आर्थिक व्यवस्था आहे, तशी न्याय्य नाही आणि ती बदलली पाहिजे, हा त्या आग्रहाचा आशय होता.

बांडुंगमधून एक विचार उभा राहिला, जो पुढे अलिप्ततावादी चळवळ (Non-Aligned Movement) म्हणून ओळखला गेला. अमेरिका किंवा सोव्हिएत संघ, कुणाचाही अंकित न बनता स्वतःचा मार्ग निवडण्याचा हा प्रयत्न होता. नेहरूंसाठी हे केवळ परराष्ट्र धोरण नव्हतं, तर ते आर्थिक स्वायत्ततेचं धोरण होतं. जर अमेरिकेवर अवलंबून राहिलो, तर ब्रेटन वूड्सच्या अटी मान्य कराव्या लागतील. जर सोव्हिएत संघावर अवलंबून राहिलो, तर वेगळ्या अटी. अलिप्तता म्हणजे, या दोन्ही शक्तींना एकमेकांविरुद्ध खेळवत स्वतःसाठी जास्तीत जास्त वाव मिळवणं.

हे धोरण काही अंशी यशस्वी झालं. सोव्हिएत मदतीने भिलाई पोलाद कारखाना उभा राहिला. अमेरिकन PL-480 कार्यक्रमातून अन्नधान्य आलं. पण त्यासोबत अटीही आल्या. भारत या दोन्ही शक्तींकडून संसाधने घेत होता, पण कुणाचाही

पूर्ण अंकित बनत नव्हता. नेहरूंच्या नियोजनाला या जागतिक वातावरणाचा आधार होता. पण मर्यादाही होत्या.

नेहरूंचा दुसरा पंचवार्षिक योजनेतला महत्त्वाकांक्षी कार्यक्रम जड उद्योग, पोलाद, यंत्रसामग्री यांविषयी होता. यासाठी आयात आवश्यक होती. आयातीसाठी परकीय चलन आवश्यक होतं. परकीय चलन मिळवायचं तर निर्यात वाढवावी लागत होती. निर्यात वाढवायची तर जागतिक किमती अनुकूल असाव्या लागत होत्या. आणि जागतिक किमती? त्या लंडन-न्यूयॉर्कमध्ये ठरत होत्या, रत्नागिरीत नव्हे!

हा सापळा आपोआप निर्माण झाला नव्हता. तो वसाहतकाळाने घातला होता आणि ब्रेटन वूड्सने पक्का केला होता. भारत जगाच्या बाजारात होता. पण समान भागीदार म्हणून नव्हे.

**पुन्हा नारायण, पुन्हा सखूबाई, पुन्हा परळ**

परळच्या गिरणीतला नारायण जे कापड बनवत होता, त्याची किंमत त्याला माहीत नव्हती. ती ठरत होती, हजारो मैल दूर आणि ती किंमत घटली, तर गिरणीचा नफा कमी होणार, मालकाचं बजेट आकुंचन पावणार, शेवटी नारायणच्या पगारावर किंवा नोकरीवर परिणाम होणार. धागा अदृश्य होता, पण तो तिथेच होता.


नारायणचा धागा लिव्हरपूलशी जोडलेला होता, हे त्याला माहीत नव्हतं. बांडुंगमध्ये नेहरू व्यवस्था बदलण्याची भाषा करत होते, त्याच वेळी परळमध्ये त्याच व्यवस्थेची चाकं फिरवणारे कामगार पहिल्या पाळीला निघत होते. हे दोन्ही एकाच व्यवस्थेत होते. पण त्यांचे अनुभव वेगळे होते. महत्त्वाचे म्हणजे, एकमेकांचे भविष्य त्यांना माहीत नव्हते. भारताने नियोजन आणि अलिप्ततेच्या माध्यमातून एक नाजूक तोल साधला होता खरा. पण हा तोल एका असमान जगावर उभा होता आणि ते जग बदलत होतं. पुढच्या दोन दशकांत जेव्हा त्या जगात मोठे भूकंप येतील, तेलाचे, चलनाचे आणि वित्तीय राजकारणाचे, तेव्हा हा तोल कोण सोसणार? हे उत्तर परळच्या चाळीत आधी मिळेल, वॉशिंग्टनमध्ये नंतर.

१९७३ मध्ये मध्यपूर्वेतील तेलाच्या किमती एका रात्रीत चौपट झाल्या. डॉलरची सोन्याशी असलेली नाळ आधीच तुटली होती. आणि लंडन व वॉशिंग्टनमध्ये एक नवा विचार हळूहळू आकार घेत होता. जो बाजाराला देव आणि नियोजनाला पाप मानणार होता. या नव्या जगात तिसऱ्या जगाच्या देशांसाठी जागा होती, पण ती समान भागीदार म्हणून नव्हे, तर कर्ज घेणारा आणि अटी पाळणारा याचक म्हणून. हे बदल देशांतर्गत काय घडवून आणतात, इंदिरा गांधींच्या काळात कोणते अंतर्विरोध उफाळून येतात आणि नारायणच्या पुढच्या पिढीला हे सगळं कुठे नेऊन सोडतं, हे पुढच्या लेखात.

**लेखक किंग्स कॉलेज, लंडनमधील इंटरनॅशनल डेवलपमेंट आणि जियोग्राफी विभागात पीएच.डी. अभ्यासक आहेत. युनिव्हर्सिटी ऑफ ऑक्सफर्ड येथेही ते अध्यापन सहाय्य करतात. त्यांचे संशोधन मुख्यत: कामगार (श्रम), तंत्रज्ञान आणि सार्वजनिक वित्त यांच्या अर्थराजकीय व्यवस्थेवर केंद्रित आहे. संपर्क : ९६५७७९९९८६,**


**ईमेल :** hiteshdpotdar@gmail.com

## मुखपृष्ठाविषयी :



**निलह् अझवेदु ही ब्राझिलियन शिल्पकार आणि दृश्यकार. 'मिनिमम मॉन्युमेंट' हा तिचा कला प्रकल्प. २००५ मध्ये प्रथम तिने या प्रकल्पांतर्गत 'मेल्टिंग मेन' या नावाने २० सेंटिमीटर्स उंचीची शेकड्याने स्त्री-पुरुषांची हिमशिल्पे साकारली. ही शिल्पे तिने बेलफास्ट, रोम, बर्लिन सँटियागो, साओ पाउलो, बर्मिंगहॅम आदी शहरातल्या ऐतिहासिक स्मारकांच्या पायऱ्यांवर मांडली. यातून तिने ग्लोबल वॉर्मिंगच्या धोक्यांकडे जगाचे लक्ष वेधण्यास सुरुवात केली. आज भारतासारख्या विकासोत्सुक देशात हवामान बदलाचे धोके चाळिशीच्या पुढे जाणारे तापमान, टोकाचा दुष्काळ आणि टोकाची पूरस्थिती या आपत्तींमधून सातत्याने पुढे येत असताना अझवेदुची ही हिमशिल्पे पर्यावरण रक्षणाचे महत्त्व अधोरेखित करणारी ठरावी.**

# इराणच्या आखातात टायटॅनिक फुटणार?



डॉ. मोहन द्रविड

विश्वकारण



**सा**ल २०२४. महिना जून. चीनच्या TEEO 1B या सर्वगुणसंपन्न यानाने अवकाशात झेप घेतली. काही दिवसातच ते यान अवकाशातच चीनच्या ताब्यातून दुसऱ्या देशाच्या ताब्यात गेलं आहे, एवढं पाश्चिमात्य निरीक्षकांच्या लक्षात आलं. पण कोणत्या देशाच्या हे कळायला जवळजवळ दोन वर्ष लागली. तो देश होता, इराण आणि इराण त्या यानाचा उपयोग मुक्तहस्ताने करत आहे, हे त्याच्या इस्रायलविरुद्ध झालेल्या युद्धात लक्षात आलं...

रॉइटर्स या वृत्तसंस्थेने केलेल्या संशोधनानंतर चीनकडून अमेरिका-इस्रायलविरोधात इराणला होत असलेल्या मदतीबद्दल खालील माहिती बाहेर आली : १. ताशी १२,००० किमी वेगाने जाणारी बोटी नष्ट करणारी ५० CM ३०२ क्षेपणास्त्रं, २. सहाशे SUNFLOWER-२००० नावाची आत्मघातकी CM ड्रोन्स, ३. सहा ताशी १०००० किमी वेगाने जाणारी विमानांवर हल्ला करणारी HQ 16B क्षेपणास्त्रं, ४. खांद्यावरून वाहून न्यायची एक हजार MANPAD क्षेपणास्त्रं, ५. शत्रूच्या क्षेपणास्त्रांच्या उगमाचा शोध घेणारी SLC2 ही रेडार-यंत्रणा, ६. शत्रूच्या अवकाशातील उपग्रहांचा विध्वंस करणारी 50 Q199 ही क्षेपणास्त्रं. ७. रॉकेटला लागणारं घन इंधन. या सर्वांची किंमत ५ अब्ज डॉलरच्या आसपास.

इस्रायलच्या मोसाद या चतुरस्र गुप्तहेर संस्थेला ही माहिती मिळत नसती, तरच आश्चर्य. इराणवर अमेरिकेने ताबडतोब हल्ला करावा म्हणून इस्रायलचा आग्रह का होता यामागचं हे एक कारण असलं पाहिजे. अर्थात, इराणला मदत करणारा चीन हा काही एकच देश नाही याची इस्रायलला कल्पना होती. त्या दुसऱ्या देशाविरुद्ध-रशिया-अमेरिका कारवाई करणार नाही याचीही इस्रायलला कल्पना होती. तेव्हा इस्रायलने स्वतःच इराणवर हल्ला करायचं ठरवलं.

पाणी किती खोल याचा विचार न करता खाली डोकं करून तळ्यात उडी मारायची इस्रायलची जुनी सवय आहे. तिचा इस्रायलला पूर्वी फायदा झाला आहे. पण या एका प्रसंगी ती सवय इस्रायलच्या अंगाशी येणार आहे. आशिया खंडाच्या उत्तरेला कॅस्पिअन सागर नावाचं समुद्राच्या आकाराचं मोठं तळं आहे. त्याच्या उत्तर किनाऱ्यावर रशिया आहे आणि दक्षिण किनाऱ्यावर इराण. इराणच्या किनाऱ्यावर अन्झाली नावाचं एक बंदर आहे. येथून इराणचा रशियाबरोबर व्यापार चालतो. तिथे उभ्या असलेल्या बोटींवर इस्रायलने हल्ला केला आणि भरपूर नासधूस केली. त्याचा सूड उगवण्याची रशियाने शपथ घेतली आहे.

**इराणी झटका**

इराणने (अक्षरशः) चौफेर हल्ला चालू केला आहे. त्याकरता वापरलेली क्षेपणास्त्रं उत्तर कोरियाची भेट आहे. त्या भेटीचं नाव आहे, 'व्हा सॉंग १८' ती घन इंधनावर चालतात. द्रव इंधनावरच्या (केरोसिन, द्रवरूप हायड्रोजन, इत्यादि) रॉकेट इंजिनांच्या पूर्व तयारीस अर्धा दिवस जातो. तोपर्यंत ती सॅटेलाइटच्या सहाय्याने दृष्टिपथात येऊ शकतात आणि त्यांच्यावर हल्ला होऊ शकतो. घन इंधनावर चालणाऱ्या रॉकेट इंजिनाचा भडका उडण्याची शक्यता नसल्याने ती कायम तयारीत राहू शकतात. महत्त्वाचे म्हणजे, ताशी दहा हजार कि.मी. वेगाने उडत असल्याने ती येईपर्यंत त्यांचा पत्ताही लागत नाही. निशाण शोधण्याचं काम रशियाच्या उपग्रहांमार्फत होतं. त्यांचं विभाजन (Resolution) एक ते दोन सेंमी असल्याने त्यांच्या सहाय्याने मिळणाऱ्या प्रतिमा अचूक आणि स्पष्ट असतात.

इराणचा पहिला हल्ला होता, खुद्द इस्रायलवर. त्यातल्या पहिल्या चढाईत इस्रायली सैन्याचे उत्तरेकडील सात ब्रिगेड जायबंदी झाले. (एक ब्रिगेड म्हणजे पाच ते सात हजार सैनिक.) हा हल्ला दोन हजार मैल अंतरावर असलेल्या इराणच्या वेगवेगळ्या सहा प्रांतांतून क्षेपणास्त्रांनी केला होता. ही क्षेपणास्त्रं चलाख (Smart) आहेत, ती दिलेली निशाणं शोधत जातात.

**अरबी राष्ट्रांच्या नाकीनऊ**

दुसऱ्या हल्ल्याचं लक्ष्य म्हणजे, अमेरिका आणि इस्रायल यांची अरब दोस्त राष्ट्र. यांत सौदी अरेबिया, बहारेन, कुवेत, अमिराती संघ (UAE), हे देश प्रामुख्याने येतात. ते सर्व ओपेक (Oil Producing and Exporting Countries) या पेट्रोलियम निर्यात करणाऱ्या संघटनेचे, आखात सहकार्य समितीचे (Gulf Cooperation Council: GCC) आणि ऑइक (Organization of Islamic Cooperation) या इस्लामी संघटनेचे सभासद आहेत. त्यांच्याकडे गडगंज पैसा आहे, पण आपल्या जीवाच्या आणि संपत्तीच्या संरक्षणासाठी त्यांना दुसऱ्याची गरज लागते. ती अमेरिका पुरवत असे. त्यांचं अमेरिकेबरोबरचं अनेक वर्षांचं नातं सहजीवी (symbiotic) होतं. अमेरिकेचे प्रचंड आणि सुसज्ज लष्करी तळ या देशांत होते, तेथून 'मीना'वर (MENA: Middle East North Africa) अमेरिकेला लक्ष ठेवता यायचं. कुवेतवर इराकने हल्ला केला, तेव्हा सद्दाम हुसेनला धडा शिकवण्यासाठी हे तळ २००३ साली अमेरिकेने इराकवर हल्ला करण्यास वापरले होते. त्यांत इराकचे काय हाल झाले हे आपल्याला माहीत आहे. या अरब देशांची समृद्धी आणि वैभव त्यांचं स्थैर्य आणि शांती यांवर अवलंबून आहे. पण त्यांचेही आपापसात रुसवे-फुगवे चालू असतात. इराण युद्ध चालू असताना अमिरातीचं कुठेतरी बिनसलं आणि ते ओपेकच्या बाहेर पडले. रागावलेल्या

अमिरातींनी इस्रायलचे सैनिक संरक्षणासाठी आपल्या भूमीवर ठेवले आहेत.

अमेरिकेबरोबर किती लाळघोटेपणा करायचा, इस्रायलला किती जवळ करायचं, तसंच इराणला किती लांब ठेवायचं, चीन आणि रशियाबरोबर किती सौहार्दाचे संबंध ठेवायचे, यांबाबतीत त्यांच्यामध्ये मतभेद आहेत. अध्यक्ष ट्रंप आणि त्यांचा ज्यूधर्मीय जावई कुशनर यांनी अरब राष्ट्र आणि इस्रायल यांना जवळ आणण्याचे प्रयत्न केले. याला इब्राहिम दिलजमाई (Abraham Accords) असं नाव दिलं आहे. त्याप्रमाणे इस्रायल, बहारेन, अमिराती संघ, सुदान, मोरॉको यांनी एकत्र काम करायचं ठरवलं. ट्रम्प यांच्या पहिल्या अमदानीत सौदी अरेबियाने कुशनरकडे १२ अब्ज डॉलर गुंतवायला दिले.

तिसऱ्या प्रकारच्या हल्ल्यात अमेरिकेच्या सैनिकी तळांची नासधूस झाली. इराणने पहिल्या महिन्यातच सोळा तळांवर हल्ला केला. अमेरिकन नौदलाच्या पाचव्या आरमाराचं (fleet) मुख्य केंद्र बहारेनमध्ये आहे. तिथल्या एका अब्ज डॉलर किंमतीच्या रेडार केंद्राचं भस्म करून टाकलं. कतारमधल्या अल–उदेद येथे या भागातील अमेरिकेचा सर्वात मोठा हवाई तळ होता. येथून सर्व हवाई तळांना आदेश जातात. तेही आता कुचकामी झालं आहे. सौदी अरेबियामधल्या अल–सुलतान तळावरील बोइंग कंपनीचं E3 Sentry हे जमिनीपासून अवकाशापर्यंत टेहळणी करणारं (Airborne Early Warning and Control: AWACS) घुमटाच्या आकाराचं फिरतं रेडार संपूर्ण निकामी केलं. अमरातीतील अल् डाफरा या तळावर अमेरिकेची हेरगिरीची कामं चालतात. अमेरिकेचे सर्वात जास्त तळ कुठे असतील, तर ते कुवेतमध्ये. तिथे कँप आरिफजान, कँप बेरिंग, अली अल् सालेम, अहमद अल् जबर असे अनेक तळ विखुरलेले आहेत. त्यांच्यावर पंधरा हजार लोक काम करतात. कँप आरिफजानमध्ये अमेरिकन पायदळही आहे. एप्रिल महिन्यात कुवेतमधून तेलाचा एक थेंबही बाहेर पडला नाही, यावरून या देशांची काय परिस्थिती झाली आहे, हे कळून चुकते.

चौथा हल्ला म्हणजे, पर्शियन आखातातून आणि जमलं तर लाल समुद्रातून जाणाऱ्या जहाजांची कोंडी करायची. हे आखात जगाच्या व्यापाराकरता अतिशय महत्त्वाचं आहे. येथून जगाला १७ टक्के नॅफ्थाचा पुरवठा होतो, तर ३० टक्के प्लॅस्टिक रेझीनचा, ४५ टक्के सल्फरचा, ३३ टक्के हीलियम वायूचा, २५ टक्के अमोनिया–यूरियाचा. इथे हॉर्मुझ सामुद्रधुनी आहे. या सामुद्रधुनीत आखातीची रुंदी ३० किमी इतकी कमी होते. त्यातील फक्त २० किमी बोट जाऊ शकण्याइतपत खोल आहे. आंतरराष्ट्रीय कायद्याप्रमाणे कोणत्याही देशाच्या किनाऱ्याच्या २२ कि.मी. समुद्राचा भाग त्या देशाचा समजला जातो. त्या नियमाप्रमाणे या सामुद्रधुनीतील ४४ कि.मी. इराण आणि ओमानचे आहेत. म्हणजे, हॉर्मुझ ही सामुद्रधुनी ही भौगोलिक कायद्याप्रमाणे इतर देशांना बंद आहे.

**अमेरिकेच्या तोंडाला फेस**

या काळात अमेरिका आणि इस्रायल गप्प होते, अशातला भाग नाही. त्यांनी इराणला अहोरात्र झोडपून काढलं. लष्करीदृष्ट्या ते देश जगातल्या महाशक्तीत मोडतात. त्यांच्याकडे अमाप पैसा आहे, विज्ञान आहे आणि परंपरा आहे. २८ फेब्रुवारीला सुरू झालेले युद्ध मार्च महिना संपत आला तरी संपायची लक्षणं दिसेनात, तेव्हा या भागात इस्रायलने पूर्वी केलेल्या लढ्यांपेक्षा हा लढा वेगळा निघणार, याची कल्पना अमेरिका आणि इस्राइल यांना यायला लागली. या दोघांची मदार एका झटक्यात युद्ध संपवण्यावर होती. युद्ध लांबणं हे दोघांनाही परवडणारं नव्हतं. मुख्य प्रश्न युद्धसामग्रीचा होता. इस्रायल लहान असल्यामुळे त्याची उत्पादनशक्ती मर्यादित आहे. त्याला लागणारी युद्धसामग्री त्याचा चिरंतन उपकारकर्ता अमेरिका पुरवतो. पण जगभर युद्धं करून अमेरिकेकडचा माल संपत आला आहे, शस्त्रं बनवण्यास आवश्यक असलेल्या रेअर अर्थ धातूंचा चीनकडून येणारा पुरवठा बंद झाला असल्यामुळे त्यांचं नव्यानं होऊ शकलेलं उत्पादन जवळजवळ बंद आहे.

अशा परिस्थितीत युद्धविराम करावा, असं अमेरिकेच्या मनात आलं. अर्थात धमक्या देणं बंद न करता. पहिला प्रस्ताव आला मार्च २१ ला. अमेरिकेने दोन दिवसांचा युद्धविराम जाहीर केला. तेवढ्या अवधीत इराणने हॉर्मुझची सामुद्रधुनी उघडी करावी, अन्यथा अमेरिका इराणचे सर्व पॉवर प्लँट्स नष्ट करेल, अशी धमकी दिली. ही मुदत संपायच्या १२ तास आधी ट्रम्पसाहेब म्हणाले, की ''आमची इराणबरोबर बोलणी चालली आहेत. तेव्हा मी ही मुदत आठ दिवसांनी वाढवत आहे. या वाढीव मुदतीच्या अटी पहिल्यासारख्याच आहेत.'' यातील मुख्य अडचण एवढीच होती, की इराणबरोबर बोलणी चाललीच नव्हती. ही वाढीव मुदत मार्च २८ ला संपणार होती. पण त्या आधीच मार्च २६ तारखेला ट्रम्पसाहेबांनी ही मुदत ६ एप्रिलपर्यंत वाढवून घेतली. ७ एप्रिलला

*आपले अंगण सुरक्षित ठेऊन, दुसऱ्याच्या दारात जाऊन युद्धाचा खेळ मांडणाऱ्या अमेरिकेला इराणने मोठीच अद्दल घडवली. त्यासाठी चीन आणि रशियाने पडद्यामागून बजावलेली भूमिका कळीची ठरली...*

ही मुदत त्यांनी एकतर्फी वाढवून २१ एप्रिल केली. २१ एप्रिल आली आणि गेली. ''इराणच्या सरकारमध्ये आपापसात मतभेद आहेत. तेव्हा त्यांच्याबरोबर बोलणी म्हणजे वेळेचा अपव्यय आहे,'' ट्रम्प म्हणाले.

ट्रम्प यांच्या धमक्या मात्र मर्यादेबाहेर जायला लागल्या. युद्धात भाग घेणारे सैनिक सोडून निरपराध लोकांना ठार मारणे किंवा नुसती तशी धमकी देणं, हा आंतरराष्ट्रीय कायद्याप्रमाणे गुन्हा आहे. पण ट्रम्प कुठलाही कायदा पाळत नाहीत. त्यांनी सबंध इराण देश खाक करण्याची धमकी दिली. ती कमी वाटते, म्हणून इराणची संस्कृतीच इतिहासातून नष्ट करू असा दम दिला आहे. इथे प्रश्न असा उद्भवतो : समजा, या युद्धात इराण सरस ठरलं आणि इराणने किंवा तत्सम शक्तीने इस्रायल नष्ट करायचा प्रयत्न केला, तर अमेरिका किंवा तिचे साथीदार कोणत्या तोंडाने निषेध करणार आहेत?

**क्षणात धमकी प्रकोपाची, क्षणात हाक स्वातंत्र्याची...**

एरवी, इराणच्या आखातीतून दिवसामागे २०० जहाज येत-जात असतात. हा लेख लिहित असताना, इराणच्या आखातीतली वाहतूक ठप्प आहे. इराणने घातलेल्या अडथळ्यापाठोपाठ अमेरिकेने त्यांचा स्वतःचा अडथळा टाकला आहे. पण तो आहे, आखाताबाहेर अरबी समुद्रात. इराणच्या कोंडीतून बाहेर आलेल्या रशिया, चीनसारख्या देशांची जहाजं अमेरिका अडवणार हा हेतू. ही बंदी चालू असताना खुद्द इराणच्या दोनशे बोटी आखातात जात आहेत व बाहेर पडत आहेत. इराणचं दररोज पंधरा कोटी बॅरल तेल विकायला बाहेर पडतं. आज जवळजवळ २० अब्ज डॉलरचा माल अरबी समुद्रात आला आहे आणि इराणला त्याचा मोबदलाही मिळाला आहे.

व्हिएतनामविरुद्ध चाललेल्या युद्धाच्या धामधुमीत १९७३ साली अमेरिकेने राष्ट्राध्यक्षांवर बंधन घालण्यासाठी एक कायदा केला होता. संविधानाप्रमाणे युद्ध पुकारण्याचा अधिकार फक्त संसदेचा असून ते चालवण्याचा अधिकार राष्ट्राध्यक्षाचा आहे. राष्ट्राध्यक्षाला ते मनमर्जीने चालू करता येत नाही. जर त्याने चालू केलं, तर नव्या कायद्याप्रमाणे साठ दिवसांच्या आत त्याने संसदेची परवानगी मिळवली पाहिजे. तेव्हा साठ दिवस झाल्यानंतर ट्रम्पनी युद्धाचं नवीन बारसं करून 'भव्य प्रकोप' (Epic Fury) बदलून 'स्वातंत्र्य' (Freedom) ते चालूच ठेवलं.

**अमेरिकेच्या नशिबी चिनी धोबीपछाड**

''आमच्या बोटी अडवून तर दाखवा,'' असं चीनने आव्हान दिलं आहे. प्रत्यक्षात काय चाललं आहे, हे सांगणं कठीण आहे. इराणकडे असलेल्या जहाजविध्वंसक क्षेपणास्त्रांचा पल्ला २०० कि.मी. असल्याने अमेरिकन जहाजांना आखाताच्या मुखापासून कमीत कमी तेवढे लांब उभे राहावे लागते. निरीक्षकांच्या मते, अशा बोटी अडवण्यात अमेरिकेला दहा टक्क्यांपेक्षा जास्त यश येत नाही. याचं कारण अमेरिकेकडे तेवढ्या बोटी आणि बाकीची सामग्री नाही. विशेषतः एकाच वेळी इराणचा दहा-वीस जहाजांचा तांडा मुसंडी मारून बाहेर पडला, तर अमेरिका त्या कशा अडवणार हा प्रश्न आहे. हे लक्षात घेऊन अमेरिकेने 'स्वातंत्र्य' मोहीम एका दिवसात मागे घेतली.

हे चालू असताना जगात इतर घडामोडी होत होत्या, ज्यांचे परिणाम या युद्धापलीकडे दूरगामी असणार आहेत. अमेरिकेच्या भात्यामध्ये एक अमोघ अस्त्र आहे, ते म्हणजे बहिष्कार (Sanctions). अमेरिका ज्याला ही शिक्षा देईल, त्याला

जगणं मुश्किल होतं. या शिक्षेला आताआतापर्यंत रशिया, चीनसुद्धा घाबरायचे. इराणकडून तेल विकत घेतलं म्हणून अमेरिकेने चीनच्या अनेक कंपन्यांवर बंदी लादली. आता चीननेच तत्सम कायदा केला आहे. जो कुणी अमेरिकेचं ऐकेल त्यालाच दंड! म्हणजे बऱ्याचशा बँकांना दोघांपैकी कुणातरी एकाला दुखवणं भाग आहे.

**ढेकणासंगे हिरा भंगला...**

जग असं विनाशाच्या उंबरठ्यावर उभं असताना, एक आशादायी घटना झाली आहे. ती म्हणजे, इराण आणि अमेरिका यांनी मध्यस्थामार्फत बोलणी करण्याची दाखवलेली तयारी. दुर्दैवाने, या चर्चेत इस्रायल भाग घेत नाही, कारण इस्रायलला वाटाघाटीच नको आहेत. इस्रायल आपल्याबरोबर अमेरिकेला धरून खेचत नेत आहे. ढेकणासंगे हिरा भंगला असं तुकोबांनी म्हटलंच आहे! ट्रम्प यांचा गॉल्फच्या खेळातील भागीदार आणि त्यांचा जावई बोलणी करताहेत. (ती अमेरिकेच्या वतीने की ट्रम्प कुटुंबियांच्या वतीने हे सांगणं कठीण आहे!) मध्यस्थ म्हणून पाकिस्तानची निवड केली आहे.

**जगावर उपकारच म्हणायचे...**


इराणला मदत करणाऱ्या देशांमध्ये सर्वात महत्त्वाचा देश आहे, चीन. चीन नसता तर इराणचा इराक केव्हाच झाला असता. (ज्याप्रमाणे चीनची मदत नसती, तर युक्रेन युद्धात रशियाचं दिवाळं केव्हाच वाजलं असतं, त्याप्रमाणे.) पाकिस्तान आणि चीनचे संबंध जिव्हाळ्याचे आहेत. त्यामुळे पाकिस्तानच्या मध्यस्थीस इराणची हरकत नव्हती. पाकिस्तान आणि इस्रायल यांचा छत्तीसचा आकडा आहे हे खरं आहे. दोघेही अण्वस्त्रधारी आहेत आणि दोघांनी एकमेकांवर बाँब टाकायची – उघड नसली तरी आडून – धमकी दिलेली आहे. तरीही भारत–पाकिस्तान युद्धानंतर ट्रम्पसाहेबांचं पाकिस्तानी लष्करप्रमुख आसिम मुनीरवरचं प्रेम वाहून चाललं आहे. तेव्हा पाकिस्तानच्या मध्यस्थीस त्यांचीही आडकाठी नव्हती. (ज्या कौशल्याने पाकिस्तान चीन आणि अमेरिका या दोघांनाही सांभाळतो, त्याचं कौतुक करायला पाहिजे. अध्यक्ष निक्सन यांच्या काळात हाडवैरी असलेल्या चीन आणि अमेरिका यांची दिलजमाई पाकिस्तानने केली होती, हे जाणकारांच्या लक्षात असेल.) पाकिस्तानचे अरब राष्ट्रांबरोबरही संबंध चांगले आहेत. पाकिस्तानने नुकताच सौदींबरोबर लष्करी करारही केला आहे.

अमेरिकेला आता युद्धात रस राहिला नाही. तिचे सर्व लष्करी तळ तुटल्यामुळे ती कशी लढणार हाही प्रश्न आहे. ट्रम्प यांचं मन चंचल आहे. एकाच गोष्टीवर फार वेळ लक्ष ठेवणं त्यांना फार कठीण होतं. त्यांची लोकप्रियता लयाला गेली आहे. त्यात पुन्हा नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात मध्यवर्ती निवडणुका आहेत. त्यात लोकसभेच्या सर्व आणि राज्यसभेच्या एक तृतीयांश जागांवर निवडणूक होईल. ट्रम्पना त्यांच्या जागेवरून हटवायच्या वार्ता चालू झाल्या आहेत. अमेरिकेने रणभूमी सोडली, तर इस्रायलचे काय होईल? सहजासहजी शरण जाणं त्याच्या रक्तात नाही. बाकीची राष्ट्र त्याला सुखासुखी जगून देणार नाहीत आणि अण्वस्त्रधारी इस्रायलला शेवटी सॅम्सन पर्याय स्वीकारावा लागेल. आपलं मरण डोळ्यासमोर दिसत असताना सॅम्सनने सर्व देऊळ तोडून सर्वांना मारून टाकलं, अशी बायबलमध्ये गोष्ट आहे.

आतापर्यंत एक गोष्ट स्पष्ट झाली आहे की हे युद्ध सुरू होण्यास आणि सुरू ठेवण्यास केवळ इस्रायल कारणीभूत आहेत. ज्यूंची अतिमहत्त्वाकांक्षा, गर्व, उर्मटपणा, बायबलची नशा आणि पैशाची उब या गोष्टी मुळाशी आहेत. ज्यूंवर झालेला ऐतिहासिक जुलूम हेही कारण होऊ शकते. त्यामुळे कुणावर अवलंबून न राहता आपल्या रक्षणासाठी आपल्यालाच प्रयत्न करावे लागणार आहेत, ही भावना समजण्यासारखी आहे. पण त्याकरता इतरांची घरं उडवायची, लहान मुलांना मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडून टाकायचं आणि अशा कृत्याबद्दल स्वतःची पाठ थोपटायची, हे फार काळ चालणार नाही आणि नव्हतं. या गोष्टीचा निचरा करायची वेळ आली आहे, हे इस्राइलला जेवढ्या लवकर समजेल तेवढे इस्राइलचे स्वतःवर आणि इतर जगावर उपकार होतील. नाही तर हिमनगाच्या दिशेने वेगात चाललेली अमेरिकेची टायटॅनिक फुटेल यात शंकाच नाहीत.

**डॉ. मोहन द्रविड हे फिजिक्समधील पीएच.डी. असून राजकारण, विज्ञान, इतिहास या विषयांवरील त्यांचे लिखाण वेगवेगळ्या मासिकांतून प्रसिद्ध होते. त्यांचे वास्तव्य अमेरिकेत असून 'मुक्काम पोस्ट अमेरिका' हे अमेरिकेचं सर्वांगीण दर्शन देणारे पुस्तक 'रोहन प्रकाशन'ने प्रसिद्ध केले आहे.**
**संपर्क : ९८२०५ ६३१३०**

# काळोखातले उजेडात...



रवि आमले

**पाळतशाहीच्या पाऊलखुणा – ६**



*मॅकजार्ज बंडीशी झालेल्या चर्चेनंतर माध्यमांना सामोरे जाताना राष्ट्राध्यक्ष जॉन्सन; अमेरिकी पाळतशाहीचा मोहरा : मॅकजार्ज बंडी*

**न्यू** यॉर्क टाइम्सचा २८ मार्च १९६५चा अंक तसा नेहमीसारखाच होता. रुटीन बातम्या. त्यातल्या त्यात विशेष बातमी होती डॉ. मार्टिन ल्यूथर किंग यांच्याविषयीची. ते अलाबामातल्या नागरी हक्कांविषयीची चळवळ अधिक तीव्र करणार होते. तिला दोन कॉलम जागा मिळाली होती. बाकी मग नेहमीचेच व्हिएतनाम, क्युबा वगैरे तेव्हाचे चर्चेतले विषय. ते पहिल्या पानावर होते. यात खळबळजनक वगैरे काहीही नव्हते. पण या अंकातल्या एका लेखाने मात्र 'सेंट्रल इंटेलिजन्स एजन्सी' (सीआयए) आणि 'नॅशनल सिक्युरिटी एजन्सी' (एनएसए)च्या अधिकाऱ्यांना अस्वस्थ करून सोडले होते...

**न्यू** यॉर्क टाइम्सच्या ३२व्या पानावरचा तो दोन कॉलमी लेख. एका भल्यामोठ्या जाहिरातीच्या बाजूस असलेल्या जागेत कोंबलेला. त्याचा मथळा होता – 'द इम्पॉर्टन्स ऑफ बीईंग बंडी'. राष्ट्राध्यक्षांचे राष्ट्रीय सुरक्षा सहायक मॅकजॉर्ज बंडी यांचे व्यक्तिचित्र रेखाटणारा तो लेख. या लेखाने, खरेतर त्यासोबत वापरलेल्या छायाचित्राने सीआयए आणि एनएसएचे अधिकारी काळजीत पडले होते.

न्यू यॉर्क टाइम्सच्या असंख्य वाचकांनी तर ते छायाचित्र नीट पाहिलेही नसेल. व्हाइट हाउसच्या हिरवळीवर राष्ट्राध्यक्ष जॉन्सन यांच्याशी हे बंडी महाशय बोलत आहेत, असे ते छायाचित्र. त्यात बंडी यांच्या हातातील एक फाइलवर लिहिलेले 'टॉप सिक्रेट दिनार' हे शब्द स्पष्ट दिसत होते.

गुप्तचर संस्थांमध्ये गोपनीयतेच्याही पायऱ्या असतात. एनएसएमध्ये सर्वात वरच्या पायरीचा 'कोडवर्ड' होता 'दिनार' . तत्पूर्वी त्यास म्हणत 'ट्राइन'. आता त्यास 'टॉप सिक्रेट अम्ब्र' म्हणतात. अम्ब्र म्हणजे सावलीचा काळोखी केंद्रभाग. या छायाचित्रातून तो कोडवर्ड दिसत होता. ते पाहताच सीआयएच्या एका अधिकाऱ्याने न्यू यॉर्क टाइम्सशी संपर्क साधला. त्या छायाचित्राची मूळ 'निगेटिव्ह' मागवून घेतली. इतर कोणाच्या हातात ती जाऊ नये, यासाठी घेतलेली ती काळजी होती. हे सर्व पाहिल्यानंतर कोणासही वाटेल, की हे जरा अतिच होत आहे. ते तीन शब्द समजा समजले लोकांना, तरी त्याने एवढा काय फरक पडणार आहे?


**कोडवर्डचे कोडे**

त्या दिवशी सीआयएचे तत्कालीन उपसंचालक (आणि एनएसएचे भावी संचालक) लेफ्ट. जनरल मार्शल सी. कार्टर यांनी मॅकजॉर्ज बंडी यांना जो दूरध्वनी केला आणि त्यांचे जे बोलणे झाले, त्यातून या प्रश्नाचे उत्तर मिळते. कार्टर बंडी यांना म्हणाले, की 'हे मॅक, तुमच्या गोपनीय खात्यात अडीच हजार डॉलर आहेत ना?' बंडी यांना या प्रश्नाचा रोख कळेना. तेव्हा कार्टर यांनी त्यांना, एनएसएच्या सिग्नल इंटेलिजन्सचा एखादा कोडवर्ड लोकांना समजल्यानंतर तो बदलण्यासाठी किती खर्च येतो, ते समजावून सांगितले. एनएसएचे ब्रिटिश, ऑस्ट्रेलिया आदी देशांच्या सिग्नल इंटेलिजन्स संस्थांशीही संबंध. एक कोडवर्ड फुटला, तर त्या सगळ्यांना तो बदलावा लागणार. त्याचे हजारो रबरस्टॅम्प फेकून देऊन नव्या कोडवर्डचे स्टॅम्प तयार करावे लागणार. त्यात पैसे आणि वेळ दोन्ही वाया जाणार. म्हटले, तर साधी बाब. परंतु सीआयए, एनएसए यासारख्या संस्थांसाठी गोपनीयतेबाबत किती पातळ्यांवर संवेदनशील असतात, हे यातून लक्षात यावे. याच न्यू यॉर्क टाइम्समधील लेखामधील तिसरेच वाक्य सरकारी गोपनीयतेविषयीचे एक सत्य सांगून जात होते, की 'गोपनीयतेची आवश्यकता जवळजवळ नेहमीच लोकशाहीच्या कर्तव्यांच्या वरचढ ठरते.' आणि एनएसएबाबत ते तंतोतंत खरे होते.

एनएसए ही अमेरिकेची सर्वांत मोठी गुप्तचर संस्था. पण आजही जनचर्चेत तिचे नाव नसते. याचे एक कारण, ही संस्था काही थेट जेम्स–बॉण्डगिरी करणारी नाही. त्यामुळे लोकांना हवी तशी चित्तचक्षुचमत्कारिकता तिच्या कार्यात नाही. पण गुप्तचर जे 'इंटेलिजन्स' जमा करण्याचे काम करतात. तेच काम तीही करते. फक्त तिचे कुरूक्षेत्र वेगळे असते. ते इलेक्ट्रॉनिक्सने, सिग्नल्सनी बनलेले असते. ते शून्य आणि एक या अंकांनी बनलेले डिजिटल मैदान असते. सर्व्हेलन्स अर्थात पाळत हा तिच्या कामाचा महत्त्वाचा भाग असतो. तिचा जन्म शीतयुद्धकाळातला. जन्मतारीख ४ नोव्हेंबर १९५२. सटवाई प्रत्येकाच्या माथ्यावर जन्मतःच त्याचे भवितव्य लिहिते, ही आपली भाबडी अंधश्रद्धा. त्या भाषेत सांगायचे, तर एनएसएच्या माथ्यावर त्या अमेरिकी सटवाईने जन्मतःच गोपनीयता कोरलेली होती. इतकी, की अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष हॅरी एस. ट्रूमन यांनी २४ ऑक्टोबर १९५२ रोजी परराष्ट्र आणि संरक्षण मंत्र्यांना पाठवलेल्या ज्या 'प्रेसिडेन्शियल मेमोरँडम'द्वारे ही संस्था जन्मास आली, तो मेमोही पुढे अनेक वर्षे गोपनीय ठेवण्यात आला होता.

'पझल पॅलेस' या एनएसएच्या 'चरित्रग्रंथा'चे लेखक जेम्स बॅमफोर्ड सांगतात, की या मेमोरँडमला एनएसएचे लोक 'टॉप सिक्रेट बर्थ सर्टिफिकेट' म्हणत असत. त्याची माहिती लोकांपर्यंत पाझरली, तेव्हा समजले, की संस्थेच्या जन्मपत्रिकेतच तिला पूर्ण मोकळीक देण्यात आलेली आहे. निर्बंधहीन अशी ती संस्था आहे. हे जगजाहीर होण्यास अनेकांचे प्रयत्न कारणीभूत ठरले. त्यातील एक लक्षणीय प्रयत्न होता, डेव्हिड कान (स्पेलिंग – के ए एच एन) यांचा.

ते पत्रकार आणि हौशी 'क्रिप्टॉलॉजिस्ट'. कूटलिपी, कूटभाषा हा त्यांच्या आवडीचा, अभ्यासाचा विषय. त्यांनी लिहिलेले 'द कोडब्रेकर्स' हे या विषयावरचे एक उत्तम पुस्तक. (यात कौटिल्याचे अर्थशास्त्र, वात्सायनाचे कामशास्त्र यांचेही




*एनएसएचे काळे उद्योग फेलवॉकने हिमतीने उघड केले, त्याला साथ दिली, 'रॅम्पाट्‌र्स' मासिकाने. दुर्गुणी अमेरिकेचा हा पाळतशाहीला आव्हान देणारा आदर्शवत गुण...*

संदर्भ येतात.) 'मॅकमिलन'तर्फे हे पुस्तक प्रकाशित करण्यात येत आहे. या पुस्तकात एनएसएवर एक पूर्ण प्रकरण आहे, याचा सुगावा जेव्हा एनएसएला लागला, तेव्हा हबकलेच ते. विचार सुरू झाला, की हे पुस्तक दडपायचे कसे? कोणी कान यांना सरकारी सेवेत घ्यावे म्हणजे कायद्याने दडपण आणता येईल, असे सुचवले. कोणी 'ब्लॅक बॅग जॉब' हा पर्याय सुचवला. म्हणजे पाळत ठेवणे, दूरध्वनी टॅप करणे, संभाषण चोरून ऐकण्यासाठीची उपकरणे बसवणे वगैरे बेकायदेशीर गोष्टी करणे. एकदा तर एनएसएच्या संचालकांनी सुचवले, की कान यांच्या लिखाणावर टीका करणारा मजकूर छापून आणून, त्यांच्याविषयी प्रश्नचिन्ह निर्माण करावे. तसे 'पुस्तक परीक्षण' लिहूनही घेण्यात आले होते. अखेर सीआयएचे माजी संचालक ॲलन डलस यांनी प्रकाशकांशी संपर्क साधला. ४ मार्च १९६६ रोजी या पुस्तकाची 'छपाईप्रत' संरक्षण मंत्रालय आणि तेथून एनएसएकडे धाडण्यात आली. राष्ट्रीय सुरक्षेच्या कारणावरून हे पुस्तक मागे घ्यावे, यासाठी प्रकाशकावर दबाव आणण्यात आला. अशा वेळी प्रकाशक नमतात. अगदी छापलेले पुस्तकही छापलेलेच नाही, असे जाहीर करण्यापर्यंत नमतात. पण ती अमेरिका असल्याने तसे काही झाले नाही. मग एनएसएने सुचवले की ते प्रकरण गाळावे. अखेर पुस्तकातील काही संवेदनशील मजकूर, म्हणजे उदाहरणार्थ एनएसए आणि जीसीएचक्यू यांच्या संबंधांची माहिती असणारे वगैरे परिच्छेद गाळण्यावर प्रकरण सुटले. १९६६मध्ये हे पुस्तक बाजारात आले. पण त्याचा भर प्रामुख्याने कूटलिपीवर असल्याने त्यातून एनएसएचे जे भयंकर रूप होते ते झाकलेलेच राहिले. ते काळोखातून उजेडात आले पुढे सहा वर्षांनी. ते करण्याचा मान जातो, पेरी फेलवॉक यांच्याकडे.

**फेलवॉकचे धाडस**

एनएसएमध्ये वरिष्ठ विश्लेषक या पदावर विविध देशांत काम केलेला हा अवघ्या २५ वर्षांचा 'एअर फोर्स स्टाफ सार्जंट'. व्हिएतनाम युद्धाविषयीच्या अमेरिकी धोरणांमुळे भ्रमनिरास झालेला. अशात १९६७ मध्ये इस्रायल आणि अरब राष्ट्रांतील ते सहा दिवसीय युद्ध झाले. त्यावेळी अमेरिकी नौदलाचे 'लिबर्टी' नामक हेरगिरी जहाज इजिप्तच्या समुद्रातून तेथील संदेशवहनावर नजर ठेवत होते. इस्रायलने ते जहाज बुडवले. ३५ अमेरिकी नौसैनिक मारले गेले. १७१ जण जखमी झाले. इस्रायलचा खुलासा असा, की चुकून घडले ते. पण ते खोटे होते. इस्रायली सैनिकांनी कैद केलेल्या शेकडो इजिप्शियन सैनिकांचे हत्याकांड केले होते. ते उजेडात येऊ नये, म्हणून इस्रायलने अमेरिकेचे हेरगिरी जहाज बुडवले होते. आणि तरीही लिंडन जॉन्सन प्रशासनाने त्यावर पडदा टाकला. या अशा गोष्टींमुळे फेलवॉकचे युद्धांबाबतचे मत बदलले. अमेरिकेत परतल्यावर त्याने पुन्हा महाविद्यालयात प्रवेश घेतला. ४ मे १९७० रोजी केंट स्टेट विद्यापीठात व्हिएतनाम युद्धाविरोधातील सभेवर अमेरिकेच्या नॅशनल गार्डने गोळीबार केला. त्यात चार विद्यार्थी मृत्युमुखी पडले. नऊ जखमी झाले. या घटनेचा फेलवॉकवर मोठा परिणाम झाला. तो युद्धविरोधी चळवळीकडे ओढला गेला 'पेंटॅगॉन पेपर्स'फुटी, 'वॉटरगेट'चा काळ तो. त्यानेही ठरवले, की एनएसएवरचा गोपनीयतेचा पडदा हटवून, या संस्थेचे नेमके काय उद्योग चालतात, ते नागरिकांसमोर आणायचे. एक मोठा लेख लिहिला त्याने. पण तो छापणार कोण? त्याच्या नजरेसमोर नाव आले, 'रॅम्पाट्‌र्स'चे. छोटेसे मासिक ते. पण बंडखोर. सीआयए महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा हेरगिरीसाठी कसा वापर करते, याचा गौप्यस्फोट करण्याचे धाडस दाखवले होते, त्यांनी. त्यामुळे पेरी फेलवॉकने त्या मासिकास आपला लेख पाठवला. मात्र त्यातली ती 'सिगिन्ट' आणि 'एलिन्ट' आणि 'कॉमसेक'सारखी तांत्रिक शब्दावली पाहून डेव्हिड होरोविट्झ, पीटर कोलिएर या संपादकांना समजेनाच, की याचे काय करायचे? या मासिकात लष्करी गुप्तचर संस्थेत काम केलेला एक पत्रकार होता. त्याने तो लेख वाचल्यावर, तो उडालाच. म्हणाला, 'हा लेख छापला, तर आपली जेलवारी नक्की.' मग त्या संपादकांनी पेरी फेलवॉकला भेटायला बोलावले. त्याची विस्तृत मुलाखत घेतली आणि ऑगस्ट १९७२च्या अंकात ती प्रसिद्ध केली. तिचा मथळा होता – 'यूएस


इलेक्ट्रॉनिक एस्पिओनॉज : ए मेमॉयर' .

**उपद्व्यापी उठाठेव**

सुरुवातीची सुमारे चार पाने विषय परिचयाची आणि त्यानंतर पेरी फेलवॉक यांची विन्स्लो पेक या टोपणनावाने मुलाखत, असा तो तब्बल १६ पानी ऐवज. एनएसएचे प्रताप आणि उद्योग यांवर पहिल्यांदाच मास मीडियातून प्रकाशझोत पडला होता. त्यामुळे न्यू यॉर्क टाइम्ससारख्या वृत्तपत्रांनीही त्याची दखल घेतली. त्यावरच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या. कोणी यात काय विशेष म्हणत टीकाही केली. गंमत म्हणजे, इंटेलिजन्स कम्युनिटीने मात्र त्याकडे साफ दुर्लक्ष केले. अनेकांचा कयास होता, की आता पेरी फेलवॉक यांना अटक होणार. पण तसे झाले नाही. 'पझल पॅलेस' (१९८२) हे एनएसएचे चरित्र आणि चारित्र्य यांवरचे एक उत्तम पुस्तक. त्याचे लेखक-पत्रकार जेम्स बॅमफोर्ड सांगतात, की खटला भरला, तर त्या लेखातील मजकुरास दुजोरा दिल्यासारखे झाले असते. त्यामुळे एनएसएने ते टाळले.

सीआयएने काही वर्षांपूर्वी खुल्या केलेल्या एका गोपनीय फाइलमध्ये पेरी फेलवॉकची ही मुलाखत आणि त्यासंबंधी प्रसिद्ध झालेल्या काही बातम्यांची कात्रणे आढळतात. त्यातून एक बाब स्पष्ट होते, की तेव्हाच्या त्या वृत्तपत्रांनी, त्या लेखातील एनएसएची जी 'कौतुकास्पद' कारवाई आहे, तिच्यावर अधिक भर दिला होता. एनएसएने सोव्हिएत रशियाचे सर्व कोड्स उलगडले होते, ही बाब ठळकपणे छापली होती. पण त्यातील एकानेही एनएसएमधील गैरप्रकारांचा उल्लेख केला नाही. फेलवॉकने स्पष्ट म्हटले होते, की एनएसएमधील बरीच मंडळी या ना त्या प्रकारच्या बेकायदेशीर कारवायांत अडकलेली आहेत. काही जण तर मानवी तस्करीत स्लेव्ह ट्रेडमध्ये गुंतलेले आहेत. त्याकडे मात्र माध्यमांनी दुर्लक्ष केले. पण याच बरोबर, जगभरात एनएसएची सुमारे दोन हजार स्टेशन्स आहेत आणि त्या माध्यमातून ही संस्था जगातील शब्दशः प्रत्येक संदेश 'इंटरसेप्ट' आणि 'डिकोड' करू शकते, या गोष्टीकडेही या वृत्तपत्रांनी काणाडोळा केला होता.

वस्तुतः यातून तेव्हाची ती वृत्तपत्रे, पत्रकार, अभ्यासक यांचा मेंदू हादरून जायला हवा होता. फेलवॉक यांची ही मुलाखत केवळ 'एनएसए अस्तित्वात आहे' एवढेच सांगत नव्हती. तिच्या गोपनीय सिग्नल इंटेलिजन्स यंत्रणेचे अवाढव्य स्वरूप, क्षमता आणि जगास कवेत घेणाऱ्या तिच्या कक्षा




*डेव्हिड कान यांच्या 'द कोडब्रेकर' पुस्तकाने अमेरिकी पाळतशाहीला घाम फोडला... पुस्तक लोकांपर्यंत पोहोचू नये, यासाठी नाना खटपटी करून झाल्या. पण गुप्तचर संस्थांचे कारनामे जगासमोर आलेच...*

यांकडे ती निर्देश करीत होती. एनएसएची ही प्रचंड क्षमता केव्हाही अमेरिकी नागरिकांवर उलटू शकत होती. पाळतखोरीची चटक मर्यादा जुमानत नसते. तेथे आपले-परके असा भेद नसतो. याचे संकेत ही मुलाखत देत होती. धोक्याची घंटा वाजवली होती, या मुलाखतीने. कालांतराने ते सारे धोके लोकांसमोर आले. सरकार नामक यंत्रणा राष्ट्रीय सुरक्षेच्या, गुन्हेगारी, दहशतवाद विरोधी कारवायांच्या नावाखाली सामान्य नागरिकांच्या खासगीपणाची कशी शिकार करते, ते चर्च समितीपासून एडवर्ड स्नोडेन यांच्यापर्यंत अनेकांनी हे दाखवून दिले. आज ती सर्व प्रकरणे इतिहासजमा झालेली असली, आजच्या पाळतखोरीने किती तरी योजने उड्डाणे मारलेली असली, तरी ती जुनी प्रकरणे जाणून घेणे महत्त्वाचे. कारण पाळतखोरीचे वर्तमान आकळण्यासाठी उपयुक्त आहेत ती.

**रवि आमले हे ज्येष्ठ पत्रकार-संपादक, प्रथितयश लेखक आणि भाष्यकार आहेत. त्यांची प्रोपगंडा, रॉः भारतीय गुप्तचर संस्थेची गूढ गाथा, मॅनहंट (अनुवादित), परकीय हात, वरुण ते बहिर्जी आदी पुस्तके वाचकप्रिय ठरली आहेत.**


**संपर्क**: ravi.amale@icloud.com

# प्रेम आणि द्वेष : हा कल्लोळ भावनांचा




प्रा.श्रीनिवास हेमाडे

**गोष्ट प्रेमाची** लेखांक – ६



प्रेमाचा एकाकार साकारणारे मार्गारेट कूक हिचे चित्र...



तत्त्वज्ञ जोस ओर्तेगा गासेट...

**प्रस्तुत लेखमालिकेतील 'मूरची अंतर्दृष्टी... चांगुलपणाचे दर्शन घडवणारी!' (लेखांक ०४ एप्रिल २०२६) आणि 'खुल्लम खुल्ला प्यार करेंगे...!' (लेखांक ०५ में २०२६) या दोन भागातील लेखांच्या आधारे आपण असा निष्कर्ष काढला, की 'प्रेम' ही अव्याख्येय संकल्पना असून 'प्रेम' हा सरल, साधा, निरवयवी, अमिश्र, अविश्लेष्य अभौतिक गुणधर्म आहे. प्रेमाचे ज्ञान इंद्रिय संवेदनांना होत नाही, तर प्रतिभेला होते. 'प्रेम' ही अशी 'जाणीव' (The Consciousness) आहे, जिला इतर कोणत्याही जाणिवेपेक्षा जास्त मूल्य आहे. प्रेम ही जाणिवेच्या काही उच्च *अवस्था* असते. परिणामी, प्रेमाची व्याख्या करण्याचा कोणताही प्रयत्न केवळ प्रेमविषयक 'नैसर्गिकतेचा तर्कदोष' घडवतो...**

तत्त्वज्ञ जॉर्ड एडवर्ड मूरची भूमिका आणि प्रेम संकल्पना व भावना यांच्या संदर्भात लागू केलेले त्याचे वरील उपयोजन अधोरेखित करता 'प्रेम' समजावून घेण्याची आणखी एक प्रभावी भूमिका पाहणे इष्ट ठरेल. ही भूमिका एकोणिसाव्या शतकातील जर्मन तत्त्ववेत्ता अलेक्झांडर फेंडर (Alexander Pfnder, 1870-1941) याने सविस्तर मांडल्याचे स्पॅनिश तत्त्ववेत्ता जोस ओर्तेगा वाय गासेट (Jose Ortega Y Gasset, 1883-1955) याने त्याच्या ''On Love : Aspects of A Single Theme'' या ग्रंथात अधोरेखित केले आहे. फेंडरचा सिद्धांत 'प्रेम आणि द्वेष' अशा दोन भावनांच्या तुलनेवर बेतलेला आहे, अशी मांडणी ओर्तेगा करतो.

ओर्तेगा प्रथम 'प्रेम' संकल्पनेच्या एकूण मांडणीचा आढावा घेतो. त्याच्या मते, ग्रीसच्या वैभवशाली काळापासून प्रत्येक युगात केवळ प्रेमभावनेविषयीचं नव्हे, तर मानवी भावनांविषयी काहीएक महान सिद्धांत मांडले गेले आहेत. प्राचीन जग प्लेटोच्या प्रेम व ज्ञान सिद्धांताकडे झुकलेले होते. त्यानंतर स्टॉइक्सच्या सिद्धांताकडे. मध्ययुगात इटालियन धर्मगुरू तत्त्ववेत्ता सेंट थॉमस ॲक्विनास आणि अरबांचे सिद्धांत प्रभावी ठरले. सतराव्या शतकात फ्रेंच तत्त्ववेत्ता आणि गणिती रेनी देकार्त आणि डच तत्त्ववेत्ता भरुच स्पिनोझा यांच्या भावनांच्या सिद्धांतांचा उत्कटतेने अभ्यास केला गेला. भूतकाळात असा एकही महान तत्त्वज्ञ होऊन गेला नाही, ज्याला 'प्रेम' या विषयावर स्वतःचा सिद्धांत मांडण्याची गरज वाटली नाही.

सेंट थॉमस ॲक्विनास (१२२५-१२७४) प्रेमाचा एक सिद्धांत देतो. त्याच्या मते, 'प्रेम आणि द्वेष' या भावना म्हणजे मानवी कामवासनेचेचं दोन प्रकार आहेत. प्रेम म्हणजे ''चांगल्या गोष्टीची इच्छा'' (*concupIscibile circa bonum* आनंद, प्रेम, सुख) आणि द्वेष म्हणजे नकारात्मक इच्छा. अर्थात, दुरिताचा अस्वीकार (*concupIscibile circa malum* दुःख, वेदना, यातना).

इथे स्पष्टपणे वासना, इच्छा आणि भावना यांच्यातील गोंधळ दिसून येतो, असे ओर्तेगा अधोरेखित करतो. याच गोंधळाने अठराव्या शतकापर्यंतचे संपूर्ण मानसशास्त्र ग्रासले होते. तोच गोंधळ आपल्याला प्रबोधनकाळात पुन्हा आढळतो. फरक एवढाच, की तो सौंदर्यशास्त्राच्या क्षेत्रात स्थानांतरित झालेला आहे. म्हणूनच, 'लॉरेन्झो द मॅग्निफिसेंट' नामाभिधानाने परिचित असलेला इटालियन राजकारणी अनभिषिक्त शासक आणि विद्वान, कवी आणि कलाकारांचा पोशिंदा लॉरेंझो दि पिएरो दे मेदिची म्हणतो, प्रेम ही एक सुंदरतेची भूक आहे (*l'amore è un appetito di bellezza*). लॉरेंझोचा शासनकाळ हा इटलीतील प्रबोधनाचा सर्वोच्चबिंदू होता.

प्रेमाचे सारतत्त्व आपल्या हातून निसटू नये, म्हणून आपण जे ज्ञानात्मक भेद केलेच पाहिजेत, त्यापैकी 'प्रेम आणि द्वेष' (Love and Hate) हा सर्वात महत्त्वाचा भेद आहे. त्याचप्रमाणे प्रेम आणि वासना, इच्छा आणि भावना यांच्यातीलही फरक लक्षात घेणे अनिवार्य ठरते.

**प्रेम आणि इच्छा**

प्रेम आणि वासना यांच्यात फरक करण्याचे एक अधिक ठोस आणि सूक्ष्म कारण आहे. एखाद्या गोष्टीची इच्छा करणे म्हणजे, ती गोष्ट मिळवण्याच्या दिशेने निःसंशयपणे उचललेले पाऊल. 'मिळवणे' म्हणजे ती वस्तू कोणत्या ना कोणत्या प्रकारे आपल्या स्वामित्वहक्काच्या कक्षेत यावी आणि जणू काही आपलाच - आपल्या शरीराचा - अविभाज्य हिस्सा बनावी की ती शरीरापासून तोडून अलग करताच येणार नाही.

''तू एक गोड पेढा आहेस. असं वाटतं की तुला खाऊन टाकावं'' असं प्रेमिक प्रेमिकेला म्हणतो, तेव्हा तो असे सुचवतो, की तुझ्यावर माझा स्वामित्वहक्क अशा प्रकारचा आहे, की तू माझा असा हिस्सा व्हावेस. तुला माझ्यापासून कोणीही अलग करू शकत नाही. पेढा खाल्ला की पोटात जातो आणि तो मग बाहेर वेगळा काढता येत नाही, कारण तो शरीराचा हिस्सा बनलेला असतो. माणूस आपल्या जिवलग मित्रालाही आपल्यापासून अलग पाहू - राहू शकत नाही. तो सारखा त्याला मिठ्या मारून धरून ठेऊ पाहतो, ते याच कारणामुळे.

इथे एक गोष्ट ध्यानात घेणे आवश्यक आहे. ते असे, की इच्छेचे स्वरूप निष्क्रिय असते. जेव्हा मी एखाद्या गोष्टीची इच्छा करतो, तेव्हा माझी खरी इच्छा ही असते, की ती वस्तूच माझ्याकडे यावी. गुरुत्वाकर्षणाचे केंद्र खुद्द मीच असल्यामुळे गोष्टी माझ्यासमोर आयत्या येऊन पडाव्यात, याची मी वाट पाहतो. (इच्छित वस्तू ऑनलाइन मागवल्या जातात. कुणीतरी मला शरण यावे, भेटायला यावे, ह्या सर्व 'वस्तू मिळविण्याच्या स्वामित्वहक्क इच्छाच'.)

तथापि प्रेम मात्र इच्छेच्या अगदी उलट आहे. प्रेम ही संपूर्ण क्रियाशीलता असते. प्रेमात वस्तू माझ्याकडे येण्याऐवजी मीच

त्या वस्तूकडे जातो आणि मीच तिचा अविभाज्य हिस्सा बनतो. प्रेमाच्या कृतीत, व्यक्ती स्वतःच्या पलीकडे जाते. प्रेम ही कदाचित निसर्गाने कोणालाही स्वतःच्या पलीकडे जाऊन दुसऱ्या कशाकडे तरी जाण्यासाठी दिलेली सर्वोच्च क्रियाशीलता आहे. प्रेमात प्रेमविषय माझ्याकडे आकर्षित होत नाही, तर मीच खुद्द त्या विषयाकडे जातो.

सेंट थॉमसने केलेला गोंधळ निस्तरण्याचा प्रयत्न प्रथम स्पिनोझाने केला, हे महत्त्वाचे निरीक्षण ओर्तेगा नोंदवतो. स्पिनोझाने इच्छेला बाजूला केले आणि 'प्रेमातून उद्‌भवलेल्या कामप्रेरणे'ला भावनिक आणि ज्ञानात्मक अधिष्ठान दिले. स्पिनोझाच्या मते, प्रेम म्हणजे असा आनंद की जो मिळणे आवश्यक आहेच, पण त्याचे ज्ञानही प्राप्त झाले पाहिजे. म्हणून तो व्याख्या करतो की प्रेम म्हणजे असा आनंद की ज्याच्या ज्ञानाची सांगड त्या आनंदाच्या मूळ कारणाशी (cause) घातलेली आहे (अवघा झाला आनंद!); तर उलट बाजूला द्वेषाची सांगड नेहमीचं दुःखाशी घातलेली असते आणि द्वेषाच्या ज्ञानाची सांगड त्या द्वेषाच्या मूळ 'उद्‌भावा'शी (source) घातली गेली आहे. द्वेष असा असतो, की जो स्वतःमध्येच आनंद शोधतो. द्वेष केलेल्या व्यक्तीला होणाऱ्या हानीमुळे द्वेष अर्थात द्वेषकर्ता आनंदाने बेहोश होतो. (नाझी असे आनंदी लोक होते. असे आनंदी लोक प्राचीन काळापासून आजपर्यंत जाती-वर्ण, धर्म, आर्थिक विषमता इत्यादि क्षेत्रात आढळतात.)

अन् प्रेमाचे मूळ कारण कोणते? तर प्रेमातील कामभाव (अर्थात स्त्री-पुरुष यांच्यातील प्रेम भाव.) एखाद्या व्यक्तीवर अथवा वस्तूवर प्रेम करण्यात केवळ आनंदी होणे आणि त्याच वेळी त्या आनंदाचा स्रोत समजून घेणे की आपला हा आनंद कोणामुळे तरी किंवा कशामुळे तरी निर्माण झाला आहे. पण इथेही एक संभ्रम आढळतोच, असे ओर्तेगा लक्षात आणून देतो.

ओर्तेगाच्या मते, हा संभ्रम प्रेम कृतीच्या संभाव्य परिणामाशी जोडून गोंधळून टाकला गेल्याच्या स्वरूपाचा आहे. तो म्हणतो, की प्रेमिकाला आपल्या प्रेमिकेत आनंद लाभतो, यावर कुणी शंका घेईल का? कधीच नाही. पण गोंधळ असा की प्रेमाची कृती नेहमी आनंदायकच असते, असे नव्हे. काही वेळेस प्रेम दुःखी असते, दुःख स्वरूपच असते. मृत्यू इतके दुःख! मृत्यू म्हणजे सर्वोच्च मानवी यातना. आणखीही थोडे विस्ताराने सांगायचे, तर 'खरे प्रेम स्वतःला जाणते'. आणखी स्पष्ट बोलायचे, तर प्रेम ज्यासाठी समर्थ आहे, त्या वेदना अन् यातना यांच्या परिमाणात स्वतःला मोजते! प्रेममग्न स्त्री प्रियकराने तिच्यावर लादलेल्या व्याकुळतेची जणू वाटच पाहत असते!

पण ओर्तेगा हा स्पिनोझाने नीट निरीक्षण केले नाही, असा दोष देतो. कारण प्रेम म्हणजे आनंद नव्हे. जसे की जी व्यक्ती आपल्या देशावर प्रेम करते, ती देशासाठी मरणही स्वीकारते. या प्रेमात केवळ दुःखच आहे. हुतात्म्याला त्या दुःखाची जाणीव होत नाही, कारण तो त्या पलीकडे गेलेला असतो. त्याच्या प्रेमाचे आणि त्या प्रेमापोटी परिणत झालेल्या चिरस्थायी वियोगाचे दुःख 'इतरांना' होते. तेव्हा प्रेम आणि दुःख जोडले गेले आहे, केवळ सुख किंवा आनंद यांच्याशी नव्हे.

या व्याख्या अपुऱ्या अन् दोषयुक्त आहेत. (अगदी मूरच्या भाषेत त्या 'नैसर्गिकतेचा तर्कदोष' घडवणाऱ्या आहेत) म्हणूनच या प्रसिद्ध व्याख्या आपल्याला समाधान देत नाहीत, हे थोडा विचार केल्यास अधोरेखित होते... म्हणून ओर्तेगा थेट प्रेमाच्या कृतीचेच वर्णन करण्याचा प्रयत्न करतो.

**केंद्राकर्षण आणि केंद्रोपसारण**

पाहा, सुरुवातीला प्रेम निश्चितपणे 'इच्छे' सारखे असते. कारण प्रेमविषय वस्तू - मग ती व्यक्ती असो वा भौतिक वस्तू- प्रेमिकाला उत्तेजित करते. वस्तूने निर्माण केलेल्या उद्दीपनामुळे प्रेमिकाचा 'आत्म' (self, soul नव्हे) एका जागी असूनही अस्वस्थ, नाजूकपणे जखमी झाल्यासारखा प्रेम अनुभवतो. अशा उद्दीपनाची दिशा 'केंद्राकर्षित' (centripetal) असते : ते वस्तूपासून आपल्याकडे येते. पण प्रेमाची कृती त्या 'उत्तेजने' नंतर किंवा अधिक योग्य शब्दात सांगायचे तर, त्या 'प्रक्षोभा' नंतरच सुरू होते. वस्तूच्या भेदक बाणाने निर्माण केलेल्या अनावृत्त बिंदूतून प्रेम उफाळून वेगात उसळते आणि सक्रियपणे त्या वस्तूच्या दिशेने झेपावते : ती 'वस्तू' - सर्व तऱ्हांच्या उत्तेजना आणि वासनांच्या विरुद्ध दिशेने गतिमान होते. प्रियकराकडून प्रियेकडे, प्रियेकडून प्रियकराकडे, माझ्याकडून दुसऱ्याकडे केंद्रोपसारी (centrifugal) फैलावते. स्वतःला मानसिकरित्या गतिमान करणाऱ्या एका वस्तूच्या *दिशेच्या मार्गावर* आणि आपल्या अंतरात्म्याकडून दुसऱ्याकडे सतत वाटचाल करणारे हे वैशिष्ट्य 'प्रेम आणि द्वेष' या दोन्हींसाठी आवश्यक आहे. सर्व बाह्य कृती प्रेमातूनच 'एक परिणाम' म्हणून विकसित होतात.

हे पाहा, कोणीही आपल्या पायांनी प्रिय ईश्वराकडे अथवा इष्ट देवदेवतेकडे जाऊ शकत नाही. तरीही ईश्वरावर प्रेम करणे

म्हणजेच त्याच्याकडे जाणे होय (***आतां कोठें धावें मन । तुझे चरण देखिलिया...***) प्रेम करताना आपण आपल्यातील 'शांतता आणि स्थायित्व' सोडून देतो आणि जणू काही त्या वस्तूच्या दिशेने 'मानसिकदृष्ट्या स्थलांतरित' होतो. आणि ही सततची अखंड गतिमान स्थलांतरावस्था म्हणजेच प्रेम!

**विचार आणि प्रेम**

विचारांच्या किंवा इच्छेच्या कृती तत्काळ घडतात. त्या कृतींपर्यंत पोहोचायला आपल्याला कदाचित थोडा वेळ लागतो. पण त्यांचा अंमल चिरस्थायी नसतो, तो फार काळ टिकत नाही. डोळ्याची पापणी लवते न् लवते तोच कृती घडते! त्या अत्यंत वेगाने पूर्ण होणाऱ्या कृती असतात.

ओर्तेगा म्हणतो, ''आपण ज्या भावनेचे विश्लेषण करत आहोत, त्यात यामुळे एक नवीन पैलू समोर येतो : 'प्रेम हा एक प्रवाह आहे, चेतन द्रव्याचा एक प्रवाह. ही अशी एक आहे रचना आहे, जी झऱ्याप्रमाणे अविरतपणे वाहत असते. मी आता ज्याचा उल्लेख करत आहे, त्याचे स्वरूप अंतर्ज्ञानाने स्पष्ट करण्यासाठी आणि त्याचे वर्णन करण्यासाठी रूपकात्मक अभिव्यक्ती शोधली पाहिजे. आपण आता असे म्हणू शकतो की, प्रेम हा स्फोट नसून एक अविरत उत्सर्जन आहे. एक आत्मज केंद्रोपसारी विकिरण आहे, जे एका प्रेमीकडून प्रियतम व्यक्तीकडे प्रवाहित होत असते. प्रेम हा स्राव नसून, एक प्रवाह आहे. जर्मन तत्त्ववेत्ता अलेक्झांडर फंडरने 'प्रेम आणि द्वेष' यांच्या या प्रवाही आणि निरंतर पैलूवर अत्यंत सखोलपणे चिंतन विवेचन केले आहे.''

**प्रेमाची वैशिष्ट्ये**

ओर्तेगाच्या मते, प्रेमाची तीन सर्वसामान्य वैशिष्ट्ये आढळतात.

१. पहिले, प्रेम केंद्रोपसारक असते.

२. दुसरे, ती ध्येयाच्या दिशेने होणारी एक आभासी वाटचाल असते.

३. तिसरे, प्रेम निरंतर व प्रवाही असते.

या अधिष्ठानावर ओर्तेगा 'प्रेम आणि द्वेष' या दोन संकल्पनांमधील मूलभूत फरक निश्चित करतो.

प्रेम आणि द्वेष या दोन्ही भावना केंद्रोपसारक आहेत. त्या एकाच दिशेने जातात. त्यात सहभागी व्यक्ती त्या वस्तूच्या दिशेने जाते. तथापि दिशा एकच असूनही त्यामागील तर्क आणि हेतू भिन्न असतात. द्वेषामध्ये कारण नकारात्मक असल्याने व्यक्ती त्या वस्तूच्या दिशेने जाते, खरी पण ध्येयाच्या विरोधात जाते. प्रेमामध्ये व्यक्ती वस्तूच्या दिशेने जातेच, पण खुद्द ध्येयाच्या प्राप्तीसाठी, खुद्द ध्येयासाठीच जाते.

**मानसिक तापमान**

या दोन भावनांमधील एक समान वैशिष्ट्य म्हणून आणि त्यांच्यातील फरकांपेक्षाही अधिक महत्त्वाचा असलेला दुसरा मुद्दा आपल्या लक्षात येतो, तो म्हणजे (१) 'विचार करणे' आणि (२) ज्याला आपण 'मानसिक तापमान' म्हणू शकतो, त्याचा अभाव इच्छेमध्ये असणे. प्रेम आणि द्वेष दोन्हीही एखाद्या गणिती प्रमेयाच्या विचाराच्या तुलनेत उबदार असतात आणि त्यांची आग विविध स्तरांमधून प्रवास करते. सर्व प्रेम तापमानाच्या वेगवेगळ्या टप्प्यांमधून मार्गक्रमण करते. म्हणूनच आपली सामान्य भाषा नेहमीच प्रियकराच्या शीत प्रेमाबद्दल आणि तिच्यात अंतर्भूत उबदारपणा किंवा थंडपणाबद्दल सावध 'शहाणपणा' ने बोलते.

भावनिक तापमानावरील एक प्रकरण आपल्याला मानसशास्त्रीय निरीक्षणाच्या मनोरंजक क्षेत्रांमध्ये घेऊन जाते. अशा प्रकरणात वैश्विक इतिहासाचे नवे पैलू समोर येतात. ओर्तेगाच्या मते, नीतिमत्ता आणि कलेने आजपर्यंत त्याकडे दुर्लक्ष केले आहे. (अ) महान ऐतिहासिक राष्ट्रांच्या वेगवेगळ्या तापमानांबद्दल बोलल्यास काय दिसेल? ग्रीस, चीन आणि अठराव्या शतकातील युरोपात थंडपणा होता, तर रोमँटिक युरोपमध्ये मध्ययुगीन उत्साह आढळतो. आता (ब) मानवी 'आत्म'च्या भिन्न तापमानाचा मानवी संबंधांवर होणाऱ्या प्रभावाबद्दल बोलल्यास आढळेल? तर, दोन माणसे एकमेकांना भेटतात आणि एकमेकांबद्दल सर्वात आधी त्यांच्या लक्षात येणारी गोष्ट म्हणजे, त्यांच्यातील भावनिक तीव्रतेची पातळी. थोडक्यात, तो गुण जो कलात्मक शैलींमध्ये, विशेषतः साहित्यिक शैलींमध्ये 'तापमान' म्हणण्यास पात्र ठरतो, तेच आढळते. हे तापमान माणसाना जवळ आणण्यास अथवा दूर लोटण्यास कारण ठरते.

**प्रेम आणि द्वेषाच्या तीव्रतेचा अंदाज**

प्रेम आणि द्वेषाच्या तीव्रतेचा अंदाज त्या प्रेमवस्तूच्या अथवा प्रेमपात्राच्या दृष्टिकोनातून पाहिल्यास जास्त उत्तम प्रकारे लावता येतो. 'प्रेम आणि द्वेष' सतत कार्यरत असतात. दोन्ही गोष्टी नेमक्या काय करतात? हा प्रश्न विचारता येईल.

***प्रिय** वस्तू किंवा व्यक्तीसाठी 'प्रेम' काय करते?*

ती वस्तू दूर असो वा जवळ, पत्नी असो वा मूल, कला असो वा विज्ञान, देश असो वा देव; प्रेम प्रिय व्यक्तीसाठी स्वतःला झोकून देते. इच्छा करते, इच्छित गोष्टीचा आनंद घेते, त्यातून समाधान मिळवते. 'प्रेम' प्रिय व्यक्तीला अनुकूल वातावरणात वेढून टाकते, कवेत घेते, मग ती जवळ असो वा दूर. सरतेशेवटी 'प्रेम' प्रेमळ, खुशामतखोर, सकारात्मक आणि लाड करणारे असते. पण उलट पावली न काही देते, ना काही अर्पण करते. प्रेमाचे योगदान काहीच नसते.

***प्रिय** वस्तू किंवा व्यक्तीसाठी 'द्वेष' काय करते?*

'द्वेष' तितक्याच तीव्रतेने प्रिय व्यक्तीला प्रतिकूल वातावरणात गुरफटून टाकतो. प्रियतम व्यक्तीला इजा पोहोचवतो, ज्वालामुखीच्या सर्वोष्ण वाऱ्याने भाजावे तसे प्रियतमेला भाजून काढतो आणि अक्षरशः पोखरून नष्ट करतो. ''प्रेम प्रिय व्यक्तीच्या उबदार समर्थनातून वाहते आणि द्वेष एक क्षणकारी विषाद स्रवतो, एक उग्र जहरीपणा.''

**विरोधातला हेतू**

प्रेम आणि द्वेष यांच्या विरुद्ध हेतू दुसऱ्या स्वरूपात प्रकट होतो : प्रेमात आपण त्या वस्तूशी एकरूप झाल्यासारखे अनुभवतो. या एकरूपतेचा अर्थ काय? ही केवळ शारीरिक एकरूपता किंवा जवळीक नाही. कदाचित आपला मित्र (प्रेमाचा सर्वसाधारणपणे विचार करताना मैत्री कधीच विसरता कामा नये) दूर राहत असेल आणि त्याचा आपल्याला काही निरोप येत नसेल, तरीही आपण त्याच्यासोबत एका प्रतीकात्मक एकरूपतेत असतो. आपला 'आत्म' जणू काही चमत्कारिकरित्या विस्तारतो; आपण अन् मित्र यांच्यातील अंतर मिटवतो. मित्र कुठेही असला तरी, आपण त्याच्याशी एका अतूट सहवासात आहोत, असे आपल्याला जाणवते. मित्र म्हणतो: मला कधीही हाक मार. मी सदैव तुझ्या सोबत आहे. अर्थात तुझे सुखदुःखाचे कारण माझेच समज. मी तुझ्याच बाजूचा आहे.

दुसऱ्या बाजूला 'द्वेष' मात्र ज्याचा तिरस्कार करतो, त्या ध्येयाच्या दिशेने सतत धावत असतो अन् आपल्याला प्रतीकात्मक अर्थाने त्या वस्तूपासून तोडून टाकतो. 'द्वेष' आपल्याला एका टोकाच्या अंतरावर ठेवतो आणि एक खोल अनुलंघ्य दरी निर्माण करतो.

प्रेमाचा हेतू हृदयांना एकत्र आणणे, सुसंवाद निर्माण करणे; 'द्वेषा' चा हेतू मतभेद, वितंड आणि विनाश. प्रेम तादात्म्य पावू पाहाते तर द्वेष भग्न अवस्था अन् संपूर्ण एकाकीपणा निर्माण करतो.

आनंद किंवा दुःख यांसारख्या निष्क्रिय भावनांच्या तुलनेत, प्रेम आणि द्वेषामध्ये कोणत्या प्रकारची सक्रियता किंवा जवळपास कोणता प्रयत्न गुंतलेला असतो, हे आता आपल्याला दिसू लागते. आनंदी होणे किंवा दुःखी होण्यामागे कारण असते.

ओर्तेगा अधोरेखित करतो, की वास्तविक 'आनंद अन् दुःख' या अवस्था आहेत; 'कृती' नाहीत. दुःखी व्यक्ती आपल्या दुःखासाठी काहीही करत नाही, तसेच आनंदी व्यक्ती देखील आपल्या आनंदासाठी आणि त्याबद्दल काहीही करत नाही. या उलट, 'प्रेम' मात्र एका *दृश्य विस्ताराद्वारे* प्रेमाच्या वस्तूपर्यंत किंवा व्यक्तीपर्यंत पोहोचते आणि एका अदृश्य अन् दिव्य कार्यात गुंतलेले असते, जे अस्तित्वात असलेल्यांपैकी सर्वात स्वागतशील कार्य आहे.


कोणते कार्य? ते म्हणजे, आपल्या प्रियतमाच्या स्वीकरणात अन् पुष्टीकरणात प्रेम कृती गुंतलेली असते. कलेवर किंवा आपल्या देशावर प्रेम करणे म्हणजे, काय याचा विचार करा : देशप्रेम म्हणजे 'देशाच्या अस्तित्वात राहण्याच्या हक्कावर क्षणभरही शंका न घेणे'. हेच तर देशप्रेम या संकल्पनेत समाविष्ट आहे. देश म्हणजे, देशातील राहणारी सर्व जातीधर्म, वर्ण, वंश, लिंग, आर्थिक स्तरात जगणारी माणसे आणि पशुपक्षी, साधनसंपत्ती, त्यांचे संवर्धन जतन इत्यादि अस्तित्वात असण्याच्या कृती निरंतर करणे. तेच कलेबाबत, कला प्रत्येक क्षणी अस्तित्वास पात्र आहेत, हे ओळखणे आणि कलेची पुष्टी करणे, म्हणजे कलेवर प्रेम करणे.

हे पाहा, हे प्रेमकृती कार्य म्हणजे एखाद्या न्यायाधीशाच्या न्यायदानाप्रमाणे नाही. न्यायाधीश एखाद्याच्या हक्काच्या मान्यतेसाठी अतिथंडपणे शिक्षा सुनावतो, तसे प्रेमाची कृती केवळ हक्क कथन करत नाही; तर 'प्रेमकृती' ही एकाच वेळी अनुकूल निर्णयाच्या हक्कामध्ये सहभाग देते आणि त्याचवेळी त्या हक्काची अंमलबजावणी करत असते.

'द्वेष' करणे ही कृती मात्र प्रेमाच्या पूर्ण विरोधी आहे. द्वेषकृती ही द्वेषविषय वस्तूला किंवा व्यक्तीला थेट अक्षरशः मारून टाकणे असते. आपल्या मनातल्या मनात मानसिक पातळीवर तिचा नायनाट करत असते, तिचा श्वास घेण्याचा हक्कच हिरावून घेत असते. एखाद्याचा द्वेष करणे म्हणजे त्याच्या केवळ अस्तित्वामुळेच आपली चिडचिड होणे.


(पान ५० वर)

# बहुजीववादी जैन तत्त्वज्ञान...



जगदीश काबरे

नास्तिक दर्शन



कोणत्याही दर्शनात जीव, जगत आणि ईश्वर या तीन विषयांचा विचार मुख्यत्वे केलेला असतो. जैन दर्शनात यांपैकी पहिल्या दोहोंचा ऊहापोह केलेला आहे; पण तिसरा जो ईश्वर तो मात्र जैन स्वीकारीत नाहीत. ईश्वर शब्दाचे अर्थ ऐश्वर्यशाली, सर्व शक्तिमान, जगाचा स्वामी, कर्ता, धर्ता, हर्ता इ. आहेत. हे अर्थ पाहिले, तर या लोकी जो दर्जा एखाद्या स्वतंत्र सम्राटाचा, तोच परलोकामध्ये ईश्वराचा मानला जातो, असे दिसते. ज्याप्रमाणे एखाद्या राजवंशात जन्म घेणाऱ्याला सम्राटपद अनायासे प्राप्त होते, त्यासाठी त्याला काहीही प्रयत्न करावे लागत नाहीत, तसेच ईश्वराचेही आहे. तो सर्वश्रेष्ठ आहे, सर्वगुरू आहे आणि सर्वज्ञ आहे. त्याचे ऐश्वर्य अविनाशी आहे; कारण कालद्वारा त्याचा कधीही नाश होत नाही. अशा अनादीअंत पुरुषविशेषाला ईश्वर म्हणतात. अशी ईश्वराविषयीची कल्पना आणि एवंगुणविशिष्ट ईश्वराचे अस्तित्व जैन दर्शनाने अमान्य केले आहे. याविषयी जैनमत आहे ते असे...

**ना**स्पृष्ट : कर्मभिः शश्वविश्वदृश्वास्ति कश्चन ।
तस्यानुपायसिद्धस्य सर्वथाऽनुपपत्तितः ।।

या वचनाचा अर्थ, कोणीही सर्वद्रष्टा व अनादिकालापासून कर्माने अस्पर्श असा असूच शकत नाही. कारण उपायावाचून त्याला सिद्धी प्राप्त होणे, कोणत्याही प्रकारे अनुपपन्न आहे.

सृष्टीचा निर्माता म्हणून ईश्वराला अनादी मानल्यामुळे तो कर्मबंधरहित मानला जातो. पण जैन धर्म कोणालाही या विश्वाचा रचयिता मानीत नाही; म्हणून त्याने कोण्या एका अनादिसिद्ध परमेश्वराची सत्ताही अमान्य केली आहे.

**ज्ञानाचे स्वरुप**

जैनमतानुसार जीव हा चेतन असून, ज्ञान हा त्याचा स्वभाव आहे. या ज्ञानाचे दोन प्रकार आहेत – प्रत्यक्ष ज्ञान आणि परोक्ष ज्ञान. या दोन शब्दांच्या व्याख्येत जैन दर्शन आणि इतर दर्शने यात भिन्नता आहे. जैनांनी आत्मसापेक्ष ज्ञानाला प्रत्यक्ष व आत्मेतर इंद्रिय मनःसापेक्ष ज्ञानाला परोक्ष म्हटले आहे. याचा अर्थ असा, की ज्या ज्ञानाच्या उपलब्धीसाठी आत्मा स्वयमेव कारणीभूत होतो, ते प्रत्यक्ष ज्ञान, तर ज्या ज्ञानाची प्राप्ती इंद्रिये व मन यांच्या द्वारे होते, ते परोक्ष ज्ञान होय.

जैन दर्शनात प्रत्यक्ष ज्ञानाचे तीन भेद मानलेले आहेत, ते पुढीलप्रमाणे–

अवधिज्ञान – ज्या ज्ञानाच्या द्वारे जीव भूतभविष्य कालातल्या मर्यादित गोष्टी आणि दूरस्थित क्षेत्रातल्या परिमित वस्तू जाणू शकतो, त्याला अवधिज्ञान म्हणतात. याचे सहा प्रकार आहेत. जैनांनी जीवाच्या ठिकाणी अशी एक शक्ती मानलेली आहे, की जिच्या योगाने इंद्रियांना अगोचर अशा अतिसूक्ष्म तसेच डोळ्यांना न दिसणाऱ्या आणि दूरस्थ पदार्थांचेही ज्ञान होऊ शकते.

मनःपर्यय ज्ञान – सम्यक चारित्राच्या द्वारे ज्ञानावरची आवरणे दूर केल्यावर जे ज्ञान उत्पन्न होते, त्याला मनःपर्यय ज्ञान म्हणतात. याच्या द्वारे दुसऱ्याच्या मनातले विचार जाणण्याची योग्यता प्राप्त होते. संयमी साधूंनाच हे ज्ञान प्राप्त होते. याचेही दोन भेद सांगितले आहेत.

केवलज्ञान – समस्त द्रव्यांचे अनंत पर्याय जाणणारे विश्वलोचन, अनंत व अतींद्रिय असे ज्ञान म्हणजे, केवलज्ञान होय. याचे वर्णन असेः कल्पनातीतमभ्भ्रान्तं स्वपरार्याविभासकम् । जगज्ज्योतिरसन्दिग्धमनन्तं सर्वदोदितम् ।।

अर्थ : हे केवलज्ञान कल्पनातीत, भ्रांतिरहित, स्व–पर पदार्थाचा निश्चय करून देणारे, जगत्प्रकाशक, संदेहरहित, अनंत व कोणत्याही काली नष्ट न होणारे असे आहे.

जेव्हा ज्ञानाच्या समस्त आवरणीय कर्माचा निःशेष क्षय होतो, तेव्हाच या ज्ञानाचा उदय होतो. सम्यक चारित्र्याचे अनुष्ठान करणारे सिद्धपुरुषच या केवलज्ञानाचे अधिकारी होतात.

जैन न्यायात प्रत्यक्ष, अनुमान व आगम ही तीनच प्रमाणे मुख्यत्वे मानलेली आहेत. प्रत्यक्षाची सत्ता सर्वमान्यच आहे. चार्वाकांनी अनुमान स्वीकारले नाही. पण जैनांनी लोकव्यवहारासाठी ते स्वीकारले आहे. जैन आगमांनी प्रतिपादिलेले सत्य हा तर जैन दर्शनाचा पायाच आहे. जैन लोक श्रुति–स्मृती प्रमाण मानीत नाहीत. त्यांच्या मते, जैनागम हेच प्रमाणग्रंथ होत.

नयसिद्धान्त हा जैन दर्शनाचा एक प्रमुख विषय आहे. जैन दर्शनामते, जगातला प्रत्येक पदार्थ सत् आहे आणि असत् ही आहे. इतकेच नव्हे; तर प्रत्येक पदार्थ हा अनंतधर्मात्मक आहे. सर्व धर्मांनी संयुक्त व अखंड अशा त्या पदार्थाचे ग्रहण करणाऱ्या ज्ञानाला प्रमाण म्हणतात. ज्याने केवलज्ञान मिळवले आहे, अशा सिद्ध पुरुषालाच पदार्थाच्या समस्त धर्माचे ज्ञान होऊ शकते. पण सामान्य माणसे पदार्थाचा केवळ एक धर्मच जाणू शकतात. म्हणून त्यांचे ज्ञान हे नेहमीच अंशरूप असते. या अंशरूप ज्ञानालाच जैनांनी नय असे म्हटले आहे. नय शब्दाची निरुक्ती स्याद्वादमंजरीत पुढीलप्रमाणे सांगितली आहे–

'नीयते परिच्छिद्यते एकदेशविशिष्ट : अर्थः अनेन इति ।' (ज्याच्या योगाने पदार्थाचा एकदेशविशिष्ट अर्थ जाणला जातो, तो नय होय.) नयाचे द्रव्यार्थिक व पर्यायार्थिक असे दोन मुख्य भेद आहेत. वस्तूचे वस्तुत्व किंवा अन्ययरूप द्रव्य याला विषय करणारा तो द्रव्याथिक नय व वस्तूच्या पर्यायांना अर्थात बदलणाऱ्या अवस्थांना विषय करणारा, तो पर्यायाधिक नय होय. पहिल्याचे तीन व दुसऱ्याचे चार मिळून सात प्रकार होतात. नैगम, संग्रह, व्यवहार, ऋजू, शब्द, समधिरूढ व एवंभूत असे हे सात भाव आहेत.

जीवाचे असाधारण लक्षण चेतना हे आहे. ही चेतना ज्ञान दर्शनात्मक आहे. जो जाणतो, पाहातो तो जीव होय. जीव हा आपले पतन व उत्थान या दोन्ही गोष्टींसाठी स्वतःच जबाबदार असतो. आपल्या कर्मानीच तो बांधला जातो व कर्मानीच बंधमुक्त होतो. बंधकारक कर्माचे फल भोगण्याच्या वेळी जीवाचे जे भाव होतात, त्या भावांचा कर्ताही तोच असतो.

ज्याप्रमाणे तो आत्मभावांचा कर्ता असतो, त्याचप्रमाणे तो त्यांचा भोक्ताही असतो. याशिवाय तो शरीरप्रमाण असतो. प्राप्त झालेल्या लहान-मोठ्या शरीराचा जो आकार असतो, तोच जीवाचाही आकार होय. जीवाला अशा प्रकारे शरीरपरिमाण मानून जैनांनी आत्म्याच्या व्यापकत्वाचे खंडन केले आहे. ते म्हणतात, की जर जीव व्यापक ठरला, तर त्याच्या ठिकाणी क्रिया असणार नाही व क्रियेवाचून तो पुण्य आणि पापांचा कर्ताही होणार नाही. जर कर्तृत्वच नाही, तर मग बंध तरी कुठला आणि मोक्ष तरी कशाचा?

**बहुजीववादी तत्त्वज्ञान**

जैन मतात संसारी जीव आणि मुक्त जीव असे जीवाचे दोन मुख्य भेद आहेत. कर्मबंधनाने बांधलेले जे जीव एका गतीतून दुसऱ्या गतीत जन्म घेतात आणि मरतात, ते संसारी होत. जे कर्मबंधातून सुटतात, ते मुक्त होत. मुक्त जीव हे समान गुणधर्मांचे असल्यामुळे त्यांच्यात कोणताही भेद असत नाही; पण संसारी जीवांच्या ठिकाणी अनेक भेदाभेद आढळतात. नारकी, तिर्यञ्च, मनुष्य व देव असे संसारी जीवांचे चार प्रकार होतात. पृथ्वीच्या खाली सात नरक आहेत. त्यात निवास करणाऱ्या जीवांना नारकी म्हणतात. पृथ्वीवरील पशू, पक्षी, वृक्ष हे सर्व तिर्यञ्च होत. मनुष्य प्रसिद्ध असून, स्वर्गात वास्तव्य करणारे ते देव होत.

जैन दर्शन हे बहुजीववादी आहे. त्याने प्रत्येक जीवाची स्वतंत्र सत्ता स्वीकारलेली आहे. सगळे जीव एक असते, तर एक जीव सुखी होण्याने सगळे सुखी झाले असते व एक जीव दुःखी झाल्याने सगळे दुःखी झाले असते. एका जीवाच्या बंधनाने सर्व जीव बद्ध झाले असते आणि एकाच्या मुक्तीने सर्व मुक्त झाले असते; पण तसा अनुभव येत नाही. या बाबतीत जैन दर्शनाचे सांख्य दर्शनाशी साम्य आहे.

जैन दर्शनात पुद्‌गल हा शब्द एका अभिनव अर्थाने येतो. पुद्‌गल म्हणजे 'पूरण' (एकत्र येणे) आणि 'गलन' (विघटन होणे) या दोन्ही गुणधर्मांचा समूह आहे, म्हणजेच जे एकत्र येते आणि वेगळे होते. पुद्‌गल म्हणजे पदार्थ किंवा अणूंचा समूह होय, जो जैन आणि बौद्ध तत्त्वज्ञानामध्ये महत्त्वाचा आहे. जैन धर्मात पुद्‌गल हे विश्वातील सहा द्रव्यांपैकी एक आहे, तर बौद्ध धर्मात ते 'आत्मा' या अर्थाने वापरले जाते, जे पंचस्कंधांच्या (रूप, वेदना, संस्कार, संज्ञा, विज्ञान) समूहाने बनलेले आहे. म्हणून भूतसामान्याला तो शब्द लावतात. अन्य दर्शनांत पुद्‌गलाच्या स्थानी असलेल्या तत्त्वाला प्रधान, प्रकृती इ. शब्द वापरले आहेत. सामान्यपणे उत्पन्न होणारे, बिघडणारे, भंगणारे, तुटणारे, फुटणारे, जे काही असेल, ते सगळे पुद्‌गल द्रव्य होय. पुद्‌गलाच्या ठिकाणी रूप, रस, गंध व स्पर्श हे गुण असतात. अन्य अजीव पदार्थांच्या ठिकाणी ते असत नाहीत. पूरण व गलन अर्थात भरणे व रिते होणे किंवा एकत्र येणे व विलग होणे, यावरून पुद्‌गल शब्द बनला आहे. पुद्‌गलाची व्याख्या अशी -

भेदादिभ्यो निमित्तेभ्य : पूरणाद् गलनादपि ।
पुद्‌गलानां स्वभावज्ञैः कथ्यन्ते पुद्‌गला इति ।।

अर्थ- ज्या अर्थी पुद्‌गल हा भेद संघटन-विघटन इत्यादी निमित्तानी एकत्र येतो आणि विलग होतो, त्या अर्थी वस्तुस्वभावाचे ज्ञाते जिन यानी त्याला पुद्‌गल म्हटले आहे.

पुद्‌गलाचे परमाणू व स्कंध असे दोन भेद मानलेले आहेत. इंद्रियांच्या द्वारा ज्याचे ग्रहण होऊ शकत नाही, अशा अविभाज्य द्रव्याला परमाणू असे म्हणतात. हा परमाणू नित्य आहे, एकदेशी आहे, मूर्तिक आहे आणि अविभाज्य आहे. अनेक परमाणूंच्या एकत्र येण्याने जे द्रव्य तयार होते, त्याला स्कंध म्हणतात. आपण जे जे काही पाहतो, ते ते सगळे स्कंध आहे.

धर्म व अधर्म यांचा अर्थ जैन दर्शनात पुण्य व पाप असा नाही. जीव आणि पुद्‌गल यांच्याप्रमाणेच धर्माधर्मही स्वतंत्र द्रव्यरूपच आहेत. जीव आणि पुद्‌गल यांच्या हालचालीत आणि त्यांच्या स्थिर राहण्यात साहाय्यक होणे, हे त्यांचे कार्य आहे. चालणे आणि थांबणे या क्रियांची शक्ती जीव-पुद्‌गलांच्या ठायी स्वयमेव असतेच; पण बाह्य साहाय्यावाचून त्या शक्तीची अभिव्यक्ती होऊ शकत नाही. धर्म-अधर्म हे त्या अभिव्यक्तीला साहाय्यक होतात. ही दोन्ही द्रव्ये समस्त लोकांत व्याप्त आहेत, अखंडित आहेत, असंख्यप्रदेशी आहेत आणि आकाशाप्रमाणे अमूर्तिकही आहेत. मात्र ती कोणाच्या चालण्याची व थांबण्याची प्रेरक कारणे नसतात.

जीव, अजीव, धर्म, अधर्म या चौघांना अवकाश देणारे द्रव्य म्हणजे आकाश होय. हे अमूर्तिक आहे. आकाशाची सत्ता प्रत्यक्ष ज्ञानावर अवलंबून नसून, ती अनुमानाच्या आधारावर स्वीकारलेली आहे. आकाशाचे लोकाकाश व अलोकाकाश असे दोन भेद आहेत. सर्वव्यापी आकाशाच्या मध्ये लोकाकाश आहे व त्याच्या चारही बाजूंना लोकाकाशात जीव-पुद्‌गलादी द्रव्ये असतात व अलोकाकाशात फक्त आकाश हेच द्रव्य असते.

**कालाचे महत्त्व**

जैनांनी कालाची कल्पनाही अनुमानाच्या आधारावरच



*मूळचे जैन तत्त्वज्ञान ईश्वराला आणि वेदांनाही नाकारणारे आहे. मात्र, कालानुक्रमे या तत्त्वज्ञानाने पुरोहितशाहीचा अवलंब करत आपले अस्तित्व गमावले...*

केलेली आहे. वस्तुमात्राचे परिवर्तन घडविण्यात साहाय्यक होणारे द्रव्य म्हणजे काल होय. जगातले समस्त पदार्थ हे परिणामशील आहेत व काल हा या परिणामांचे साधारण कारण आहे. कच्चा असलेला आंबा पिकणे, हा आंब्याचा परिणाम होय. ही गोष्ट कालजन्यच आहे. पूर्वापर क्षणांना व्यापून राहणारी क्रिया कालामुळेच संभवते. ज्येष्ठ–कनिष्ठता ही कल्पनाही कालाच्या सिद्धीलाच प्रमाणभूत ठरणारी आहे. कालाचा अणू एकप्रदेशी असतो, म्हणून तो अस्तिकाय द्रव्याहून भिन्न आहे.

निश्चयकाल व व्यवहारकाल असे कालाचे दोन प्रकार मानलेले आहेत. लोकाकाशाच्या समस्त प्रदेशात वेगवेगळे कालाणू भरून राहिलेले असतात. त्यांना निश्चयकाल म्हणतात. अर्थात कालद्रव्य नावाची वस्तू म्हणजे हे कालाणूच होत. आकाशाच्या एका प्रदेशात स्थित असलेल्या पुद्‌गलाचा एक परमाणू आपल्या गतीने जितक्या वेळात आपल्या प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात पोचतो, तेवढ्या वेळाला समय म्हणतात. समयांच्या समूहांनाच श्वास, उच्छ्वास, प्राण, स्तोक (एका विशिष्ट कालावधीसाठी, ज्यात माणूस सात वेळा श्वास घेतो, त्यासाठी वापरला जाणारा शब्द म्हणजे स्तोक), घटिका, दिवस, रात्र इ. नावे दिलेली आहेत. हा सगळा व्यवहारकाल होय. कालही आकाशाप्रमाणेच अमूर्तिक आहे.

**राग–द्वेषाचे न अनादि चक्र**

साधकाच्या मोक्षमार्गात ज्या एका शक्तीमुळे बाधा उपस्थित होते, तिला जैन दर्शनात कर्म म्हटले आहे. प्राणी जसे कर्म करतो, तसे त्याला त्याचे फल भोगावे लागते. सामान्यपणे कर्मसिद्धान्ताचा हाच आशय आहे. राग–द्वेषांनी युक्त अशा जीवाच्या प्रत्येक कायिक, वाचिक, मानसिक क्रियेला धरून एक द्रव्य जीवाच्या ठिकाणी प्रवेश करते आणि त्याच्याशी संबद्ध होऊन त्याला बरे किंवा वाईट फल देत असते. जीव आणि कर्म यांचा हा संबंध अनादी आहे. यासंबंधी कुंदकुंदाचार्य म्हणतो, जो संसारी जीव आहे तो राग–द्वेषादी भावांना उत्पन्न करतो; त्यामुळे कर्मबंध प्राप्त होतात. त्या कर्मामुळे जीवाला निरनिराळ्या गतींत जन्म घ्यावा लागतो. जन्म घेतल्याने शरीर मिळते. शरीरात इंद्रिये असतात. त्या इंद्रियांच्या द्वारे जीव विषयांचे ग्रहण करतो. विषयग्रहणामुळे जीवाला इष्ट विषयांसंबंधी राग आणि अनिष्ट विषयांसंबंधी द्वेष निर्माण होतो. अशा प्रकारे संसारचक्रात पडलेल्या जीवाला भावामुळे कर्मबंध व कर्मबंधामुळे राग–द्वेषरूपी भाव होत राहतात. हे चक्र अभव्य जीवाच्या अपेक्षेने अनादि–अनंत आहे आणि भव्य जीवाच्या अपेक्षेने अनादि–सान्त आहे.

जीवाच्या ठिकाणी कर्माचा हा प्रवेश रोखण्यासाठी जैनाचार्यानी गुप्ती, समिती, धर्मानुप्रेक्षा, परीषहजय व चारित्र असे पाच उपाय सांगितले आहेत. काया, वाचा आणि मन यांच्या चंचलतेला रोखून धरणे याला गुप्ती म्हणतात. आहार–विहार गमनागमन, वचन–व्यवहार या गोष्टी संयमपूर्वक करणे, याला समिती म्हणतात. क्षमा, मृदुता, सरलता, शौच, सत्य, संयम, तप, त्याग, औदासीन्य व ब्रह्मचर्य यांना दशविध धर्म म्हणतात. यांच्या पालनाने आत्म्याच्या ठिकाणी कर्मप्रवेश रुद्ध होतो. या धर्माच्या धारणेसाठी अनित्य, अशरण, संसार इ. बारा अनुप्रेक्षांनी युक्त राहणे आवश्यक असते. अनुप्रेक्षांनी युक्त म्हणजे एखाद्या गोष्टीचा सखोल विचार करणे किंवा चिंतन करणे होय. विशेषतः जैन धर्मामध्ये, हे जीवन आणि जगाच्या मूलभूत सत्यांचा विचार करण्याची प्रक्रिया आहे, जसे की अनित्य (नाशवंत), अशरण (असुरक्षित), संसार (पुनर्जन्म) आणि निर्जरा (मोक्ष). या विचारांना 'अनुप्रेक्षा' म्हणतात आणि त्यांच्या विचाराने युक्त असणे म्हणजे 'अनुप्रेक्षांनी युक्त' होणे होय. साधना मार्गात येणारी संकटे सहन करणे, याला परीषहजय म्हणतात. परीषहजय म्हणजे जो 'परीषह' (अडचणी किंवा परीक्षा) आणि 'जय' (विजय) यांच्या संयोगातून बनला आहे. याचा अर्थ 'परीक्षेवर विजय मिळवणे' असा होतो. यामध्ये साधू आणि श्रावक द्वेष व रागावर नियंत्रण ठेवून, राग–द्वेषावर मात करतात आणि समभावाने राहण्याचा प्रयत्न करतात. याचे बावीस भेद आहेत. सदैव सदाचारांचे पालन

करीत राहणे व उत्तरोत्तर त्याचा विकास करणे, याला ते चारित्र म्हणतात.

**जैन तत्त्वज्ञानातील रत्नत्रय**

जैन दर्शनात मोक्ष - ज्याला ते कैवल्य म्हणतात - त्याची तीन प्रमुख साधने सांगितली आहेत, ती अशी -

सम्यग्दर्शन-ज्ञान-चारित्राणि मोक्षमार्गः।

अर्थ - सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान व सम्यक्चारित्र मिळून मोक्षमार्ग होतो.

दर्शन शब्दाचा अर्थ जैनमतानुसार श्रद्धा असा आहे. तीर्थंकरांनी प्रतिपादिलेल्या शास्त्रग्रंथांवर दृढ श्रद्धा असणे, हेच सम्यग्दर्शन होय. सम्यग्दर्शन हे मोक्षमार्गाचे कर्णधारच मानलेले आहे. सम्यग्दर्शनानंतर सम्यग्ज्ञान येते. शास्त्रप्रतिपादित अशा समस्त तत्त्वांचा यथार्थ अनुभव प्राप्त करून घेणे हे सम्यग्ज्ञान होय. संसाररूपी मरुस्थलीत संतप्त झालेल्या प्राण्यांना अमृतरूप जल पाजून तृप्त करणारे असे हे सम्यग्ज्ञान आहे. इंद्रियरूपी चंचल मृगांना बांधून आवळण्याचा तो एक दृढ पाश आहे. म्हणून मनुष्याने सम्यग्ज्ञानाच्या प्राप्तीसाठी निरंतर प्रयत्नशील असायला हवे. सम्यग्ज्ञान झाल्यावर सम्यक् चारित्र धारण करण्याची आवश्यकता असते. जोवर सदाचाराचे पालन होत नाही, तोवर निव्वळ कोरडे ज्ञान निरर्थकच ठरेल. म्हणून सम्यक चारित्राच्या सिद्धीसाठी अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य व अपरिग्रह या पाच महाव्रतांचे पालन नितांत आवश्यक मानलेले आहे. सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान व सम्यक्चारित्र या तीन तत्त्वांना मिळून जैन दर्शनात रत्नत्रय अशी संज्ञा दिलेली आहे.

अशा प्रकारे मूळचे जैन तत्त्वज्ञान हे वेदांना नाकारणारे आणि ईश्वरालाही नाकारणारे तत्त्वज्ञान आहे. परंतु, आजचे भटाळलेले जैन मूळ तत्त्वज्ञान विसरून गेले आहेत. हिंदू धर्मातील कर्मकांडांमध्ये अडकू लागले आहेत. प्रचलित राजकारणात सामील झालेले, स्वार्थी राजकारण्यांच्या कच्छपी लागलेले स्वतःस जैन साधू म्हणवणारे काही तर उन्मत्त, उद्दाम आणि विखारीही व्हायला लागलेले आहेत. याचे ताजे उदाहरण म्हणजे, मुंबईतील कबूतरखाने बंद केल्यानंतर काहींनी केलेला थयथयाट! हे जैन साधू एवढ्या उद्दामपणे बोलतात की, ''कबुतराला दाणे खायला देणे हा आमचा धर्म आहे. त्यासाठी एखादा माणूस मेला तर काय बिघडले? कबुतराच्या विष्ठेमुळे रोग होतात असे सांगणारे डॉक्टरच मूर्ख आहेत. उलट कबुतराची विष्ठा थंड पाण्यात मिसळून महिनाभर प्यायला दिली तर मूत्राशयाचे रोग बरे होतात. जर कबूतरखाना उघडला नाही, तर आम्हाला शस्त्र हाती घ्यावे लागेल.'' या साधूंनी केलेले हे दावे अवैज्ञानिक तर आहेतच, पण माणसाच्या जीवाशी खेळ खेळणारे आणि जैन तत्त्वज्ञानाला हरताळ फासणारे आहेत.

विरोधाभास म्हणजे, असे हिंसक वक्तव्य ते हवेतील सूक्ष्मजंतू तोंडात जाऊन मरू नयेत अशी भूतदया दाखवत तोंडाला रुमाल लावून करत आहेत! हिंसेला चिथावणी देणाऱ्यांना आपण साधू तरी कसे म्हणावे? कारण ते 'अहिंसा परमो धर्म:' सांगणाऱ्या जैन धर्माला आणि तत्त्वज्ञानाला पदतळी तुडवत कलंक लावत आहेत.

**जगदीश काबरे हे विज्ञानप्रसार आणि सामाजिक उन्नयनाशी निगडित कार्यकर्ते, ज्येष्ठ लेखक आणि आस्वादक आहेत.**
**संपर्क :** ९९२०१९७६८०
**ई मेल :** jetjagdish@gmail.com

## आमचे पाठीराखे

समतावादी मुक्त-संवाद पत्रिका

**कुमार केतकर, हुसेन दलवाई, रवींद्र टी. प्रधान, जगदीश काबरे, जयराज साळगावकर, दत्ता नायक, टी. जगत, विनोद शिरसाठ, डॉ.आनंद जोशी-सुमती जोशी, आशिष पाटकर, डॉ.दिलीप खताळ, डॉ.प्रदीप कर्णिक, प्रसाद केरकर, अतुल देऊळगावकर, गणेश मनोहर कुलकर्णी, डॉ.अजित जगताप, डॉ.रेखा शेळके, प्रशांत पवार, डॉ.मंदार काळे, सुशीलकुमार शिंदे, विकास महाडिक, दत्ता बाळसराफ, चिन्मय दामले, प्रशांत खुंटे, प्रा. राजेंद्र भोईवार, सचिन परब, पांडुरंग शिवलकर, सोहन भांगले, अविनाश हावळ, प्रभाकर कुंभार, चंद्रकांत पाटणकर, सुधीर साठे, वासुदेव (काका) खानोलकर, नेहा आसगावकर.**

# दिल्लीवाले हैं हम...



आशय गुणे

**बरसाती मजला**



*दिल्लीतली फुरसत...*



*बाबूशाहीची सत्ता...*

तुम्ही काम करीत असलेल्या संस्थेचे, कंपनीचे किंवा अगदी सरकारी कार्यालयाचे मुख्य कार्यालय जर दिल्लीला असेल, तर तिथल्या कर्मचाऱ्यांचे दिल्लीतील त्यांच्या कार्यालयाबद्दलचे आणि एकूण तिथल्या लोकांबद्दलचे काय मत असते, याची यादी केली, तर 'हे दिल्लीवाले ना...' या श्रेणीत तक्रारीशिवाय फार काही विशेष आढळत नाही. काम व्यवस्थित केले जात नाही किंवा वेळेवर केले जात नाही, इथपासून बोलणे व्यवस्थित नाही आणि सतत हुकूम सोडत असतात, अशाच तक्रारी अधिक असतात. त्यामुळे बहुतेकांना (हे महाराष्ट्रातील लोकांबद्दल– त्यात विविध पक्षीय नेतेही आले– तर नक्कीच म्हणता येईल.) दिल्लीला जावेसे वाटत नाही, तिकडे जाणे झालेच, तर तिकडे रमता येत नाही आणि काही दिवस झाले की लगेच परत महाराष्ट्रात यावेसे वाटते. त्यामुळे दिल्लीवाले यांच्याबद्दल मनात असलेली 'तू जानता नहीं मेरा बाप कौन हैं' ही प्रतिमा अजूनही आपल्या लोकांच्या मनात कायम आहे. पण हे म्हणजे, पुण्याची ओळख अजूनही तिथल्या तिरकस–तिरसट पाट्या आणि '१ ते ४ दुकान बंद' यातच अडकून ठेवण्यासारखे आहे...

शहर ही एक सतत विकसित होत राहणारे आणि नवे प्रवाह आत्मसात करीत राहणारे अस्तित्व आहे. दिल्ली तर देशाची राजधानी आहे. त्यामुळे तिथेही मुंबईसारखेच देशभरातून लोक येतात आणि कमी-अधिक प्रमाणात आपले सांस्कृतिक ठसे उमटवत असतात. त्यामुळे सत्ताधीशांचे शहर किंवा तेथील प्रत्येक व्यक्ती आपल्यावर सत्ता गाजवीत असते, ही दिल्लीची ओळख तिला एकजिनसी रूप देते. किंबहुना, गेल्या वीस वर्षात 'दिल्लीवाले' ही ओळख अधिक व्यापक झाली आहे आणि ही व्यापकता वाढण्यास कारणीभूत ठरली आहे, दिल्ली मेट्रो. (दिल्ली मेट्रो रेल विस्तार प्रक्रियेचा व्यापक वेध फेब्रुवारी २०२६ अंकात 'मेट्रोत मेट्रो... दिल्ली मेट्रो' असे शीर्षक असलेल्या लेखात घेतला होता. हा लेख आणि पूर्ण अंक वाचण्यासाठी ही फ्लिपबुक लिंक https://heyzine.com/flip-book/b 689154152. html उपयोगात आणता येईल.)

दिल्ली ते दिल्ली- एनसीआर (National Capital Region) ही नवी ओळख तयार होण्यास या वाहतूक प्रकल्पाद्वारे विकसित झालेले (आणि अजूनही विकसित होत राहणारे) गुडगाव, नोएडा-ग्रेटर नोएडा व फरिदाबाद हे शहरी समूह कारणीभूत आहेत. शिवाय दिल्ली मेट्रो प्रकल्प हा देखील अजून विस्तारित होतो आहे व त्यात नव्या मार्गांचा समावेश केला जातो आहे. त्यामुळे एनसीआर हा भाग देखील आणखी विस्तारित होतो आहे. हा विस्तार होताना दिल्ली विरुद्ध इतर हा संघर्ष देखील विकसित झाला आहे. या संघर्षात दिल्लीचे प्रतिनिधित्व करतात, अनेक दशकांपासून दिल्लीत राहणारे लोक आणि 'इतर' या श्रेणीत येतात दिल्ली भोवती गुडगाव, नोएडा या विकसित झालेल्या शहरी समूहातील लोक.

**दिल्लीवाले होण्यातली असोशी**

दिल्लीवाल्यांना आपणच खरे दिल्लीवाले आहोत हे अधोरेखित करायचे असते व इतरांना आपल्या राज्यांची ओळख (गुडगाव आणि फरिदाबाद हे हरियाणात स्थित आहेत व नोएडा हे उत्तर प्रदेशात) मागे टाकून दिल्लीवाले व्हायचे असते. हा संघर्ष म्हटलं तर मजेशीर आहे. परंतु हा संघर्ष देशातील बहुतेक सर्व प्रमुख शहरांच्या भविष्यकालीन अस्तित्वाचे अपरिहार्य वास्तव आहे. या संघर्षात मुंबईने खूप आधीच पदार्पण केले होते. पुणे, बंगलोर आणि हैद्राबाद हे देखील त्याच वाटेवर आहेत. या पार्श्वभूमीवर दिल्ली आणि तिथल्या लोकांची काही गंमतीशीर स्वभाव वैशिष्ट्यं मला टिपता आली.

रोजच्या वाहतुकीत आणि पर्याय व्यापार-उदिम आणि परस्परव्यवहारात इतके मोठे बदल होऊन देखील दिल्लीने आपला जुना स्वभाव टिकवून ठेवला आहे आणि तो म्हणजे - फुरसत!

दिल्लीत मेट्रो येण्याआधी तिथली जनता ही बस सेवा आणि ऑटो रिक्षावाले यांच्या सापळ्यात अडकलेली होती. २००२ (मेट्रो सुरु झाल्याचे वर्ष) पासून पुढील दहा वर्ष 'आज तक' या वाहिनीवर मी दिल्लीच्या बसेस किती धोकादायक पद्धतीने चालवल्या जातात, तिच्यामुळे सतत घडणारे अपघात आणि त्यांच्यामुळे काही प्रसंगी होणारे अपघाती मृत्यू या बातम्या अनेकदा बघितल्या होत्या. २००३ या वर्षी तर दिल्लीला चार दिवस प्रवासी म्हणून गेलो होतो आणि तुडुंब भरलेल्या बसेस, त्यांचा फायदा उठवून वाट्टेल ती किंमत मागणारे रिक्षावाले यांच्यामुळे झालेला अधिक खर्च आणि सततची होणारी गैरसोय हेही मला चांगलंच आठवतंय. पण हीच ती मेट्रो सुरू झाल्यानंतरची पहिली दहा वर्ष होती, जेव्हा मेट्रो नोएडा (२००९) आणि गुडगाव (२०१०) येथे पोचली. आतापर्यंत विकसित झालेल्या मेट्रोच्या नकाशात ब्लू-लाइन ही नोएडापर्यंत जाते आणि येलो-लाइन गुडगावपर्यंत आणि या दोन लाइन्स दिल्ली मेट्रोच्या सर्वात मोठ्या आणि सर्वात व्यग्र लाइन्स आहेत.

नोएडा आणि गुडगाव येथे आधी कोणतेही उद्योग नव्हते असं नाही, मात्र मेट्रो पोहोचल्यानंतर इथला औद्योगिक विकास झपाट्याने वाढला. आधी उल्लेखल्याप्रमाणे एनसीआर ही ओळख आणखी ठळक होऊ लागली. पुढे अर्थात मेट्रोचे जाळे अधिक घट्ट विणले गेले. तरीही नवीन लाइन्स बांधण्याची प्रक्रिया आजही सुरू आहे. परंतु मेट्रो विकसित होईपर्यंत दिल्लीची ओळख ही 'सरकारी' एवढीच मर्यादित होती. सतत सत्ता गाजवणे, राज्य करण्याची मानसिकता असणे ही तिथल्या स्वभावाची वैशिष्ट्य या सरकारी या ओळखीमुळे ठळकपणे अधोरेखित झाल्या आहेत. याचा अर्थ दिल्लीत औद्योगिक वर्दळ अजिबात नव्हती असं नाही. कारखाने, लघुउद्योग यांचा समावेश तिथेही होताच. परंतु मोठ्या संख्येने कॉर्पोरेट कार्यालयांचा समावेश होऊ लागला मेट्रोमुळेच - आणि तो झाला गुडगाव आणि नोएडात.

**कसं काय… ? एकदम निवांत!**

परंतु दिल्लीच्या स्वभावातच 'फुरसत' आहे. ती टिकून राहिली इथल्या वर्दळीच्या दिशांमुळे. हा माझ्यामते, मुंबई आणि दिल्ली यांच्या स्वभावातील आणि गतिशील असण्यातील प्रमुख फरक आहे. मुंबईत लोक कामाला येतात मुंबईबाहेरील उपनगरांतून, तर दिल्लीतील वर्दळीची दिशा आहे, दिल्लीतून बाहेर तिच्या शेजारी प्रदेशात (गुडगाव आणि नोएडा). त्यामुळे मुंबई ही सतत क्रियाशील भासते, तिथे गर्दी असते आणि तिचे रस्ते लोकांनी भरलेले असतात. दिल्लीत सकाळी ऑफिसला जायच्या वेळेत तिथल्या मेट्रोत गर्दी होते. एकदा लोक आपापल्या ऑफिसात गेले की दिल्ली ही संध्याकाळी लोक घरी परत येईपर्यंत निवांत असते. त्यामुळे दिल्लीच्या स्वभावात फार विशेष फरक पडला नाही – ती मेट्रो-पूर्व काळात जशी रेंगाळत असे तशीच आजही रेंगाळते.

दोन शहरांमधील आणखी एक फरक जाणवतो तो तिथल्या सार्वजनिक वाहतुकीच्या स्वभावामुळे. मुंबईची लोकल ही तिच्या तांत्रिक व भौगोलिक मर्यादेमुळे वेळापत्रकाशी जोडलेली आहे. ठरलेली ट्रेन जर चुकली तर पुढली सारी गणितं बिघडतात आणि साहजिकच उशीर होतो. मेट्रोचे तसे नाही. आधुनिक व जलद गतीची असल्यामुळे तिला कोणत्याही वेळापत्रकाशी जोडले गेले नाही. एखादी मेट्रो जर चुकली तर पुढली हजर असते – अगदी पाच मिनिटांत. त्यामुळे दिल्लीवाल्या मंडळींना मेट्रोमागे धावावे लागत नाही. तात्पर्य, मुंबईची वाहतूक जीवनशैली ही वेळापत्रकावर अवलंबून आहे व दिल्लीवाल्यांना थेट आधुनिक वाहतूक सुविधा मिळाल्यामुळे त्यांच्या आयुष्यात एका विशिष्ट वेळापत्रकाने समावेश केलेला नाही. याला अपवाद अर्थात, दिल्लीच्या बाहेर राहणारे लोक. उदाहरणार्थ; जर नोएडा-स्थित व्यक्तीला गुडगावला कामाला जायचे असल्यास तिला दोनदा तरी मेट्रो बदलावी लागते. अशा परिस्थितीत त्यांच्या जीवनशैलीत वेळापत्रकांचे महत्त्व अधोरेखित होते. परंतु, एकूण विश्लेषण केल्यास असे जाणवते, की दिल्लीत मेट्रोत येऊन व तिच्यात आमूलाग्र बदल घडवूनही दिल्लीच्या गतीत आणि तिच्या स्वभावात विशेष फरक पडलेला नाही.

याच दिल्लीवाल्या मंडळींना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष पद्धतीने 'पूर्वीचे दिल्ली राहिले नाही' म्हणताना मी दिल्लीच्या बाजारांमध्ये पाहिले आहे. पूर्वीच्या दिल्लीची आठवण काढताना दिल्लीत दिसणारी गर्दी आणि रस्त्यावर गाड्यांची वाढलेली संख्या ही प्रमुख कारणं आहेत. शिवाय दिल्लीत पंजाबी आणि हरियाणवी मंडळींचे वर्चस्व असल्याने 'बाहेरच्या' व्यक्तींच्या श्रेणीत 'उत्तरप्रदेश के लोग' यांना प्रथम स्थान दिलं जातं. तेव्हा अनेकांचा रोख हा नोएडा व ग्रेटर नोएडा या दोन शहरी भागांकडे असतो. गंमत म्हणजे, यात आघाडीवर असतात, हरियाणा आणि दिल्ली येथे नोंदणी झालेल्या गाड्यांचे चालक. उबर, ओला, रॅपिडो यांच्या रिक्षा आणि टॅक्सीचे ड्रायव्हर 'युपी पासिंगवाले' या गाडी चालवणाऱ्यांवर विशेष राग धरून असतात. त्यांच्यामुळे 'पूर्वीचे दिल्ली राहिले नाही' या मूळपदावर येऊन विषय संपतो. दिल्लीत आयुष्य काढलेल्या दुकानदारांना किंवा स्थानिक कामगारांना गुडगाव आणि नोएडा ही अंतरं खूप लांबची वाटतात आणि अनेकदा त्या जागांबद्दल बोलताना जरासा तुच्छतेचा दर्प जाणवतो. उभं आयुष्य दादरला काढलेल्या एखाद्या व्यक्तीला नवी मुंबईहून कामाला येणाऱ्या लोकांबद्दल ज्या मिश्र भावना दाटून येतात, तशाच त्या इथे असतात.

**सारे कसे रेंगाळलेले… धीमेधीमे**

या साऱ्याचा परिपाक हा की देशाची राजधानी असूनही दिल्ली आणि दिल्लीवाले हे अतिशय धीम्या गतीचे व रेंगाळलेले आयुष्य जगतात. एक मुंबईकर म्हणून मला या गतीशी एकरूप होण्यास काही महिने तरी द्यावे लागले. सकाळी साडेआठ वाजता मुनिरका येथून घरून निघून मला पुढील दहा ते पंधरा मिनिटात मेट्रो पकडून आधी हौज खास या स्टेशनपर्यंत जावे लागायचे. तिथून पुढे दुसरी मेट्रो पकडून गुडगाव येथील सिकंदरपुरला, ऑफिसला. परंतु रस्त्यावरून अतिशय धीम्या गतीने चालणाऱ्या लोकांमुळे मेट्रो पकडेपर्यंतचा दहा मिनिटांचा प्रवास अर्ध्या तासाचा वाटायचा. कधी कधी वाटेत 'मुंबई स्पेशल' नागोरी चहाच्या दुकानात एक चहा प्यायची हुक्की यायची.

शिवाय त्या दुकानाचा मालक हा मूळचा बांद्र्याचा होता, हे कळल्यापासून आमच्यात एक वेगळेच सामंजस्य तयार झाले होते. तिथेही माझ्यासारखेच कामाला जाणारे पण तशी देहबोली अजिबात न बाळगणारे दिल्लीवाले उभे असायचे. मी माझ्या मुंबईच्या सवयीप्रमाणे चहा मागवून, तो हातात मिळेपर्यंत खिशातले पैसे त्याच्यासमोर ठेवून किंवा डिजिटल माध्यमाने पैसे द्यायचे असल्यास तिथला कोड स्कॅन करून, चहा पीत असतानाच त्याच्याकडून सुट्टे पैसे (असल्यास) घेऊन



*सार्वजनिक ठिकाणी थुंकणे हा भारतीयांना जडलेला राष्ट्रीय रोग आहे. याचे नजरेला खुपणारे दर्शन दिल्लीतल्या मेट्रो स्टेशनच्या भिंती तसेच कनॉट प्लेससारख्या वर्दळीच्या ठिकाणी सर्रास घडते...*

'मोकळा' होऊ जायचो. दिल्लीवाले मात्र चहा मागवून, तो पूर्ण पिऊन झाल्यावर मग खिशातील पैसे काढून दुकानदारही पुढे दोन मिनिटे गप्पा मारून पुढे ऑफिससाठी प्रस्थान करायचे. मग पुढे मेट्रो स्थानकापर्यंत पुन्हा धीम्याच गतीने चालायचे व तीच गती मेट्रोत चढताना व तिथून उतरताना. मुंबईत लोकल बदलताना दोन स्थानकांमधील प्रवास हा किती घाईघाई होतो, हे सर्वश्रुत आहे. मात्र दोन मेट्रो बदलताना दिल्लीवाले त्याच संथ गतीने दुसऱ्या मेट्रोकडे चालताना आढळतात. किंबहुना, दिल्ली हाट, हौज खास व कालकाजी मंदिर ही तीन इंटरचेंज (जंक्शन) स्थानकं अशी आहेत जिथे दुसरी मेट्रो पकडण्यासाठी खूप चालावं लागतं. मात्र पुढली मेट्रो ही 'जी मिळेल त्याने जाऊ, चुकली तर पुढली पकडू' या मानसिकतेने पकडली जात असल्यामुळे लोक संथ गतीने चालत असतात. मला तर अनेकदा लोक फोनमध्ये व्हिडिओ पाहत, एखाद्या वेब-सिरीजचा एपिसोड पाहत चालताना दिसायची. असे चित्र कुर्ला किंवा दादर स्थानकावर लोकल बदलताना किंवा अगदी मुंबई मेट्रो बदलताना (उदाहरणार्थ: वेस्टर्न एक्स्प्रेस हायवे मेट्रो स्थानक ते गुंदवली मेट्रो स्थानक) दिसेल?

एकदा का नोकरी करणारी मंडळी गुडगाव व नोएडा स्थित आपल्या ऑफिसमध्ये गेली की संपूर्ण शहर एकप्रकारची निरवता अनुभवते. मेट्रो न वापरणारे व सदैव गाडीने प्रवास करणारे एका बाजूला व मजूर, कामगार, दुकानदार, डिलिव्हरी बॉईज हा वर्ग दुसऱ्या बाजूला – बहुतांश हीच मंडळी रस्त्यावर आढळतात. यातील बहुतांश लोकांची वर्दळ स्थानिक पातळीवर असल्यामुळे शहराचा वेग कधीच फारसा जलद भासत नाही. शहरात मेट्रो येण्याआधी देखील या वर्गांमधील मंडळी ज्या वेगाने आपले आयुष्य जगत होती त्याच वेगाने आजही जगत आहेत. त्यांच्या स्वभावात फारसा फरक पडलेला नाही.

म्हणूनच या दिल्लीवाल्यांच्या स्वभाव वैशिष्ट्यांकडे पाहून आश्चर्य वाटतं. एवढी फुरसत आणि नीरवता असूनही इथे राहणाऱ्या मंडळींना तिची अजिबात किंमत नाही. या शांत रस्त्यांवर, अगदी रात्री १० वाजता देखील, गाडीसमोर जरा कुणी आलं किंवा पुढची गाडी धीम्या गतीने चालत असली की आक्रमक रित्या हॉर्न वाजवणारी हीच मंडळी आहेत. हॉर्न मी उर्वरित भारतात अनेक ठिकाणी ऐकले आहेत. मात्र दिल्लीत हे जरा अधिक जोराने आणि त्वेषानेच वाजवले जातात.

**एक दिशाहिन थुंकणे... फुंकणे...**

एरवी देखील बहुतांश दिल्लीवाल्या मंडळींमध्ये ही आक्रमकता कुठून येते हा देखील प्रश्नच आहे. आणखी एक वाईट सवय जी दिल्लीला मुंबईपासून आणि बहुदा दक्षिणेतील अनेक शहरांपासून वेगळं करते, ती म्हणजे रस्त्यावरील धूम्रपान. मुंबईत रस्त्याच्या एक कोपऱ्यात किंवा पान-टपरीच्या दुकानाच्या शेजारी उभं राहून शांतपणे धूम्रपान करीत असलेल्या लोकांना बघायची माझी सवय दिल्लीने मोडून काढली. कारण रस्त्याने चालताना सिगरेट फुंकत आणि आपण चालत असलेल्या संपूर्ण मार्गावर धुराचे अस्तित्व स्थापन करीत मागे चालणाऱ्या अनेकांना निष्क्रिय धूम्रपान (passive smoking) करायला लावणे हे दिल्लीतच दिसते. जी गोष्ट सिगरेटची तीच पान-तंबाखूची. तसे भारताला थुंकणे वर्जित मुळीच नाही. परंतु कुठेही आणि कसेही थुंकण्यात मुंबई आणि एकूण दक्षिणेतील शहरांनी थोडा संयम बाळगलेला दिसतो. दिल्लीत मात्र माझ्या नव्या ऑफिसला जायच्या पहिल्याच दिवशी सिकंदरपुर मेट्रो स्टेशनाबाहेर मला एका दिशाहीन थुंकण्याला सामोरे जावे लागले. मी दुसऱ्या सेकंदाला दोन पावले मागे उडी मारली, पण थुंकणारी व्यक्ती तोपर्यंत त्याच्यासाठी असणारी ही एक स्वाभाविक क्रिया पार पाडून पुढे निघून गेली होती.

**मान न मान मैं तेरा मेहमान...**

हे सारे विरोधाभास पाहता पाहता जुने दिल्लीवाले दिसतात आणि आपल्या वागण्याद्वारे आपली ओळख पटवून देत असतात. उभी हयात लजपत नगरमध्ये काढलेला दुकानदार किंवा मुनिरकात गेली अनेक वर्ष दूध पुरवठा करणारा एखादा,

ग्रीन पार्क मार्केटमधला एखादा किराणा मालाचा दुकानदार किंवा एल.आय.सी. कार्यालयात जॅकेट घालून आपल्या अस्सल पण आर्जवी हिंदीद्वारे गिऱ्हाईक म्हणून आपल्यावर वर्चस्व गाजवू पाहणारा एजंट! 'पहले ऐसा नहीं था' किंवा 'अब यहाँ लोग बहुत बढ गये' अशी टिप्पणी त्यांच्याकडून येतेच येते. प्रत्येकाने आपापल्या वयानुसार नि वकुबानुसार दिल्लीत आयुष्य काढलेलं असतं आणि एकंदर मानवी स्वभावाला अनुसरून आपल्या भोवती झपाट्याने घडणारा बदल त्यांना तितकासा पटत नसतो. या बदल घडण्यात एकाच गोष्ट टिकून आहे आणि ती म्हणजे त्यांची हिंदी भाषा. दक्षिणेतील राज्यात आणि महाराष्ट्रात स्थानिक भाषेला स्पर्धा तयार होते, इथे ती झालीच तरी तिला गिळंकृत करण्यात हिंदी सक्षम आहे.

जाता जाता, काही वर्षांपूर्वी घडलेल्या मुंबई ते दिल्ली या राजधानी एक्स्प्रेसच्या प्रवासात माझ्या समोरच्या जागी बसलेल्या एका दिल्लीवाल्या 'अंकल'ची आठवण सांगतो. संबंधित व्यक्ती ही देखील जॅकेटधारी व्यक्ती होती. उभं आयुष्य दिल्लीत एका सरकारी कार्यालयात काम करत घालवलं होतं. मुंबई सेंट्रलहून ट्रेन सुटल्यापासून आपण अनेक वर्ष याच ट्रेनने कसा प्रवास केला आहे आणि आता ट्रेनचा दर्जा कसा खाली गेला आहे वगैरे बोलणं सुरू झालं. अधूनमधून दिल्लीतील 'पराठेवाली गली'चा उच्चार 'रा' या अक्षराला शक्य तितका नाकात बोलून झाला. आपण कुणी काही बोलल्यावर 'काय?' असं विचारतो तिथे 'हें...' असं शक्य तितकं ताणून विचारलं गेलं. मात्र सोबत असलेले इतर प्रवासी हे (बहुदा दिल्लीचे नसल्यामुळे) या सर्व चर्चेला थंड प्रतिसाद देत होते. ट्रेन जेव्हा सूरतला पोचली. तेव्हा कुणीही काहीही विचारलं नसताना देखील त्यांनी, 'सुरत आ गया,' अशी घोषणा दिली. तेव्हा मला जाणवलं होतं की या व्यक्तीचे स्मृति-चित्र अजून त्याच जुन्या दिल्लीचे होते आणि काळ बदल असल्यामुळे इतरांना ते तितकंसं लक्षात येत नव्हतं. मी पाहिलेले 'दिल्लीवाले' हे असेच आहेत. सध्याची पिढी एक तर महाराष्ट्रात किंवा दक्षिण भारतात कामाला जाते किंवा गुडगाव अथवा नोएडात. मूळ दिल्ली होती तशीच आहे.

**आशय गुणे हे दिल्ली-मुंबई स्थित कम्युनिकेशन कन्सल्टंट, लेखक, अनुवादक आणि संगीत आस्वादक आहेत. त्यांचे डॉ. मनमोहन सिंग-ए टेम्पेस्टुअस टेन्यूर-सहलेखक सुजय शास्त्री- हे पुस्तक प्रकाशित आहे.**
**संपर्क:** gune.aashaygmail.com

---

(पान ४० वरून)

म्हणूनच त्यातील समाधान देणारी एकमेव गोष्ट म्हणजे, त्या द्वेषविषय वस्तूला किंवा व्यक्तीला पूर्णपणे नाहीसे करणे.

ओर्तेगाचा निष्कर्ष स्वीकारता प्रेम आणि द्वेष यांचे या शेवटच्या अनुक्रमे 'अस्तित्व रक्षण - संवर्धन' आणि 'अस्तित्व नष्ट करणे' या चिन्हापेक्षा अधिक मूलभूत असे दुसरे कोणतेही लक्षण नाही. आयुष्यात एकदा जरी कुणी प्रेमात पडले असले, तरी त्याचा अर्थच त्या प्रिय व्यक्तीच्या अस्तित्वाचा आग्रह धरणे, ती जिवंत असणे. (कारण सर्व काही त्या एका गोष्टीवर अवलंबून आहे) तिच्या शिवायच्या विश्वाची शक्यता स्वीकारण्यास नकार देणे. पण लक्षात घ्या की, याचा अर्थ, शेवटी तोच होतो जो म्हणजे, आपल्यावर अवलंबून असलेल्या गोष्टीला सातत्याने आणि जाणीवपूर्वक जीवन देणे. प्रेम करणे म्हणजे प्रिय गोष्टीचे शाश्वत पुनरुज्जीवन, निर्मिती आणि जाणीवपूर्वक जतन करणे. द्वेष करणे म्हणजे विनाश आणि एकप्रकारे हत्याच; पण ही अशी हत्या नाही जी एकदाच केली जाते. कारण जेव्हा आपण द्वेष करतो, तेव्हा आपण द्वेष केल्या जाणाऱ्या व्यक्तीची सतत हत्या करत असतो.

या टप्प्यावर शोधलेल्या प्रेमाच्या गुणधर्मांचा सारांश काढल्यास आपण असे म्हणू शकतो की, प्रेम ही आपल्या 'आत्म' (Self) ची एक सतत प्रवाही केंद्रोपसारक क्रिया आहे, जी प्रेमपात्राच्या दिशेने जाते आणि तिला उबदार पुष्टीकरणाने कवेत घेते, आपल्याला तिच्याशी एकरूप करते आणि तिच्या अस्तित्वाची सकारात्मक पुष्टी करते.


**लेखक व्यावसायिक तत्त्ववेत्ते आणि सल्लागार आहेत.**
**संपर्क : ९१५ ८६५ ८०६६,** wiselove2026@gmail.com

# विन्सेंट वॅन गॉफ : वैज्ञानिक अंतर्दृष्टीचा चित्रवंत



डॉ. आनंद जोशी

ज्ञान रंग



कला आणि विज्ञान आणि कलेचे अनेक विभाग चित्र, शिल्प, साहित्य, नृत्य, वगैरे हे फक्त सोयी करता केलेले असतात. पण ते सगळे एकमेकांशी विविधांगाने जोडलेले असतात. कारण ते मानवाच्या फक्त एका अवयवातून उगवलेले असतात. तो अवयव म्हणजे, मानवी मेंदू. आपल्याला हातपाय तोंड डोळे दिसतात, हा मेंदू कवटीच्या पेटीत सुरक्षित ठेवलेला असतो. तो दिसत नाही. तो दिसतो त्याच्या आविष्कारातून. मग लिओनार्दो, मिकेलांजलो, पिकासो, चित्र आणि शिल्पा–बरोबर सुनीते लिहितात, कविता करतात, नाटुकली लिहितात. व्हिन्सेन्ट वॅन गॉफसुद्धा साहित्यिक होता. त्याने लिहिलेल्या अनेक पत्रांतून तो तसा दिसतो. काही हुशार माणसांनी त्याची अनेक पत्रे जपून ठेवली म्हणून ते आपल्याला कळले. मेंदूविज्ञानानेही त्यांचा अभ्यास केला आहे, कारण सगळे काही मेंदूजनित असते, व्यवहारात आपण त्याला मनोजनित म्हणतो...

**२७** मार्च २०१९, टेट ब्रिटन या लंडनमधील सुप्रसिद्ध कला दालनात 'वॅन गॉफ आणि ब्रिटन' हे रसरंगीत प्रदर्शन भरले होते. दर्शकांचा ओसंडून प्रतिसाद होता. विन्सेंटच्या ५० चित्रकृती होत्या. 'या कलाकाराला ब्रिटन कसे स्फूर्तिदायी ठरले आणि हा कलाकार ब्रिटिश कलाकर्मीना कसा स्फूर्तिदायक होता' अशी प्रदर्शनाची 'थीम' होती. जॉन एव्हरेट मिलाइस (१८२९-१८९६) आणि जॉन कॉन्स्टेबल (१७७६-१८३७) या दोन ब्रिटिश पेंटर्सचा विन्सेंट वॅन गॉफने (डच उच्चार : वान हॉह) रसपूर्ण अभ्यास केला होता.

विन्सेंट ब्रिटिश, अमेरिकन आणि इतरही साहित्याचा विचक्षण वाचक होता. मॅडम जिनॉक्स यांची सहा पोट्रेट्स त्याने काढली होती. या चित्रात त्या महिलेसमोर पुस्तके आहेत. चार्ल्स डिकन्स (१८१२-१८७०) आणि अमेरिकी लेखिका हॅरिएट बिशर स्टोव्ही (१८११-१८९६) यांची पुस्तके आहेत. बारीक नजरेने पाहिले, तर पुस्तकाच्या स्पाइन अर्थात कण्यावर डिकन्स आणि हॅरिएटची नावे दिसतात. डिकन्स हा वंचितांचा कादंबरीकार, हॅरिएट ही गुलामगिरीला प्रखर विरोध करणारी लेखिका. विन्सेंटचे भावनिक नाते कोणाशी जुळले होते, ते हलकेच त्याने दाखवले आहे. त्याने ही नावे उगाचच दिलेली नाहीत त्या कादंबऱ्या त्याने वाचल्या होत्या.

**विन्सेंट एक वाचक**

बालपणापासून विन्सेंट खूप वाचत असे. ब्रिटनला जाऊन आल्यापासून त्याचे इंग्लिश वाचन वाढले होते. 'अरे, सकाळपासून रात्रीपर्यंत तू डिकन्स अधाशासारखा खात असतोस,' असे त्याचे आईवडील म्हणत असत. शाळा सोडली तरी त्याचे वाचन सुटले नव्हते. लॉन्गफेलो, गटे (ग्योथ), किट्स यांच्या कविता तो लिहून काढत असे. जॉर्ज इलियट, हॅन्स ख्रिश्चन ॲन्डरसन, थोमास ए केम्प्स, टॉलस्टॉय, झोला, दोस्तोव्हस्की, मापुसां, बाल्झाक आणि वोल्टेर हे लेखक त्याने वाचले होते. एका पत्रात विन्सेंटने लिहिले आहे, 'माझी वाचनाची आवड आवेशी आहे, न आवरता येणारी. माझे मन सतत सुधारण्यासाठी मला पुस्तके लागतात. जशी शरीराकरिता ब्रेडची गरज.' खरेच, चित्रकलेसाठी साहित्य त्याला खाद्य पुरवत असे. संपत्तीची किळस, गावकुसाबाहेरच्यांसाठी काही करण्याचा उमाळा अशी त्याची मानसिकता होती. त्याची लेखकांची निवड तशीच होती. दोस्तोव्हस्कीच्या 'द हाउस ऑफ द डेड' या साहित्यकृतीने 'वॉर्ड इन द हॉस्पिटल इन आर्ल' ही चित्रकृती करण्यास त्याला उभारी दिली. 'बेडरूम इन आर्ल' हे त्याने रंगवलेले त्याच्या झोपेच्या खोलीचे सुप्रसिद्ध चित्र. यात अगदी मोजक्याच गरजेच्या साध्या वस्तू आहेत. या कलाकृतीबद्दल तो थिओला पत्रात लिहितो, 'फेलिक्स होल्ट या जॉर्ज इलियटच्या कादंबरीतील माणूस ऐश-आरामापेक्षा कामकरी माणसाची गरिबी निवडतो, तशा साधेपणाचा 'इफेक्ट' मला या चित्रात दाखवायचा आहे. इथे मला सुचवायची आहे झोप, मेंदूला विश्रांती वा कल्पनाशक्तीला विसावा.' ऑक्टोबर १८८८ काढलेल्या या पेंटिंगचे तपशीलवार वर्णन, रंगसंगती याबद्दल त्यानेच पत्रात लिहून ठेवले आहे. लेखक जसा त्याच्या व्यक्तिरेखेचे अंतरंग उलगडतो, तसेच एखाद्या वास्तूचे सार 'एसेन्स' चित्रात पकडण्याचा त्याचा प्रयत्न असतो. द हॉग (डेनहॉग) या हॉलंडमधल्या गावात असताना शेतावर काम करणाऱ्यांची व्यक्तिचित्रे तो रेखाटत असे. यासाठी त्याने विक्टर ह्युगोची 'ले मिझराब्ल' वाचून काढली. लेखक जसे प्रत्येक व्यक्तिरेखेत तिचे व्यक्तिमत्व शब्दात उभे करतो. तसेच त्याला त्याच्या विचित्र व्यक्तिचित्रणात रेषांनी, कुंचल्याच्या फटकाऱ्यांनी, त्या व्यक्तीचे अंतरंगी जीवन रंगवायचे असे. विन्सेंटने लिहिले आहे, 'मला कळत नाही ज्याला व्यक्तीचे चित्र रंगवायचे आहे, तो साहित्याबद्दल ममत्व असल्याशिवाय कसा राहू शकतो.'

वाचकाचे लक्ष वेधून घेणाऱ्या प्रतिमा शब्दांनी निर्माण करण्याच्या लेखकाच्या क्षमतेबद्दल विन्सेंटला आदरयुक्त कौतुक होते. 'डिकन्ससारखा दुसरा कोणताही लेखक नाही, जसा जो पेंटर आहे, तसा आरेखकही आहे' असे गौरवोद्गार विन्सेंटने काढले आहेत. शेक्सपिअरचे शब्द आणि शैली उत्साहाने आणि परमानंदाने थरथरणाऱ्या कुंचल्यासारखी आहे.' असे विन्सेंटने नमूद करून ठेवले आहे.

रेम्ब्राँ (१६०६-१६६९) हा डच पेंटर आणि मास्टर, हा शेक्सपियर (१५६४-१६१६), डेलूहक्रॉय (१७९८-१८६३), विक्टर ह्युगो(१८०२-१८८५) यांच्यासारखा निर्मितीक्षम कलावंत आहे, असे विन्सेंट मानत असे. जे लेखक, कलावंत, आर्त बंधुभावाने लिहितात त्यांच्याबद्दल विन्सेंटला सहानुभूती होती. स्वत:ची साहित्यिक कौशल्ये लक्षणीय होती. थिओला लिहिलेली त्याची पत्रे कलापूर्ण असत. त्याची शैली आकर्षक आणि थेट संवाद साधणारी होती. क्षणिक आणिक शाश्वत यांच्या नातेसंबंधाचा शोध घेण्याचा प्रयत्न तो त्याच्या पेंटिंग्जमध्ये करत असे. तो त्याच्या जीवनाचाही शोध होता.

'ज्या जीवनात काही अनंत, काहीतरी सखोल आणि काही सत्याची चुणूक नसेल अशा जीवनाला मी कवडीचीही किंमत देणार नाही' असे त्यांनी पत्रात लिहिले आहे. 'वर पसरलेल्या तारका, अनंतता, याची जाणीव असेल, तर मग जीवन कसे मंत्रमुग्ध आहे, असे शेवटी वाटते' त्याच्या या विधानामुळे विन्सेंट किती मृदुमवाळ होता, याची कल्पना येते.

कपडालत्ता, खाणेपिणे, असे व्यावहारिक तपशील त्याने कधीच लिहिले नाहीत. पण लँडस्केपची उदात्त उन्नत वर्णने, राजकारण, साहित्य, माणसाचे मूलभूत अनुभव आणि नवीन कल्पना प्रत्यक्षात आणताना होणारा हळूहळू आणि निरंतर संघर्ष याबाबतच्या त्याच्या अंतर्दृष्टीने त्याची पानेच्या पाने भरलेली आहेत. 'महान गोष्टी नुसत्या आवेगी उर्मीने होत नाहीत, छोट्या छोट्या गोष्टीच्या साखळीने तयार होतात,' असे त्याने लिहून ठेवले आहे.

**पत्राचे खंड**

वॅन गॉफचा पहिला इंग्लिशमध्ये अनुवादित पत्र संग्रह १९१२ साली प्रकाशित झाला. अँथनी ल्युडोविची (१८८२-१९७१) ब्रिटिश तत्त्वज्ञ आणि बहुभाषिक समाजवैज्ञानिक, तसेच सामाजिक समीक्षक यांनी हा अनुवाद केला होता. खंडाला ४७ पाने प्रस्तावना लिहिली होती. विन्सेंटच्या पत्रसंग्रहाचे संपादन डब्ल्यू.एच.ऑडेन (१९०७-१९७३) या सुप्रसिद्ध ब्रिटिश-अमेरिकन कवीने केले आहे. 'विन्सेंटचे प्रत्येक पत्रच मनमोहक, कोणते वगळायचे, कोणते घ्यायचे, हा प्रश्नच पडतो. त्याचे एकएक पत्र म्हणजे त्याच्या असाधारण व्यक्तिमत्त्वाची खूण आहे, पुरावा आहे.' असे कवी ऑडेनने नमूद केले आहे.

रोनाल्ड डी लिऊ (१९४८) हे कलेचे इतिहासकार. ते ॲमस्टरडॅम येथील वॅन गॉफ म्युझियमचे संचालक होते. त्यांनी १९६६मध्ये पेंग्विन-क्लासिकच्या विन्सेंटच्या पत्र संग्रहाचे संपादन केले होते. त्याबाबत त्यांनी नमूद केले आहे, 'शरीरउपभोगाच्या जगापेक्षा अनंततेच्या सौंदर्याच्या श्रेष्ठत्वाचे त्याच्यासाठी जास्त महत्त्व होते. म्हणून तर तारे, चांदण्या ही त्याची वरचेवर येणारी आवडती प्रतीके. मी विचार करतो, माझा विश्वास आहे, मला प्रेम वाटते, ही त्याची त्रिसूत्री होती. त्याच्या उपमा आणि रूपके चित्तवेधक असतात. त्याच्या पेंटिंगच्या तंत्रात अधूनमधून रंग मिसळलेले असतात, त्याला तो मागावर कापड विणण्याची उपमा देतो.' विन्सेंटने एका पत्रात लिहिले आहे 'मी बहुतेकांच्या नजरेने एक नगण्य, तऱ्हेवाईक, स्वभावाने वाईट व्यक्ती आहे, पण अशा नगण्य तऱ्हेवाईक माणसाच्या हृदयात काय होते ते मी माझ्या चित्रकामातून एक दिवस दाखवून देईन.'


**तऱ्हेवाईक रूपकार**

वॅन गॉफ १८८६ च्या सुमारास पॅरिसला आणि तेथून पुढे आर्ल या दक्षिण फ्रान्समधील रंगरम्य गावात कलेसाठी गेला. १८९०मध्ये त्याचा मृत्यू झाला. या चार वर्षात त्याने तैलरंगात स्वत:ची ३५ पोर्ट्रेट्स काढली. याचे एक कारण म्हणजे, मॉडेल्सना देण्यासाठी त्याच्याकडे पैसे नव्हते. तो स्वत:च मॉडेल झाला. 'स्वत:ला ओळखा' हे अपोलोच्या मंदिरातील भिंतीवर कोरलेले प्राचीन ग्रीक सुभाषित सॉक्रेटिसने सुप्रसिद्ध केले. स्वत:ला ओळखण्याच्या अनावर इच्छेपोटी त्याने ही सेल्फ पोर्ट्रेट्स केली, हे त्यामागचे ठळक कारण.

पोर्ट्रेट्सना (त्यात सेल्फ पोर्ट्रेट्सही आली) पाश्चात्य कलेत इतिहास आहे. जोहानस व्हेरमीर (१६३२-१६७५) डच पेंटर आणि दिएगो बेहलाकेस (१५९९-१६६०) स्पॅनिश चित्रकार यांनी जे पोर्ट्रेट्सबाबत दिशादर्शक काम केले ते वॅन गॉफ, कोकोश्का (१८८६-१९८०) ऑस्ट्रियन चित्रकार, कवी आणि इगान शिलुह (१८९०-१९१८) ऑस्ट्रियन चित्रकार यांनी पुढे नेले. यात दोन भाग होते. पहिला विचार-बिंदू व्यक्तीचे फक्त नुसते रूप दाखवायचे नाही, तर अंतरंग व भावनिक जीवनही दाखवले पाहजे. दुसरा, रुपकाराने पोर्ट्रेटमध्ये त्याच्या कलात्मकतेच्या तांत्रिक तपशिलांचे प्रकटीकरण करणे अपेक्षित असते. हे काम वॅन गॉफने त्याच्या पोर्ट्रेट्स आणि सेल्फ पोर्ट्रेट्समध्ये प्रभावीपणे केले आहे. त्यामुळे त्याची सेल्फ-पोर्ट्रेट्स नवोदित चित्रकारांकरिता अभ्यासाचा विषय आहेत, असे कलासमीक्षकांनी लिहून ठेवले आहे.

सेल्फी आणि सेल्फ पोर्ट्रेट्समध्ये फरक आहे. 'सेल्फी' ही बरेच वेळेला समाज माध्यमावर दाखवेगिरी करता असते. सेल्फ पोर्ट्रेट्समध्ये चित्रवंत कलेच्या माध्यमातून स्वत:चे आतले जीवन दाखवण्याचा प्रयत्न करत असतो.

कलेचे तंत्र हे वास्तवाचा आभास निर्माण करणारे वाहन असते. हे वाहन निर्जीव नसते तर ते रुपकाराने, कालावंताने कसे वापरले आहे, निर्मिले आहे याचा बोध पोर्ट्रेट बघताना होतो. हे तंत्रच त्याचा सखोल अर्थ सांगत असते. त्यासाठी दर्शकाने पोर्ट्रेट बारीक नजरेने पाहावे लागते. असे कलेच्या समीक्षकांनी सांगितले आहे, हे दाखवून देण्याकरता कलेच्या इतिहासकारांनी वॅन गॉफचे उदाहरण दिले आहे. वॅन गॉफने त्याच्या पोर्ट्रेट्समध्ये



*वॅन गॉफचे साहित्यविषयक प्रेम त्याच्या चित्रांमधूनही झळकते... त्याने रंगवलेल्या चित्रांतली पुस्तके चित्रकाराच्या ज्ञानाच्या कक्षेचे सूचन करतात...*

छोटे छोटे पण स्पष्ट, भावपूर्ण कुंचल्याचे आघात वापरले आहेत. अलग अलग, तेजस्वी, गडद रंग, परस्पर विरोधी, स्वत:च्या मर्जीने निवडलेल्या रंगांचा प्रत्येक ब्रश स्ट्रोक वापरून चेहऱ्याची वा प्रतिमेची निर्मिती विन्सेंटने केली आहे.

कला हा आभास असतो. हा आभास वास्तवाचे पुनर्निर्माण करून कलात्मक सादरीकरण करतो. वॅन गॉफसारखे आधुनिक चित्रवंत दर्शकाचे या कलेच्या निर्मिती प्रक्रियेकडे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न करतात. वॅन गॉफने दर्शकांना मुख्यत्वे करून चित्रातील चेहऱ्यावरील एक्स्प्रेशन्स बघा, असे आवाहन सतत केले आहे. कारण 'एक्स्प्रेशन्स' चेहऱ्याची गोष्ट सांगत असतात.

**बोलकी चित्रे**

चित्रे का बोलकी असतात याचे स्पष्टीकरण मायकेल पोलेनि (१८९१-१९७६) हंगेरियन-ब्रिटिश, या पॉलीमथ-बहुविद्यातज्ज्ञ आणि वैज्ञानिक यांनी दिले आहे. त्याचा आशय असा : 'चित्र डोळ्यासमोर आल्याबरोबर पंचेंद्रिये उद्दीपित होतात, मेंदूवर एक ठसा तयार होतो. हा एक विलक्षण अनुभव असतो. म्हणून शब्दभाषेपेक्षा चित्रभाषा जास्त शक्तिमान असू शकते.' हे आपण व्यवहारातही अनुभवत असतो. कारण माणसाच्या उत्क्रांतीत माणूस प्रथम पाहायला शिकला, मध्ये कितीतरी युगे गेली आणि तो बोलायला, लिहायला शिकला. याबद्दल पोलेनि यांनी छोटे वैज्ञानिक स्पष्टीकरण दिले आहे. प्रतिनिधित्वात्मक चित्रकलेत म्हणजे वास्तववादी चित्रकलेत जगातील वस्तू, व्यक्ती किंवा दृश्ये जशी दिसतात तशीच, ओळखता येतील अशा रुपात चितारलेली असतात. यांच्याविरोधी 'अपोझिट' अमूर्त कला. हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे. अमूर्त कलेचे आकलन दृष्टी मेंदूच्या निराळ्या भागात होते. वास्तववादी चित्रकलेचे आकलन थोड्या निराळ्या मार्गाने होते.

वास्तववादी चित्र बघण्याचे दोन घटक असतात. त्यातील पहिला घटक म्हणजे, 'केंद्र-जागरुकता' म्हणजे दर्शकाचे लक्ष भटकू न देता एका विशिष्ट भागाकडे लक्ष खेचून घेण्यासाठी चित्रकार काही उपाय योजतो. हे दृष्टी विज्ञानाला धरून आहे. तुम्ही खिडकीतून बाहेर बघत आहात, बाहेर अनेक गोष्टी आहेत, पण तुमची नजर एखाद दोन गोष्टींवर खिळून राहते आणि इतर गोष्टींकडे तुम्ही दुर्लक्ष करता. चित्रकार मेंदूच्या या कार्य पद्धतीचा उपयोग त्याच्या चित्रकौशल्याने करून घेतो.

वास्तववादी कलेतील दुसरा घटक म्हणजे, 'गौण जाणीव'. दर्शकाचे लक्ष केंद्रित असते, त्याच वेळी रंग, कुंचल्याचे फटकारे, कॅन्व्हास याकडे त्याचे नकळतपणे लक्ष असते. त्यामुळे दर्शकाला सबंध चित्र पाहिल्याचा अनुभव मिळतो. तुम्ही खिडकीबाहेरचे दृश्य बघत आहात, विशिष्ट गोष्टीवर नजर खिळलेली आहे, तरी भवताल तुमच्या दृष्टिक्षेत्रात असतोच. म्हणून तर तुम्हाला सगळे दृश्य बघितल्याचा अनुभव मिळतो.

आयर्विन रॉक (१९२२-१९९५) हे सुप्रसिद्ध अमेरिकन प्रायोगिक मनोवैज्ञानिक. ते कॅलिफोर्निया विद्यापीठात प्राध्यापक होते. ते 'आकलनाचे मनोवैज्ञानिक' होते. 'पर्सेप्शन' हे त्यांचे मनोविज्ञानातील ठळक पुस्तक. रंग, आकार, खोली, आवाज, अवकाशाची जाणीव मानवी मेंदू कशी विकसित करतो, या बाबत त्यांनी विचार मांडले आहेत. 'केंद्र जागृकता आणि गौण जागृकता, या दोन्ही जाणिवा 'प्रतिनिधित्वात्मक चित्रकलेच्या आकलनासाठी कळीच्या असतात. त्यामुळे दर्शकाला कळते, हे चित्र वास्तवाशी जवळीक साधणारे आहे, पण हे वास्तव नाही.'

'चित्रकला ही मेंदूच्या नियमात वागत असते.' या सेमीर झेकी (१९४०) यांच्या विधानाची उदाहरणे मला मेंदूविज्ञानाच्या नजरेतून 'चित्रकला' समजून घेताना वेळोवेळी सापडली. सेमीर झेकी हे न्युरो बायोलॉजिस्ट, युनिव्हर्सिटी कॉलेज लंडन येथे प्राध्यापक आहेत. विज्ञानाच्या शोधनिबंधात सुरुवातीला 'कि वर्डस', 'कळीचे शब्द' दिलेले असतात, त्याकडे लक्ष ठेवले म्हणजे, सबंध शोधनिबंध उकलायला मदत होते. हे 'केंद्र जागरूकते'सारखे आहे. साहित्यात, वैचारिक लेखनात असे घडत

असावे, काही वाक्ये, शब्दप्रयोग वाचकाचे लक्ष वेधून घेतात, वाचक थबकतो, सबंध लेखनाचा विचार करू लागतो, असे मला वाटून गेले. असे मला वाटले यालाही कारण आहे. शरीराला लागणाऱ्या उर्जेतील सगळ्यात जास्त ऊर्जा मेंदूला लागते. मेंदू हा खर्चिक अवयव आहे. तो त्याची ऊर्जा जपून वापरतो. एकदा निर्माण केलेली प्रक्रिया मेंदू सगळीकडे निरनिराळ्या प्रकारे वापरतो. मेंदू नवीन प्रक्रिया तयार करण्यात ऊर्जा खर्च करत नाही.

**दिशादर्शक चित्रवंत**

वॅन गॉफ याची चित्रशीलता सहजतेने दिशादर्शक होती. रंगपेटीतील रंग झोपलेले असतात. चित्रकार ते रंग कॅन्व्हासवर जिवंत करतो, जसे कवी, लेखक, कोशातले शब्द कागदावर, तेव्हा अर्थाची फुलपाखरे चित्रभाषेत, शब्दभाषेत उडू लागतात. वॅन गॉफने रंगाचे जाड थर, एका थरावर दुसरा थर लावून, कधी पॅलेट, कधी ब्रशने 'इम्पॅस्तो' हे तंत्र विकसित केले. त्याने रंगाचे थरावर थर लावून पेंटिंग्जना त्रिमितीय शिल्पाचा पोत दिला. हा छाया-प्रकाशाचा खेळ असतो. कॅन्व्हासवर रंग दाटपणे लावल्याने थर वर आलेले दिसतात आणि प्रकाशात सावल्या तयार करतात. यालाच इम्पॅस्तो पोत म्हणतात.

विन्सेंट वॅन गॉफने रंगांची प्रातिनिधिक कार्यापासून मुक्तता केली, असे पाश्चात्य कला समीक्षकांचे मत. पाश्चात्य संस्कृतीत रंगाला धार्मिक महत्त्व होते. सोनेरी रंग म्हणजे सूर्य आणि ईश्वरी आत्म्याचे प्रतीक, जांभळा रंग राजघराणे आणि संपत्तीशी जोडला होता, कारण जांभळा रंग तयार करणे खर्चिक होते. असे अनेक संकेत होते. वॅन गॉफने रंगाना या पारंपरिक अर्थाच्या मुठीतून त्याच्या चित्रकलेत सोडवले. विन्सेंटसह इतरही चित्रवंतांनी हे काम केले आहे, पण त्याचा या कामातील वाटा मोठा होता एवढेच.

प्रत्येक संस्कृतीत रंग, आकार, यांना सांस्कृतिक कार्य आणि महत्त्व असते. जे पाश्चात्य संस्कृतीला लागू आहे, ते भारतीय चित्र संस्कृतीला लागू होईलच असे मुळीच नाही. पण प्रत्येक संस्कृतीत रंगाला, आकाराला भावनिकदृष्ट्या महत्त्व असते.

**वरवरचे आणि आतले**

वॅन गॉफने त्याच्या एका जवळच्या मित्राचे पोर्ट्रेट काढले होते. त्या मित्राचा 'लाइकनेस'-'सारखेपणा' चित्रात पकडणे ही पहिली पायरी होती. ते केल्यानंतर, त्यांनी एक नवीनच पाऊल उचलले. समोर बसलेल्या मित्राचा रंग आणि त्याच्या पार्श्वभूमीचा रंग बदलण्यास सुरुवात केली, हे विन्सेंटने थिओला एका पत्रात लिहिले, त्याचा आशय असा 'मी आता स्वैर 'कलरिस्ट' रंगारी होणार आहे, त्याच्या फिकट केसांना ठळक उठाव देणार आहे, त्यासाठी 'ऑरेंज टोन्स' क्रोम्स, पेल लेमन वापरले आहेत, पार्श्वभूमी इंटेन्स ब्लू रंगाची आहे. या सोप्या भवतालामुळे गूढ प्रभाव तयार होतो, खोल निळ्याभोर आकाशातला तारा.' आपल्या जवळच्या प्रिय मित्राचे चित्र काढताना विन्सेंटने जे बदल केले, ते त्याने पत्रात नमूद केले. या पत्राचे उदाहरण एरिक कॅन्डेल (१९२९-) वैद्यक नोबेल विजेते मेंदूतज्ज्ञ यांनी वॅन गॉफ काय करू पाहत होता या बाबत दिले आहे. ते वाचून उलगडा झाला. ते पुढीलप्रमाणे- वरवरच्या क्षणिक ठशांपासून खोलवर जात दीर्घकालिक, शक्तिमान, भावनिक अभिव्यक्तीचे मार्ग वॅन गॉफ शोधत होता. हे कळीचे संक्रमण असते. 'वॅन गॉफने रंगांना प्रातिनिधिक कार्यापासून मुक्त केले' म्हणजे काय केले. या विधानाचा अर्थ वरील उदाहरणाने आणि त्याच्या स्पष्टीकरणाने माझ्यासारख्या सामान्य दर्शकाला आणि वाचकाला उजेडाइतका स्वच्छ झाला.

चित्रात भावनांचे दर्शन घडवणे हे चित्रवंतांचे प्राथमिक उद्दिष्ट असते. हे कलेच्या इतिहासात वर्षानुवर्षे चालत आले आहे. प्रत्येक काळाच्या चतकोरात निरनिराळ्या वाटांनी हे साध्य करण्याचा प्रयत्न अनेक चित्रकार करत आले आहेत. असे करत चित्रकला 'पोस्ट इम्प्रेशनिस्ट' काळात येऊन पोचली. मुख्यत्वे करून वॅन गॉफ, एडवर्ड मंच, हेन्री मॅतीस यांनी रंगांचा उपयोग नेणिवेतील सुप्त भावना आणि जाणिवेतील भावना जागृत करण्याकरता तसेच त्यांना आवाहन करण्याकरता केला.

वॅन गॉफ आणि फ्रेंच चित्रकार जॉर्जेस स्युरा (१८५९-१८९१) यांना रंग मिश्रणाच्या विज्ञानात अंतर्दृष्टी होती, यामुळे नैसर्गिक प्रकाश कॅन्व्हासवर कसा पकडायचा याचे तंत्र त्यांनी विकसित केले होते. या सगळ्याचा उपयोग पुढील चित्रकारांना झाला. वॅन गॉफ हा इम्प्रेशनिझम-प्रभाववाद व एक्सप्रेशनिझम-अभिव्यक्तीवाद या मधील दुवा होता.

**वॅन गॉफची सूर्यफुले**

आधुनिक पाश्चात्य संस्कृती ही विज्ञानावर उभी आहे. कलेच्या सर्व शाखांना विज्ञानाचा शोधक स्पर्श झालेला आहे. 'विन्सेंट वॅन गॉफ' या विषयातील सगळी प्रकरणे विज्ञानाच्या बहुआयामी शाखांच्या सूक्ष्मदर्शकाखालून गेली आहेत. 'वॅन गॉफची सूर्यफुले' ही सुप्रसिद्ध पेंटिंग्जची मालिका. १८८७ मध्ये पॅरिस येथे त्याने जमिनीवर विखुरलेली सूर्यफुले रंगवलेली होती. आर्ल या गावात गेल्या नंतर १८८८च्या सुमारास फुलदाणीत



*रंग मिश्रणाचेही विज्ञान असते. वॅन गॉफला त्या विज्ञानाची अंतर्दृष्टी होती. त्यातूनच नैसर्गिक प्रकाश कॅनव्हासवर कसा चितारायचा याचे तंत्र त्याने विकसित केले होते. चित्र आर्लच्या हॉस्पिटलचे असो वा सूर्यफुलांचे त्यात ते प्रतिबिंबित झाल्याचे दिसते...*

ठेवलेली सूर्यफुले निरनिराळ्या पार्श्वभूमीवर रंगवली आहेत. त्याची ही पेंटिंग्ज तो गेल्या नंतर लाखो डॉलर्सना विकली गेली. त्याच्या सूर्यफुलांची कोट्यावधी पिक्चर पोस्टकार्ड्स विकली गेली व जात आहेत. त्याच्या हयातीत त्याने लिहून ठेवले होते, 'विक्रीयोग्य, सुंदर हे माझ्यासाठी भयावह शब्द आहेत.' बाजार नियतीला हे मान्य नव्हते. पण याची त्याला कल्पना असावी त्याने थिओला एका पत्रात लिहिले, 'पैसा हे एक चलन आणि पेंटिंग दुसरे.'

वॅन गॉफ म्हणाला होता, 'फुले जशी फिकुटतात तशी पेंटिंग्जही' आज त्याची सूर्यफुले कोमेजली आहेत, ही चित्रे म्हातारी झाली आहेत. काळाचा हात त्यावर फिरला आहे. अमेरिकेतील कॅलिफोर्निया विद्यापीठातील सांख्यिकीविज्ञान विभागातील वैज्ञानिकांच्या वॅन गॉफच्या सूर्यफुलांची ही स्थिती लक्षात आली. काही वर्षाच्या संशोधनानंतर २०२१ साली त्यांनी शोधनिबंध प्रकाशित केला.

'The geometry of colors in Van Gogh's Sunflowers' (Keywords - Van Gogh, Sunflowers, Color geometry, Color transfer) हा शोधाभ्यास पेंटिंग्जच्या डिजिटल प्रतिमा तयार करून संगणकावर केला आहे. कलर जिओमेट्री म्हणजे रंग आणि भौमितिक आकारांचा मेळ घालणे व रंगीत भूमितीय आकाराचे चित्र तयार करणे. कलर ट्रान्सफर हे इमेजिंग प्रोसेसिंग तंत्र आहे. हे उदाहरणाने स्पष्ट होईल. तुमच्याकडे तुमच्या मित्राचा सूर्योदयावेळी काढलेला फोटो आहे. हे तंत्र वापरून तोच फोटो सूर्यास्ताच्यावेळी काढला आहे, असे तुम्ही 'ट्रान्सफर' करू शकता.

या वैज्ञानिकांनी संगणकाचा वापर करून वॅन गॉफच्या फिकुटलेल्या चित्रांचा आणि ताज्या सूर्यफुलाच्या छायाचित्रांचा तुलनात्मक अभ्यास केला. ताज्या फुलांच्या रंगातील कोणत्या छटा कमी वा जास्त झाल्या म्हणून ही पेंटिंग्ज फिकुटली हे शोधून काढले. या छटा त्यात घालून विन्सेंटला हवी असलेली तेजस्वी रंगाची जिवंत सूर्यफुले निर्माण करता येईल, का हे पाहिले. मुख्य म्हणजे, यात विन्सेंटच्या एकाही पेंटिंगला हात लावलेला नाही. हा सगळा आभासी खेळ. याचा उपयोग रेस्टोरेशन – पेंटिंग्ज पूर्ववत करण्याकरता होईल का? हे पाहावयाचे.(या शोधनिबंधात सांख्यिकीविज्ञानाने विश्लेषण, डेटा-विदाची निर्मिती, एआयचा उपविभाग मशीन लर्निंगचा उपयोग वगैरे तांत्रिक तपशील आहेत. ते येथे देता आलेले नाहीत.)

हे सारे लिहितालिहिता बाहेर पाहिले. मे महिन्यातील दुपारचा सूर्य तळपत होता. पिवळ्या फुलांची रुखराजी डोलत होती. अनेक तज्ज्ञ मंडळींनी वाट दाखवली म्हणून मी येथपर्यंत येऊन पोचलो होतो. तरी अपूर्णतेची अस्वस्थता होती. कोणीतरी कानात म्हणाले, 'पण विन्सेंट व्यथालयात अडकला होता त्याचे काय?'

**व्यवसायाने हृदयरोग तज्ज्ञ असलेले डॉ. आनंद जोशी हे मराठीतले नामवंत विज्ञानलेखक, ललितलेखक आहेत. 'बोलकी हाडे', 'मेंदूतला माणूस', 'कर्कविज्ञानाची गोष्ट', 'अक्षर पाविजे निधीरे', 'व्यूहचक्र', 'आपले वर्तन, आपला मेंदू' (सहलेखक सुबोध जावडेकर) 'ऑर्वेलच्या अवतीभोवती' ही त्यांची प्रकाशित झालेली पुस्तके आहेत.**


**ई मेल :** drjoshianand628@gmail.com

# कला संचिताचा अक्षय्य ठेवा



डॉ. मिनाक्षी पाटील






**चि**त्र म्हणजे काय? चित्रकला म्हणजे काय? चित्राचा मूलभूत पाया असलेल्या दृश्य–अदृश्याच्या खेळात कलादृष्टीचे अंतर्दृष्टी म्हणून असलेले महत्त्व म्हणजे काय? या साऱ्या दृश्यविचारावर आयुष्यभर गंभीरपणे चिंतन करणारे चित्रकार म्हणून प्रभाकर बरवे यांचे महत्त्व अनन्यसाधारण असे आहे. आपल्या चित्रकृतीतून आणि लेखनातून बरवे यांनी निरंतर चित्रतत्त्वाचाच विविधांगाने शोध घेतला. अशा या चिंतनशील व्यक्तिमत्त्वाचा विविधांगातून समग्र वेध घेण्याचा प्रयत्न 'बरवे संचित' या ग्रंथात केलेला आहे. त्यांचं मोठेपण आम्ही नाही सांगायचं तर कुणी? असं म्हणत एका व्रतस्थ जबाबदारीचं भान प्रास्तविकातच प्रकट करणाऱ्या संपादक सतीश नाईक आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी 'बरवे संचित' या मौलिक ग्रंथाची निर्मिती केली आहे. या बृहद्ग्रंथासाठी या साऱ्यांनी जी प्रचंड मेहनत घेतली आहे, त्याबद्दल या साऱ्यांबद्दल कृतज्ञता व्यक्त करावी तेवढी कमीच आहे. चिन्ह प्रकाशनाने एक सामाजिक, सांस्कृतिक उत्तरदायित्त्व समजून अत्यंत निष्ठेने यापूर्वी प्रसिद्ध केलेला गायतोंडेंवरचा ग्रंथ आणि आता 'बरवे संचित' हा ग्रंथ महाराष्ट्राच्या कलेतिहासातील एक महत्त्वाचा दस्तऐवज आहे...

'कोरा कॅनव्हास' (मौज प्रकाशन गृह, १९९०)च्या शेवटच्या पानावर बरवे यांनी आपल्या चित्रविचाराविषयी म्हटलंय, ''ज्यांनी ज्यांनी आपल्या अंतरंगाची खिडकी उघडून आतमध्ये पाहण्याचा प्रयत्न केला, त्या सर्वांना हाच अनुभव येतो – कारण माझा अनुभव हा सनातन अनुभव आहे, खरं म्हणजे मी हे केवळ निमित्त आहे!'' थोडक्यात, स्वतःला केवळ एक निमित्त म्हणून पाहणारे, स्वतःच्या संपूर्ण कला प्रवासाकडे किंबहुना साऱ्या जगण्याकडे ज्या एका कलात्मक ताटस्थ्याने, साक्षीभावाने बरवे यांनी पाहिले त्या बरवेंवरचे चिन्ह प्रकाशित 'बरवे संचित' हे पुस्तक आपणही साक्षीभावाने वाचूया, असे कितीही ठरवले तरीही, ते शक्य होत नाही. ३८४ पृष्ठांच्या या बृहद्ग्रंथात बरवेंचं अत्यंत साधं जगणं आणि प्रत्येक कृती–उक्तीतून व्यक्त होणारं त्यांचं चिंतन टिपताना एका वेगळ्याच भावावस्थेचा अनुभव मी घेतला. प्रसंगी भरून आलं. वेळोवेळी साक्षीभाव गळून पडला. स्वतःला केवळ निमित्तमात्र समजणारे, अखंड चिंतनात निमग्न असे बरवे, या पुस्तकाच्या पानोपानी मला भेटले. केवळ चित्रकारच नव्हे तर कोणत्याही संवेदनशील माणसाला भावनिक, आत्मिक पातळीवर खूपच समृद्ध करणारा ऐवज आहे, या ग्रंथात!

**खूप समृद्ध केलं, पण त्याचवेळी प्रचंड अस्वस्थही...**

बरवेंचं 'कोरा कॅनव्हास' जसं एका वाचनात संपत नाही, आपण ते वारंवार वाचत राहतो, प्रत्येक वेळी आपल्याला त्यातून काहीतरी नवं गवसत राहतं, अगदी तसाच 'बरवे संचित' हा एका वाचनात संपणारा ग्रंथ नाही. चित्राला सुरुवात करण्यापूर्वी बरवे जसे कोऱ्या कॅनव्हासकडे एकटक पाहत त्याच्यासमोर तासन्तास विचार करत बसत, आपल्या चित्रात अवकाशातून आकाराकडे व परत आकारातून अवकाशाकडे वळत, तसंच हे पुस्तक वाचताना पुढून मागे, मागून पुढे अशी उलटसुलट भ्रमंती करताना पानापानागत एक वेगळाच आनंद आणि तितकीच एक आगळी अस्वस्थता मी अनुभवली. या ग्रंथात प्रत्येक लेखकाने त्याला गवसलेले बरवे अगदी हृदयापासून उभे केले आहेत. वाचताना मी अगदी बरवेमय झाले. आता कितीतरी दिवस की कायमचेच बरवे सोबत राहतील कुणास ठाऊक? म्हणूनच कदाचित माझ्या मनात हा ग्रंथ वाचताना आनंदासोबतच एक अस्वस्थता दाटून आली.

या ३८४ पृष्ठांच्या ग्रंथात एकूण १३ भाग आहेत. त्यात चाहत्यांमधले, मित्रांमधले, स्नेह्यांमधले, कुटुंबातले, वीव्हर्समधले, तरुण चित्रकारांतले, त्यांच्या पुस्तकातले, विविध नोदींमधले, रुग्णालयातले असे विविध रूपातले बरवे आपल्याला भेटतात. बरवे यांच्या संपर्कात आलेल्या तब्बल ६२ पेक्षा अधिक व्यक्तींचे लेख या ग्रंथात आहेत. चित्रकलेच्या क्षेत्रातील शुभ्र काही जीवघेणं असं व्यक्तिमत्त्व कोण? असं जर मला कुणी विचारलं, तर माझ्या नजरेसमोर तत्काळ बरवेंची शांत, संयत, मृदू मूर्ती उभी राहते.

**वाचकांसमोर बरवेंची कशी प्रतिमा उभी राहते?**

तर इथे मला लीळाचरित्रामधली हत्ती आणि चार आंधळ्यांची गोष्ट आठवते. त्या चार आंधळ्यांपैकी एकाला हत्ती खांबासारखा, दुसऱ्याला सुपासारखा तर तिसऱ्याला झाडूसारखा वाटतो. दैनंदिन जगण्यातही या कथेतल्यासारखंच प्रत्येकाला आपापल्या चश्म्यानुसार सारं जग दिसत असतं. पण या ग्रंथात बरवे यांच्याविषयी वेगवेगळ्या क्षेत्रातील व्यक्तींनी लिहिलेले लेख वाचताना मात्र त्या साऱ्या लेखातून बरवे नामक जे एक रसायन आपल्यासमोर उभं राहतं, त्यात मात्र सर्वत्र एकवाक्यता दिसते. प्रत्येकाला त्यांचं एकाच प्रकारचं विश्वरूप दर्शन घडताना दिसतं. हे असं तेव्हाच घडतं, जेव्हा तुमच्या कृती–उक्तीत एकवाक्यता असते, आत–बाहेर एकाकार वृत्ती असते. तेव्हाच साऱ्यांना बरव्यांविषयीचा अनुभव समानशील स्वरूपाचा आलेला दिसतो.

या ग्रंथातील सर्व लेख वाचताना बरव्यांच्या व्यक्तिमत्त्वाचं एक सर्वात मोठं वैशिष्ट्य प्रकर्षाने जाणवतं, ते म्हणजे, प्रत्येकाला जाणवलेलं त्यांचं चिंतनशील व्यक्तिमत्त्व! त्यांच्या पत्नी प्राचीताईंचा लेख अत्यंत हृद्य असा झाला आहे. त्यांचं एक वाक्य इथे मला नोंदवावंसं वाटतं, जे नेमकं त्याच अर्थाने प्रत्येक लेखाच्या लेखकांनी आवर्जून नोंदवलेलं दिसतं ते म्हणजे, बरवे जेव्हा चित्र काढत असायचे, तेव्हा तर ते चित्र काढत असायचेच, पण ते जेव्हा चित्र काढत नसायचे, तेव्हाही चित्रच काढत असायचे. अर्थात मनःपटलावर! त्यांचं चित्र हे बहुधा त्यांच्या मनःपटलावर पूर्ण साकारत असावं आणि नंतर ते कॅनव्हासवर उतरणं, हे केवळ एक निमित्तमात्र ठरत असावं, इतका त्यांचा अखंड चिंतनावर भर होता. सतत विचारात राहणं हेच त्यांचं व्यक्तित्त्व होतं आणि त्यांच्या सर्व लेखांमधून सतत चिंतनात आकंठ बुडालेले बरवे आपल्यासमोर उभे राहतात.

**आकार आणि अवकाशाचे अद्वैत**

सभोवतालाचं सतत बारकाईने निरीक्षण करणं, त्याचा अन्वय लावणं, चित्रात वस्तूंच्या आकाराचं नैसर्गिक स्थान शोधण्याचा प्रयत्न बरवे करताना दिसतात. जसं जीवन मी जगलो, तशीच माझी चित्रं झाली पाहिजेत, असं जे बरवे आपल्या डायरीत नोंदवतात,

तेच निरीक्षण सर्व लेखांमधून सर्व लेखकांनी त्यांच्याविषयी नोंदवलेलं दिसतं. ही कृती–उक्तीची एकवाक्यता हा बरवे यांच्या व्यक्तिमत्त्वाचा मुख्य विशेष सर्वांनी नोंदवलेला दिसतो. संपूर्ण ग्रंथात त्या त्या लेखाला संवादी अशी बरवेंची चित्रं, रेखाटनं, त्यांच्या डायरीतल्या नोंदी, त्यांच्या कविता, त्यांच्या चित्रांची छायाचित्रं अशा भरगच्च माहितीमुळे हा ग्रंथ एक मौलिक दस्तावेज झाला आहे. आपल्या चित्रनिर्मिती प्रक्रियेविषयी बरवे म्हणतात, ढगाळलेलं वातावरण दूर व्हावं आणि अचानक स्वच्छ, सुंदर, निळंभोर आकाश दिसावं, तशी मनाची शुद्धावस्था येऊन हळूहळू चित्र स्पष्ट होत जातं. मन मोकळं झाल्याशिवाय नव्या प्रतिमा आकार घेत नाहीत, कोऱ्या कॅनव्हाससारखं चित्रकाराच मन, चित्रकाराचा अवकाश निर्विकार झाल्याशिवाय सृजनाला पूरक पार्श्वभूमी तयार होत नाही. चित्रावकाशाशी तादात्म्य पावल्याशिवाय चित्रकाराला मार्ग सापडत नाही. त्यांच्या मते, आकार आणि अवकाशाचं नातं कसं खेळीमेळीचं असतं, म्हणजे कसं? जो एकाक्षणी आकार असतो, तोच दुसऱ्याक्षणी अवकाश बनतो आणि अवकाशाचा आकार व्हायला वेळ लागत नाही.

बरव्यांच्या स्वभावाचं वैशिष्ट्य म्हणजे, ते प्रत्येकाला आपल्या चित्राविषयीचं बोलायला लावत किंवा कोणत्याही वयाच्या, वृत्तीच्या, वैचारिक स्तरावरच्या व्यक्तीशी ते सहज संवाद साधू शकत. उदा. भांडेवाली, ग्रीलवाला, लहान मुले ते समवयस्क, अगदी कुणीही! हे जवळपास प्रत्येक लेखातून आलंय. इथे मला जयंत जोशींच्या प्रस्तावनेतील एक वाक्य प्रकर्षाने नोंदवावंसं वाटतंय, ते म्हणतात, चित्र बांधणी सांभाळतानासुद्धा बरवे कल्पना, सत्य आणि वास्तव यांना एका पातळीवर आणतात. परस्पेक्टिव्हला त्यांनी त्यांच्या चित्रसृष्टीत जवळजवळ वजा केले होते. तसेच पेंटिंगला स्थैर्य देणाऱ्या सूचक क्षितिजरेषेलासुद्धा त्यांनी कधी रेखित केले नाही. त्यांच्या चित्रातील आकार चित्रावकाशात तरंगताना दिसतात, तरी खरे वाटतात. जसं एका चित्रात ते फुलपाखरू मोठं दाखवतात व डोंगर छोटासा दाखवतात. सदर ग्रंथातील काही लेखकांनी त्यांच्या या चित्रशैलीला अतिवास्तववादी म्हटलंय. पण माझ्या मते, खरं तर ते त्यांच्या प्रत्येक चित्रातून एक प्रकारची सौंदर्यपूर्ण अशी विरचनाच– deconstruction करतात.


**खंडन आणि विरचनाचे महत्त्व**

बरवेंची चित्रं व त्यांचं चित्रांविषयीचं चिंतन पाहता मला ते पोस्टमॉडर्न–उत्तर आधुनिक कलावंत वाटतात. मला वाटतं, बरवे आपल्या वर्षानुवर्षांच्या कंडिशनिंगला तोडतात. वस्तूंच्या व्यक्तिमत्त्वाचं खंडन करतात, विरचन करतात. त्यांच्या मते, अवकाशातच रूपाला आकार लाभतो. रुप आणि रंग या अवकाशाच्याच दोन अभिव्यक्ती आहेत. त्यामुळे अवकाश आणि रुप यांच्यात संवाद नसेल तर अर्थाला न्यूनता येते. म्हणूनच ते सतत प्रयोग करीत राहिले. सदर ग्रंथातील एका लेखात नितीन दादरावालांना त्यांनी चौकोन तोड हे जे सांगितलं ते याच अर्थाने!

बरवे संचित या ग्रंथातून प्रत्येक संवेदनशील, चिंतनशील कलावंताला मनात येणाऱ्या असंख्य प्रश्नांची उत्तरं मिळू शकतील, दिशादिग्दर्शन होऊ शकेल. जसं चित्रकार नितीन दादरावालांना नोकरीतील ओढाताणीमुळे नोकरी सोडावीशी वाटत होती, त्यावेळी त्यांना बरवेंनी स्वानुभवातून खूप सुंदर उत्तर दिलंय. चित्र काढण्यात रंगून गेलेलं असतानाच नेमकं चित्रं अर्ध टाकून कामाला जावं लागल्यामुळे विचारांची, निर्मितीची लय खंडित होते, म्हणून नोकरी अडसर वाटते, असं दादरावालांनी म्हटल्यावर बरवेंनी त्यांना छान उत्तर दिलंय. ते म्हणतात – चित्र सोडून नोकरीवर जावं लागल्यानं चित्र काढण्याची क्रिया खंडित होते, ही चांगली गोष्ट आहे. कारण चित्रापासून काही काळ डिटॅच होणं, दूर जाणं चांगलंच! कारण काही गॅपनंतर परत आपल्या चित्राकडे परतताना त्याकडे साक्षीभावाने पाहिल्यावर त्या चित्रात खरे तर अधिक वेगळ्या प्रकारची मौलिक भर पडू शकते. दादरावालांनी पुढे नोंदवलंय, की त्यांच्या या विचारामुळे माझं समाधान होऊन माझा नोकरीचा वैताग मोडून निघाला.

कोणत्याही संवेदनशील मनात सतत वेगवेगळे संघर्ष सुरू असतात, तसे अनेक प्रश्न, अस्वस्थता बरवे यांच्या मनातही सतत नांदत होती, वीव्हर्स सेंटरमध्ये अनेक वर्ष डिझाइनचं काम केल्यामुळे कितीही ठरवलं, तरी या ना त्या मार्गाने त्यांच्या चित्रात येणारं डिझाइन त्यांना एक अभिजात कलाकार म्हणून अजिबात पसंत नव्हतं, त्यामुळे ते निग्रहाने कसं बाजूला करता येईल, हा त्यांचा आयुष्यभर प्रयत्न राहिला.

तसंच नोकरीमुळे, आर्ट कॅम्पमुळे, सेमिनार्समुळे, प्रदर्शनात पाठवण्यासाठी चित्र रंगवावी लागल्यामुळे कामासाठी वेळ आणि अपुऱ्या जागेत कामाचा अखंड प्रवाह सुरू ठेवणं कठीण होतं. हे सर्व थांबवून फक्त काम करता आलं पाहिजे, असं त्यांना सतत वाटे, असं भारती कापडिया यांनी त्यांच्या लेखात नोंदवलं आहे. पण या सारख्या असंख्य प्रश्नांवर आपल्या चिंतनशील स्वभावातून त्यांनी त्या त्या वेळी उत्तरं पण शोधलेली दिसतात.



*'बरवे संचित' बृहद्ग्रंथाच्या प्रकाशनप्रसंगी दिनकर गांगल, कुमार केतकर, सतीश नाईक, किशोर कदम, अतुल दोडिया, डॉ. मिनाक्षी पाटील, मनोज जोशी आदी मान्यवर...*

या ग्रंथातील हे सारे लेख वाचताना प्रकर्षाने जाणवतं, की इतक्या तरल संवेदनशीलतेने जगणाऱ्या कलावंताला सांभाळण्यात, जपण्यात आपण समाज म्हणून कमी पडतो. खरेतर अशा संवेदनशील कलावंताना आपण खूप निगुतीनं जपलं पाहिजे, किंबहुना एक समाज म्हणून ही आपली सर्वांची जबाबदारी आहे, अशी तीव्र जाणीव हा ग्रंथ वाचल्यानंतर नक्की निर्माण होते. आपण समाज म्हणून त्यांच्यासाठी नेमकं काय केलं? असा प्रश्न मनात निर्माण झाला तर नजरेसमोर फक्त कोरा कॅनव्हास उभा राहतो...

बरवे फार लवकर गेलेत. त्यांच्या आयुष्याच्या आरंभाचा अत्यंत महत्त्वाचा क्रिएटिव्ह असा काळ नोकरी, रोजी-रोटीच्या रहाटगाडग्यात गेला... त्यांना चिंतनमननासाठी जी शांतता हवी होती, काम करायला भरपूर वेळ हवा होता, तो त्यांना मिळत नसल्याने शेवटी त्यांनी नोकरी सोडली आणि ते घरातल्याच छोट्याशा बेडरूमच्या स्टुडिओमध्ये काम करीत राहिले, पण दुर्दैवाने असह्य आजारपणात त्यांचा ५९व्या वर्षी मृत्यू झाला. या ग्रंथातील 'रूग्णालयातले बरवे' या विभागातील लेख वाचताना प्रचंड अस्वस्थ व्हायला होतं, प्रचंड दुःख होतं. आयुष्यभर विशुद्ध कलाचिंतन करणाऱ्या नाजूक प्रकृतीच्या बरवे यांनी प्रदीर्घ आजाराने वयाच्या अवघ्या ५९व्या वर्षी जग सोडलं. याचा अर्थ, सारं अतर्क्य आहे. आकाशात ढग येतात, एकमेकात मिसळतात, वेगवेगळे आकार धारण करतात, अन् आपल्याही नकळत ढग विरून जातात, पण एखादाच बरवे यांचा ब्लू क्लाऊड मात्र कायमसाठी स्मरणात राहून जातो. भारतीय साहित्यशास्त्रात आनंदवर्धनाने मांडलेल्या अनुरणन या संकल्पनेसारखे प्रत्येक संवेदनशील मनात बरवे कायमच नादावत राहतील, असं मला मनापासून वाटतं!

आणि हो, बरवे संचित एका वाचनात संपत नाही, तर तो आयुष्यभर परत परत वाचत राहावा असा मौलिक ग्रंथ आहे. खरं तर कला शिक्षणात कोरा कॅनव्हास, किमया, बरवे संचित अशी पुस्तके अभ्यासक्रमाचा भाग व्हायला हवीत. ते जाऊ दे. निदान आपण साऱ्या कला रसिकांनी तरी ही पुस्तकं पुन्हा पुन्हा वाचत राहायला हवी एवढं मात्र नक्की!

**पुस्तकांची नावे : बरवे संचित आणि गेले द्यायचे राहून**
**प्रकाशक : चिन्ह प्रकाशन; संपादन : सतीश नाईक,**
**मूल्य : ४५००/- रुपये आणि १५०/- रुपये**

**डॉ. मीनाक्षी पाटील या कवयित्री, चित्रकार आणि पुरस्कारप्राप्त लेखिका आहेत. सध्या त्या महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या सचिवपदी कार्यरत आहेत.**
**संपर्क** : pminakshi31@gmail.com

# अनाहत नाद निरंतर...



गणेश मनोहर कुलकर्णी

सुरानुबंध



**गा**णं कुठे सुरू आहे का असं म्हणत, जेव्हा शोध घ्यायला लागलो त्यासरशी भोवताली अनेक नाद जाणवायला लागले. 'नाद आणि अनाहत नाद' यातील अनाहत नाद हा सर्वसामान्यांना ऐकू येत नाही; पण तो सगळीकडे आपले अस्तित्व व्यापून असतो. मुख्य म्हणजे, तो आपल्या आतही असतो, अशी कल्पना केली जाते...

**"डर लगता है, लय और सुर से – ये बहुत बड़ी चीज़ है। हम लय और सुर के पुजारी हैं। अगर वो मंज़ूर कर लिए हमारे पूजना, तो मेहरबानी है अल्लाह की। और नहीं तो ये हवा के साथ खेलना है। और हवा किसी के काबू में नहीं रहती।''**

**– बडे गुलाम अली खाँ साहेब (१९५०च्या दशकात)**

ध्वनी कोणीतरी निर्माण करतो आणि ग्रहण करणाऱ्या माणसाला त्यापासून बोध होतो. ध्वनी या शब्दाला अनेक अर्थ आहेत. संगीतातला ध्वनी आणि ध्वन्यालोकातला ध्वनी हे समानार्थी नाहीत. ऐकू येणाऱ्या स्वरातलं जे अंतर वा विराम आहे, ज्यांना म्युझिकल इंटरव्हल म्हणतात; त्याला आपल्याकडे श्रुत्यंतर, स्वरांतर असं म्हणतात.

हे अंतर ठरवणं प्रत्येक संगीतपद्धतीचं काम आहे. प्रत्येक पद्धती ते वेगवेगळ्या रीतीनं ठरवते. मग कुठल्या स्वराला किती महत्त्व द्यायचं, आरोह–अवरोह कसे करायचे हे ठरवलं जातं. प्रत्येक प्रांत एकमेकांपासून दूर असले आणि भाषा वेगवेगळ्या असल्या, तरी संपूर्ण उपखंडात व्यापून राहिलेली अशा तऱ्हेची ही पद्धत आहे. म्हणून भारतीय संगीत आहे, असं म्हणायचं. कालमापनाच्या पद्धतीतील मात्रा, आवर्तन या ज्या संकल्पना आहेत, त्या सगळीकडे समान आहेत. म्हणजे, भरताचं नाट्यशास्त्र हे संगीताबद्दल लिहिलं गेलेलं पहिलं शास्त्र मानतात. त्यामध्ये रागाचा उल्लेख नाही. मागे एकदा राग आणि समय यांचं काय नातं आहे? असं विचारल्यावर एका प्रसिद्ध गायकाने सांगितलं होतं, ''त्या त्या समयी तोच राग गायला पाहिजे, आपल्या ऋषीमुनींनी चार हजार वर्षांपूर्वी तसं लिहून ठेवलंय.'' खरं सांगायचं, तर चार हजार वर्षांपूर्वी राग नव्हता. राग ही संकल्पना नंतर आलेली आहे. तर हे सगळं मनात उमटत असतानाच गोव्यातील रसिक लेखक उल्हास पै–रायकरांच्या 'स्वरमंडल' या पुस्तकाचा सुगावा लागला.

सध्या गाणं या विषयाने आणि त्यानुषंगिक विचाराने पछाडलो असताना या संदर्भातील काहीही अस्पर्शित राहू नये, या असोशीने ते पुस्तक ताबडतोब मागवून घेतले. प्रकाशकांनी पुस्तक पाठवलेच, पण म्हणाले, पैसे पुस्तक मिळाल्यानंतरच द्या. दुर्मीळ जमातीतील दिलदार प्रकाशक मनावर ठसा उमटवून गेला. पुस्तक हातात पडले आणि मागच्या बाजूला 'मोल' असे ठसठशीतपणे छापलेले वाचून पुस्तक नक्कीच अनमोल असणार, याची खात्री पटली!

आपले मराठी–हिंदी–इंग्रजी प्रकाशक किंमत इतक्या ठळकपणे छापतच नाहीत. पण मोठ्ठा घोळ म्हणजे पुस्तक कोंकणी भाषेत असल्याने नेटाने वाचूनही समजायला अडचण व्हायला लागली. पुस्तकाचा भाव समजून घेताना जाणवलं, की अरे, हा तर आपल्याच जातकुळीतला आहे. लेखकाने अनेक रागांच्या आठवणी सांगितल्या आहेत. ते लिहिताना, त्या त्या रागाच्या मैफलींचे वर्णन करतानाच त्या त्या गायकांची वैशिष्ट्येही सांगितली आहेत.

**मर्म संगीताचे**

या पुस्तकाच्या गोव्यातील प्रकाशनाच्या वेळी गोव्यातील व्यासंगी लेखक मुकेश थळी गोव्यातील जुन्या गाण्यांच्या आठवणीत रमल्यावर पुढे म्हणतात, त्या काळी गाण्याचा एक त्रिकोण होता. गीतकार, संगीत म्हणजे चाल देणारा संगीतकार व गायक. तिघांनी समजून घेऊन गाणं घोटवलं जायचं. हल्लीच्या काही गाण्यांचे उच्चार नाटकांतील उच्चारांसारखे कळतच नाही. साळोरे हा उच्चार शाओए असा विचित्र झाला आहे. मुळात साळोरी हा पक्षी असतो, तो नक्कल करतो, हे तरी गायकाला समजावून सांगायला पाहिजे. तो गायक बंगाली असो किंवा गोव्याचा. शब्दउच्चारण हे फार महत्त्वाचं. हल्ली ऑर्केस्ट्राच खूप मोठा असतो, प्रत्येक वाद्यासाठी स्वतंत्र माइक असल्याने गोंगाटच होतो. त्यात शब्द, सूर, भाव झेलणं पेलणं कठीण होऊन जातं. घ–ण–घ–ण करून वाद्यवृंदाचा फक्त आक्रोश चालू असतो. रंगमंचावरून लाटाच येत असतात. कलेजा खपखपतो. नाजूकपणा, सूक्ष्मता, गहिरेपणा हे गीत गायनात अभिप्रेत असते, ते गमावले जाते व रसिकाच्या पदरी निराशा पडते. गायकाच्या स्वरोच्चारांवर व शब्दोच्चारांवर साथी कलाकारांनी कुरघोडी करता कामा नये. तिथंच विचका पचका होतो. शब्दप्रधान, भावप्रधान व रागदारीवर आधारीत गाण्याची समज वेगळीच. उल्हास पै रायकर हे या पठडीतले. त्या सुवर्णकाळातील संगीतसेवक. 'स्वरमंडल' पुस्तकातील त्यांचे संगीतावरील ललित काव्यात्म लेख त्यांच्या चिंतनाची साक्ष देतात.

**सारंग रागाचा लळा**

सारंग रागाचं सौंदर्य उलगडून दाखवताना सारंगचे स्वर तहानलेल्या गायीसारखे. गाय कितीही तहानली, तरी शांतपणे संथपणे पाणी पिते. तसे हे सारंगचे स्वर. ही त्यांची रूपकं, प्रतीकयुक्त समृद्ध भाषा. माझाही आवडता राग सारंगच. सारंगच्या अनेक छटा अनेक गायकांनी गायलेल्या आहेत.

आमच्या चिरंजीवांनी यातलं नादाळ सौंदर्य समजावून आम्हाला नेहमीच समृद्ध केलंय. शाळेत असताना त्याला आम्ही जेव्हा पहाटेच्या अभ्यासासाठी उठायला सांगायचो, तर तो म्हणायचा, की मालकंसची वेळ झाली की उठवा, मग सकाळ सगळी मालकंसच्या सुरांनी भरून जायची. भीमण्णा, किशोरीताई यांच्या मालकंसनी आम्हाला आयुष्यभर जोजवलं आहे. पण तो स्वतः मात्र सारंगची वेळ झाल्याशिवाय उठायचाच नाही. आमच्या घराच्या घड्याळाला मालकंस, सारंग अशा वेगवेगळ्या प्रहरातल्या रागांचे काटे लगडलेले होते. त्यातही सारंगने वेगळाच लळा, जिव्हाळा लावला आहे.

या प्रवासात अगदी सुरुवातीलाच मेहदी हसनने सारंग रागात गायलेली, 'दिले ए नादा तुझे हुआ क्या हैं' या गझलशी गाठ पडली. तेव्हा सारंगच्या या रूपानं भारावूनच गेलो. मेहदीचा मधाळ आवाज त्यात गालिबची गझल, त्यातला शेर

*जान तुम पर निसार करता हूँ*
*मैं नहीं जानता दुआ क्या है.*

हे ऐकल्यावर तर जीव पार कळवळूनच गेला. अवाक् होण्यास या गझलने शिकवलं.

खरं तर, सारंग या रागावर कितीही लिहिलं तरी मन भरून जात नाही. मी एक कॉम्पॅक्ट डिस्क बनवून घेतली होती. त्यात तमाम दिग्गजांनी गायलेले सारंग एकत्र केले आहेत. यातही मालिनीताईंचा (राजूरकर) सारंग कमालीचा शांत आहे. त्यांना साथीला पेटीवर डॉ. अरविंद थत्ते (हे स्वतः गणितज्ञ, हा गणितातला अचूकपणा त्यांच्या वादनातही जाणवतो.) आणि तबल्यावर सुभाष कामत. नुसती बहार येते, त्यांना ऐकताना, आतूनच शांत शांत होत जातोय, ही भावना दृग्गोच्चर होत जाते.

एकदा मुंबईत मालिनीताईंची मैफल होती. स्वप्निलच्या (स्वप्निल गणेश कुलकर्णी) स्वाक्षरी पुस्तकात एव्हाना तमाम दिग्गजांच्या स्वाक्षरी जमा झालेल्या होत्या. तो त्या बुकमध्ये डाव्या बाजूला पेपरमध्ये नुकताच छापलेला संबंधित गायका-वादकाचा फोटो चिकटवून उजव्या बाजूला त्यांची स्वाक्षरी घ्यायचा. तर आम्ही ग्रीनरूम मध्ये गेलो, त्या रियाजात व्यग्र होत्या. आम्ही लांबूनच स्वाक्षरीसाठी विनंती केली, त्यांनी अक्षरशः आम्हाला हाकलून दिलं. स्वप्निल फारच लहान होता, त्याला कळेना ताई कशासाठी रागावल्या? मी त्याला समजावलं म्हटलं, नंतर कधी तरी त्यांची सही घेऊया, पण नंतर त्यांच्या मैफलीच कमी कमी होत गेल्या आणि अखेर एके दिवशी त्या दिगंताच्या प्रवासालाच निघून गेल्याची बातमी वाचून निव्वळ हळहळलो.


परवाच ती डायरी चाळताना मालिनीताईंच्या फोटो शेजारची रिकामी उजवी बाजू ठसठशीतपणे जाणवून गेली... मालिनीताईंची (८ जानेवारी १९४१-६ सप्टेंबर २०२३) एक आठवण अशीही मनात कोरली गेली.

**निर्मळ स्वरांचा साज**

सांगायचे हे की, उल्हास रायकरांनी या पुस्तकात एका लेखात निव्वळ सवाई महोत्सवाच्या आठवणींची लड लावली आहे. प्रभा अत्रेंच्या गाण्यावर लिहिताना, ते म्हणतात, शास्त्र शिकल्यानंतर कलाविष्कार करताना त्याचा विसर पडायला हवा किंवा शास्त्राने नेहमीच कलाविष्काराच्या मागे मागे चालावे, या उक्तीचा प्रत्यय देणारे श्रीमती अश्विनी भिडे-देशपांडे यांचे गाणे. अश्विनीताईंनी लावलेला षड्ज ऐकताना त्यांना मंदिरात कर्पूर आरतीवर ओंजळ धरताना तरंगत येणाऱ्या कापूरगंधाची आठवण येते. व्यंकटेश कुमारांचा बागेश्री ऐकताना, ते म्हणतात कुणाचे कधी कुणाशी कसे धागे जुळतील काही सांगता येत नाही. व्यंकटेशाला जशी पद्मावती भेटली, तशी व्यंकटेशकुमार यांना इथे बागेश्री भेटली.

कर्नाटकच्या काही प्रदेशातल्या गायकांना देवानं खुला आणि निर्मळ स्वर दिला आहे. पाण्यात अगदी स्वच्छ खळबळून काढल्यासारखा. पुढच्या जन्मात देवानं गायक केला आणि वत्सा कोणता आवाज देऊ तुला असं विचारलं, तर मी म्हणेन, भीमसेनांची व्यापकता, बसवराजांचे निरागसपण, व्यंकटेशकुमारांचा गोडवा, मल्लिकार्जुनांच्या आवाजातली खोली हे सगळं माझ्या आवाजात दे. असं फार कलागतीनं लिहिणारी रायकरांची लेखणी वाचकाला पार हळवी करून सोडते.

किशोरीताई म्हणजे, गोवेकरांचा जीव की प्राण. त्यांच्या अनेक मैफलींना प्रत्यक्ष हजर राहून उल्हास रायकरांनी त्यांच्या गाण्याचे वर्णन केले आहे. गोव्यात एकदा मिलिंद रायकरांचे व्हायोलिन आणि योगराज बोधनकरांच्या सतारीची जुगलबंदी होती. त्यातल्या पुरिया कल्याणचं वर्णन करताना लेखकाच्या लेखणीला एक वेगळाच बहर येतो. ते म्हणतात, तिन्हीसांजेला पावसाची सर येऊन जाते. मग माडाच्या झावळीच्या पातीवरून थेंब अलगद सरकत जावेत, तशी मिलिंद रायकरांची बोटं व्हायोलीन वरून फिरत होती. षड्ज आकारातला तो स्वर




*उल्हास पै-रायकरांचे 'स्वरमंडल' हे कोकणी भाषेतले पुस्तक संगीतातली लय आणि संगीतातला नाद इतक्या आर्ततेने टिपते की, एरवी न जाणवणारी सौंदर्यस्थळे दीपमान होऊन अवर्णनीय आनंद देऊन जातात...*

आपली ओळख अंधुकशी-अस्पष्टशी मारवा रागाशी, पण अधिक पुरियाशीच सांगत होता. काही क्षणातच त्याची ओळख पटली. बरणीतलं ताक झटकून घुसळून लोण्याचा गोळा काढावा तसाच योगराज बोरकारांनी सतारीच्या कल्याणी झंकारातून त्या रागाची ओळख सांगितली... पुरिया कल्याण!

लेखकाने एके ठिकाणी किशोरीताईंच्या यमनबद्दल लिहिताना, आमचे गोव्यातील कवी मित्र माधव बोरकारांची कविता दिली आहे. धूसर धूसर काही तरी समजत होतं, पण संपूर्ण अर्थ काही उलगडत नव्हता. हे बाकीबाबांचे नातेवाईक, माझ्या लेखनाचे चाहते. मग मीच त्यांना गळ घातली, की मला हे समजावून द्या. पुढच्याच आठवड्यात त्यांच्या रेखीव अक्षरात हा मजकूर आला. अत्तराच्या पावलांनी घरात येणाऱ्या प्रियेची चाहूल शब्दांतून गाणाऱ्या कवी माधव बोरकारांना यमन सापडतो, तो त्यांच्या कवितेतून

*सांज वेळे डोंगरापल्याड गावात*
*दिवसाच्या अखेरच्या किरणांत*
*हळूहळू हरवत चाललेलं आकाश*
*एक एक नक्षत्र पेटू लागतं*
*अंगणातल्या तुळशी समोर लावलेल्या*
*पणतीच्या उजेडाला काळोखाचा ठाव फुटतो*

यमनच्या स्वरांत रात्रीच्या आकाशाचं विराट रूप दिसतं. हे स्वर आपोआप आकाश घेऊन दारात येतात. कल्याण थाटातून येणाऱ्या या रागाला काही जाणकार यमन कल्याण असेही म्हणतात. काही असो. सर्वांना शांती बहाल करून या रागानं सर्वांचंच कल्याण केलं आहे. असा हा यमन आपल्यासाठीही सुखमय ठरो. वाह किती उदात्त भावना आहे ही.

या बोरकरांनी मुंबई आकाशवाणीत नोकरी केल्याने अनेक गायक वादकांशी यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. एक दत्तोपंत सहस्रबुद्धे नावाचे गायक होते. प. विष्णू दिगंबर पलुस्करांचे शेवटचे ज्ञात शिष्य. एकदा भीमसेनांचं गाणं दादर-माटुंगा कल्चरल सेंटरमध्ये होतं. सकाळची मैफल होती. दत्तोपंत सहस्रबुद्धे धोतर कोट घालणारे जुन्या पठडीतले रसिक गायक, तर गेटवर त्यांना तिकिटाशिवाय कुणी आत सोडेचना. हे म्हणाले, त्या भीमण्णांना माझं नाव सांगा, मी तिकीट-पास काहीही काढणार नाही, मग कुणीतरी मंचावर नुकतेच स्थानापन्न होणाऱ्या भीमसेनांच्या कानात हे सांगितले, की कुणीतरी बाहेर गोंधळ घालतंय, भीमण्णांनी आयोजकांना सूचना केली, की त्यांना ताबडतोब आत आणून माझ्या समोरच्या खुर्चीवर अगदी पुढे आणून बसवा. ते आत आल्यावर मंचावरूनच त्यांना नमस्कार करून भीमण्णांनी आपल्या मैफलीची सुरूवात केली. मैफल संपल्यावर आपल्या बिदागीतून दत्तोपंतांची त्या संस्थेची आजीवन सभासद फी भरून टाकली. हे असं नातं जपणारी कलावंत मंडळी आताशा दुर्मीळ प्रजातीतच मोडतात.

रायकरांच्या या पुस्तकातले काही लेख गजानन जोगांनी मराठीत अनुवाद केले होते, पण ते निदान माझ्या मते, तेवढं परिपूर्ण झालेलं काम नाही. कुणीतरी यात लक्ष घालून अधिक पोटतिडकीने हे काम करायला हवे. नाहीतर आपण एका चांगल्या पुस्तकाला नक्की मुकणार. मुकेश थळींनी लेखकाचे कौतुक करताना लिहिले आहे, की 'कुळागरांत मोठ्याने हाक मारली, तर तो नाद लांब लांबपर्यंत झाडातून, वृक्षवल्लीतून दूर दूर भुयार गुहा, विवर, चर सगळ्यांना चिरून, व्यापून, कापून, कातरून जातो. त्या आवाजाचा रेझोनन्स (अनुनाद) घुमत राहतो. उल्हास रायकरांनी कोंकणीच्या साहित्य कुळागरात आपलं स्वरमंडल असं ट्यून करून लावलंय... पुस्तक वाचा, आतून खचितच श्रीमंत व्हाल. माझी खात्री.'

**अनादी... अनित्य**

अर्थातच मीही या पुस्तकात रमलो. भाषा वेगळी होती. वाचताना त्यातली लय आणि नाद जाणवू लागला. संगीत आणि भाषा यातली काही साम्यस्थळं गवसली. एकूणच जिथे मानवी समूह असतो; तिथे भाषाही असते, संगीतही असतं.

भाषाशास्त्रज्ञांच्या म्हणण्यानुसार भाषेवर बाहेरचा काहीही

परिणाम झाला नाही, तरी बोलता बोलता ती बदलत जाते. जाता जाता हेही नमूद करावेसे वाटते, की विज्ञानाचे लालित्य सहजसोप्या भाषेत वाचकांपर्यंत पोहोचवणारे आमचे डॉक्टर मित्र, लेखक आनंद जोशीसर म्हणतात, की ज्यांना एकापेक्षा अधिक भाषा येतात, त्यांना विस्मरणाचा आजार होण्याची शक्यता दुर्मीळ असते.

तर संगीतही आतल्याआत सतत बदलत राहतं. कोणत्या नियमानुसार संगीत बदलत जातं, याचा शोध आपल्याकडे घेतला गेलेला नाही. भाषेला जशी वळणं मिळत जातात, तशीच संगीतालाही मिळत जातात. कोणीतरी हे शोधायला, तपासायला हवं. शास्त्रीय संगीत आणि जनसंगीत यांच्यात प्रारंभापासून सहअस्तित्व आहे. सगळ्या संगीत संस्कृतींमध्ये एक राजकारण असतं. हा एक प्रकारचा सत्तासंबंध असतो. म्हणजे एका कलाप्रकारानं दुसऱ्यावर अधिसत्ता गाजवणं. संगीतामध्ये सतत अभिसरण, देवघेव सुरू असते. लोकसंगीत आणि शास्त्रीय संगीत यात फरक आहेच. हे प्रवाह सतत एकमेकांच्या जवळ येत असतात, एकमेकांपासून दूर जात असतात, ते एक-दुसऱ्यावर आघात करतात. सलगता आणि बदल लोकसंगीतात सतत होत असतात. लोकसंगीताची निर्मिती समाजाकडे असल्यामुळे आणि ते एका पिढीतून दुसऱ्या पिढीकडे मौखिक परंपरेतून जात असल्यामुळे त्यात सतत फरक, बदल होत असतात. हे बदल समाजाला मान्य असावे लागतात. लोकसंगीतात सर्वांचा सहभाग असतो. एक गाणार आणि बाकीचे ऐकणार असं न होता, सगळे त्यात सहभागी होतात. त्यामध्ये श्रोता असा वेगळा नसतो. त्यामुळे सगळ्यांनाच त्या आविष्काराबद्दल काहीतरी माहीत असतं. फक्त बाहेरच्याला, त्या संगीत संस्कृतीशी संबंधित नसणाऱ्या माणसाला त्यातल्या खाचाखोचा कळणार नाहीत. त्या समूहातला प्रत्येकजण या संगीताबरोबरच वाढत असतो. लोकसंगीताचा संबंध नेहमीच त्या लोकांच्या जीवनशैलीशी असतो. ते कधीच संदर्भचौकटीबाहेर नसतं. संदर्भमूल्य




*मालिनीताईंनी गायिलेला सारंग आणि वेंकटेशकुमारांचा बागेश्री ऐकणाऱ्याला लळा जिव्हाळा लावून जातात...*

(काँटेक्स्चुअल व्हॅलिडिटी) ही इथे अतिशय आवश्यक बनते.

मात्र, तंत्रज्ञानामुळे होणारं सपाटीकरण लोकशाहीकरणावर घातक परिणाम करणारं आहे. हे या सगळ्यांना एकाच पातळीवर आणून ठेवतं. मग मूल्य कुठे आहे? छायाचित्रकारितेत प्रिंट्सद्वारा मुद्रण तंत्रानं जे केलं, त्यामुळे मूळ आणि कॉपी यातला फरकच संपून गेला. तसाच प्रकार संगीतात होऊन कलाकारांच्या कलाविष्कारात या काळात समानता आली. याबाबत स्व. भास्कर चंदावरकर अगदी ठामपणे असं म्हणाले होते, की आजच्या बऱ्याच कलाकारांच्या बाबतीत तुकडेजोडच दिसते. या अर्थाने, ही उत्तर आधुनिक स्थिती आहे. पूर्वीच्या गायकांनी, बुजुर्गांनी जे निर्माण केलंय; तेच तुकडे जोडून, खाऊन त्यावर जगणारी माणसं पुढच्या काळात निर्माण होणार अशी स्थिती आहे. तेच संगीताच्या बाबतीतही घडू शकेल. यात काही खोल रुतलेल्या गोष्टी झालेल्या आहेत. अगदी सांगीतिक गोष्टी बघायला गेलं, तर कलाकार मंडळी अधिक तीव्रतेकडे, अधिक वेगाकडे झुकलेली आहेत.


**गणेश मनोहर कुलकर्णी हे राज्य पुरस्कार प्राप्त 'रूळानुबंध' या पुस्तकाचे लेखक आणि कला आस्वादक आहेत.**
**संपर्क : ९८१९९५७८५२**

# समाजनिष्ठ चिंतनस्वर



अमरेंद्र धनेश्वर

स्मरणाक्षरे



**चिं**तनाशिवाय सूर आणि स्वरांचा नाद उमटतच नाही. त्या अर्थाने गायक-वादक चिंतनशीलच असतात. परंतु कित्येकांच्या बाबतीत ही चिंतनशीलता आत्मनिष्ठ असते. विशेषतः कलेसाठी कला हा विचार प्रबळ असतो, तिथे तर ती आत्मरतच असते. मात्र १४ एप्रिल २०२६ रोजी हे जग सोडून गेलेल्या विदुषी नीला भागवत यांची चिंतनशीलता समाजकेंद्री होती, परिवर्तनशीलतेची आस असलेली होती. समाजात जिथे जिथे वेदना ठणकत होती, तिथे तिथे भागवतांचा स्वर समतेचा, माणुसकीचा आग्रह धरत त्या वेदनेचा हुंकार बनत होता. अर्थात केवळ गायकीच नव्हे, तर लेखन, अनुवाद, संपादन, अभिवाचनाद्वारेदेखील त्या माणुसकीच्या सन्मानार्थ आरंभलेल्या मोहिमेत सामील होत होत्या. त्यांची अखेरपर्यंत साथसोबत करणाऱ्या सहोदराने आणि शिष्योत्तमाने नीला भागवतांच्या टिपलेल्या या मुद्रा...

आपल्या गायनकलेचा आविष्कार त्रिखंडात गाजवणारे गवय्ये पंडित जसराज यांच्याबरोबर मी एकदा सहज गप्पा मारत होतो. ते नुकतेच अमेरिकेतून परतले होते. आपलं संगीत आणि त्यांचं म्हणजे, पाश्चात्य संगीत यातला फरक सांगताना ते म्हणाले, की त्यांचं संगीत झोपलेल्या माणसाला जागं करेल. याउलट आपलं संगीत झोपेसाठी, तळमळणाऱ्या माणसाला निद्रेच्या स्वाधीन करेल. त्यांचं संगीत तुम्हाला हसवेल, खूश करेल. पण आपलं संगीत ऐकताना तुम्हाला अनेकदा अश्रू अनावर होतील.

सुमारे वीस वर्षांपूर्वी अमेरिकेच्या न्यू जर्सी शहरात ग्वाल्हेर घराण्याच्या मान्यवर गायिका नीला भागवत यांची मैफल रंगली होती. कवी महंमद इक्बाल यांची 'नया शिवाला' ही कविता तुम्ही रागदारीत बसवा, असा आग्रह समाज सुधारक असगर अली इंजिनियर यांनी नीला भागवतांना केला होता. नीला भागवतांनी ही सूचना ताबडतोब अमलात आणली आणि न्यू जर्सीच्या कार्यक्रमात ती गायली. 'खाक-ए-वतन का मुझको हर जर्रा देवता है' (मातृभूमीच्या मातीचा कण न् कण माझ्या दृष्टीने देवतेसमान आहे) ही ओळ गायिकेच्या ओठांतून आर्जवीपणे बाहेर पडली आणि गाण्यातला 'दर्द' म्हणजे काय असतो, ते त्या ठिकाणी श्रोत्यांच्या अनुभवास आलंच, पण श्रोतृ वर्गातला एक जण हुंदका अनावर झाल्याने हमसाहमशी रडू लागला. आपल्या मातृभूमीपासून झालेली ताटातूट त्याला तीव्रपणे जाणवली असेल आणि ही वेदना इक्बालच्या या ओळी नीला भागवतांच्या आवाहक आवाजातून ऐकताना अधिकच तीक्ष्ण झाली असेल.

**वेदनेचा आठव**

जर्मनीमधल्या 'स्टुटगार्ट' या शहरात असाच प्रसंग प्रत्यक्षात पाहायला मिळाला. तिथल्या थिएटर ॲम फॅडन या संस्थेच्या सभागृहात नीला भागवत पूरिया गात होत्या. एखाद्या रागावर एका विशिष्ट भावनेचा अथवा रसाचा बंदिस्त शिक्का मारणं योग्य नाही. पण 'पूरिया' हा करुण रसप्रधान राग मानला जातो. तो राग ऐकून रमाकांत अय्यंगार हा श्रोता ओक्साबोक्सी रडायला लागला. ''नीलाजी! यू विल नॉट रियलाइस व्हॉट यू हॅव डन् टुमी.'' असं, अधूनमधून म्हणत तो हुंदके देऊन रडत होता. 'पूरिया'चे धीरगंभीर आणि करुण स्वर त्याच्या वर्मी लागले होते आणि वर्षानुवर्षे अश्रूंना घातलेला बांध त्यामुळे पार ढासळून गेला होता.

१९६० च्या दशकात पूर्व जर्मनी हा देश रशियाच्या अधिपत्याखाली होता. आणि तंत्रज्ञानाच्या देवाणघेवाणीसंबंधी भारत आणि पूर्व जर्मनीत जो सहकार्य करार झाला होता. त्यानुसार रमाकांत हा हुशार इंजिनियर तिथे गेला. तिथे रमला आणि एका जर्मन युवतीबरोबर त्याने लग्न केलं. पत्नीला घेऊन हौशीने मैसूरला गेला, तर आईने कर्मठपणे दोघांना हाकलून लावलं. त्यानंतर मायदेशाशी पूर्णपणे संबंध तुटला. हे सर्व दुःख नीला भागवतांचा 'पूरिया' ऐकताना उसळून वर आलं असावं. गायनात स्वाभाविक 'दर्द' असला, की ते किती परिणामकारक ठरू शकतं याची ही उदाहरणं!

**संस्कार अभिजाततेचा**

माझ्या मते, 'दर्द' आणि 'आवेग' नीला भागवतांच्या गायनाची दोन प्रमुख वैशिष्ट्यं आहेत. साधारणतः कोकीळकंठी गोडवा आणि सफाईदार तानप्रभुत्व ही गायिकेच्या ठायी असणारी प्रमुख अस्त्र असं मानलं जातं. या पठडीत नीला भागवत फारशा अडकल्याच नाहीत. 'दूरदर्शन'च्या 'रागरंग' या मालिकेत त्यांच्या वाट्याला 'मियाँमल्हार' हा राग आला होता. गडगडाटी गमकाच्या ताना आणि खोलातून येणारं मिंडकाम ही अंग दिसल्याशिवाय 'मियाँमल्हार' हा राग उभा राहू शकत नाही, अशी सर्वसाधारण धारणा आहे. आणि हे पुरुषांनाच जमू शकतं, हा समज खोटा पाडण्याचं काम नीला भागवतांनी केलं. ते त्यांच्या स्त्रीवादी जीवननिष्ठेशी सुसंगतच होतं.

परंपरा आणि नवता यांचं अफलातून रसायन त्यांच्या व्यक्तिमत्त्वात होतं. गुरु शरदचंद्र आरोलकर हे ख्याल गायकीचे निर्माते म्हणून गौरविल्या जाणाऱ्या हद्दू खान यांच्या थेट परंपरेतले. १९व्या शतकाच्या उत्तरार्धात जी ख्याल गायकी या दोन प्रणेत्यांमुळे बहरली, तिचं मूळ स्वरूप आपल्या अध्ययनातून, चिंतनातून आणि तालमीतून आरोलकरांनी अभ्यासलं आणि ते आपल्या या शिष्येकडे सुपूर्द केलं. अभिजाततेचा हा संस्कार अत्यंत मूलभूत होता.

**स्त्रीवादी जीवननिष्ठा**

दुसरीकडे, साहित्याच्या अध्ययनातून आणि पुरोगामी राजकीय, सामाजिक चळवळीतल्या सहभागातून नवीन विचारांचं आणि प्रेरणांचं वारंही अंगात भिनू लागलं. त्यामुळे सहाजिकच परंपरेची नवतेशी सांगड घालण्याच्या प्रयत्नांना बळ मिळू लागलं. १९७०च्या दशकात 'स्त्रीवाद' हा एक सशक्त विचारप्रवाह म्हणून पुढे येऊ लागला. त्याचा आविष्कार आपल्या कलेच्या माध्यमातून करणाऱ्या बिनीच्या कलाकार म्हणून नीला भागवत गणल्या जाऊ

लागल्या. 'देसकार'सारखा सकाळचा राग निद्रिस्त ईश्वराला किंवा भक्ताला जागं करण्यासाठी गायला जातो, असा प्रघात आहे. नीला भागवतांनी जो समस्त महिलावर्गाला जागृत करण्यासाठी उपयोगात आणला. 'जागनकी बेर भई सोहेलरिया' ही रचना इतकी गाजली, कारण त्यात क्रांतिकारक भगिनीभाव ओतप्रोत भरलेला आहे. लंडनच्या 'सेडिस्क' कंपनीने त्याचं ध्वनिमुद्रण करून ती प्रकाशितही केली.

मातृत्व ही संकल्पना आपल्याकडे फार संकुचित अर्थाने मांडली जाते. नीला भागवतांनी 'दुर्गा' रागात या संकल्पनेवर आधारित एक अप्रतिम बंदिश बांधली. आई ही जन्मदात्री तर असतेच. परंतु ती विविध रूपं धारण करते. ती कधी सखी असते, तर कधी मैत्रीण. कधी बहीण असते, तर कधी आपल्या अपत्यासमान. तर कधी प्रियकरासारखी. या बंदिशीतला लडिवाळपणा मातृत्व संकल्पनेतली करुणा आणि ममता फार सुंदर पद्धतीने अभिव्यक्त करतो.

**निषेधसूर निनादला**

'होळी' हा आपल्या परंपरेतला एक महत्त्वाचा सण. या सणाच्या बाबतीत पुरुषत्वाच्या वर्चस्वाचं आक्रमक स्वरूप हे जणू अंगभूतच आहे. त्याचा संबंध थेट कृष्णकन्हैयाच्या गोपींबरोबरच्या प्रणयरंगाशी लावला जातो. होळीतून येणारे पाण्याचे फुगे मारणे, दगड मारणे, इतर प्रकारची हिंसा करणे तर अत्यंत आक्षेपार्ह आणि निषेधार्ह आहेत. नीला भागवतांनी 'नंद' रागात एक 'होरी' रचून अत्यंत कलात्मक रीतीने आपला निषेधात्मक सूर नोंदवला आहे. 'सखी री मैं कैसे खेलू होरी, ना चाहूँ ये रीत पुरानी, काहे करत बरजोरी' असं त्या म्हणतात. संगीतातून उमटणारा निषेधात्मक सूर हा आक्रस्ताळा अथवा थयथयाट करणारा नसतो. तो संयमी आणि आर्जवी असतो. त्याचं हे उत्तम उदाहरण.

बेगम अख्तर हे नीला भागवतांचं प्रेरणा स्थान. अत्यंत भावस्पर्शी आणि आर्त असा आवाजाचा लगाव, शब्दाची सूक्ष्मातिसूक्ष्म जाणीव, त्याच्या छटा न् छटा प्रकट करण्याचा अट्टाहास आणि काळजाला भिडणारा सच्चा सूर ही बेगम अख्तरींची वैशिष्ट्यं. नीला भागवतांनी तिला आदर्श मानलं. त्या शिवाय सिद्धेश्वरीदेवींनाही एक प्रकारे अनुकरणीय मानलं. त्यांच्या गाण्यातला गहिरा भाव आणि आवाजातली पुकार ही विलक्षण हृदयस्पर्शी असे. असे आदर्श डोळ्यांसमोर ठेवून नीला भागवतांनी आपली साधना केली आणि गायकी घडवली म्हणूनच त्यांचा प्रभाव पडला. गायन कलेच्या साधनेत त्यांनी आरोलकरबुवा आणि जालसाहेब बालापोरिया यांना गुरू मानून त्यांचे आदर्श गिरवले. साहित्याच्या क्षेत्रात त्यांनी दुर्गा भागवत, म. वा. धोंड, श्री. पु. भागवत आणि विंदा करंदीकर यांना पूजनीय मानलं. राजकारणाच्या चळवळीत तारा रेड्डी, अहिल्या रांगणेकर यांच्याशी त्यांची खास जवळीक होती. इतक्या पहाडासारख्या उंचीच्या माणसांनी दाखवलेल्या रस्त्यावर चालत राहणं, हे त्यांनी आपलं ध्येय मानलं.

**कबीराने ठाव घेतला...**

लघुपट दिग्दर्शक आणि क्रियाशील कार्यकर्ते आनंद पटवर्धन यांनी अयोध्या राममंदिराच्या निमित्ताने जो हिंसाचार आणि धार्मिक तेढ निर्माण करणारं विध्वंसक राजकारण शिजवण्यात आलं, त्यावर आधारित 'राम के नाम' हा अत्यंत सत्यदर्शी पण म्हटलं, तर स्फोटक लघुपट १९९१–९२ साली बनवला. यासाठी कबीराचं एखादं समर्पक कवन गाशील, का असं आनंद पटवर्धनांनी नीला भागवतांना विचारलं. नीला यांनी तत्काळ होकार दिला आणि 'साधो! देखो जग बौराना (बावळट, वेडसर)' हे कवन निवडलं. त्यातल्या 'हिन्दू कहत है राम हमारा, मुसलमान रहमाना। आपस में दोऊ लडे मरत हैं मर्म कोई नही जाना!' या पंक्ती जगभर निनादल्या. अत्यंत बुलंद आवाजात 'मांड आणि भैरव' रागांच्या मिश्रणातून बांधलेली ही चाल गावोगावी आणि शहरोशहरी पोहोचली.

तेव्हापासून कबीराने नीला भागवतांच्या चित्ताचा ठाव घेतला. त्यानंतर हजारीप्रसाद द्विवेदी आणि अमेरिकन विदुषी लिंडा हेस यांच्या ग्रंथांचा त्यांनी कसून अभ्यास केला आणि कबीराचे अनेक दोहे स्वरबद्ध केले. इतिहासकार आणि साहित्यिक पुरुषोत्तम अग्रवाल, यांनी मुंबईच्या नेहरू केंद्रात डॉ. अशोक रानडे स्मृती व्याख्यान देताना म्हटलं, की कबीर खऱ्या अर्थाने रागदारी गाणाऱ्या दोनच कलावंतांना समजला आहे. एक म्हणजे, कुमार गंधर्व आणि दुसऱ्या म्हणजे, नीला भागवत.

कबीराच्या पाठोपाठ नीला भागवतांनी आपला मोहरा मीराबाईंकडे वळवला. मीराबाई म्हणजे, कृष्णावर जान कुर्बान करणारी केवळ अंध कृष्णभक्त नव्हे. ती आपल्या स्वातंत्र्याच्या आड येणारी, सर्व जाचक बंधन निर्भयपणे झुगारून देणारी बंडखोर मुक्त स्त्री होती, असा नीला यांचा आग्रही दृष्टिकोन होता. त्यातून 'मीरा' हा कार्यक्रम निपजला. कर्नाटक संघ सभागृह खच्चून भरलं होतं आणि प्रमुख पाहुणी म्हणून आलेल्या अभिनेत्री दीना पाठक यांनी नीला भागवतांची मुक्त



*परिवर्तनशील चळवळींशी आंतरिक नाते असल्याकारणानेच नीला भागवतांनी परिवर्तनाच्या पाऊलवाटांवरही सुरांचा नाद आणि सुरांची लय साधली...*

कंठाने स्तुती केली. संत कवी आदींच्या काव्याकडे पाहण्याचा एक पुरोगामी दृष्टिकोन यातून सिद्ध झाला. संत काव्य आणि त्यातून मिळणारा समतेचा राजकीय परिवर्तनाच्या प्रक्रियेतला महत्त्वाचा टप्पा आहे, असा त्यांचा विश्वास होता. त्यामुळे संत वाङ्मयाकडे पुरोगाम्यांनी अजिबात दुर्लक्ष करू नये, असं त्या कळकळीने सांगत. महात्मा फुलेंच्या अखंडांकडे त्या याच प्रेरणेतून वळल्या. ''फुलेंचे अखंड हे गेयतेच्या प्रांगणात येऊ शकतात, ही गोष्ट एरव्ही अविश्वसनीय वाटते. पण नीला भागवतांनी ही किमया करून दाखवली,'' अशी दाद विचारवंत सदानंद मोरे यांनी खुल्या दिलाने दिली होती.

समाजातल्या वंचित आणि गरजू लोकांबद्दल त्यांना सहानुभूती होती. त्या त्यांना मदतही करत असत. जेरी पिंटोंबरोबर त्यांनी १० मराठी पुस्तकं इंग्लिशमध्ये अनुवादित केली. त्यात 'रणांगण', 'बलुतं', 'मला उद्ध्वस्त व्हायचंय्' वगैरे आहेत. त्यातही त्यांनी 'द अँट स्वालो द सन' हे संत कवितांचं पुस्तक तर जगात सर्वत्र पोहोचलं.

**ज्ञानाचे जतन-संवर्धन**

विद्यादानाच्या बाबतीत पारंपारिक संगीतकार कृपण असतात. मौखिक संस्कारांमधून कष्टाने मिळवलेली विद्या ही सहजासहजी विद्यार्थ्याला द्यायची नसते, असाच दृढ समज असतो. आपल्याला गुरुजनांकडून मिळालेली अस्सल विद्या आपण स्वत:च्या बरोबर घेऊन न जाता, पुढल्या पिढीतल्या ज्ञानपिपासू विद्यार्थ्यांसाठी जतन करून ठेवली पाहिजे, या भावनेने त्यांनी सुमारे ३५० रचनाचं ध्वनिमुद्रण आणि स्वरलेखन करून त्या इंटरनेटवर अपलोड केल्या. अनीश प्रधान आणि शुभा मुद्गल यांनी या प्रकल्पास उत्तेजन दिलं. १९३२ ते १९४८ या काळात आरोलकरबुवांनी एकनाथ पंडित आणि कृष्णराव मुळ्ये यांच्याकडून शिकलेल्या सुमारे ४००हून अधिक बंदिशी स्वरलेखनासकट सार्वजनिक अखत्यारीत (पब्लिक डोमेन) आणल्या. म्हणूनही 'वसंतोत्सव' आणि 'हृदयेश संगीत सेवाव्रती' अशा दोन मोठ्या जीवनगौरव पुरस्कारांच्या त्या मानकरी ठरल्या.

२९ जून २०२५ रोजी त्यांना फुफ्फुसांच्या फायब्रोसिस नामक असाध्य दुखण्याची बाधा झाल्याचं निदान झालं. त्यानंतर क्रमाक्रमाने रोग बळावत गेला. शेवटच्या महिन्यात वेदनेने त्या बेजार झाल्या होत्या. या रोगावर वैद्यकशास्त्रात अजून औषध सापडलेले नाही. १४ एप्रिलला त्यांनी अखेरचा श्वास घेतला, त्यावेळी त्यांच्या अंगावर घरातला साधा हाऊसकोट होता. ''ताई अंतिम यात्रेला निघतील, तेव्हा त्यांचा आवडता 'अनारकली' सलवार खमीस घालूया त्यांना. त्यांची ठसठशीत टिकली पण हवी आणि डोळ्यांत काजळही,'' असं त्यांच्या घरात काम करणाऱ्या सहाय्यक बाया म्हणाल्या आणि तसंच झालं. ते पाहताना मला नीला भागवतांची आवडती कबीर रचना आठवली आणि गळा दाटून आला...

''चतुर सिंगार करत अलबेला, साजनके घर जाना होगा!
न्हाले धोले सीस गुधाले, वापस फिर नहीं आना होगा...''

**अमरेंद्र धनेश्वर गायक, लेखक नीला भागवतांचे ज्येष्ठतम शिष्य. संपर्क : ९८२१५ ०४६२३**

# मूल्यसंस्कारांचे काव्यसंचित



डॉ. नेहा सावंत

काव्यगत संवाद



*कवी द. भा. धामणस्कर...*



*प्रदीप कोकरे यांच्या इन्स्टाग्राम अकाउंटवरून साभार...*

**म**ध्यंतरी ख्यातकीर्त चित्रकार प्रभाकर बरवे यांच्या चित्रकारितेच्या कारकिर्दीवर आधारित ‘बरवे संचित’ या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभाला गेले होते. तेव्हा प्रभाकर बरवे लिखित ‘कोरा कॅनव्हास’ या पुस्तकातील काही भागांचे फार सुंदर आणि प्रभावी असे अभिवाचन झाले होते. ते ऐकताना बरव्यांचे निसर्गविषयक, रंगविषयक, आकारविषयक विचार ऐकायला मिळाले. एकप्रकारचे तत्वचिंतनच होते ते. ते विचार ऐकताना माझ्या मनामध्ये द. भा. धामणस्करांची निसर्गकविताच साकारत होती. चित्रकार बरवे म्हणतात, ‘निसर्ग आपल्याला काय काय आणि किती किती देत असतो, आपल्याला ते घेता आलं पाहिजे’ किंवा ‘निसर्गात सर्वत्र ओतप्रोत भरून सौंदर्य असतं’ पण आपण शोधल्याशिवाय ते आपल्याला दिसत नाही, धामणस्करांची निसर्गकविता वाचताना याचाच प्रत्यय येतो...

**द.** भा. धामणस्करांचे निसर्ग विचार आणि निसर्गातील विविध घटकांकडे पाहण्याची वृत्ती ही बरीचशी प्रभाकर बरवे यांच्या विचारांशी मिळती जुळती आहे. एकाच काळातील दोन वेगळे कलाकार, पण त्यांची संवेदनशीलता किती सारखी असू शकते, हे जाणवून गंमत वाटते. पुस्तक प्रकाशनप्रसंगी झालेल्या अभिवाचनातून एका वेगळ्याच भावविश्वात पोहोचले होते मी. धामणस्करांची निसर्गानुभवाची कविता माझ्या मनात अगदी खोल खोलपर्यंत पोहोचली होती, या अभिवाचनामुळे.

द. भा. धामणस्कर यांनी १९४७ पासून आपल्या काव्यलेखनाला प्रारंभ केला, त्या काळात लिहिलेली आपली कविता धामणस्करांनी प्रसिद्ध केली नाही. कारण ते प्रसिद्धी पराङ्मुख होते, त्यांची कविता ही स्वांतसुखाय लिहिली होती. डॉ.विजया राजाध्यक्ष म्हणतात त्याप्रमाणे, 'स्वतःचा सूर सापडेपर्यंत ते थांबले. तो सापडल्या नंतर – म्हणजे या आठ–दहा वर्षातच – त्यांच्या कविता प्रसिद्ध होऊ लागल्या. साहजिकच, या कवितांमध्ये एक प्रकारची प्रगल्भता आहे, स्वत्व जपण्याची ऊर्मी आहे. या दशकातील कवितेत आढळणाऱ्या काही लकबींपासून धामणस्कर दूर राहू शकले, ते या ऊर्मीमुळेच. कवितेतील जुन्या नव्याच्या सीमारेषेवर उभी असलेली ही कविता आहे.' म्हणजेच धामणस्करांची कविता एकीकडे त्यांच्या काळातील समकालीन कवितेशी नाते जोडते तर दुसरीकडे समकालीन कवितेहून आपले वेगळे अस्तित्वही सिद्ध करते. कवींच्या कंपूशाहीत ते कधीच सामील झाले नाहीत किंवा त्यांनी आपल्या कवितेतून शिष्यमेळाही उभा केलेला दिसत नाही.

'प्राक्तनाचे संदर्भ', 'बरेच काही उगवून आलेले', 'भरून आलेले आकाश' असे त्यांचे तीन काव्यसंग्रह प्रकाशित झालेले आहेत. वेगवेगळ्या विषयावर त्यांनी कविता लिहिल्या आहेत, पण मनावर गडद परिणाम करते, ती त्यांची निसर्गकविता. पारंपरिक निसर्गकवितेहून आगळीवेगळी असणारी त्यांची कविता वाचकाच्या मनाला नक्कीच भुरळ घालते.

**अतःसूत्री काव्य**

येथे त्यांच्या 'प्राक्तनाचे संदर्भ' आणि 'बरेच काही उगवून आलेले' या दोन काव्यसंग्रहातील दोन स्फूट कविता निवडल्या आहेत. खरंतर दोन्ही कवितेतील आशय पाहता या कविता पूर्णपणे वेगळ्या तऱ्हेच्या आहेत असे वाटते; पण त्या अंतर्गत एका सूत्राने बांधलेल्या आहेत असेही जाणवते. संस्कार हे

### आजोबा

**सकाळी उठल्याबरोबर आजोबा**
**नातवाला घराबाहेर**
**कटाक्षानी झाडं फुलं पक्षी आकाश**
**इत्यादी उन्हाच्या संदर्भानिशी दाखवतात**
**तेव्हा तोही परिउत्सुक डोळ्यांनी सारं पहात रहातो**
**एखाद दिवशी आजोबा विसरले तर**
**आजोबा आपण खाऊ आणायला जाऊया ना**
**इतक्या लडिवाळपणे झाडे बघुयाना, आजोबा असं म्हणतो.**

**आजोबांना बोट धरून नेत त्यांचच जग त्यांना दाखवतो**
**तेव्हा मिटत चाललेले आजोबा म्हणतात बरं का उन्हां!**
**आकाशां पक्षांनो, झाडांनो, फुलांनो उद्यापासून बहुधा**
**बिट्टू एकटाच तुमच्या चौकशीला येत जाईल. बदल्यात**
**वारसा हक्कानीच जणू त्याला कुठेच कधीच**
**एकटं वाटणार नाही एवढं मात्र बघा!**

**(काव्यसंग्रह – बरेच काही उगवून आलेले)**

एकच सूत्र दोन्ही कवितेत दिसून येते. तसेच दोन्ही कवितांमध्ये मागची आणि पुढची अशा दोन पिढ्यांचे संदर्भ आले आहेत. 'हस्तांतर' या कवितेत रूढी परंपरेचे संस्कार पुढच्या पिढीकडे कवी सोपवित आहे, तर 'आजोबा' या कवितेत निसर्ग प्रेमाचे संस्कार कवी आपल्या नातवावर करीत आहे. माणसांपेक्षाही निसर्ग हा अधिक भावपूर्ण आहे अधिक संवेदनशील आहे, हेच कवीला सुचित करायचे आहे. तर हस्तांतर या कवितेतून परंपरेचे ओझे पुढील पिढीवर लादल्यानंतर जबाबदारीच्या भाराने पुढील पिढी ही लवकरच प्रौढ होते व आपल्यातील उत्फुल्लता हरवून बसते, परिस्थितीच्या व जबाबदारीच्या भाराने वाकली जाते, त्यातला आनंद हरवून बसते, हेच कवी अधोरेखित करतो.

**हेतू नैतिक मूल्यसंस्कारांचा**

निसर्ग हा धामणस्करांच्या कवितेतील महत्त्वाचा घटक आहे परंतु त्यांच्या कवितेत येणारा निसर्ग केवळ सौंदर्यनिष्ठ हेतूने येत नाही किंवा निसर्ग वर्णनासाठी म्हणूनही येत नाही, तर तो नैतिक मूल्य संस्कारांच्या हेतूने येतो. म्हणूनच तो बालकवी यांच्या कवितेतील निसर्गाहून वेगळा जाणवतो. किंबहुना, असे म्हणता

येईल, की बालकवींपेक्षा धामणस्करांची निसर्गाकडे पाहण्याची दृष्टीच वेगळी आहे. बालकवींच्या कवितेतील निसर्ग हा वर्णनात्मक पातळीवरचा आहे, बऱ्याचदा ते निसर्गाचे काल्पनिक चित्र उभं करतात. धामणस्करांची निसर्गाकडे पाहण्याची दृष्टी याहून वेगळी आहे. काही प्रमाणात वसंत आबाजी डहाके यांच्या निसर्ग कवितेशी त्यांचे नाते जोडता येईल. यादृष्टीने त्यांची 'आजोबा' ही कविता पाहता येईल.

आजोबा ही कविता म्हटलं तर निसर्गकविता आहे, पण पारंपरिक निसर्ग कवितेपेक्षा तिचा बाज वेगळा आहे. निसर्ग हा मानवी समाजाहून वेगळा नाही, हेच धामणस्करांना या कवितेतून सांगायचे आहे. निसर्गाचे चिरंतनत्व, नश्वरत्व ते अधोरेखित करतात. माणूस हा अल्पजीवी आहे, पण निसर्ग हा चिरकाल असणारच आहे, आणि तोच मानवाला आधार देणार आहे, हे अधोरेखित करू पाहतात. म्हणूनच नातवाच्या मनावर ते निसर्ग संस्कार बिंबवण्याचा प्रयत्न करतात. या कवितेतील आजोबा पुढील पिढीवर म्हणजेच त्यांच्या नातवावर संवेदनशीलतेचे आणि निसर्ग प्रेमाचे संस्कार करताना दिसत आहेत, म्हणूनच हे आजोबा आपल्या नातवाला गाडी किंवा यंत्र तंत्र संस्कृतीच्या गोष्टी न दाखवता झाड, पक्षी, फुलं, आकाश हे चिरंतन घटक दाखवतात. जणू काही निसर्गाचे हे घटक म्हणजेच आपले सगळे सोयरे असावेत, ही तरल जाणीव करून देत आहेत. उदा.–

*सकाळी उठल्याबरोबर आजोबा*
*नातवाला घराबाहेर*
*कटाक्षानी झाडं फुलं पक्षी आकाश*
*इत्यादी उन्हाच्या संदर्भानिशी दाखवतात*

येथे आजोबा केवळ झाडं, पानं, फुलं, पक्षी हे सुटेसुटे घटक दाखवित नाहीत, तर त्यांचे उन्हाशी असलेले नातेही सांगतात. ही कविता वाचताना पुन्हा चित्रकार बरवे आठवतात. प्रभाकर बरवे 'कोरा कॅनव्हास'मध्ये म्हणतात, 'शहरातल्या वातावरणाच्या कृत्रिमतेच्या मुळाशी असलेले एकमेव कारण म्हणजे, निसर्ग सानिध्याचा अभाव, एकदा याची स्पष्ट जाणीव झाल्यामुळे त्याचे मूलभूत निसर्गप्रेम जागृत होते आणि तो निसर्गाच्या सानिध्यात जाण्याचा प्रयत्न करतो.' 'आजोबा' या कवितेतील आजोबा म्हणूनच तर आपल्या नातवावर हा संस्कार करत नसतील ना? कारण पुढच्या पिढीवर आपण कोणते संस्कार करतो, हेही महत्त्वाचे असते. आपण जे संस्कार करतो, तेच पुढची पिढी आत्मसात करते. म्हणूनच या कवितेतील नातू आजोबांकडे खाऊचा हट्ट न करता आजोबांना म्हणतो–

*एखाद दिवशी आजोबा विसरले तर*
*आजोबा आपण खाऊ आणायला जाऊया ना*
*इतक्या लडिवाळपणे झाडे बघुयाना आजोबा, असं म्हणतो.*
*आजोबांना बोट धरून नेत त्यांचच जग त्यांना दाखवतो*

आपण केलेला संस्कार नातवाच्या मनापर्यंत पोहोचला आहे, या जाणिवेने आजोबा सुखावतात. येथे नातवाचं नातंही निसर्गाशी सहजपणे जोडलं गेलंय, हे दिसून येते.

कवितेच्या पुढच्या टप्प्यात भूमिकांची काहीशी अदलाबदल झालेली दिसते. तसेच काही काळ निघून गेल्याची एक सूचक जाणीवही होते. आजोबा अधिकाधिक वृद्ध होत जातात, तेव्हा नातू त्यांची भूमिका स्वतःकडे घेतो आणि आजोबाच जणू आता नातू झाले आहेत, अशा पद्धतीने तो त्यांनीच दाखवलेलं निसर्गाचं जग त्यांना नव्याने दाखवू पाहतो. अर्थातच आजोबांना या गोष्टीचे कौतुक वाटते, कारण आजोबांचा नेहमीच निसर्गाशी मूक संवाद सुरू असतो. मानवी जगापेक्षा या निसर्गसृष्टीवरच त्यांचा अधिक विश्वास असतो. अर्थातच ही जाणीव धामणस्करांच्या बहुतांशी निसर्ग कवितांमधून व्यक्त झालेली दिसून येते. म्हणूनच स्वतःच्या मृत्यूची जाणीव झालेले आजोबा अगदी विश्वासाने एखाद्या सुहृदाला कानगोष्ट सांगावी, तसं निसर्गाला उद्देशून काही सांगू पाहतात, पण दुसरीकडे आजोबांना काळजीही वाटते. कारण त्यांना आपल्या मृत्यूची जाणीव झाली आहे, आपलं नातं दुरावणार आणि आपल्यासारखीच त्याची काळजी कोण घेणार, या विचाराने ते खंतावतात. पण घरातल्या माणसांपेक्षा त्यांचा विश्वास निसर्गावर अधिक आहे, म्हणून ते विश्वासाने निसर्गातील एकेका घटकाला उद्देशून म्हणतात –

*तेव्हा मिटत चाललेले आजोबा म्हणतात बरं का उन्हां!*
*आकाशां पक्षांनो, झाडांनो, फुलांनो उद्यापासून बहुधा*
*बिट्टू एकटाच तुमच्या चौकशीला येत जाईल. बदल्यात*
*वारसा हक्कानीच जणू त्याला कुठेच कधीच*
*एकटं वाटणार नाही एवढ मात्र बघा!*

आपल्या पश्चात नातू एकटा पडेल की काय ही काळजी आजोबांना वाटते. कारण आजोबा आणि नातवाचं एक विलक्षण गहिरं असं नातं असतं. आता आपणही या निसर्गातच विलीन होणार आहोत; मग या निसर्गरूपातूनच आपण नातवाला सोबत करणार आहोत, म्हणूनही ते निसर्गाला विनवत

नसतील ना? असा प्रश्नही मनात निर्माण होतो.

**त्रिविध नात्याची उकल**

धामणस्करांची आजोबा ही कविता केवळ आजोबा आणि नातू यांच्यातलं नातं विशद न करता आजोबा आणि निसर्ग, आजोबा आणि नातू, नातू आणि निसर्ग असं त्रिविध स्वरूपाचं नातं विषद करणारी आहे. अत्यंत साध्या सोप्या आणि ओघवत्या अशा तरल शब्दातून निसर्गाविषयीच्या संवेदना या कवितेत मुखर झालेल्या दिसतात. इतकेच नाही, तर जन्म मृत्यूचे एक विलक्षण गहिरे तत्त्वज्ञानच ही कविता मांडते. या कवितेतील आजोबा हे मागच्या पिढीचं प्रतिनिधित्व करणारे आहेत, तर नातू हा पुढील पिढीचे प्रतिनिधित्व करणारा आहे. परंतु या दोघांचं नातं घट्ट करणारा निसर्ग हा केवळ चराचराला व्यापून उरलेला नाही, तर तो युगानुयुगे व्यापून राहिलेला आहे. त्यामुळे आजोबांना असे वाटत आहे, की आपण असलो नसलो तरी आपली उणीव नातवाच्या आयुष्यात भरून काढणारा निसर्गच आहे आणि म्हणूनच ते निसर्गातल्या छोट्या छोट्या घटकांना म्हणजेच ऊन पान फुलं यांना उद्देशून म्हणतात, की माझ्या नातवाला एकटेपणा वाटणार नाही, याची काळजी तुम्ही घ्या.

अर्थातच या कवितेतून कवीला हेच विशद करायचे आहे की आजचे युग, आजचा काळ हा अतिशय धावपळीचा आहे. इथे माणसाला माणसाशी बोलायला किंवा आई-वडिलांना आपल्या मुलासाठी किंवा मुलाला आई-वडिलांसाठी वेळ देता येईलच असे नाही; परंतु ही उणीव निसर्ग नक्कीच भरून काढू शकतो, हा आशावाद या कवितेतील संवेदनशील मनाचे आजोबा व्यक्त करतात. म्हणूनच ही कविता थेटपणे आजच्या काळातील मानवी नातेसंबंधांवर बरंच काही बोलून जाते. येथे आजोबांना झालेली मृत्यूची जाणीव बिट्टूचे एकाकीपण यातला एक विलक्षण ताण जाणवतो. पुढच्या पिढीवर आपण केलेल्या संस्काराची संस्काराबद्दल खात्री वाटते. म्हणूनच बिट्टू एकटाच तुमच्या चौकशीला येत जाईल, असे ते म्हणतात व आपली भूमिका ते निसर्गाकडे सोपवून (हस्तांतर कवितेतील ययातीप्रमाणे) स्वतः विरक्त, विमुक्त होऊ पाहतात. अनेक अर्थाने ही कविता मनावर खोलवर संस्कार रुजवू पाहते.

येथे धामणस्करांच्या कवितेचे काही प्रमाणात ना. धों. महानोर यांच्या कवितेशी नाते दिसते. महानोरांच्या कवितेतील निसर्ग त्यांच्या रोजच्या अनुभवाचा आहे. त्यांच्या शेतकरी जीवनाशी बांधलेला आहे, कवीचा तो सहचर आहे. निसर्ग हा अगदी आप्तांसारखाच मायेचे पांघरून घालतो. हीच भावना जशी महानोर यांनी व्यक्त केली आहे, तशीच धामणस्करही व्यक्त करतात. महानोर एका कवितेत म्हणतात-

*डोळे गच्च अंधारून तेव्हा माझे रान*
*रानातली झाडे मला फुले अंथरूण*

अर्थात महानोर यांची कविता निसर्गाबद्दल आहेच, पण त्याहीपेक्षा ती शेताची अधिक आहे. पण निसर्गाचे केलेले मानवीकरण किंवा निसर्ग आणि मानव यांच्यातलं अद्वैत नातं महानोर आपल्या कवितेतून मुखर करतात, तर धामणस्कर हे निसर्ग हा आपल्या जिवाभावाचा सखा असावा, आपला आधार असावा, अशा पद्धतीने अलवारपणे आपल्या भावना व्यक्त करतात.

निसर्ग हा धामणस्करांच्या कवितेतील एक केंद्रवर्ती घटक दिसतो. त्यांची निसर्ग कविता वाचताना रवींद्रनाथ टागोर यांच्या अनेक कणिका मला अपरिहार्यपणे आठवतात. मध्यंतरी रवींद्रनाथ टागोरांच्या बंगाली कणिकांचा सुमती जोशी यांनी केलेला मराठी अनुवाद वाचताना टागोरांच्या तरल हळुवार मनाचा प्रत्यय येत गेला. निसर्गातील छोट्या छोट्या घटकांशीही म्हणजेच पान, फूल, ढग, कळी अगदी मुंगी सुद्धा. किती सहजतेने ते संवाद साधतात! निसर्गातील या घटकांच्या अंतर्मनात प्रवेश करून त्यांच्याशी ते संवाद साधतात. अगदी तसाच भाव धामणस्करांच्या कवितेत आढळतो. तेही उन्हाशी, पानांची, फुलांशी, आकाशाशी अगदी तसाच संवाद साधतात. रविंद्रनाथ टागोरांनी जसे संवादतत्व कवितेत योजले आहे, तसेच धामणस्करांनीही योजले आहे, त्यामुळे या कवितेला अधिक आत्मीय सौंदर्य प्राप्त झालेले दिसते. किंबहुना ते त्यांच्या कवितेचे वैशिष्ट्य ठरलेले दिसते.

धामणस्करांची मला आवडलेली दुसरी कविता म्हणजे, 'प्राक्तनाचे संदर्भ' या संग्रहातील 'हस्तांतर' ही कविता होय.

*विसर्जनासाठी गणपती नेताना*
*मला मूर्ती जड झाली, तेव्हा*
*उसळत्या तारुण्याचा*
*माझा मुलगाच मला म्हणाला: द्या इकडे.*
*मी मूर्ती तात्काळ मुलाच्या हातावर ठेवली*
*चौरंगासहित.*
*मुलानेही मूर्ती हातात घेतली नीट सावरून, तर*
*मी एका दैवी आनंदात अकल्पित*

*परंपरा पुढे सरकल्याच्या...*
*मी पुन्हा तरूण ययातीसारखा;*
*माझा मुलगा जख्ख म्हातारा,*
*परंपरेच्या ओझ्याने वाकलेला. (काव्यसंग्रह – प्राक्तनाचे संदर्भ)*

**तत्त्वचिंतनात्मक सूर**

धामणस्करांची 'हस्तांतर' ही कविता पिढीजात परंपरा आणि इतर कर्मकांड किंवा इतर श्रद्धास्थानं यांचे संस्कार पुढील पिढीकडे सुपूर्द करण्याबाबतची आहे. 'हस्तांतर' या कवितेत वडील आणि मुलगा यांच्यातील नाते नकळतपणे व्यक्त केले आहे. परंतु त्याहीपेक्षा ही कविता पूर्वापार पिढीकडून चालत आलेले पिढीजात रूढी संस्कार पुढच्या पिढीकडे विश्वासाने देण्याबद्दलची आहे. या कवितेत कवीने ययाती ही पौराणिक प्रतिमा योजली आहे. ययाती राजाकडे ऐश्वर्य सुख ऐहिक सुख सगळे काही असते, परंतु त्याला जेव्हा अकाली वृद्धत्वाचा शाप मिळतो, तेव्हा मात्र तो आतून हादरतो. वृद्धत्व स्वीकारणं त्याला कठीण जातं. मानवी वासना, भोगलालसा आणि तारुण्याच्या मोहाची प्रतिमा म्हणून ययातीकडे पाहिले जाते. हा ययाती वृद्धत्वाच्या जाणिवेने जेव्हा हादरतो, तेव्हा आपल्या मुलाचे म्हणजेच पुरुचे तारुण्य घेऊन भोगविलास अनुभवतो आणि मुलगा मात्र अकाली वृद्ध होतो, असे असतानाही ययातीला अतृप्तीच जाणवते, भोगलालसेतील निरर्थकता जाणवते, तेव्हा मात्र तो वैराग्याकडे वळतो.

'हस्तांतर' या कवितेतही परंपरेच्या ओझ्याने वाकलेला गृहस्थ, घरातील गणेशोत्सवाच्या वेळी आणली जाणारी गणपतीची मूर्ती, हाताला जड झाल्याने तरुण मुलाच्या हाती सोपवतो नव्हे, सुसंस्कारी तरुण मुलगाच वयस्कर वडिलांच्या हातातील मूर्ती स्वतःहून पुढे होऊन घेतो. अर्थात, येथे केवळ मूर्ती जड झाल्याने उचलणे, इतकाच अर्थ अपेक्षित नाही, तर त्या मूर्तीसकट येणाऱ्या इतरही परंपरा, कर्मकांड, रुढी त्यासोबत चिकटूनच येतात. केवळ मूर्ती हस्तांतरित होत नसून त्या मूर्तीसोबत आलेले अनेक संस्कार अनेक रूढी कर्मकांडही हस्तांतरित होत असते, हे अधोरेखित केले आहे. या कवितेतील वडील आपल्या मुलाच्या हाती केवळ मूर्ती सोपवत नाही, तर ती मूर्ती ज्या चौरंगावर विराजमान झाली आहे, त्या चौरंगासकट ती मूर्ती त्याला सोपवतात. येथे चौरंग ही परंपरेचा पाया असलेली, परंपरांच्या पिढीजात बैठकीची प्रतिमा म्हणून योजलेली आहे. अर्थातच त्या परंपरेच्या ओझ्यातून मुक्त होण्यासाठी कवी आपली जबाबदारी पुढच्या पिढीकडे सुपूर्द करून स्वतः मुक्त होतो, हे एक प्रकारचे चक्रच कवी येथे मुखर करतो, म्हणूनच या कवितेतील वडील म्हणतात–

*मी मूर्ती तात्काळ मुलाच्या हातावर ठेवली*
*चौरंगासहित*
*मुलानेही मूर्ती हातात घेतली नीट सावरून, तर*
*मी एका दैवी आनंदात अकल्पित*
*परंपरा पुढे सरकल्याच्या*

ही परंपरा जतन करून सातत्याने सुरू ठेवावी लागणार आहे, जशी कित्येक वर्ष आपल्या वडिलांनी जपली, या जबाबदारीचे ओझे तात्काळ जाणवून ऐन तारुण्यातच जबाबदारीच्या ताणाने मुलगा वाकलेला दिसून येतो. कारण एकदा का ही जबाबदारी स्वीकारली, की आपलं स्वातंत्र्य अबाधित राहत नाही, कुळाचार, कुळधर्म यांचे विधीवत पालन करावेच लागते, याची जाणीव त्या मुलाला होते, तर आता आपल्याला या परंपरेच्या जोखडापासून अनेक वर्षांनंतर स्वातंत्र्य मिळालं, या जाणिवेने वडील आनंदून जातात, हा विलक्षण भावनिक ताण येथे व्यक्त केलेला दिसून येतो. इथे भूमिकांची अदलाबदल केलेली दिसते. उत्फुल्ल, उसळत्या तारुण्याचा मुक्तपणे आस्वाद घेणारा मुलगा आता परंपरेच्या जोखडात बद्ध होतो आणि अचानक वृद्ध होऊ लागतो, तर वडील मात्र आपल्या परंपरा मुलाकडे सुपूर्द करून एक प्रकारच्या स्वातंत्र्याचा आनंद घेऊ पाहतात शिवाय एक प्रकारचा विश्वासही त्यांना या पुढच्या पिढीबद्दल वाटत असतो म्हणूनच ते आनंदाने यातून मुक्त होतात.

डॉ.विजया राजाध्यक्ष म्हणतात, 'हस्तांतर' या कवितेत या समतोलाचे प्रत्यंतर येते. कवी गणपतीच्या मूर्तीच्या रूपाने आपल्या मुलाकडे जणू परंपराच सोपवीत आहे. परंपरा नाकारण्याऐवजी पुढील पिढीकडे पोहोचती करणे, पण ती पत्करलेला मुलगा ओझ्याने वाकलेला दिसणे, या दोन्ही प्रतिक्रिया अर्थपूर्ण आहेत, एकमेकींना तोलून धरणाऱ्या आहेत. त्यांच्यामागे जीवनाविषयी स्थिर, शांत बुद्धीने विचार करणारे मन आहे. तेही आवश्यक असते हे या कवितेत जाणवते.'

अतिशय साध्या, सोप्या शब्दकळेतून अतिशय महत्त्वाचा विचार धामणस्कर मांडतात, वाचकांना विचारप्रवण करतात. अशा अनुभवाची कविता यापूर्वी कुणी लिहिलेली दिसत नाही,

हे या कवितेचे वेगळेपण म्हणता येईल.

आजोबा आणि हस्तांतर या दोन्ही कविता आत्मलक्ष्यी स्वरूपाच्या अल्पाक्षरी रचना आहेत. कवीचे व्यक्तिगत अनुभव येथे काव्यात्म रूप धारण करून आलेले दिसतात. या कविता संस्कार मूल्यांची जाणीव करून देणाऱ्या आहेत. दोन्ही कवितांमधून दोन पिढीतील नातेसंबंध विशद केलेला दिसतो. एकप्रकारचा आश्वासक सूर या कवितांमधून उमटलेला दिसतो, हे या कवितांचे वेगळेपण म्हणता येईल. डॉ.विजया राजाध्यक्ष म्हणतात, त्याप्रमाणे त्यांच्या कवितांमध्ये दुःख असले तरी वैफल्य, उद्वेग नाही; एक सहज, समजुतदार स्वीकार जाणवतो. जीवनातील अगदी साध्या साध्या वाटणाऱ्या अनुभवाकडे पाहण्याची तरल संवेदनक्षम मन, सहृदयी वृत्ती आणि तत्त्वचिंतनाची जोड, यामुळे धामणस्करांची कविता मनात रूंजत राहते, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

**संदर्भ :**

**१. धामणस्कर द. भा.: प्राक्तनाचे संदर्भ, मौज प्रकाशनगृह, मुंबई**

**२. धामणस्कर द. भा.: बरेच काही उगवून आलेले, मौज प्रकाशनगृह, मुंबई**

**३. पवार दया, पाडगावकर मंगेश व इतर (संपादन) : कविता दशकाची, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.**

**डॉ. नेहा सावंत अंधेरी–मुंबई येथील भवन्स महाविद्यालयात मराठी विभागप्रमुख आहेत. त्यांनी कुपारी बोलीतील साहित्याचा चिकित्सक अभ्यास या विषयावर पीएच.डी. मिळवली असून, लेखन, शब्दांकन, संपादन, अभिनय, डबिंग, सूत्रसंचालन आदी क्षेत्रात त्या सक्रिय राहिल्या आहेत.**

**संपर्क** : nehasawant603@gmail.com

## आ वा ह न

सप्रेम नमस्कार,

तुमच्या पाठबळाच्या जोरावर '**समतावादी मुक्त–संवाद पत्रिके**'ने (पूर्वाश्रमीचे 'मुक्त–संवाद') साडेसहा वर्षांचा टप्पा गाठला आहे. पुढची वाटचाल अशीच सुकर होण्यासाठी आपल्या मदतनिधीची आम्हाला आशा आहे. मदतनिधी जमा करण्यासाठी बँक खात्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

**खातेदार संस्थेचे नाव :** SAMATAWADI MUKTSANVAD PATRIKA

**बँक, शाखा :** SARASWAT BANK, MAHIM

**खाते क्रमांक :** 610000000035417

**आयएफएससी क्रमांक :** SRCB0000007

---

**'समतावादी मुक्त–संवाद पत्रिके'चा अंक मर्यादित संख्येने छापील आणि पीडीएफ अशा दोन प्रकाराने प्रकाशित होतो. हा अंक वाचकांसाठी विनामूल्य असून, अंकाच्या पीडीएफसाठी पुढील क्रमांकावर संपर्क साधावा अथवा व्हॉट्सॲपद्वारे संदेश पाठवावा. संपर्क : ९६१९८२३६७२/८५५१८५०४६२**


# शब्दकोडं



अनुवाद : सुमती जोशी

**मूळ कथा: इंद्रनील सान्याल**

**बंग नाद**




**ल**घुकथेची खुमारी काही औरच असते. त्यातही लघुकथेची मूळ भाषा बंगाली असेल, तर ती कथा बंगालच्या मातीचा आणि त्या मातीत फुलणाऱ्या मानवी नातेसंबंधांचा गंध घेऊनच अवतरते. त्यात त्या नातेसंबंधातून आलेली लय असते, नादही असतो. ही लय आणि हा नाद कधी वाचकाला धक्का देतो, कधी अंतर्मुख करतो, तर कधी बुचकळ्यातही पाडतो. बंगाली भाषेचे सौंदर्य यात असतेच, पण त्या त्या लेखक-लेखिकेची दृष्टी वाचकांचे भानही विस्तारते. अशाच काही निवडक कथांचा हा भावानुवाद...

‘डेझी’ हे गणेशचंद्र अव्हेन्युमध्ये असलेलं बार कम रेस्टॉरंट. तिथले मॅनेजर राजू हालदार. कोंबडी हलाल करण्यावरून त्याचा शेफ अफजल याच्याबरोबर झमेला झाला. घाऊक बाजारातून मांस-मच्छी खरेदी करायची जबाबदारी अफजलची. अफजल हलाल पद्धतीने कोंबड्यांचा जीव घेतो, हे जेव्हा राजूला समजलं तेव्हा त्याने अफजलला स्पष्ट शब्दात ताकीद दिली, ‘‘तुझ्या घरी तू नियमांचं पालन कर, पण इथे तसं करायला लागलास, तर तुला सरळ पाकिस्तानात पाठवून देईन.’’

अब्दुलने एका झटक्यात कोंबडीचा जीव घेतला.

चाळिशी गाठलेला राजू गेली पंधरा वर्षे डेझी हॉटेलचा मॅनेजर म्हणून काम करत होता. हावडा स्टेशनपासून दहा स्टेशन्स पार केल्यावर त्याचं घर. लोकल ट्रेन पकडून दुपारी बाराच्या सुमारास तो हावडा स्टेशनवर पोचत असे. तिथून लाँचने गंगा ओलांडत असे. फेअरली प्लेसला उतरल्यावर उरलेलं अंतर तो चालत जाई. बार कम रेस्टॉरंटमध्ये नोकरी करायची म्हणजे, घरी कधी परतता येईल हे नक्की सांगता येत नसे. रात्री अकरा वाजता बाहेर पडता आलं, तर शेअर टॅक्सीने हावडा स्टेशनवर पोहोचून शेवटची किंवा त्याच्या आधीची ट्रेन पकडता येत असे.

राजूने ज्या दिवशी अफजलला पाकिस्तानात पाठवून देईन, असा दम भरला होता, त्याच दिवशीची ही घटना. सकाळी उशिरा जाग आल्यावर चहाचा घोट घेता घेता त्याच्या पत्नीने-मल्लिकाने बाजारातून काय काय आणायचं आहे, ते त्याला सांगितलं. रोजच्या ठराविक गोष्टींबरोबर मुलगा-सायक याच्यासाठी क्रेयॉन पेन्सिल्स आणि सत्तर वर्षांच्या सासूबाई मिनती यांच्यासाठी पोट साफ व्हायची पावडर खरेदी करायची होती.

ही घरगुती कामं उरकल्यावर स्वत:च्या स्नानादी गोष्टी आवरणं - बरीच कामं असायची त्याला! राजू दुपारचं भोजन उरकून साडे अकरा वाजता घरातून बाहेर पडला. दुपारी एक वाजता रेस्टॉरंटमध्ये शिरला. मद्याचा साठा बरोबर आहे ना - हे तपासणे, कर्मचाऱ्यांच्या हजेरी बुकावर नजर टाकणे, धान्य आणि पोल्ट्री यांची खातरजमा करून घेणं, प्रत्येक टेबलावरची सजावट नीटनेटकी आहे ना, याची खात्री करून घेणं, अफजलला पाकिस्तानात पाठवून द्यायची धमकी - हे सगळं पार पाडता पाडता पहिला कस्टमर तिथे आला. दुपारी दोनपासून संध्याकाळी पाच वाजेपर्यंत हॅपी अवर्स. या वेळात कस्टमर कमी असतात म्हणून एका व्हिस्कीबरोबर आणखी एक व्हिस्की फुकट दिली जात असे. कमी पैशात अधिक मद्य मिळवायच्या लोभापायी कॉलेजमधले विद्यार्थी आणि ऑफिसातली बाबू मंडळी तिथे गर्दी करीत. रात्रीच्या सुमारास कस्टमर्सची संख्या साहजिकच वाढत असे.

हॅपी अवर्स संपल्यावर रेग्युलर कस्टमर्स येऊ लागत. पावणे सातच्या सुमारास राजू नेहमीच्या कस्टमर्सबरोबर गप्पा मारत होता. तितक्यात मोबाइलची रिंग वाजली. बघितलं तर मल्लिका.

इमर्जन्सी असल्याशिवाय कामाच्या वेळात मल्लिका कधीही फोन करत नसे. ही गोष्ट एखाद्या पोपटाला पढवावी, तशी मल्लिका, सायक आणि मिनती यांना सांगून ठेवलेली होती. आता कोणती इमर्जन्सी आली असेल? कस्टमरपासून दूर जाऊन राजूने फोन घेतला आणि विचारलं, ‘‘काय झालं?’’

मल्लिका शांतपणे म्हणाली, ‘‘आई बाथरूममध्ये पडल्या होत्या. काही क्षण त्या बेशुद्ध झाल्या होत्या. आता त्यांना एका बाजूचे हातपाय हलवता येत नाहीयत. मी त्यांना रिकव्हरी नर्सिंग होममध्ये घेऊन जातेय. ॲम्ब्युलन्स बोलावलीय. तुम्ही एकदा डॉक्टर सेन यांच्याशी बोलून घ्या.’’

मी येतोय, असं सांगून राजू डेझी हॉटेलच्या सर्वेसर्वा रिना शहा यांच्या लहानशा ऑफिसमध्ये गेला. अशा सगळ्या बाबतीत रिना खूप मदत करत असे. सगळी हकीगत ऐकल्यावर ती म्हणाली, ‘‘माझी गाडी घेऊन जा. किती पैसे लागतील?’’

राजू म्हणाला, ‘‘मला गाडीने हावडा स्टेशनपर्यंत सोडलं की झालं. सध्या पैसे लागणार नाहीत. आधी घरी जातो, मग बघतो.’’

प्लास्टिकच्या पिशवीत शिजवलेलं मांस पॅक करून त्याच्या सॅकमध्ये घालून रिना म्हणाली, ‘‘आज घरी स्वयंपाक करणं होणार नाही. पाड्यावरच्या दुकानातून रोट्या खरेदी कर. आई कशी आहे, ते रात्री फोन करून कळव.’’

रिनाच्या गाडीने हावड्याला पोचायला संध्याकाळचे साडे सात वाजले. प्लॅटफॉर्मवर ऑफिसमधून सुटलेल्या माणसांची गर्दी पाहून राजूचं डोकं फिरायची वेळ आली होती. तो बहुतेक दुपारच्या वेळी किंवा उत्तररात्री तिथून जा-ये करत असे. स्टेशनवरच्या नित्यनियमाने प्रवास करणाऱ्या या माणसांचे त्रस्त चेहरे त्याने अलीकडे कधी पाहिले होते, हे त्याला आठवत

नव्हतं. त्याच्या डोळ्यासमोरून बँडेल लोकल, सिंगूर लोकल, वर्धमान लोकल आणि काटोया लोकल निघून गेल्या. त्यातून जाणारी माणसं कशी लोंबकळत होती ते पाहून राजूला भीती वाटू लागली. माणसं दिवसेंदिवस असे हाल सोसतच प्रवास करतात का?

समोर एक लोकल उभी राहिली. ती बरीचशी रिकामी होती. राजू धावला आणि धापा टाकताच त्याने डब्यात प्रवेश केला. तितक्यात गाडी सुरू झाली.

**दोन**

डब्यात चेंगराचेंगरी होईल, अशी गर्दी नव्हती. बसायला जागा मिळत नसली तरी मोकळेपणाने उभं राहता येत होतं. शेजारी उभ्या असलेल्या मुलाकडून समजलं, ही फास्ट ट्रेन आहे. त्यामुळे लहान लहान स्टेशन्सवर उतरणाऱ्या प्रवाशांची त्या डब्यात गर्दी नव्हती. हावड्यानंतर प्रथम थांबली, राजूच्या स्टेशनवर.

डेली पॅसेंजर्स स्मार्ट फोन बघण्यात व्यग्र होते. तर काही लोक पत्ते, ल्युडो किंवा कँडी क्रश खेळण्यात गुंगून गेले होते, काही कानात इअर फोन घालून संगीत ऐकत होते. सगळ्या प्रकारचे उद्योग तिथे चालू होते. राजूला स्मार्ट फोनची फारशी आसक्ती नव्हती. त्याने आपल्या सॅकमधून बांगला वर्तमानपत्र बाहेर काढलं आणि तो शब्दकोडं सोडवू लागला.

रोजचे प्रवासी एकत्र येऊन तावातावाने बोलत होते. अनेक बोलीभाषा बोलणारे लोक एकत्र येऊन मुसलमानांची निंदा करत होते, हे राजूच्या लक्षात आलं.

जन्माने हिंदू असलो तरी आपण धर्माच्या बाबतीत उदासीन आहोत, अशी राजूची समजूत होती. आता मात्र परिस्थिती बदलली होती. अलीकडे मोर्चे, सभासंमेलनं, अंगणातले अड्डे, समाजमाध्यमांवर, टी.व्ही.वरच्या भाषणांमध्ये नाना प्रकारचे विचार कानावर पडत. भारतातले मुसलमान आमची मायनॉरिटी आहे, असं म्हणत असत. आशिया, आफ्रिका खंडात जिथे जिथे त्यांची लोकसंख्या कमी होती, तिथे तिथे मुख्य समाजाकडून त्यांचा छळ केला जाई. परंतु त्यांची लोकसंख्या वाढली. मायनॉरिटीची मेजॉरिटी झाली रे झाली, की ते इस्लामिक राष्ट्र म्हणून घोषित केलं जाई आणि तिथे शरियत कायदा लागू केला जाई. त्यामुळे त्यांना वेळीच आवर घातला नाही तर भारत इस्लामिक राष्ट्र होऊन जाईल, अशी भीती त्यांना वाटत होती. राजू नुकताच एका हिंदुत्ववादी संघटनेचा सदस्य झाला होता. त्यांनी दिलेली पत्रकं वाचल्यावर हिंदूंची जी काही दुरवस्था झाली होती, ती समजत असे आणि तळपायाची आग मस्तकात जात असे.

वर्तमानपत्रातलं शब्दकोडं काढून राजू भराभर रिकाम्या जागी योग्य ते शब्द घालू लागला. पावसाळ्यात भिजलेल्या मातीचा येणारा सुगंध–सोंदा. मृद्‌गंध. तीन अक्षरी शब्द – त्याचे दोन अर्थ ऋतू आणि रोग. अर्थातच बसंत. (बंगाली भाषेत वसंत ऋतू आणि वसंत म्हणजे देवीचा रोग). आता हवा होता उभा तीन अक्षरी शब्द, ज्याचा अर्थ असेल वीज आणि शेवटचं अक्षर असेल दा. कोणता शब्द असू शकेल?

वीज या शब्दाचा प्रतिशब्द आठवता आठवता राजूने एक कटाक्ष टाकून पाहिलं तेव्हा रोज प्रवास करणाऱ्या ग्रुपमधला एक लठ्ठ माणूस मोठ्याने ओरडून बोलत होता, ''त्यांच्यातले तरुण आमच्या कुटुंबातल्या तरुणींना फसवून त्यांच्याशी लग्न करतात.''

आणखी एक स्थूल माणूस म्हणाला, ''लव्ह जिहाद.''

आणखी एकजण म्हणाला, ''तुम्ही त्यांना वंदे मातरम् म्हणायला सांगा. ते काही झालं तरी उच्चारणार नाहीत.''

लठ्ठ माणूस म्हणाला, ''ते गायीचं मांस खातात. शी! गाय आमची माता आहे.''

राजू अस्वस्थ होऊ लागला होता. तितक्यात शेजारी बसलेला तरुण म्हणाला, ''तो शब्द दामिनी असेल.'' अगदी बरोबर सांगतोय. दा या अक्षराने सुरू होणारा वीज या अर्थाचा तीन अक्षरी शब्द. राजूने कुतूहलाने त्या तरुणाकडे पाहिलं. कॉलेजच्या शेवटच्या वर्षात शिकत असेल किंवा नुकताच नोकरी करू लागला असेल. आपल्या वर्तमानपत्रात हा तरुण डोकावतोय, म्हणून राजूला तो जरा आगाऊ वाटला होता, पण दुसऱ्याच क्षणी त्याला वाटलं, हासुद्धा त्याच्यासारखा दुर्मीळ प्रजातीचा माणूस असावा. अजूनही तो वर्तमानपत्र वाचतोय, शब्दकोडं सोडवतोय.

राजू म्हणाला, ''एक सहा अक्षरी शब्द, बंकिमचंद्रांनी लिहिलेलं गीत. हे काय असेल?''

तरुण झटकन म्हणाला, ''वंदे मातरम्.''

अगदी बरोबर असं म्हणत राजूने तिथल्या मोकळ्या जागा भरल्या. 'जर वरच्याची इच्छा असली तर' या अर्थाचा चार अक्षरी शब्द आता शोधायचा होता.

उत्तेजित झालेला राजू मोठ्याने म्हणाला, ''इन्शाल्ला! इन्शाल्ला! जर अल्लाची इच्छा असली तर.''

डब्यातले सारे प्रवासी अवाक् होऊन पाहू लागले. मान वळवून राजूने एक कटाक्ष टाकला तेव्हा लठ्ठ आणि दुसरा एक स्थूल माणूस त्याच्याकडे एकटक बघत होते. त्यांच्याकडे दुर्लक्ष करत राजू त्या तरुणाला विचारू लागला, ''मानवी अनुभूती या अर्थाचा दोन अक्षरी शब्द हवाय. काय असेल तो शब्द? घृणा?''

भुवया उंचावत तो तरुण म्हणाला, ''थांबा, विचार करतो.''

**तीन**

लठ्ठ माणसाने कुतूहलाने विचारलं, ''नाव काय तुझं?''

राजू म्हणाला, ''ते कशाला हवाय तुम्हाला?''

स्थूल माणूस म्हणू लागला, ''खरं काय ते सांग. तुझं नाव काय आहे?''

लठ्ठ माणूस म्हणाला, ''यांची मिजास किती वाढलीय, ते बघतोयस ना? साधं उत्तरही देत नाहीत.''

लठ्ठ माणसाकडे बघत राजू म्हणाला, ''राजू हालदार. आपलं नाव काय? तुम्ही कोणत्या स्टेशनावर उतरणार?''

स्थूल माणूस म्हणाला, ''नाव राजू, आडनाव हालदार. बघितल्यावर मुसलमान आहे, असं वाटत नाही.''

हसत हसत राजू विचारू लागला, ''मी मुसलमान आहे, असं वाटतंय का तुम्हाला? त्याने यापूर्वी मोठ्या आवाजात इन्शाल्ला हे शब्द उच्चारले होते, त्यामुळे तो मुसलमान आहे, असा त्यांचा समज झाला होता.

लठ्ठ माणूस म्हणाला, ''दाढी बघून याची जात कोणती ते समजतंय.''

राजू म्हणाला, ''ही विराट कोहलीची स्टाइल. लोकांच्या मागे लागण्याशिवाय दुसरं काम नाही यांना!''

तितक्यात पेटून उठून लठ्ठ माणसाने त्याची कॉलर पकडली आणि तो म्हणाला, ''वंदे मातरम् म्हण.''

एक धक्का मारून लठ्ठ माणसाला बाजूला सारून आपली सॅक आणि वर्तमानपत्र त्या तरुणाच्या हाती सोपवत राजू म्हणाला, ''अशी कानफटात लागवून देईन, की तुला बापाच्या नावाचासुद्धा विसर पडेल.''

स्थूल माणूसही एव्हाना त्याच्याजवळ आला होता. तो जोरात श्वास घेत म्हणाला, ''तुझ्या सॅकमधून असली दुर्गंधी येतेय रे? मांस आहे वाटतं?''

राजू मनातल्या मनात धुसफुसत होता. आता त्याला भीती वाटू लागली होती. भारतातल्या इतर राज्यात या विषयावरून खून पडले होते, त्याची त्याला आठवण झाली. माझ्या सॅकमध्ये गोमांस आहे, असा जर यांचा समज झाला तर फार मोठं संकट ओढवेल! मारामारी सुरु होईल.

वास्तविक तो हिंदू होता. हिंदूंची मेजॉरिटी. तो स्वत: हिंदुत्ववादी संघटनेचा सभासद होता. कोणी त्याच्या केसालाही धक्का लावू शकणार नाही. राजू ओरडून म्हणाला, ''होय. माझ्या सॅकमध्ये बोकडाचं मांस आहे. त्याच्याशी तुम्हाला करायचंय काय? मी हिंदू आहे. वंदे मातरम्. आता तरी तुमचं समाधान झालं का?''

त्याच्या कानफटात वाजवून स्थूल माणूस त्याला म्हणाला, ''गोमांस घेऊन फिरतोयस. तू हिंदू कसा असशील? पँट काढ.''

राजूच्या स्टेशनवर गाडी थांबली होती. हीच सुसंधी आहे! त्याने स्थूल माणसाच्या गालावर जोरदार ठोसा लगावला. आई ग, असं म्हणत तो जमिनीवर पडला. त्या माणसाची कॉलर पकडून त्याला खेचत खेचत प्लॅटफॉर्मवर उतरवून तो म्हणाला, ''थांब, आता तुझीच पँट काढतो आणि तुझ्या अंगावर खाजखुजली टाकतो. माझ्याशी पंगा घेतोस काय? तू ज्या गटात आहेस, त्याच गटाचा मीही एक सभासद आहे. आजच तुझ्या लांड्यालबाड्या बाहेर काढतो.''

स्थूल माणसाचे ओठ फाटून त्यातून रक्त वाहू लागलं होतं. हात जोडून तो क्षमायाचना करत होता. राजूने कॉलर सोडल्याबरोबर तो धावत्या ट्रेनमध्ये चढला. बघता बघता ट्रेन प्लॅटफॉर्म ओलांडून पुढे गेली.

तितक्यात राजूला आठवलं, त्याची सॅक त्याने शेजारच्या तरुणाजवळ दिली होती. ती ट्रेनमध्येच राहून गेली. आता काय होईल? त्यात अतिशय महत्त्वाची कागदपत्रं होती.

प्लॅटफॉर्मवरची गर्दी हळूहळू कमी होऊ लागली. राजू मूर्खासारखा नुसता उभा होता. तितक्यात जवळून आवाज आला, ''ही घ्या. आपली सॅक.''

बघितलं तर ट्रेनमधला तो तरुण त्याची सॅक त्याला परत देत होता. किंचित हसून राजूने विचारलं, ''तुम्हीसुद्धा इथेच राहता का?''

तो तरुण म्हणाला, ''मी मीरपूरला राहतो. आणखी पाच स्टेशन्स गेल्यावर मी उतरणार होतो. पण आपली अवस्था पाहून मी इथे उतरलो.''

भुवया उंचावत राजू म्हणाला, ''मीरपूर? ते स्थान अँटी

सोशल लोकांनी व्यापलेलं आहे. ज्यूट मिल बंद झाल्यापासून सगळे मुसलमान कामकरी तिथे राहून चोऱ्या दरोडखोऱ्या करतात.''

सॅक आणि वर्तमानपत्र राजूच्या हातात देत तो तरुण म्हणाला, ''मीही मुसलमान आहे. आणि तुम्हाला हवं असलेला दोन अक्षरी शब्द आहे 'प्रेम'. घृणा हा शब्द घातलात तर शब्दकोडं जुळत नाहीय.''

तो तरुण निघून गेला. आजारी आईला बघायला रिकव्हरी रूममध्ये जाता जाता राजूने मनाशी ठरवून टाकलं, उद्या 'डेझी'त गेल्यावर अफजलशी संवाद साधायला हवा. काय बोलणार होता, ते माहीत नव्हतं, पण बोलणार होता.

**'शब्दछक' या इंद्रनील सान्याल यांनी लिहिलेल्या बंगाली कथेचा हा अनुवाद. (संवाद प्रतिदिन, छुटी क्रोडपत्र १ मार्च २०२०) अनुवादिका सुमती जोशी या राज्य पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ लेखिका आहेत. त्यांची उत्क्रांती, बंगरंग, दैत्याचा बगीचा, मंत्र आदी स्वतंत्र तसेच अनुवादित पुस्तके प्रकाशित झाली आहेत.**

ईमेल : sumatijoshi154@gmail.com

## बोललेला शब्द लिहिलेला शब्द

**टिप फुले टिप...**

माझ्या संग्रहात एक 'इतिहासाचे झाड' आहे. त्याची काही आकर्षक फुले टिपली. जोहान होएझिंगा (१८७२–१९४५) हे जगप्रसिद्ध डच इतिहासकार. हे ते झाड. त्यांचा भारतीय साहित्य आणि संस्कृतीचा अभ्यास होता. पण त्यांचा खास विषय म्हणजे, युरोपीय इतिहास. त्यातही युरोपातील मध्ययुग ओसरण्याच्या काळाबद्दल त्यांनी लिहिले आहे. कोणत्याही युगाचा उदय जसा बोधक तसा अस्तही. रोमन साम्राज्याचा अस्त ४७६च्या सुमारास झाला. तेथपासून १४५३–१४९२ पर्यंतचा कालखंड, म्हणजे मध्ययुग असे म्हणायला हरकत नाही. तोवर कोलंबस अमेरिकेला पोचला होता. पण युरोपची स्थिती काय होती? युरोपात साक्षरतेचा दर म्हणजे, वाचण्या आणि लिहिण्याच्या क्षमतेचा दर १० टक्क्या पेक्षाही खाली होता. फक्त काही धर्मगुरू राजे, सरदार वगैरे वाचत असत. उरलेले ९० टक्के लोक निरक्षर!

त्याची कुळीमुळी या इतिहासवृक्षाने शोषली आहे, ती मजेदार की उदास करणारी? युरोपातील मध्ययुगीन समाजात बोललेल्या शब्दाचा हिंसक प्रभाव ना वाचता, ना लिहिता येणाऱ्या अज्ञानी मनावर होता. बौद्धिक अन्न न मिळाल्यामुळे कुपोषित मने झुंडीने ख्रिश्चन भिक्षूच्या प्रवचनाला हजर असत. वाचनसंस्कृती अजून खूपच दूर होती. हे युरोपभर घडत होते. राजसत्तेची परवानगी असल्याशिवाय चर्च बाहेर प्रवचने, व्याख्याने होत नसत. एकदा एका प्रवचनकाराने सरकारविरोधी शेरेबाजी केली, त्या बरोबर परवानगी काढून घेतली गेली. प्रवचने बंद करावी लागली. बोललेल्या शब्दाचा प्रभाव राजसत्तेला ठाऊक होता. १४२० साली पॅरिस येथील चर्चच्या सिमेट्रीत एका भिक्षूला दहा दिवस बोलण्याची परवानगी मिळाली होती. तो सकाळी ५ वाजता प्रवचनाला सुरुवात करत असे, दहा–अकरा वाजेपर्यंत बोलणे संपत असे. लोक झुंडीने बोललेला शब्द झेलण्यास उभे असत. ऐकताना बाप माणसे, बायका मुले सतत रडत असत. चोर चिलटे या भिक्षूच्या पायावर लोळण घेण्यास धडपडत. तर्कबुद्धीला पूर्ण फाटा देऊन, भावनांच्या ताणतणावांनी भारलेला तो काळ होता. चैनीच्या वस्तू, कलाकृती या निषिद्ध आहेत, असे एकदा भिक्षूने प्रवचनात सांगितल्याबरोबर झुंडीने घरातल्या अशा वस्तू आणून जाळून टाकल्या, फ्लॉरेन्समध्ये हे घडले. हिंसक कार्यकाळ होता तो. बोललेल्या शब्दाचा प्रभाव विलक्षण होता. झुंडी धार्मिक व्याख्यानाला जमल्या म्हणजे, गावातील सगळे व्यवहार ठप्प होत. धार्मिक आणि इतरही मिरवणुकांचा उन्माद होता. गावात कोणाला शिक्षा होणार असेल, तर झुंडी उत्साहाने हजर असत.

हे वाचत असताना 'नवी क्षितिजे'कार विश्वास पाटील (१९२८–२००२) यांचे झुंडीचे मानसशास्त्र (प्रभात प्रकाशन, मुंबई, नोव्हेंबर २०००) या पुस्तकाची आठव झाली. त्यात त्यांनी म्हटले आहे, ''झुंडीची बौद्धिक पातळी कधीही वरच्या दर्जाची नसते.'' मध्ययुगीन इतिहास वाचताना आजच्या काळातील साम्य स्थळे दिसली, सोशल मीडिया दिसला. झुंडीचे मानसशास्त्र या पुस्तकाच्या ब्लर्बमध्ये विश्वास पाटील यांनी नमूद केले आहे. ''झुंडीचा इतिहास हा एक जादूचा आरसा आहे. त्यातून 'काल' उलगडेल, 'आज' नव्याने समजेल, 'उद्या'चं भान येईल, सावध होता येईल...''

**– टिपक**

# आयुर्वेदिक औषध खरेदी विषयक दक्षता



डॉ. श्रीराम सावरीकर







**स**माजामध्ये आयुर्वेदिक औषधांची गणना घरगुती उपायात होत असल्यामुळे बहुसंख्य लोक आयुर्वेदिक औषधांची खरेदी व सेवन स्वयंप्रेरणेने करीत असल्याचे दिसून येते. त्यामुळेच आयुर्वेदिक औषध निर्माते त्यांच्या औषधांच्या विक्रीसाठी डॉक्टरांच्या सल्ल्यापेक्षा जाहिरातबाजीवर अवलंबून असतात. त्यातच आता बहुसंख्य आयुर्वेदिक औषधांचा समावेश आहारद्रव्यामध्ये झाल्यामुळे लोकांनी स्वयंप्रेरणेनेच आयुर्वेदिक औषधांचे सेवन करण्याला प्रोत्साहन मिळाले आहे. सोबतच आजच्या व्हॉट्सॲप, फेसबुक, इन्स्टाग्रॅम, एक्स आणि आता एआयच्या जमान्यात ही स्वयंप्रेरणा 'स्वयं' भोवती मर्यादित न राहता ती मीडियाप्रेमींच्या जगात वायुवेगाने पसरू लागली आहे. पण कोणत्याही औषधाचे डॉक्टरांच्या सल्ल्याविना सेवन धोकादायकच असते. त्याला आयुर्वेदिक औषध अपवाद कसे असेल?

**सा**मान्यतः औषधाच्या दर्जाबाबत औषध विक्रेते, ग्राहक इतकेच काय पण डॉक्टरांच्या मनांतही काही शंका असत नाहीत. परंतु आयुर्वेदिक औषधाबाबत अशी परिस्थिती नाही. आयुर्वेदिक औषध खरेदी करणारा ग्राहक बहुतेक वेळा स्वयंप्रेरित असतो. तो त्याला माहीत असलेल्या आयुर्वेदिक औषधाची तोंडी मागणी विक्रेत्याकडे करत असतो. हा विक्रेता अनेकदा किराणा दुकानदारही असतो. तो ग्राहकाने मागितलेल्या नावाचे त्याच्याकडे उपलब्ध असेल त्या कंपनीचे अधिकृत अथवा बरेचदा अनामी उत्पादकाचे अनधिकृत औषध ग्राहकाला देत असतो. वास्तविक अनामी उत्पादकाचे वा औषध निर्मितीचा परवाना नसलेल्या उत्पादकाचे औषध विक्रीसाठी ठेवणे हा कायद्याने गुन्हा आहे. परंतु अनेक अनामी निर्मात्यांच्या अनधिकृत आयुर्वेदिक औषधांची खुल्या बाजारात विक्री होत असल्याचे नियमितपणे आढळून येते.

या अशा अनधिकृत औषधांच्या पाकिटावर ना निर्मात्याचे नाव असते, ना अन्य काही माहिती. जनमानसात मोठ्या प्रमाणात प्रचलित असलेली सुंठ, त्रिकटु, त्रिफला, सितोपलादि इत्यादि चूर्णे, वेगवेगळ्या प्रकारची केशवर्धक आणि वेदनाशामक तेले, सांधेदुखीवरील मलमे, च्यवनप्राशसारखी लोकप्रिय उत्पादने अशा अनधिकृत विक्रीमध्ये आघाडीवर असतात. त्यांच्या विक्रीवर कुणाचेच नियंत्रण नाही. अनेकदा यातील अनेक उत्पादने लोणच्या पापडासारखी घरगुती तयार करून बाजारात विक्रीसाठी ठेवली जातात. बरेचदा ती अंतर्गत प्रसारण पद्धतीने विकली जात असतात. आयुर्वेदिक औषधाची विक्री करण्यासाठी ते तयार करण्याच्या परवान्याची आवश्यकता असते. हे अशी विक्री करणाऱ्या लोकांच्या गावीही नसते.

आयुर्वेदिक औषधांच्या अशा अनियंत्रित बाजारामधून आयुर्वेदिक औषधांची स्वयंप्रेरणेने वा डॉक्टरांच्या सल्ल्याने खरेदी करताना खरेदीपूर्वी ते औषध परवानाप्राप्त औषध निर्मात्याने बनवलेले अधिकृत आहे की नाही, हे ग्राहकांनी पाहणे अत्यंत आवश्यक आहे. डॉक्टरांनी चिठ्ठीवर लिहून दिलेले औषधही किराणा दुकान, फूटपाथ, घरगुती तयार केलेले वा ऑन लाइन खरेदीद्वारे खरेदी न करता अधिकृत औषध दुकानातूनच घेणे आवश्यक आहे. औषध खरेदी करताना त्यावरील लेबल तपासून घेणे आवश्यक आहे. हे लेबल कसे असावे, यासंबंधी औषधी व प्रसाधन कायद्याने नियम उद्धृत केले आहेत. हे नियम पाळणे आयुर्वेदिक औषधी उत्पादकास कायद्याने बंधनकारक आहे.

**आयुर्वेदिक औषधांच्या लेबल संबंधीचा कायदा**

औषधी व प्रसाधन नियम १९४५च्या कलम १६१ अन्वये प्रत्येक आयुर्वेदिक औषधाच्या लेबलवर पुढील माहिती असणे कायद्याने अनिवार्य आहे.

१. औषधाचे नाव

२. औषधातील प्रत्येक घटक द्रव्याचे नाव, त्याचे वनस्पती शास्त्रोक्त नाव, त्याचे औषधात वापरलेले अंग उदा. पान, मूळ, खोड इ., त्या प्रत्येक घटक द्रव्याचा आयुर्वेदिक ग्रंथोक्त संदर्भ व प्रत्येकाचे मेट्रिक मापन पद्धतीनुसार औषधातील प्रमाण

३. औषध निर्मात्याचे नांव व संपूर्ण पत्ता

४. पुढीलपैकी एका पद्धतीने दर्शविलेला औषध निर्मिती परवान्याचा क्रमांक

Manufacturing Licence Number... or Mfg. Lic. No. ... or M.L. ...

५. औषधाचा विशिष्ट बॅच क्रमांक

६. औषध निर्मितीचा दिनांक व त्याची एक्स्पायरी डेट

७. 'आयुर्वेदिक औषध' असे स्पष्ट छापील शब्द

८. बाह्य उपयोगासाठी औषध असेल तर 'FOR EXTERNAL USE ONLY' अशी स्पष्ट सूचना.

औषधामध्ये आरोग्यास घातक ठरू शकणारे कायद्याच्या शेड्यूल इ (१) मध्ये नोंद केलेले विषारी घटक असतील तर लेबलवर दर्शनी भागावर हे औषध डॉक्टरांच्या निगराणीखालीच घेणे आवश्यक आहे, अशी ताकीद पुढीलप्रमाणे हिंदी व इंग्रजी दोन्ही भाषांमध्ये ठळकपणे छापणे आवश्यक आहे.

Caution: 'To be taken under medical supervision'

वास्तविक अशी औषधे लोकांना डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय मिळताच कामा नयेत.

औषधातील घटक द्रव्यांची संख्या जास्त असल्यामुळे आयुर्वेदिक औषधाच्या पाकिट, डबा अथवा बाटलीच्या दर्शनी भागावर त्यांची माहिती देणे शक्य नसेल तर ती माहिती छापलेला कागद औषधांच्या खोक्यामध्ये ठेवणे आवश्यक आहे.

**आयुर्वेदिक औषधांची वापरयोग्य सीमा**

आयुर्वेदिक औषधे जितकी जुनी तितकी चांगली त्यामुळे

त्यांना वापरयोग्य सीमा-एक्स्पायरी डेट नसते, असा सर्वसाधारण समज आहे. हा समज पूर्णपणे खोटा आहे. औषधी व प्रसाधन नियमाच्या कलम १६१ बी २ (१) मध्ये आयुर्वेदिक औषधांची त्यांच्या प्रकारानुसार वर्गवारी करून त्या प्रत्येक वर्गाचा त्याच्या निर्मिती दिनांकापासून सामान्य कार्यकालावधी (शेल्फ लाइफ) नमूद केला आहे. हा कालावधीही वस्तुस्थितीवर आधारित नसल्याचे निदर्शनास आल्यामुळे भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाने १९ फेब्रुवारी २०२५ रोजी जारी केलेल्या मसुदा अधिसूचनेमध्ये आयुर्वेदिक औषध निर्मात्यांनी प्रत्येक आयुर्वेदिक औषधाच्या कार्यकालावधीचा (शेल्फ लाइफ) अभ्यास करून त्याची एक्स्पायरी डेट ठरवून ती औषधाच्या लेबलवर छापण्याच्या सूचना दिल्या आहेत. या मसुद्याचे अद्याप कायद्यात रूपांतर झालेले नाही.

**आयुर्वेदिक औषधांची अनिर्बंध विक्री व वितरण**

आयुर्वेदिक औषधांची अनिर्बंध व अनियंत्रित विक्री हा त्यांच्या सुरक्षित सेवन कार्यक्रमातला मोठा अडथळा आहे. सामान्यतः ॲलोपॅथिक औषध विक्रीचे दुकान चालवण्यासाठी औषधविक्रीचा परवाना आवश्यक असतो. 'फार्मसी कौन्सिल'कडे नोंदणी केलेल्या फार्मसी विषयाच्या पदवी वा पदविकाधारक व्यक्तीलाच असा परवाना मिळू शकतो. म्हणजेच औषध दुकान चालवणाऱ्या प्रत्येक व्यक्तीकडे फार्मसी कौन्सिलचे नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. पण आयुर्वेदिक औषधांच्या विक्रीसाठी हा नियम लागू नाही. आयुर्वेदिक औषधांची विक्री कुणीही अगदी निरक्षर व्यक्तीही कुठेही बसून करू शकते. म्हणूनच गावोगावीचे फूटपाथ, गल्ली बोळातील किराणा दुकानांत धुळीने माखलेल्या कपाटाच्या फळीपासून ते मोठमोठे मॉल्स, डिपार्टमेंटल स्टोअर्स, एअरपोर्टसच्या लाउंज मधील काचेच्या सुंदर सुंदर शेल्फवर आयुर्वेदिक औषधे सजलेली आपल्याला दिसत असतात. त्यांच्या विक्रीवर कायदेशीर बंधन नाही.

औषध व प्रसाधन अधिनियम कलम ३३ इ इ सी (बी) अन्वये अधिनियमातील कलमांचा भंग करून बनवलेल्या आयुर्वेदिक औषध विक्रीवर कायदेशीर बंधने आहेत. पण या उपकलमाव्यतिरिक्त कायद्यामध्ये आयुर्वेदिक औषध विक्री व वितरणासंबंधात एकही कलम वा उपकलम नाही. याही नियमाचे पालन होते की नाही, हे पाहणारी राज्य स्तरावरील आयुर्वेदिक औषध नियंत्रण यंत्रणा केवळ कागदोपत्री अस्तित्वात असल्यासारखी आहे. अनेक राज्यांमध्ये ही यंत्रणा अस्तित्वातच नाही आणि जिथे आहे तिथे तुटपुंज्या आणि आयुर्वेद क्षेत्रातील शैक्षणिक पात्रता नसणाऱ्या मनुष्यबळाच्या हाती ही यंत्रणा आहे. यामुळे ती अतिशय दुर्बल आहे.

महाराष्ट्रासारख्या १३ कोटीपेक्षा अधिक लोकसंख्येच्या पुरोगामी राज्यामध्येही जिथे ३००० पेक्षा अधिक आयुर्वेदिक औषधी उत्पादक व एक लाखापेक्षा अधिक आयुर्वेदिक डॉक्टर्स कार्यरत आहेत तिथेही आयुर्वेदिक औषध नियंत्रकाचे पदच अस्तित्वात नाही. महाराष्ट्र औषध प्रशासनामध्ये तांत्रिक अधिकारी (आयुर्वेद) या नावाचे एकच पद आहे. हे पदही रिक्त असून त्याचा अतिरिक्त कार्यभार गेल्या चार-पाच वर्षापासून आयुर्वेद महाविद्यालयातील एका अध्यापकाकडे आहे. यावरून आयुर्वेदिक औषध नियंत्रणाचे महाराष्ट्र सरकारला किती गांभीर्य आहे हे दिसून येते.

सध्या प्रचलित नियमानुसार राज्य औषध नियंत्रक प्रशासनाच्या आयुर्वेद विभागात नियुक्त व कार्यरत औषध निरीक्षकांकडे आयुर्वेद क्षेत्राशी संबंधित कोणतीही शैक्षणिक अर्हता असण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे या निरीक्षकांना आयुर्वेदिक औषधांचे कुठलेच ज्ञान नाही. या समस्येवर मात करण्यासाठी भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाने १९ फेब्रुवारी २०२५ रोजी जारी केलेल्या मसुदा अधिसूचनेमध्ये आयुर्वेद औषध निरीक्षक, आयुर्वेद वैद्यक शास्त्र किंवा आयुर्वेद फार्मसी विषयाचा विद्यापीठ मान्यताप्राप्त पदवीधारक असणे अनिवार्य करण्यात आले आहे. या मसुद्याचे अद्याप कायद्यामध्ये रूपांतर झालेले नाही. पण भारत सरकारचे हे पाऊल नक्कीच स्वागतार्ह आहे. या नियमांचे राज्य सरकारांनी काटेकोर पालन केले, तर राज्य स्तरावरील आयुर्वेदिक औषध निर्माण, वितरण व विक्रीवर नियंत्रण ठेवण्याच्या दिशेने हे पहिले महत्त्वाचे पाऊल ठरेल.

**आयुर्वेदिक डॉक्टरांकडून होणारे आयुर्वेदिक औषधांचे वितरण**

खुल्या बाजारातून औषध विकत घेण्याशिवाय आयुर्वेदिक डॉक्टरकडे जाणाऱ्या रूग्णांना त्या डॉक्टरजवळील आयुर्वेदिक औषधांची सुटी चूर्णे आणि गोळ्या छोट्या-छोट्या पुड्यामध्ये बांधून दिली जात असतात. ही चूर्णे वा गोळ्या कोणत्या आहेत. याची माहिती त्या रूग्णाला अजिबात नसते. या पुड्यांवर डॉक्टर स्वतःच्या सांकेतिक भाषेमध्ये काही अक्षरे वा क्रमांक

लिहीत असतात. या नोंदीशिवाय नुसत्या गोळ्या अथवा चूर्ण त्या डॉक्टरला परत दाखवले तर त्यालाही ती कोणती औषधे आहेत, हे कळत नाही. वास्तविक अशाप्रकारे सुटी निनावी औषधे रूग्णांना देणे, हे वैद्यकीय नीतिमत्तेला धरून नाही. आपण कोणते औषध सेवन करीत आहोत, हे ज्ञात असणे हा प्रत्येक रूग्णाचा हक्क आहे. बरेच आयुर्वेदिक डॉक्टर रूग्णांना द्यावयाची औषधे स्वतः तयार करीत असतात. तशी कायदेशीर परवानगी त्यांना आहे. त्यातच एकापेक्षा अधिक आयुर्वेदिक औषधे विशेषतः चूर्णे एकत्र मिसळून त्या मिश्रणाच्या मात्रेनुसार पुड्या तयार करून रूग्णाला देण्याची आयुर्वेदिक डॉक्टरांची पद्धत असते. अशा वेळी औषधाच्या प्रत्येक पुडीवर त्यातील सर्व औषधांची नावे लिहिणे शक्य नसते. आयुर्वेदिक डॉक्टरकडून वा दवाखान्यातून केले जाणारे सुट्या आयुर्वेदिक औषधी चूर्णांचे व गोळ्यांचे वितरण हा अत्यंत दुर्लक्षित विषय आहे. हल्ली स्ट्रिप पॅकिंगमुळे वटीचे (टॅबलेट) डोजप्रमाणे वितरण होऊ लागले आहे. तरीही गुटी (पिल्स) प्रकारातील गोळ्या डब्यात एकत्रित भरूनच वितरित केल्या जात असतात. तसेच चूर्णे आणि रसौषधी प्रकारातील औषधेही छोट्या मोठ्या डबा अथवा बाटलीमधूनच वितरित केली जात असतात. अशा वितरणामुळे औषधाच्या मात्रेवर नियंत्रण राहत नाही. आयुर्वेदिक औषधांचे युनिट पॅकिंग संबंधित औषधांच्या एका वेळेच्या कमीतकमी आणि अधिकातअधिक मात्रेनुसार होणे अत्यंत आवश्यक आहे. वास्तविक आयुर्वेदिक औषधी निर्मात्यावर अशा युनिट पॅकिंगची सक्ती कायद्यानुसार असायला हवी.

**आयुर्वेदिक औषधांचा वाढत जाणारा अनियंत्रित व्यापार**

एका आर्थिक पाहणी अहवालानुसार २०२४मध्ये आयुर्वेदिक औषधांचा भारतातील व्यापार ८००३ कोटी रुपये नोंदला गेला आहे. वार्षिक १३ टक्के वाढीने तो २०३४मध्ये २७, ७०० कोटी रुपयांपर्यंत पोहोचेल असा अंदाज आहे. हाच वैश्विक व्यापार २०२५मध्ये २०.४२ बिलियन अमेरिकन डॉलर्स होता. तो २०३३पर्यंत ८५.३३ बिलियन अमेरिकन डॉलर्स होणे अपेक्षित आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात विकल्या जाणाऱ्या उत्पादनाची विक्री व वितरण अनियंत्रित ठेवणे समाजस्वास्थ्यासाठी अत्यंत घातक आहे. असे असले तरी या गंभीर परिणामाबाबत सरकार आणि समाज या दोन्ही स्तरावर प्रचंड उदासीनता म्हणण्यापेक्षा अज्ञान आणि म्हणूनच निष्क्रियता आहे. ही निष्क्रियता विशेषतः राज्य स्तरावर अधिक दिसून येते.

**आयुर्वेदिक औषध विक्री व वितरणाचे कायदेशीर नियमन आवश्यक**

ॲलोपॅथिक औषधांच्या विक्री व वितरणाच्या नियमनासंदर्भात औषध व प्रसाधन नियम १९४५मध्ये कलम ५९ ते कलम ६६ अशी आठ कलमे व उपकलमांचा एक स्वतंत्र भाग आहे. त्या कलमांप्रमाणेच औषध व प्रसाधन नियमामध्ये आयुर्वेदिक औषध विक्री व वितरणाच्या नियमनासाठी स्वतंत्र नियम करणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रथम फार्मसी कौन्सिलकडे आयुर्वेद औषध निर्माणशास्त्राच्या शैक्षणिक अर्हताधारकांची नोंदणी करून केवळ त्यांनाच आयुर्वेदिक औषध विक्री व वितरणाचा परवाना देण्याची तरतूद करणे आवश्यक आहे. असे नियमन आयुर्वेदिक औषधांचा सुरक्षित व परिणामकारक उपयोग होण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल ठरेल यात काही शंका नाही. कारणे कोणतीही असोत आयुर्वेदिक औषधांचा स्थानिक व वैश्विक व्यापार वर्षागणिक पटीच्या प्रमाणात वाढत चालला आहे. अशा पार्श्वभूमीवर या औषधांच्या निकृष्ट दर्जामुळे लोकांच्या आरोग्यावर होणारे घातक दुष्परिणाम थांबवण्यासाठी आयुर्वेदिक औषध उत्पादन, विक्री व वितरणासंबंधात औषध व प्रसाधन नियम १९४५मध्ये आमूलाग्र बदल करण्याची नितांत निकड आहे. याची दखल सरकार घेईल, तो सुदिन उजाडण्याची वाट पाहणे एवढेच आपल्या हाती आहे.

**डॉ. श्रीराम सावरीकर हे एम. डी. (आयु), पीएच. डी. असून, आयुर्वेद प्राध्यापक तसेच गुजरात आयुर्वेद विद्यापीठाचे माजी कुलगुरू, भारत सरकारचे माजी आयुर्वेद सल्लागार आणि भारत सरकारच्या आयुर्वेद फार्माकोपिया समितीचे माजी अध्यक्ष राहिले आहेत. त्यांची रसचंडांशु – हिन्दी टीका, शारंगधर संहिता – इंग्रजी टीका – तीन खंड, अर्वाचीन आयुर्वेदायन, आयुर्वेद – फाउंडेशन ऑफ हेल्दी लाइफ, इंग्रजी, वैद्यकीय सांख्यिकी शास्त्र – हिंदी आदी साहित्य प्रकाशित झाले आहे. संपर्क :** sssavrikar@gmail.com

(पान ६ वरून)
मिळाली. या रकमेचा विनियोग ऊर्जेच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्यासाठी करण्याचा ठराव ग्रामसभेत मंजूर करण्यात आला.

त्यानंतर महावितरणच्या अधिकाऱ्यांना कल्पना देऊन गावकरी, महावितरणचे अधिकारी व कर्मचारी आणि टाटा सोलरच्या कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नांतून साकारले गेले, राज्यातील पहिले सौर गाव. आपले गाव उर्जेच्या बाबतीत स्वयंपूर्ण असावे, गावच्या लोकांना उत्तम सोयीसुविधा मिळाव्यात व सर्वात महत्त्वाचे म्हणजे, कर्ब उत्सर्जन कमी करण्यासाठी आपल्या गावाने प्रयत्न करावेत, या भावनेतून कार्यरत असलेले गावचे सरपंच रवींद्र माने यांच्या आग्रही भूमिकेमुळे व अविरत प्रयत्नांमुळे पहिले सौर गाव होण्याचा बहुमान मान्याच्या वाडीला मिळाला आहे.

**कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी अपारंपरिक ऊर्जा स्त्रोत**

वाडीच्या उर्जेच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्याच्या वाटचालीबद्दल सरपंच रवींद्र माने सांगतात की, ''माझी वसुंधरा अभियानाच्या माध्यमातून आम्ही बरेच उपक्रम राबवले. पण, त्याआधीही पेपरलेस लाइट बिल, वृक्षारोपण, बोलक्या भिंती असे उपक्रमही आमच्या ग्रामपंचायतीने राबवले. कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी जगभरातून अपारंपरिक ऊर्जा स्त्रोत वापरण्यावर भर देणे गरजेचे आहे. हेच लक्षात घेऊन आम्ही शंभर टक्के सौर उर्जेवर आधारित चालणारे गाव करण्याचा निर्णय घेतला...''

गावच्या वंदना पाचुपते या सौर प्रकल्पाबद्दल 'बाईमाणूस'शी बोलताना म्हणतात की, ''चक्कीतून पीठ दळणं, पाणी भरणं यांसारखी घरगुती कामे आता वीज नाही या कारणाने अडणार नाहीत. आम्हा महिलांना याचा त्रास होणार नाही. याआधी जे काही चार-पाचशे रूपये लाइट बिल यायचं तेवढी आता बचत होईल. बाकी लहान सहान कामांना ते पैसे उपयोगाला येतील.''

**वीजदरवाढीला कायमस्वरूपी पर्याय**

विजेची बचत म्हणजेच विजेची निर्मिती असे महावितरणचेही घोषवाक्य आहे. मान्याच्या वाडीने मात्र केवळ विजेच्या बचतीतून विजेची निर्मिती न करता अपारंपरिक ऊर्जा स्रोतांचा आधार घेत वीजनिर्मिती केली आहे. प्रत्येक घराच्या छतावर बसवण्यात आलेल्या सौर पॅनल मधून एक किलोवॅट तर शेतातील विहिरींवर बसवण्यात आलेल्या सौर पॅनल मधून चार किलोवॅट विजेची निर्मिती होणार आहे.

मान्याची वाडीमध्ये शंभर किलोवॅट वीजनिर्मितीचा प्रकल्प उभारला जात आहे. यातून रोज पाचशे युनिट विजेची निर्मिती होणार आहे. गावाची गरज सध्या तीनशे युनिट असून, उर्वरित दोनशे युनिट विजेची महावितरणला विक्री केली जाणार आहे. गरजेपुरती वीज वापरल्यानंतर उरलेली वीज महावितरणला विकली जाणार आहे. यासाठी 'प्रधानमंत्री सूर्यघर' योजनेचीही मदत घेतली जाणार आहे. या सूर्यघर योजनेअंतर्गत मिळणाऱ्या सबसिडीचा उपयोग सोलर पॅनल बसवण्यासाठी होणार आहे.

महावितरणच्या मदतीने हा प्रकल्प राबवण्यात आल्याने सूर्यप्रकाश नसल्यास काय? याची चिंता नाही. जेव्हा सौर पॅनलमधून सूर्यप्रकाशाच्या अभावी वीज निर्मिती झाली नाही, तर महावितरणची वीज उपलब्ध असेल, अशी व्यवस्था करण्यात आली आहे. तीच वीज जास्त प्रमाणात तयार झाली तर महावितरणला विक्री केली जाईल. वाडीतील ११८ घरांच्या छपरांवर सोलर पॅनल बसवण्याचे काम ८० टक्क्यांपर्यंत पूर्ण झाले आहे.

महावितरणचे १०४ ग्राहक या गावात आहेत. त्यापैकी रस्त्यावरील दिव्यासहित, ग्रामपंचायत, अंगणवाडी, प्राथमिक शाळेसहित सर्वच ग्राहकांनी सोलर पॅनल बसवले आहेत. विजेची दरवाढ, भारनियमन या समस्येतून वाडीतील ग्रामस्थांची कायमची सुटका झाली आहे. खऱ्या अर्थाने राज्याच्या विकासाला चालना देणारा हा पारंपरिक ऊर्जा प्रकल्प आहे. कोयनेवरील प्रकल्पापासून काहीशा अंतरावर असलेला पाटण तालुक्यातील मान्याचीवाडी गावचा सौर ऊर्जा प्रकल्प राज्याच्या आगामी काळातील अपारंपरिक ऊर्जेच्या विकासाला चालना देणारा व अनेक गावांना प्रोत्साहन देणारा ठरणार आहे.

***

## ताटात भरडधान्य, हाती पैसा...

ग्लोबल वॉर्मिंगचा केवळ पाण्याच्या उपलब्धतेवर दूरगामी परिणाम होतोय असं नाही, तर शेती आणि अन्नसुरक्षेवरही याचा परिणाम होऊ लागला आहे. आजच्या समृद्धीसाठी कायमचा कफल्लकपणा ओढवून घेतला जात आहे. अशा स्थितीत, या इन्स्टन्ट जमान्यातही काही गावखेड्यांत, कडे-कपारींत दडलेल्या आदिवासी पाड्यांत त्या शहाणपणाच्या खाणाखुणा आजही शिल्लक आहेत. या मातीतलं शुद्ध बियाणं त्या दुर्गम भागांत जपलं जात आहे. जमिनीत रसायनांची भेसळ

न करता जुन्याच पद्धतीने वाढवलं जात आहे.

ज्वारी, बाजरी, नाचणी, वरई, राळा, जव, कोडो, साम, बाजरी, सवा, लहान धान्य किंवा कुटकी, कांगणी ही भरड धान्य म्हणून आपल्याकडे ओळखली जातात. या भरड धान्यांच्या संदर्भात आपण काहीतरी करायला हवं असं, मुलाच्या अपघाती मृत्यूनंतर उभारी घेण्याच्या प्रयत्नांत मुलाच्या नावे 'सौरभ प्रतिष्ठान'ची स्थापना करून पर्यावरण संवर्धन क्षेत्रात कार्यरत झालेल्या नीलिमा जोरवर यांना वाटायला लागलं. पण नेमकं काय करायचं, ते सुरुवातीला लक्षात येत नव्हतं. पण उत्तर हळूहळू सापडत गेलं, ते कळसूबाईच्या परिसरातल्या काही गावांत.

अहमदनगर जिल्ह्यातील अकोले हा तोच तालुका रतनगड, मदनगड, कुलंग, आजोबागड, बितनगड, पाबरगड, विश्रामगड, हरिश्चंद्रगड यांसारखे किल्ले, महाराष्ट्रातील सर्वोच्च शिखर कळसूबाई, भंडारधारा अशी अकोले तालुक्याची ओळख. या सर्व गडांच्या पायथ्याशी महादेव कोळी आणि ठाकर आदिवासी समाजाची वस्ती. मुख्य व्यवसाय शेतीचा. नाचणी आणि वरई ही सुरुवातीची पिकं असायची, परंतु त्याला योग्य भाव मिळत नसल्याने शेतकरी भात आणि गव्हाकडे वळले.

**डोंगरउतारावरची शेती आणि चिंतातूर शेतकरी**

एरवी, निसर्गाच्या लहरीपणामुळे तिथला शेतकरी कायम चिंतेत असायचा. त्यात डोंगर उतारावरची शेती असल्यामुळे इथे पावसात एकदाच पीक घेतलं जातं. भात, नाचणी, वरी यावर त्यांचा भर असला तरी नाचणी त्यांच्या आहारातून गेली होती. त्यामुळे वर्षातून एकदा येणाऱ्या भात आणि वरीवर ते जगत. त्यातही खाचरात भात पिकवला जाई आणि डोंगरउतारावर वरी. भात घरी खाल्ला जात असे आणि वरी विकली जात असे. पण तिला फारसा भाव मिळत नाही, ही इथल्या लोकांची समस्या होती. नीलिमा जोरवर यांनी तिथल्या काही गावात जायला सुरुवात केली होती. खरंतर या भागात त्यांना पाणी प्रश्नावर काम करायचं होतं. पण त्याऐवजी शेतीच्या प्रश्नांवरच स्थानिक लोकांशी चर्चा व्हायला लागली. नीलिमा यांच्या पुढाकाराने तिथल्या महिलांचा 'कळसूबाई महिला शेतकरी बचत गट' स्थापन करण्यात आला.

सेंद्रिय शेतीचं महत्त्व त्यांनी तिथल्या स्थानिक लोकांना पटवून द्यायला सुरुवात केली. हो-नाही करत करत काही शेतकरी त्यासाठी तयार झाले. २०१४ मध्ये त्यांनी जुनी बियाणं घेऊन नाचणी, वरी, देशीभात, जिरवेल लावायला सुरुवात केली. ते पीक यायला लागलं. पण त्याचा खरा परिणाम जाणवला, २०१८ मध्ये. त्या वर्षी या परिसरात भाद्रपदानंतर एक थेंबही पाऊस पडला नाही. हायब्रिड बियाणं, खतं या सगळ्यावर अवलंबून असलेल्यांची सगळी गणितं चुकली. त्यांचं पीक वाळून गेलं. पण पारंपरिक बियाणं लावलेल्यांना मात्र कमी पावसातही ८० टक्के पीक हाताला लागलं.

**अकोले तालुक्याच्या 'बीज'माता**

ज्वारी, बाजरी ही इथली सर्वमान्य पिके असले तरी इतर जी भरडधान्यं आहेत, ती बहुतांशी आदिवासी पट्ट्यात जोपासली गेल्याचे आढळते. त्याचीही कारणे वेगवेगळी आहेत. १९६० नंतर हरित क्रांतीपाठोपाठ जे मोठे बदल भारतीय शेतीपद्धतीत झाले, पाटपाण्याची सोय ज्या प्रकारे वाढली त्या प्रकारे लोकांचे बागायती क्षेत्रही वाढत गेले. परिणामी, मिलेट मागे पडले. म्हणजे साधारणतः १९४०-५० च्या दरम्यान अकोले भागात 'डेंगळी' नावाचे पीक हे मिलेट पीक असल्याचे लक्षात आले.

जून-जुलैमध्ये खाण्याची टंचाई होत असे, त्यावेळी पहिल्या पावसात टाकलेले हे बियाणे दोन महिन्यात उगवायचे व लोकांना टंचाईच्या काळात धान्य उपलब्ध व्हायचे, म्हणूनच सर्वत्र या बियाणांची लागवड होत असे. शिवाय पाऊस कमी असला तरी पीक उगवायचे. नंतर प्रवरेचे पाणी सर्व शिवारात फिरले, विजेची जोडणी आली आणि ही पिके मागे पडत गेली. असेच काहीसे इतरही भागात झाले. जसजसे पाटपाणी आले तसतशी शेती बदलायला लागली आणि भरडधान्य मागे पडत गेले.

**रोजगाराची शाश्वती मिळाली...**

नीलिमा जोरवर म्हणतात, ''मी गावागावांत जाऊन सगळ्या महिलांना गोळा करायला सुरूवात केली. अगोदर देशी भात आणि भरड धान्य यांचे महत्त्व, त्याचे आर्थिक गणित आणि मग करवंद, आंबा, जांभूळ या रानमेव्याची वेगवेगळी प्रक्रिया हे त्या महिलांच्या गळी उतरवलं. फळांवर प्रक्रिया कशी करायची, करवंदापासून रस कसा तयार करायचा, कैरीपासून लोणचं कसं तयार करायचं, हे सगळं त्यांना शिकवलं आणि अशाप्रकारे हळूहळू कामाला सुरुवात झाली,'' नीलिमा जोरवर कळसूबाई महिला शेतकरी बचत गटाच्या जन्माची कथा सांगत होत्या.

२०१३ मध्ये कळसूबाईच्या पायथ्याशी असलेल्या बारी





*पर्यावरणाचा समतोल राखणाऱ्या जादुई धान्याने कळसूबाई परिसरातल्या महिला शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान फुलवले आहे...*

गावात स्थानिक शेतकऱ्यांच्या मदतीने नीलिमाने राज्यातले पहिले भरडधान्य प्रक्रिया केंद्र सुरू केलं. या गावात पर्यटकांचा ओढा अधिक असल्याने मग त्यांची राहण्याची व्यवस्था करणे आणि जेवणात पारंपरिक खाद्याचा वापर करण्यास गावातल्या महिलांनी सुरूवात केली. नाश्त्यामध्ये वरईचा उपमा, जेवणामध्ये नाचणीची भाकरी, करवंदाची कढी, फणसाची भाजी हे सगळं पारंपारिक खाद्य तिथले शेतकरी पर्यटकांना खाऊ घालायला लागले. पर्यटकांनाही ते आवडलं आणि स्थानिक महिलांना रोजगार मिळाला.

नीलिमा जोरवर यांनी सलग तीन वर्षे भरडधान्य शिबिरं घेतली, तरूणांना सोबत घेऊन निसर्ग संवाद कार्यक्रम सुरू केला. जैवविविधतेबाबत गावागावांत जाऊन पथनाट्य करणे, जैवविविधतचे महत्त्व पटवून सांगणे हे करत असतानाच त्यांनी राज्यात भरड धान्यांची किती बी बियाणे आहेत, याचे एक 'सीडमॅपिंग' केलं.

**बीज बँक आकारली**

पहिल्या वर्षी कळसूबाई महिला शेतकरी बचत गटाकडे १७ वेगवेगळ्या प्रकाराची बी-बियाणे जमा झाली. मग तिथेच नीलिमा जोरवर यांनी बीज बँक सुरू केली. आज सबंध राज्यात ती एकमेव बीज बँक आहे. बीज बँकेमुळे तेथील भागांमध्ये नाचणीचे पीक पुन्हा वाढलं. देशी भात असेल राळा असेल, या सगळ्या गोष्टी तिथल्या शेतात पिकू लागल्या. भरडधान्य पुन्हा त्या लोकांच्या ताटात आले.

एकूण ९ प्रकारची मुख्य भरड धान्य आज कळसूबाई मिलेटचा भाग आहेत. त्यासाठी वरई या धान्याबरोबर राळा, बर्टी, नाचणी, सावा, कोदो अशी सर्वच धान्य पिकवणारे शेतकरी जोडण्यात आले. सप्टेंबर २०२० मध्ये 'कळसूबाई मिलेट'चे 'कळसूबाई मिलेट उत्पादक शेतकरी कंपनी'त रूपांतर झाले. अहमदनगर, नाशिक व धुळे भागातील आदिवासी शेतकरी या कंपनीचे सर्व ३०० नोंदणीकृत सभासद आहेत.

त्यातही २३० सभासद महिला आहेत. हे सर्व शेतकरी अगदीच तुकड्यात आपली शेती करतात. हे सर्व शेतकरी भरड धान्य पिकवतात. पारंपरिक, रसायनेविरहित शेती करूनदेखील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले आहे. २०१४पासून रसायन न वापरता केलेल्या शेतीमुळे परिसरातील इतर शेतकरी त्याचे अनुकरण करत आहेत. ग्राहकांसाठी कळसूबाई ७० पेक्षा जास्त नैसर्गिक उत्पादने पुरवत आहे.

नीलिमा जोरवर यांनी सुरू केलेल्या या उपक्रमाच्या लाभार्थी असलेल्या मंदा बुरंगे यांनी यावर समाधान व्यक्त केले. कळमुस्ता गावात राहणाऱ्या मंदा म्हणतात, ''आम्ही पूर्वी भरड धान्याची शेती करायचो. जेव्हापासून रेशनच्या दुकानावर गहू, तांदूळ मिळायला लागला, तेव्हा हळूहळू भरडधान्याची शेती करणं आम्ही कमी केलं आणि आमच्या शेतातही गहू, तांदूळ पिकवू लागलो. कधी पाऊस इतका जास्त यायचा की या पिकांचं नुकसान व्हायचं आणि कधी पाऊसच पडायचा नाही तर काय खावं हा प्रश्न असायचा. मात्र,

भरडधान्याची ही पिकं कोणत्याही परिस्थितीत टिकणारी आहेत. आरोग्यासाठीही तेवढीच चांगली आहे. त्यामुळे आम्ही पुन्हा नाचणी, राळा, वरईचे पीक घ्यायला सुरुवात केली. आज आम्ही घरातदेखील भरडधान्य खातो आणि बाजारातही विकतो. आता पाऊस असो वा नसो, आमच्या ताटात भरडधान्य पण असतं अन् हाती पैसाही...

दिनाबाई गांगड या देखील कळसूबाई शिखराच्या पायथ्याशी असणाऱ्या उडदावने गावात राहतात. 'बाईमाणूस'शी बोलताना त्या सांगतात की, आमची खडकाची जमीन असल्याने भरडधान्याशिवाय आम्हाला पर्याय नाही.

नाचणी आम्ही घरात पण खातो आणि कळसूबाई मिलेट कंपनीमध्ये त्या भरडधान्यापासून वेगवेगळे पदार्थ पण बनवतो. कंपनीमध्ये जेव्हापासून काम करते, तेव्हापासून थेट माझ्या हातात पैसे यायला लागलेत. भारी वाटतं. कोणाला पैसे मागण्याची गरज पडत नाही. दुखायला लागलं, की स्वतः दवाखान्यात जाते गोळ्या औषधी घेऊन येते. नातवांना काही लागलं ते घेऊन देते. आपल्या कामाचे दोन पैसे हातात आले तर अजून काय पाहिजे.''

इतरवेळीसुद्धा ज्या भागात शेतीला पाण्याची सोय नाही अशा कोरडवाहू, हलक्या जमिनीत मिलेट या पिकांचे चांगले उत्पन्न मिळते. याला पाणी कमी लागते, खते लागत नाही तसेच शेतकऱ्याला हे पीक हमखास उत्पन्न मिळवून देते. हे पीक कोणत्याही हवामानात येते. या पिकासोबत शेतकऱ्यांना कडधान्य, तेलबिया, भाजीपाला अशीही पिके घेणे शक्य असल्याने, त्यांना व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना उपजीविकेची शाश्वतता मिळवून देतात. दुसरे म्हणजे, ज्या शेतात मिलेट घेतले जाते, तेथे जमिनीतील नत्राचे प्रमाण वाढून जमिनीचा कस व पोत वाढतो. शेतामध्ये पिकांची विविधताही जपली जाते. काही पक्ष्यांचे हे आवडते खाद्य आहे. तसेच ज्या शेतात मिलेट घेतले जाते, तेथे अनेक रानभाज्या व इतर वनस्पतींची वाढ होते. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल राखला जातो. त्यामुळे याला 'जादुई धान्य' असेही संबोधले जाते.

अर्थात, आजच्या बाजारपेठीय व्यवस्थेमध्ये धान्याचे भाव व्यापारी ठरवतात, शेतकऱ्याला तो अधिकार नसतोच. मिलेट वर्षानिमित्त मिलेट धान्यांचे भाव सध्या वाढलेले आहेत, परंतु हीच परिस्थिती पुढेही राहील का, असा प्रश्न शेतकऱ्यांच्या मनात चुकचुकला तर तो रास्तच म्हणावा लागेल. यासाठी शासकीय यंत्रणेने तत्पर राहून आणि त्या अनुषंगाने सुयोग्य धोरण आखून व भरीव आर्थिक तरतूद करणे ही काळाची गरज आहे.

**(या वृत्तलेखांसाठी 'बाईमाणूस टीम'च्या संजना खंडारे आणि शुभम सोळसकर यांचे सहकार्य लाभले आहे. विशेष आभारः प्रशांत पवार, मुख्य संपादक, बाईमाणूस मीडिया रिसर्च फाउंडेशन. संपर्क : ९९३०८०३३२८)**



## मंगला प्रभूखानोलकर फाऊंडेशनचा

# तळागाळातील गरजूंना मदतीचा हात





जिल्हा परिषद शाळा घोडपापड शाळेतील विद्यार्थ्यांना युनिफॉर्म वाटप.



बोअरवेल भूमीपूजन सोहळा.



फौंडेशनच्या सौजन्याने अंबीसत्ते हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय ता. वाडा, जि. पालघर यांना साऊंड सिस्टीम व क्रीडा साहित्य पुरविले.




फौंडेशनच्या वतीने तालुक्यातील पाच जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना खाऊ वाटप केले.



जिल्हा परिषद शाळा घोडपापड येथील शाळेतील मुलांना पिण्याच्या पाण्यासाठी नवीन बोअरवेल लोकार्पण समारंभ.



फौंडेशनच्या वतीने वर्षभर पुरेल एवढी वह्या, पुस्तके, पेन, पेन्सिल, चित्रकला साहित्य. स्कूल बॅग व रेनकोट वाटप.

* संत गाडगेबाबा ट्रस्ट या संस्थेतील गरजूंना अल्पोपहार व दोन्ही वेळचे जेवण मोफत देण्यात आले.
* मंगला प्रभूखानोलकर फाऊंडेशन आणि जीवन विद्यामिशन, मुंबई यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांसाठी संस्कार वर्ग व अंधश्रद्धा निर्मूलन शिबीर, तसेच व्यसनमुक्ती शिबिराचे आयोजन वेगवेगळ्या ठिकाणी केले जाते.

**- मंगला प्रभूखानोलकर फाऊंडेशन**

Samatawadi MuktSanvad Patrika
Monthly Magazine- Publishing date- 1st of every month
PRGI NO-MAHMAR/2023/86554

